TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY

OU_192668

UNIVERSAL LIBRARY

# मुचकुंददरी

[illegible] ग्रामीण जीवनावरील स्वतंत्र
सामाजिक कादंबरी

लेखक
वि. ल. बर्वे, बी. ए., एल् एल् बी.

महाराष्ट्र ग्रंथ भांडार
मुंबई, नं. ४

प्रकाशक
शंकर वामन कुळकर्णी
संचालक
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगाव, मुंबई नं ४

★ ★ ★

या पुस्तकांतील मजकुराचे पुढील आवृत्ति, पुनर्मुद्रण,
रूपांतरहि सर्व हक्क लेखकानें राखून ठेवले आहेत.

प्रथमावृत्ति
एप्रिल १९४०

किंमत
दीड रुपया

★ ★ ★

मुद्रक
विठ्ठल वामन हडप
'आदर्श' मुद्रणालय
१२६ रामाचा गोट, सातारा ३

# आमचीं पुस्तकें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| (१) | आजचे स्वराज्य-ले वा वा जोशी, B A B T | ०-६-० |
| (२) | काम आणि कामिनी—ले कु० प्रेमा कटक | १-८-० |
| (३) | चौपाटीवर-ले डॉ श्री. वाळिंबे | १-४-० |
| (४) | सीतास्वयवर—ले प्रो० द सी. पगू, M A. | २-८-० |
| (५) | पूजन—ले वि. स खाडेकर | १ ८-० |
| (६) | करवीराच्या कळ्या | १-४-० |
| (७) | साजवात | ०-१०-० |
| (८) | मावळता चद्र (सामाजिक कादबरी) ले बा भ. बोरकर | १-४-० |
| (९) | पुष्पपराग-(लघुकथासग्रह) ले कु प्रभावळकर, B A | १-४-० |
| (१०) | काळे ढग-ले. वि बा आवेकर, एम् ए. | २-८-० |
| (११) | बेसूर सगीत (सामा कादबरी) ले कु प्रभावळकर, B A | १-४-० |
| (१२) | भडकत्या ज्याला अर्थात् आगामी महायुद्ध ले. श्रीकृष्ण रा पोतनीस एम् ए एल्एल् बी | १-८-० |
| (१३) | साम्राज्य व स्वराज्य—ले दा न. शिखरे, एम् ए | १-०-० |
| (१४) | विवाहानतर—ले प स देसाई | १-८-० |
| (१५) | बालसुहृद—ले. गो रा. चोळकर, बी. ए, बी. टी. | ०-१२-० |
| (१६) | बाभळवनात—ले शामराव ओक | १-४-० |
| (१७) | पिशाच्च प्रेम—ले प. स देसाई | १-४-० |
| (१८) | उजळत्या दिशा—ले वि द साळगावकर | २-८-० |
| (१९) | प्रवाह पतित—ले गो कृ पानसे | १-४-० |
| (२०) | माझे आवडते लेखक—ले. ग. त्र्य माडखोलकर | १-०-० |
| (२१) | चोरटे हल्ले—ले. अनत काणेकर | १-०-० |

## महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

# धुक्यांतून ★
# ★ लाल ताऱ्याकडे

लेखक—अनन्त काणेकर

युरोपांतील प्रवासाचे श्री. काणेकरानी लिहिलेले हें वर्णन आता-पर्यंतच्या प्रवासवर्णनपर पुस्तकांहून भिन्न असून, दोन रंगी नाविन्यपूर्ण मलपृष्ठ, आर्टपेपरवरील चित्रे, सुबक बाधणी व आकर्षक छपाई यामुळें हें संग्राह्य झालें आहे.

हें पुस्तक तारीख २०।७।४०पूर्वी विकत घेणारांस

**उत्तमोत्तम ग्रंथ विनामूल्य मिळणार आहेत.**

**कारण**— पत्येक पुस्तकात एक एक कूपन घालण्यात आले असून, त्यावर नंबर घातला आहे. यापैकी पाच नबर आम्हीं निवडले असून, ते सीलबंद पाकिटात निराळे ठेवले आहेत ते ता. २०।७।४० इसवी रोजीं उघडून केसरी, आशा वगैरे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील, व हे नंबर ज्या कोणाकडे असतील त्यांना त्या क्रमाकास आम्ही ठरविलेल्या लॉटचीं पुस्तकें विनामूल्य मिळणार आहेत. आम्ही ठरविलेल्या लॉटमधील पुस्तकांची माहिती काणेकरांच्या या पुस्तकात मिळेल. अगर आमचेकडे विचारणा केल्यास आम्हीहि ती पाठवूं.

किंमत २। रुपये + + + पृष्ठें २३०

प्रकाशक— सागर साहित्य, मुंबई ४

---

## सोल एजंट : महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

हिंदुस्थानच्या नष्ट झालेल्या
गुरांढोरांदि ग्राम समृद्धीस
सादर सप्रेम समर्पण

वि. ल. ब.

# प्रस्तावना

"मुचकुंददरी" लिहिण्याची उचल, माझ्या मनाला Thomas Hardy च्या कादबऱ्या वाचून, प्रथम झाली २।३ वर्षानतर मात्र मला त्याचें आश्चर्यच वाटते! दुसरा भाग मी लिहीत आहें. सध्या— Bee कवीहून जरा भिन्न—मला असे म्हणावयाचें आहे —

"कां 'जातीयज–वाद' नित्य अमुच्या
मार्गी पडे आडवा?
"याचा सार–विचार–बोध अजुनी
आम्हां नको का हवा?
"नाना–वर्ग–विमोह निर्मुनि जना—
केले निसर्गच्युत,
"ही कालोपहता समाज घटना
कामा नये सांप्रत!"

चिपळूण
ता. ३-३-४०

वि. ल. बरवे

# परिच्छेद-अनुक्रम


| | | पृ. |
|---|---|---|
| १ | मोर्च्याच्या माळावर | १ |
| २. | रावजीकाकाकडे राजबाजी फिर्याद | १३ |
| ३ | अवती व उद्धव | २६ |
| ४ | गौरीतला नाच | ३९ |
| ५. | हौसल्या व बबसल्या | ५४ |
| ६ | मनसूर व बहादुऱ्या | ६४ |
| ७ | स्थित्यतर | ८१ |
| ८ | वाघबारशी | ८६ |
| ९ | खांडक्यांची चळवळ | ९७ |
| १० | गाठीभेटी | १०९ |
| ११ | फजितवाडा | १२० |
| १२ | हाहाःकार | १२९ |
| १३. | मुबईचे टपाल | १४२ |
| १४ | अखेर गोत बसले | १५५ |
| १५ | निघालो परतून घरट्याकडे | १६६ |

# मुचकुंददरी

## १. मोऱ्यांच्या माळावर

"पोरि रम्ये, धाव व्हयन्या मनसुन्या बैलाला दबाव इद्रयावानी हकड कुट बगत्यस? तो तो म्होर व त्या फरदीला जालवडाशी! त्या त्या कोकबीच्या म्होर! थोरली वोड रयचा पळ नाग! गोठलाच्या यकुदा भातात जायूल अन तो हेरिच शिव्या खाल!" [illegible] नजरेच्या विश्रामाचे हे शब्द ऐकून रमीनें मनसूर बैलाच्या अनुपाला धूप ठोकली.

मुचकुंद दरीच्या डोंगर चालीवरील गोवटाने पाचपन्नास गुरें चालली होतीं. त्या साऱ्या गुरांना मागे टाकून मनसुन्या बैल गोल चालीनें सणकून पुढें निघाला. साऱ्या गुरांढोरांचा तो म्होरक्याच म्हणाना! रमी आपल्या पाठीवर येत आहे असे पाहून व तिनें उच्चारलेले 'फिर फिर, मनसुन्या' हे शब्द ऐकून ते शहाणें जनावर मागें फिरलें.

"आपल्या जागाळिणीला काय त्रास द्यायचा! नाहीं ना तिची इच्छा आपल्याला मोकळीक द्यायची? चला तर फिर मागें, आपलें काय! आता आपण हळूहळू गुरांच्या इतर जमावातून चालू" जणू काय हेच विचार मनात आल्यामुळे मागें फिरून मनसुन्या इतर गुरांच्या कळपात सामील झाला.

"दादा! आज गुरें कुटर न्येयाचीं?" रमीने आपल्या भावाला—विश्रामाला साद घालून विचारलें.

"मोऱ्यांच्या मालावर" विश्रामनें उत्तर दिलें.

"थकड नुको र! काजवीच्या पऱ्याला आउर आला म्हजी मग यया नाय गवसत व्हयत्या नकावड्या पोरींना—" गोठलाच्या केरूनें हरकत व्यक्त केली.

"नाय पर बेस चारा झालाय थकड, अन् गायरा पर बेस रमतात." चालक्याच्या चिमानें विश्रामाला दुजोरा दिला.

"पर आवरात मरशील ना फुकट?" केरूनें वक्रतेने प्रश्न विचारला.

"तुमी इकते बाप्ये असताना?" रमीनें फेर सवाल केला.

"बेस! मसणात का चलाना! सांगताय ता नाय! नाय त नाय!!" केरूनें क्रुद्ध होऊन कबुली दिली व सर्वजणाचा रोख गुरांसह मोर्च्याच्या माळाकडे वळला.

गोवडाच्या आजूबाजूला असणाऱ्या कित्येक गोठ्यातील गुरें या कळपात सामील होतच होतीं. माणसाप्रमाणें गुरेंहि कळपाचीं मोठीं मोक्कीं असतात. कुणी हंबरून तर कुणी बारिकसें डिरकण फोडून, एकमेकांना उल्हासानें इषारा देत होतीं लहान लहान वासरें तर आपल्या शेपट्या उभारून सर्वांच्या पुढें पळ काढीत अगदीं बोकलत निघालीं. होता होता कळपाला शंभर एक गुरूं जमलें. त्याच्या मागून जागळी जागळिणी मिळून कुळब्याचीं दहा पोरें तरी होतींच! यातील काहीं स्वतःच्या घरचीं गुरें तर काहीं गावच्या खोताचीं गुरें चरायला घेऊन जात होतीं. पेंढ्याची दुराई बांधून गवतें राखावयाला अद्याप महिनाभर अवकाश असल्यामुळें कुणाचींहि गुरें कुठल्याहि चरणात न्यायला अद्याप हरकत येण्यासारखी नव्हती. मोर्च्यांचा माळ तर त्यातून साऱ्या जागळ्याच्या आवडीचें ठिकाण. मुचकुंददरी गावच्या उगवतेस रखवालदाराप्रमाणें उभ्या असलेल्या डोंगराच्या सपाट माथाडीलाच मोर्च्याचा माळ असें म्हणत असत. हा मैल दोन मैल लांबीचा माळ संपल्यावर त्याच डोंगरानीं दक्षिण बाजूला उतरत जाऊन आपले पाय अगदी खाडींत रोवले होते. खाडीच्या दक्षिण किनाऱ्यावर त्याच पेहेलवानी थाटात पवित्रा देऊन उभ्या असणाऱ्या डोंगरी सुळक्यावर एक जुनाट काळवत्री दगडाचा किल्ला आहे. या किल्ल्याच्या उंचीइतकीच, मोर्च्यांच्या माळाची उंची असल्यामुळें, या ठिकाणात तोफाचे मोर्चे बांधलेले अद्यापहि नजरेस येतात. दक्षिणेकडून येणारी खाडी मुचकुंददरीच्या लगत्यानें लांबवर पश्चिमेकडे जात असलेली, मोर्च्याच्या माळावरून जितकी मोहक दिसते, तितकी मुचकुंददरींतील कोणत्याहि ठिकाणाहून दिसण्या-

सारखी नसल्यामुळें जागळ्याचे पाय याच ठिकाणाकडे धाव घेत. या ठिकाणाहून मुचकुंददरी गाव तर अख्ख्याच्या अख्खा दिसून येईच, पण पश्चिमेकडे जाणाऱ्या खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावरील समांतरानें पुसट पुसट होत जाणाऱ्या माडापोफळीच्या काळसर रेघा, त्याच्या आणखी दक्षिण उत्तरेस असणाऱ्या झुपकेबाज पण ठेंगण्या कलमांच्या कुट्टसर हिरव्या पट्टया, अधून मधून भातांचीं हिरवींचार क्यारेर, या खाडीच्या आसपासच्या खेळातील दंड मानला तर त्याला पाठ्याप्रमाणे दिसणारे व जूनीं येवून मिळणारे गढूळ पाण्याचे ओव्हर व पऱ्हे, या सर्वांच्या पाठीमागें हिरवाळलेले पण पावसातल्या धुक्यानें धुदकारलेले डोंगर, व या साऱ्यांच्यावर, काळसर पण पिठाळलेलें आभाळ!!

कुळवाड्याचीं पोरें झालीं म्हणून काय झालें? सृष्टीला बेहोष स्थितींत पाहायचा मोह त्यानाहि अनावर होई.

"क्येम रमतिल गुरा आता, असा आणा बरी येकुतल्याची इरली माज्या म्होर! तुन तुनाऱ्या इरलीला टुणटुणी हाय?" विश्रामानें घोंगडीची खोल जमिनीवर टाकून बैठक मारली.

सर्वांच्या इरल्याना टुणटुण्या होत्याच.

इरल्याच्या आतल्या बाजूस सागाडीच्या आडव्या दांड्याना सुर्मांडाची बारीक तात खूप ताण देवून पण सागाडीपासून अलग अशी आवळतात. सुर्मांडाची तात न मिळाल्यास, 'आस्वलीची वट' नावाची काळसर बारीक वेल घेऊन तिचाहि तंबुऱ्याच्या तारेसारखा उपयोग करतात. एक तात मंद्र सप्तकात तर दुसरी, तार सप्तकात! मग डाव्या उजव्या हाताच्या अनामिकानीं ठराविक प्रकारचा गावठी ताल वाजवू लागल्यावर जागळीचसे काय? पण पावसाचें पाणी थिबकणाऱ्या आम्रशाखा, सागाचीं रुंद रुंद पानें, काजूच्या पानाचे गोलदार झुबके, सुस्नात वनवेली, चरणारीं गुरें व झुलता झाड झडोरा भुवनसुंदराच्या चलत् चित्रगृहात श्रोत्याप्रमाणें तल्लीन होऊन तें वादन प्रहरान् प्रहर ऐकत राहतात.

प्रत्येक इरली तपासून पहाल्यावर त्यातून चिमाची इरली विश्रामानें डोक्यावर घेतली. थोडा जादा ताण देवून मनासारखा नाद आल्यावर

'हा आता करा सुरवात' म्हणून सर्व तुणतुण्या वाजवायला हुकूम दिला.

तणन् तणन् तण ताण् ताण्! ताण् ताण्—

एकजात पाचसात ततुवाद्यें सुरू झालीं

कल्पनेबाहेर जम बसल्याचें अनुभवाला येताच विश्राम गाऊंहि लागला.

आला आला सरावण
गवत वाढे सणामण
म्हन् म्हन् पावसाचा गीत
पिकव त्या नादावर शेत ॥ पिकव त्या नादावर शेत ॥

"पिकव त्या नादावर शेत" या अक्कड कडव्याचा कढ जेव्हा इतर जागळ्यानी ओढला तेव्हा तर वासरेंहि त्याच्या जवळपास येऊं लागलीं.

"इस्राम, इस्राम, तुज्या धोगडीची घुग्रा घेरे रम्ये, जा ग आन् तो घुग्राचा गट आपुन या गान्यात घुग्राचा जम बसवू" ही चिमाची सूचना रमीनें तात्काळ मान्य केली

कुणबी लोक पावसात घोगडीची खोल करून डाकीवर घेतात आणि ती उस्कटू नये म्हणून एक लोखडी वीत दीड वीत ताडी खोचून ताडीच्या पुढील टोकाला दहावीस पैंजणी घुगुराचा गट लटकावून देतात विश्राम हा बारा पधराचाच पोऱ्या! पण कमालीचा नादी होता त्याच्या गळ्यांत माणग्याच्या नळीचे एक अलगुजेही लटकत होतें.

चिमाने त्या गाण्याचा तोल साभाळून घुगूर घुमवायला सुरवात केली. घुगुरध्वनि अगदीं तालबद्ध चालू लागला

थोडा वेळ झाल्यावर चिमाचें कौतुक करण्याकरता विश्रामानें तिच्याकडे एक हासरा निक्षेप केला. त्या हासऱ्या नजरेबरोबर चिमाचे गोरे गोरे गाल लाल रगाची उघडमीट करू लागले

चालक्याची चिमा ही बारा वर्षांची पोर, पण इतर कुणबी पोरींपेक्षां अगकातीनें, चणीनें व तरतरीतपणानेहि फार निराळीच दिसे. कुणीहि खुशाल म्हणावें कीं कुळबी पेहरावातली ब्राह्मणाचीच मुलगी आहे म्हणून! प्रत्येक जागळ्याला वाटे कीं आपलें हिच्याबरोबरच लगीन व्हावें. ती मात्र खरेखुरें विश्रामाचें लाडपण करी व तो विश्रामहि तिच्यावर तितकाच भाळलेला

दिसे. विश्रामाची बहीण रमी ही बारा वर्षांची असूनहि 'इदव' होती केरू गोठलाची बहीण लाडी हीहि विधवाच, पण नवदा वर्षांची विधवा! केरूची धाकटी बहीण गुणी ही दहा वर्षांची असून चिमाप्रमाणेच कुंवार होती चिमाच्या देखणेपणामुळे तिचा बाप—तात्याबा चालका—तिचे अद्याप लग्न न करता पुष्कळ 'देज' (हुंडा) मिळेल या वेड्या आशेवर गुतून होता.

गोठलाचा केरू चांगला सतरा अठराचा असावा चिमाशीं लगीन व्हावें हें त्याचें मोठें मोठें सुखस्वप्न!! यामुळे तो विश्रामशीं नेहमीं हेवादावा करी. शिवाय आपली धाकटी बहीण गुणी ही विश्रामालाच देण्याचा त्याच्या बापाचा—राजबा गोठलाचा निश्चय असल्याचे त्याला पूर्ण माहित होतें अन् विश्राम तर गुणीकडे ढुंकूनहि पाहत नसे! यामुळे तर विश्रामाचा त्याला अतोनात राग येई.

चिमा व विश्राम एकमेकाकडे पाहून हसलेलीं दिसताच केरूच्या तळ-पायाची आग मस्तकात गेली

"वाजाप थाबवा रे! इश्या! तू अन् चिमा हासताव का र?" केरू अगदीं एकदम तेरीमेरीवर आला

"पर वाजाप थाबवाया सागनारा तू असा कोन् खोत लागून ग्येलास र!" पड्या पाणकराने ताडकन् सवाल केला पड्या पाणकर हा अकरा बाराचा बारिकसा पोर. पण मोठा चिमखडा!

"पड्या चिप ऱ्हा. मर्दी घायला येवु नुको. कसा पर सपाटा दाविन् म्हनतोइस! व्हय र इसराम? तू गुनीकडे कदीच पाउन हसत नाइस अन् चिमाकडच पाहुन बेस हसतोस?"

"त्या कुसल्या म्होऱ्याकड पाउन कोन र हसल?" विश्रामनें गुणीच्या चेहऱ्याला उद्देशून उत्तर दिले. या सरळ रोखठोक उत्तराने केरू तर जास्तच भडकला. गुणीलाहि मनात फार वाईट वाटले अगदीं कायमचे ध्यानात राहाण्याइतके केरूला अधिकच भडकवण्यासाठीं कीं काय विश्रामनें स्निग्ध नजरेनें फिरून एकदा चिमाकडे पाहिलें.

"तुझें पहाणे मला फार फार आवडतें" अशा आशयानें चिमानेंहि विश्रामला गोड नजरेचें उत्तर दिले. व पुन्हा—

"काय मेल्याचा म्होरा!" हा तुमडेपणा व्यक्त करणारा आणखी एक दृष्टिनिक्षेप नतर तिनें केरूकडे फेंकला.

"करा र वाजपाला सुरवात" असे म्हणून विश्राम फिरून तुणतुणी छेडूं लागला. केरूला तें सहन न होवून विश्रामच्या हातातील तुणतुणी त्यानें तोडून टाकली. त्या झटापटींत चिमाची ती इरलीहि विस्कटली, वरच्या केवड्या-च्या पातीहि फाटल्या व सागाड्याच्या एक दोन कडसराहि मोडल्या!

विश्रामनें केरूच्या ताडकन् मुस्कटात भडकावली

आता दोघेहि वीर मारामारीला सज्ज झाले.

"डुक्कर म्यला! व्हह बाजूला" चिमा केरूवर खेंकसून म्हणाली.

"अन् हा बोकड इतका का माजला पर!" करूचा कड घेऊन लाडी विश्रामवर धावत आली. लाडी ही खरोखरच काळीकुट्ट अन् गुबदुल होती.

"खबरदार केन्या"

उच्च स्वरात आवाज आला.

"कान्तुदा आला वाटतों!" रमीनें हायसें वाटून बोलून दाखविलें. इतक्यात आलाच 'कातुदादा' पुढें.

त्याबरोबर केरू बाजूला सरला. सुकातकडे पाहून विश्रामनें खेळकर हास्य केलें.

सुकातहि त्याच्याच शिणेचा असून आस्वलीच्या वटी शोधीत शोधीत इकडे सहज आला होता

"काय झाले रे केन्या? आडील खोंडासारख वतरण का टाकीत होतास? आन् ही इरली कशी फाटली? गुण्यागोविंदाने गुरें चारायचीं सोडून, वा गोड गोड चकवे म्हणायचे सोडून, मारामारी रे कसल्या करता? केन्या! आहे तुला मारामारीची गुर्मी? विश्राम, मार रे मुद्दा"

सुकातच्या प्रोत्साहनाबरोबर घोगडीची खोल टाकून विश्राम पुढें झाला.

"जाउद्या हो दादानु! मी जाताय गुरा येकाराया" असें म्हणून केन्यानें पाय काढला सुकात हा विश्रामची बाजू घेईल हे केरू पूर्ण जाणून होता.

"आता कसा तरसान पाय काडलान्!" पड्या पाणकर केरूकडे पाहून मिस्किलपणानें म्हणाला.

"पंड्या काय झालं रे?" विश्रमनें अदबीनें दिलेल्या घोंगडीच्या खोलीवर बसत बसत सुकातनें विचारलें

"अवो झाला काय? आमी मोप वकत, बेस चागल्या टुगदुण्या व जवित व्हताव, आनू इस्लाम गाना बोलत व्हता तों माधिन कुट या इयागिरदाराचा कत्राबडा पादला! तू चिमाकडच बगुन का हासतोस? तू गुणीकडे बगुन का नाय हासत! यक ना दोन! हेरींच लागला बडबडाया. आनू जो जो आला तो यकदम् चिमाच्या इरलीवर घसरला त्या आस्वलीच्या बटा तोडुन, पाना फाडून, सागाड्याच्या हातभर बावकाड म्वोडलान्! आता ही पोर पाऊसभर काय करनार बरी?"

खरच काय करणार याचा आढावा घेण्यासाठींच कीं काय सुकातहि चिमाकडे पाहू लागला. जागळयापैकीं कुणालाहि न लाजणारी चिमा सुकातच्या नजरेबरोबर त्याकडे पाठ फिरवून उभी राहिली. तिच्या उजव्या गालाचा लालवडणारा भाग सुकातला दिसतच होता. त्या पाठम्होऱ्या अटकुर बाध्याकडे पाहण्याचीसुद्धा सुकातला गम्मत वाटली.

"चिमा तुझी इरली मी नीट करायला सागेन कुणाला तरी! कोण रे चागली इरलीं वळतो आपल्या वाडींत?" सुकातनें चौकशी केली.

"तिचा बावास अन् दुसरा कोन?" लाडीनें उत्तर दिलें.

"म्हणून काय तिची इरली फाडायची? देस बरी तू आपली तिला" विश्रामनें लाडीला सागितलें.

"लाड्ये, चल आण तुझी इरली." सुकातनें हुकूम केला,

"जाउद्या दादानु काय हाय त्यात! बावा मना असल्या पाच करूनशान द्यतील" चिमानें तोंड वळवून विनवणी केली.

चिमाच्या या उत्तरानें त्या प्रश्नाचा शेवटच झाला.

"पर तुमी आज इकड कुट वाट चुकल्यव?" विश्रामनें विचारलें.

"खर सागू विश्राम, तुमचें तें टुणटुगे मला फार फार आवडलें. आपणहि आस्वलीच्या बटी शोधून आणून घरच्या एखाद्या इरल्याला सांधाव्या म्हणून घराहून निघालों—"

"पर कुट मिळाल्या काय?" पड्यानें सलगीनें सवाल केला.

"कुठें नाहींच उमगत त्या"

"बगता बरि कुट मिळतात शा. य र पड्या माज्यासग" असें म्हणून विश्राम व पड्या दूर कुठेंसे धावत गेले

त्याच्या टणूटणू उड्या मारीत जात असण्याकडे पहात असताच, दुरून कुठून तरीं सुकातच्या कानावर—

डो ओ, डो ओ, फटकिचा डो ओ!

आल्या गेल्यावर फटकिचा डो ओ!!

काल्या बामणावर—डो ओ डो ओ!!!

तरल व अस्फुट अशी स्वराक्षरें आलीं. सुकातला मोठी गम्मत वाटली. हा तर केरूचा आवाज हें त्यानें ओळखलें पण त्या आवाजाला इतका गोड कंप कसा आला हेंच त्याला समजेना. आपले सारें भान त्या स्वराकडेच केंद्रित करून उघडया जिवणीने व मिटल्या डोळ्याने तो फिरून ऐकू लागला.

"चिमा चिमा, हें कसल ग गाण?

"अव याला डो बोलतात"

"हा डो कसा ग घालायचा?"

"इस्! मी नाय दावीत!" हासत चिमानें मान खालीं घातली.

"तू दाखवू नकोस! सुमता मला साग कसा घालायचा डो तो!"

"अव हाय काय त्यात. तुमचा हाताचा आगठा हाय ना, त्याचें पेर मानेच्या म्होरल्या बाजुन नरड्याच्या मनगाजवळ सारखा हापटायचा, आन त्वांडाने डो बोलायचा" चिमा सागत असतानाच सुकातनें डो घालायची पूर्ण तयारी केली

"डो ओ, डो ओ, फटकिचा डो ओ!

केऱ्या गोठलावर फटकिचा डो ओ!!"

इतका डो घालून झाल्यावर तो थाबला. एखादी अस्सल उत्साही चीज, तिच्या साऱ्या वजनासह आत्मसात् केल्यावर, गळेबाज शिष्याला जो आनद होतो, तितकाच आनद या वेळीं सुकातला झाला होता. त्या आनदाच्या भरांत तो असतानाच जवळच्या साऱ्या आगळिणी खुदखुद हासल्या. त्यानेंही मान बाजूला करून हसें दाबलें! हेतू इतकाच कीं त्या आणखी हसाव्या!!

केऱ्यानें घातलेल्या डोला सुकातने उत्तर दिल्याचें ऐकून, आस्वलीच्या बटी घेऊन येणारे विश्राम व पड्या, मोठमोठ्याने व लाबलचक डो घालूं लागले.

त्या डोचा ध्वनि आसमनात लहरी लहरीने हेलावू लागला. डोंगराच्या पायथऱ्यानें जणु काय तो आदळतच चालला होता!!

त्या डोला उत्तर म्हणूनच कीं काय—

प्रथम काही वेळ नुमताच घोषनाद, नतर थड् थड् थड् थड् शिंतडे, व फिरून वाढत्या घोषनादातून पावसाचा घळघळाट सुरू झाला अगदीं मुसळधार.

ज्यानें त्याने डोकीवर इरली चढवली. सुकातने आपली छत्रीहि तिरकस धरली. पश्चिम बाजूनें वाराहि जोराचा वाहू लागला

पश्चिमच्या बाजूनें सुकात भिजू नये म्हणून विश्रामहि त्याच बाजूला येऊन कमरेला बाक काढून उभा राहिला. सारे जागळी व जागळिणी एका ठिकाणीं मिठाळलीं. केरूहि लाबून धावत आला. तोहि या राखर्डीतच सामील झाला.

वाऱ्या पावसाच्या वाढत्या सरवटामुळें गायरानीं चरायचें सोडून एका ठिकाणीं जमाव केला. पुढील दोन पायामधें मुस्कीं घेत घेत त्यानींहि फेर धरला. मध्ये मुडकीं व बाहेर धडे, अशा पद्धतीने अग भोवरीत भोवरीत तीं उभीं राहिलीं

म्हसरें मात्र वाय् वाय् करीत खुशाल आनदाने चरगणावर रमलीं होतीं.

आड धरलेली छत्री मधून मधून बाजूला करून विस्फारल्या नयनांनीं सुकात मुचकुददरीसह पश्चिम दिशेकडे पहात होता आकस्मिकता, विभ्रम, भव्यत्व, विशालता, गुरुत्व, सामर्थ्य, अनतत्व आदिकरून साऱ्या उदात्त भावनानीं शोभून दिसणाऱ्या या पाऊस—झडींमुळें त्याच्या विशाल हृदयातहि त्याच भावनाचे तरग क्रमशः विस्तार पावत होते. आणि नतर मनांत हेहि विचार येवून गेले—अर्थात् अगदीं पुसट स्वरूपात—

—असल्या उदात्त पार्श्वभूमींत ज्या शेतकऱ्याचे जीव रगून निघतात त्या शेतकऱ्याच्या हृदयात केवढी प्रचड उदात्तता सामावून रहात असेल! ती व्यक्त करण्याला वाव न मिळाल्यामुळें त्याच्या अखिल जीवनाचें मोल

कुऱ्याकोंबड्याच्या किंमतीइतकेंहि होत नाहीं. आपण मात्र भव्यतेला, या विशालत्वाला आपल्या जीवनात कायमचें स्थान प्राप्त करून देणार!—सुकांत असल्या विचारात दग असताच—

"आता हतच बसून काय करताव? ती बघा गायरा निघालीं! नाय थोपात या टोंबात!" केरूनें ओरडून सर्वांना इशारा दिला.

"इचिभन् खरच! पड्या, आन तीं रेडका! आपुनबी पाठोपाठ जाऊं" विश्रामनेंहि 'ह्रहाय! हल्या' करून म्हसराना इशारा दिला.

"आता काजवीच्या पऱ्यावर व्हनार बोंबाबोंम. सोपला नाय उतार घ्यायाचा!" लाडी म्हणाली.

"गायरा, म्हसरा, आन् हे बाप्ये जातील पल्याड! आन् आम्ही" म्हणून चिमा भीत भीत विश्रामच्या व सुकांताच्या मुखाकडे पाहू लागली. चिमा आपल्याकडे पहात आहे असे पाहून सुकांतला, आपली छाती थोडी-फार रुंदावली असल्याचा पौरुषी भास झाला. त्याच्या उमरीच्या कुठल्याही मुलापेक्षा तो जास्त कणखर होता हें खचित्! मग त्याला आपल्या पौरुषाचा का बरें अभिमान वाटणार नाहीं?

गुरावासराच्या पाठीमागून तो सारा जागळीवर्ग सुकांतासह चालू लागला. पावसाच्या सरीवर सरी सुरूच होत्या.

काजवीचा पऱ्हा! अरे बापरे—!

तो नुसता फोफावून वहात होता. नेहमींच्या उतरण्याच्या खालच्या बाजूला पाण्याचा वेग थोडा कमी व्हावा म्हणून मोठमोठाले धोंडे बाधोळी-सारखे रचून ठेवलेले होते. गढूळ चहाच्या रंगाचें पाणी हत्तीच्या अंगा-एवढें अगदीं पवन वेगानें धावत होतें. धोंडीच्या बाधोळीवर हापटून कोंबड्याच्या डोक्यावरील तुऱ्याप्रमाणें तें फेसाळत होतें.

विश्रामानें प्रथम पऱ्ह्यात रेडकें चेंपलीं.

एका रेडकाच्या पाठीवर पड्या पाणकर स्वार झाला व पल्याड गेला. त्याच्या मागून गाई व बैलहि तशींच पलीकडे झालीं. विश्रामनें व केरूनें वासराचे कान धरून त्याना एकामागून एक पऱ्ह्यापलीकडे काढलीं.

सुकांतला अशा वेळीं मुळींच स्वस्थ बसवेना.

तो झपकन् चिमाजवळ गेला.

"मी नेतों तुला पलिकडे" असें म्हणत उजवा हात मांडीखालीं व डावा हात मानेखालीं घालून सुकातने चिमाला अलगज उचलली. पाण्याच्या लोंढ्यातून तो मोठया धीराने पण चाचपडत असा चालला होता. पाणी कमरेच्याहि वर झालें. आपल्या हातातील त्या कवळया सौंदर्याचा बोजा त्यानें आणखीहि वर उचलून धरला.

या वेळीं त्याचा उबदार श्वास चिमाच्या नाजूक व रेखीव मुखावर जोरानें हबकत होता. चिमानेंहि आपली गहिरी नजर सुकातकडे लावली होती. त्या नजरेंत--

माझ्यासारख्या गरीब कुळब्याच्या पोरीला तू अशी अलगज उचलून नेतोस हा तुझा मोठेपणा मी ठेवू तरी कुठें व सांगू तरी कुणाकुणाला! तू थोरामोठया घरचा, मी काय—? तुझी कशी व केव्हा उतराई होऊ! —हेच विचार भरलेले होते.

बहुतेक आता आपण पलिकडे आलों असा आत्मविश्वास आल्यावर चालता चालताच सुकातनें आपली नजर क्षणभरच चिमाच्या गहिऱ्या जहर नजरेकडे लावली त्या वेळीं कसला तरी त्याचा त्यालाच न उमज पडणारा गोंधळ--भावनाचा गोंधळ त्याच्या मनात सुरू होता. त्याच्या हाताची पकडहि घट्ट झाल्याचें चिमाला तात्काळ समजून आलें.

तो पाण्यातून पलीकडे झाला व अलगज् चिमाला उभी राहू दिली. ती उभी राहाताना तिच्या उजव्या गालाचा ओझरता स्पर्श सुकातच्या ओठाना झाला.

त्याच्या अगावर क्षणभर अननुभूत असा शहारा सळसळला.

"इस्राम, तू आता पल्याड हो आन गुनीला घेऊनशान ये बरं" केऱ्यानें सुचविलें.

"मना नाय व्हनार तां." विश्रामनें सांगितलें.

"का र? ती तुझी नावरशीची न्होवरी हाय ना?" केरूनें फिरून विचारलें.

"ती मसनात का जाय ना!!" विश्रामनें बेशक उत्तर दिलें.

"बार, बार, याद ठेव हा! बाबाना सांगता बरं तू काय म्हनतोस तां"

अशा तऱ्हेनें बजावीत केरू पल्याड जाऊन गुणीला घेऊन आला. विश्रामनें आपल्या बहिणीला हातीं धरून आणलें. त्याच्या मागोमाग लाडीहि हळूहळू आली.

चिमाला सुकातानें उचलून नेल्याबद्दल विश्रामाशिवाय प्रत्येकाला कसेंसेंच वाटत होतें. विश्रामला मात्र कौतुकच वाटलें.

विश्रामानें मला का उचलून नेलें नाहीं याची गुणीच्या हृदयाला सारखी टोंचणी लागली आजच्या सकाळचे हे दोन्ही प्रसग गुणी जन्मभरहि विसरली नाहीं. विश्रामबद्दल तिला एक प्रकारची तीटच बसली म्हणा ना!

त्या दिवसापासून चिमाच्या भावनात मात्र भलतेंच स्थित्यतर झालें. मात्र विश्रामवर व सुकातवर केरूनें त्या दिवसापासून भयकर दात धरला.

वेडीं पोरें!!

आपल्या बालभावनाचे भलतीकडेच मोर्चे लावून बसलीं!

# २. रावजीकाकांकडे राजबाची फिर्याद

मुचकुददरींतील गावचा बलुतेदार न्हावी गेले पधरा दिवस अथरुणाला खिळून राहिल्यामुळें, गावातील कामाची ओरड होऊ नये यासाठीं बाहेरच्या गावातला कारागीर आज रावजींच्या घरीं काम करायला आला होता. "रावजीकाका खोत फार कडक आहेत फार फार अदबीनें काम उरक" असें गावच्या न्हाव्यानें आगाबूच बजावून ठेवलें असल्यामुळें या परक्या माणसानें फार अदबशीररीत्या रावजींच्या पडवींत येऊन रामराम केला.

"कोण रे ?"

"मी ता ! काम कराया आलाय"

"घे ती बैठक आतून मी साबण पाणी घेऊन येतों" असें म्हणत बगोबा मास्तर आत गेले

स्वतः साबण पाणी आणायला ज्या अर्थी हा गृहस्थ गेला, त्या अर्थी रावजी खोत म्हणतात तो हा नव्हे असें त्या कारागिरानेंहि तात्काळ ओळखलें. काम करताना खूबसें बोलून खोताची सगळी इत्थंभूत चौकशी करण्याचें त्यानें ठरवलें.

बगोबा मास्तर व कारागीर याची तावडतोब बैठक जमली. बगोबा मास्तरानीं आपला जस्ती फ्रेमचा चष्मा उजव्या हाताला काढून ठेवला. त्याबरोबर कारागिराने मात्र, आपला चष्मा—तसल्याच जस्ती दांड्यांचा—आपल्या डोळ्यांवर चढवला.

"तुम्ही म्हजी मोठ्या रुवताचे--"

"मी याच्या घरीं मुलाना शिकवायला मास्तर म्हणून आहे—"

"इतकीं मोप मुलं हायत घरांत !"

"मुलें म्हणजे काय? एक त्याची मुलगी व दुसरा त्याच्या मामेभावांचा मुलगा। अशीं दोनच! मोठीं फडीं पोर आहेत! गेल्या पाच वर्षांत मराठी शिक्षण सपवून आज इग्रजी पाचव्या यत्तेचा अभ्यास करताहेत! अन् वय म्हणशील तर किती? ती अवघी तेराची व तो पधराचा! हो सुकात फार फार तर पधराचाच असेल—!" शेवटचें वाक्य मास्तर स्वतःजवळ म्हणाले.

"म्हजी खोतास्नी यकुन मुलगा नायच तर—?"

"छेः! एकच मुलगी. पण कीं नई या सुकातवर त्याचा पोरीइतकाच जीव आहे. अरे मुजसुद्धा त्याची यानींच केली इथे. सुकातचे दुसरे आहे कोण? थोरल्या तापसरींत सारीं माणसें खलास! अगदीं नागर फिरला घरा-वरून! तेव्हापसूनच यानीं स्वतःच्या घरीं आणून इतका तयार केला. अगदीं पोटच्याच मुलासारखा तो! त्यात बाधा नाहीं—!"

"आसा नाय? व्हावारे व्हावा! खोताची कारबारिन पर—"

बगोबा मास्तरहि आता ताडताड उत्तरें देवू लागला—

"अरे आहे कुठें कारभारीण? ती मरून सुमार आठ वर्षें झालीं. घरात सगळें काहीं करणारी अवतीची मावशी."

"शबास मावशी बायनूची!! खोताची इस्टक लइ असल नाय? म्हजी आपला हेरिंच इचारताय व—"

"इस्टेट म्हजे? या होल मुचकुददरीचा सोळा आण्याचा खोत! नुसता व्यायशीं खडींचा—म्हणजे चार विसा अन दोन—मक्ता येतोय दरसाल. वीस खंडी नाचणी एका मापावर घेतों मी मोजून!! हीं सारीं मापें बिपें घेतो कोण? मीच!"

समोर धरलेल्या आरशात, आपल्या मिशीवरून हात फिरवलेला बगोबा मास्तरनीं पाहिला, व स्वतःचें महत्त्व कारागिराला पटवून दिल्याची स्वतःची खात्री केली.

"तुमी हाव म्हजी मग काय? बगायाच नुको!"

"माझ्यावरहि आहेच त्याचा तसा विश्वास. एका वर्षभऱ्यात हीं दोन्ही पोरें मॅट्रिकच्या परीक्षेला पाठवतों!! हमखास पास व्हायचीं तीं! मुंबईच्या मोठ्या हायस्कुलात माझें नांव अजून गरजत आहे?"

"तुमी हुंच्य काय कायमचीच सोडलीत? अन् खटलं?"

"तेवढें विचारू नको. थोडक्यात सांगायचं म्हणजे मला बायकोहि नाहीं व मुलेंहि नाहींत!"

तो कारागीर नंतर काही वेळ गप्प बसला.

इतक्यात रावजीकाकांच्या गड्यानीं एक पोफळीचें शिंपुट व एक हारा-भर शहाळीं आणून पडवीला पायठणीबरोबर ठेवलीं. त्याकडे कारागिराची नजर जाताच त्याला फिरून वाचा फुटली.

"या मुचकुंददरींत नारली फोपलीच्या बागा दिसतात त्या पर तुमच्याच खोतांच्या वाटता?"

"बारा आणे आमच्या म्हणस ना? कुठे विरळा इतर ब्राह्मण लोकांच्या आहेत. तीच गोष्ट कलमाची. आम्ही एकमापी हजारएक रुपयाचा कलमी आंबा मुंबईवाल्याला देतो दरसाल! पुढल्या सालीं वैशाखात ये हो! तुला आंब्यानीं होरून काढीन!" बगोबा खुशींत येऊन म्हणाले. समोर आरसा होताच!

"जगल्या वाचल्या यवू त काय! पर आज मला जाता जाता चार व्हयत्यातलीं फोपला मातुर द्या हा!" कारागिरानें सहज खडा टाकला.

"देईन रे बुवा! घाबरतोस का? आधी तेल चांगलें रगड."

कारागिरासमोरच्या बैठकींत तेलाचें रगडणें म्हणजे अगदीं विहिणींच्या रासन्हाणापलिकडचें.

कोंकणच्या आडगावांतून अद्यापहि ही पद्धति आहेच.

बगोबा मास्तरच्या केसाळ कानांत प्रथम तेल जिरवल्यावर कारागिरानें आपला मोर्चा वर शिरोभागाकडे वळवला. गवाणीच्या कळकावर एखाद्या बैलानें अगर रेडक्यानें आपले शिंग सारखे हापटीत रहावें तसा काहीं काळ भास झाला. माथ्याची व मानेची शिरन् शीर रगडून झाल्यावर प्रत्येक नखाच्या जिवाळीला कारागिरानें तेलाचें बोट लावलें.

मास्तरनीं आता कारागिराकडे पाठ फिरवली—

तोंच समोर रावजीकाका आले.

कारागिरानें घाईघाईनें उठून मोठा थोरला रामराम केला. त्या राम-रामांत नुकताच ऐकलेला रावजींचा थोरपणा व त्या नवख्या कारागिराचा

आडगांवी विनय, ओतप्रोत भरलेला होता.

"हहह कामावरून उठून नको रामराम करायला! हहह बस! ब-अ-स! हहह कसा का आय हात आहे—ए मास्तर या पाव्हण्याचा?" रावजी चोचरत बोलले.

"हात मोठा गोड. तुम्ही करवायला हरकत नाहीं." मास्तरनीं उत्तर दिलें. इतक्यात मास्तरच्या शेंडीला गाठ मारून कारागिरानें त्याच्या पाठीवर थाप दिली. त्याबरोबर आपला चष्मा उचलून उठलेच मास्तर

सर्व काहीं स्वच्छ करून कारागिरानें दुसरी बैठक आरंभली.

अगदीं नवी विटी नवें राज्य! आता तो आपला कारभार गुपचुप हाकीत होता. थोड्याच वेळात बाहेरून एक पोलिस अम्मलदार आत आला.

"रामराम साहेब!" तो उभ्या उभ्याच बोलला

"कोण? रावजींनीं मान न फिरवताच विचारले.

"मी हेड कानिष्टिबल. कामगिरीवर जात आहे या पुढच्या गावीं. खेडला तुमचें नाव ऐकलें, म्हटलें जावें रामराम करून. आपली माझी ओळख नाहीं तशी! मी नवीनच आलों आहे बदलून खेडला——"

"अस्सें! हहह बसा त्या खुर्चीवर!"

कानिष्टेबलनें स्वतःच खुर्ची तिथपर्यंत उचलून आणली व बैठक मारली

इतक्यात घरातून सुकातहि शीळ घालीत तिथे आला.

"हा आपला छोकरा काय?" अम्मलदाराने सलगी वाढवण्याच्या उद्देशानें विचारले

"माझाच हहह म्हणा ना! काय रे हह कातू! खर सागू हहह तुम्हाला अम्मलदारसाहेब? मी लहान हह पणापासून हहह चोचरा! आमच्या मामे हहह भावाचा हा अतिशय बोलका मुलगा पाहिला व आणला हिंतें हहह माझ्याकडे!" अगदीं मोकळ्या स्वभावानुरूप रावजी खरे तेंच सागत होते.

"काका, याना चहा ठेवायला सागू ना?"

"तेंच मी तुला हहह सागणार होतो. थोडा या कारागिरालाहि हहह झाला म्हणजे आणून दे ह!"

कारागिराच्या मनावर रावजींच्या स्वभावाचा भलताच उमदा प्रकाश पडला.

मात्र त्या पोलीस अम्मलदाराला थोडाफार रागच आला.

"आपली व या न्हाव्याची सारखीच बडदास्त ठेवायची म्हणजे काय?" हे विचार एकदम त्याच्या मनात आले.

"इहह किती वर्षं नोकरी झाली इहह या खात्यात?—"

अशा तऱ्हेचें बरेंच मामुली बोलणें चालणें चाललें होतें.

कारागीरहि आपल्या सर्व कसबाची पराकाष्ठा करीत होता. रावजीहि अगदीं खूष होऊन उठले.

सुकातनें दोघानाहि चहा दिल्यावर—

"कारागीर, तुझा चहा पिऊन होईपर्यंत माझें काम मी स्वतःच उरकतों हां" असें म्हणून सुकातनें सुरवात केली. त्याला काय नुसते कटच तोडायचे होते!

"अव न्हाउ द्या." कारागीर भयभीत होऊन उद्गारला.

"इहह करू दे रे काय इह करतोय तें. तू आपला चहा पी." असें म्हणून रावजी सुकातकडे कौतुकानें पण दुरूनच पहात होते.

आपले छोटेसे कट सारखे करून सुकात पार आघोळीला पळाला.

"मोठा वस्ताद आहे हा!" अम्मलदारानें काहीतरी बोलायचें म्हणून बोलून दाखविलें.

इतक्यात अवतीनें बाहेर येऊन मुचकुंदाचीं चारसहा फुलें रावजींच्या हातीं दिलीं. त्यातलीं दोन रावजींनीं त्या अम्मलदाराच्या हातीं दिलीं. वास घेत घेत अम्मलदार बोलू लागला. दरम्यान परका इसम पाहून, कपाळाला आठ्या टाकीत अवती आत गेली.

"तरीच! हाच तो वास! अहो, तुमच्या गावात शिरल्यापासून सारखा हाच घमघमाट येतोय मला. म्हणजे पुण्यात मोतीचौकापासून स्टेशनकडे जाताना दोनएकशें पावलें अस्सा सारखा वास सुटलेला असतो. काय बर या फुलाचें नाव?" त्या फुलाकडे पहात पहात कानिष्टेबलनें विचारलें.

"इहह मुचकुद. आमच्या या इह गावात जिकडे तिकडे इहह मुचकुदाचीं झाडें पसरलीं आहेत. मुचकुददरी हें नाव इहह यामुळेंच पडलें इह असावें. फार फार इहह गोड वास! मीं नाना प्रकारचीं सेंटस्

व हइ अत्तरें वापरलीं पण या फुलाचा परिमळ हइ कांहीं हइ औरच! तीन दिवसाचे शिळें फूल असलें तरी हइइ अगदी ताज्यासारखा सुवास! बर झाडें तरीं हइइ केवढालीं? अगदीं सरळ सायासारखीं सोट. तजेलदार आन् हइ गुबगुबीत. चागलीं पशाएवढालीं पानें हइ आहेत या झाडांना. नुसत्या हइइ तीन पानांची पत्रावळ, शेरकीचा भात जेवणाऱ्यांना हइइ पुरेल राहता का जेवायला? हइइ मुचकुंदाच्या पत्रावळीवर वाढवतों तुम्हाला मास्तर, मास्तर,—" —इतक्यात मास्तर लगबगीनें बाहेर आले. "मुचकुंदाचीं ताजीं पानें हइ काढवा. या पाव्हण्याची हइ त्या पत्रावळीवर जेवायची हइ इच्छा आहे"

रावजींचा हेतू ओळखून मास्तर पाहुण्यांची वर्दी द्यायला परतले.

तो कारागीर!

आपलें सामानसुमान खाकोटीस मारून पडवीच्या दारापाशीं रेंगाळूं लागला.

"हइइ कां रे थांबलास?" त्याच्या चेहऱ्यावरील आशाळूपणा ओळखून रावजींनीं विचारलें.

"व्हयत्यांतलीं च्यार फोपलं?"

"जा घेऊन त्यांतलीं! हइ घे स्वतः तोडून—"

शिपटाचीं चार पोफळें घेऊन, "यतांय त" म्हणून कारागीर अंगणांत उतरून निघून गेला.

"तुम्ही आता हइइ काढाच कपडे! मी आंघोळ हइइ करायला जातों. असें म्हणून रावजी थेट माजघरांतून मागिलदारच्या पाणघराकडे वळले.

त्या पोलीस अम्मलदारानें कपडे काढून पडवीच्या खुटीवर ठेवले, व उगाच पडवींत येरझारा सुरू केल्या. ओटीदारच्या पल्लेदार पडवीच्या उगवत बाजूला व तसेंच उगवतच्या भल्या लांबरुंद पडवीच्या उत्तर टोंकाला, खूब मोठालीं भाताचीं कोठारें होतीं. तीं चांगल्या प्रकारें झंवरलेलीं असून निरनिराळ्या खणावर खडूनें 'कोळंबा,' 'आंबेमोहर,' 'पनवेल,' 'भडशा' व 'मिसळ' अशीं नावें लिहिलेलीं दिसलीं. पडवीसमोर नीटनेटक्या पद्धतीनें बांधलेलें अंगण असून, मांडवाकरतां जांभ्या दगडाचे कायम खांब

उभे होते. अंगणाच्याहि पुढें उत्तरेस पूर्वपश्चिम पोवळी असून पडवीच्या पायठण्यासमोर जाण्यायेण्यासाठीं म्हणून भली मोठी रुद दिंडी—चार कळकाचे अडसर असलेली—अशी दिसली.

आगण पडवीचा हा आंखीव रुबाब पाहून त्या वरघाटी माणसाला फारच आनद झाला. म्हणून त्यानें आणखीहि निरीक्षण चालवलें. मावळतच्या पडवींत काडपाची; कुदळी, पावडें वगैरे हत्यारें ठेवण्याची, टोपल्या, हारे आदिकरून ठावकीं ठेवण्याची, अशा निरनिराळ्या कित्येक खोल्या दिसून आल्या. त्या आडगावी घरंदाज शिस्तीचें त्याला अतिशय कौतुक वाटलें. अगणाच्या पायठणीजवळील छोटासा फरस, जवळ पावळयाच्या पाटलोटानें—पावळयाना एक पोफळीचा पन्हळ लावलेला होता—भरलेली लहानशा हौदाएवढी काळवत्री डोण, या सर्वांवर माडाच्या झापाचे छप्पर, ही पाय धुवायकरता कायमची केलेली सोय लक्षात येवून त्या अम्मलदारानें मनमुराद हातपाय धुतले. इतक्यात ओटीवरील बैठकीवर सुकात व अवती काहीं तरी बरेंचसें बोलत बसण्यासाठीं आलीं.

त्या पोलीस अम्मलदाराच्या हातात रत्नागिरीच्या 'बलवंत'चा अंक देवून सुकातनें त्याला वाचीत बसवलें.

"मला नइ आवडत तू गुराख्याबरोबर खेळलेला! इश्श!"

"अग पण बेफाम गम्मत येत्ये त्या पाऊस–झडींत! तूं एकदां माझ्याबरोबर येऊन तर बघ!"

"अरे पण आपण एकटे जावें! त्याच्याबरोबर जायचें, त्याच्यांत मिसळायचे, त्याच्याबरोबर गप्पागोष्टी करायच्या? इश्श, मेल र तें जिणें!" असें म्हणून अवंतीनें आपल्या उपऱ्या ओठाना बरीचशी मुरड दिली.

"पण तुला काय त्याच्याशीं करायचें आहे? माझें ज्यात मन रमतें, मला ज्यापासून खरोखर आनंद होतो, ती गोष्ट मी करूं नको असें तूं कां बरें मला सुचवतेस? मी तुला कधीं सागतों?"

"माझें मुळीं कई चुकतच नई, तर तूं सागणार काय?" अवंतीनें हनुवटी उंचावली.

"बरं, वाद राहुं दे ग!"

"वाद राहूं दे म्हणशील तर काय झालें? मला ठवुक आहे आणखी तू काय काय केलेस तें!"

"असेल! आपल्या जागळ्यानें सांगितलें ना! तुम्हा पोरींना भारी नसत्या चौकशा!" असें म्हणून सुकातनें आपली गोलबंद मान बाजूला झुकवली.

"यात रे कसल्या नसत्या चौकशा? तुझें आपलें काहींच्या बाहींच. मीं आपलें सहज मावशींजवळ म्हटलें कीं अभ्यास झाल्यापासून कातूचा कुठें पत्ता नाहीं म्हणून! तों आपलें जागळ्यानें सांगितलें कीं तू मोऱ्यांच्या काफोऱ्यांच्या माळावर गेला होतास म्हणून. मग मी बइ पुढची चौकशी केली. सहजच माणूस असें करतें! त्यात तें काय एवढेंसें?"

"बरं ग नसेल!"

"मला खरे वाईट वाटलें, अन् राग आला तो दुसऱ्याचबद्दल!" अवंतीनें सुकातच्या पाठीशीं अगदीं लकडा लावला.

"राग आला ना? मग आता पुढें काय त्याचें?"

"पुढें काय म्हणजे? माझें नको का तुला ऐकायला?"

"हवें आता झालें ना?"

"काय झालें? सांगायचें तें सारें पुढेंच आहे. कातू, असा रे काय अगदीं एकेरीवर येतोस?" अवतीचे डोळे, जिव्हणी व नाक कशीं अगदीं क्रुद्ध झालीं होतीं या वेळीं. तो थाट पाहून सुकातला हंसूच लोटलें.

"इश्श! हसतोस रे काय? करून सवरून वर हसायचें!"

"काय केलें? चिमाला उचलून आणली हेंच ना?" सुकातनें तिचा विवाद खुंटवण्यासाठीं ही युक्ति काढली.

"हो हेंच! तुला किळस कशी नाहीं वाटली अगदीं?"

"मला नाहीं बा किळस वाटली. ती किती छान पोर आहे. अगदीं तुझ्यासारखी स्वच्छ आहे. तुझी बहीण शोभेल बघ. कधीं जवळ जाऊन पाहिलीस? तू आपल्याच तोऱ्यात! असें करूं नये. अग, कुळवाड्याचीं पोरें झालीं, अगदीं आपल्या कुळाचीं पोरें असलीं तरी त्याच्याशीं खेळीमळीनें वागायला आपल्याला कसली हरकत? आपण मोठे खोत असलों तरी घरचे, घराबाहेर सगळींच सारखीं नाहीं का?"—

इतक्यात रावजीच बाहेर आले.

आणि सर्व मंडळी जेवणासाठीं मागील दारीं निघाली.

* * *

दुपारीं दोन वाजता त्या अम्मलदारानें पुढचा गाव आक्रमला.

रावजी ओटीवर लोडाला टेंकून वर्तमानपत्र चाळीत होते

इतक्यात राजबा गोठलानें रामराम करून, खाद्यावरील घोंगडीच्या घडीवर रावजींसमोर पडवींत बैठक मारली.

राजबा गोठल म्हणजे अस्सल कोंकणी कुळंबी होता. तांबड्या पागोट्याचा दहा हाताचा तुकडा—तांबडा रंग आता राहिला होता कुठें ? मळाने तो पार झाकाळून गेला होता—कानावरील चार बोटें डोक्याचा भाग शिल्लक ठेवून त्यानें गुंडाळला होता. भल्या चांगल्या पाढऱ्या झुबकेबाज पण अव्यवस्थित अशा मिशा, पानाच्या रापानें लालबडलेल्या; तसल्याच रंगाची थोबाडभर वाढलेली दाढी; कानाच्या पाळीवरील झुबकेदार केस; अंगात उवीळ झालेलें जुनेंपानें लोंकरीचें कुडतें, कमरेला आकडी कोयती व नेसू दोन हात औरस चौरस मांजरपाटाचा रुमाल !

त्याच्याजवळ कमरेच्या करगोटयात खोंवलेली आणखी एक महत्त्वाची वस्तू होती. आणि ती म्हणजे त्याचा पानसुपारीचा बटवा. ज्या ठिकाणीं बटव्याचें तोंड दोरी ओढली असतां पुरचुंडीच्या आकारात येऊं शकतें, त्या ठिकाणच्या दोरीला चांगले दहा पधरा घुंगूर लोंबत होते. बटव्याचें कापड तांबड्या खाव्यांचें असून, त्यावर कित्येक ठिकाणीं चुन्याचे डाग पडले होते.

"खोतानू, मी अशासाटनं आलांय !"—

"कशासाटनं ?"

"माजी योक फिऱ्याद हाय तुमच्या पायाशीं."

"काय झालें इहइ काय ?"

"म्हजी असा झाला. सकालची कथा ! मोऱ्यांच्या मालावर आज मोप जागली गेल व्हत काय ? थत मार्जींव तीन पोरा गेलीं व्हतीं. ता पोर इस्लाम, माझ्या धाकटया नकाबड्या पोरीला, नाय नाय त्या शिव्या द्यव लागलाम् काय ? बरं तां असो ! म्होरं काजबीच्या पन्ह्याला आला व्हता

लौंडा. थत काय शनपन् चालना. त्या नकावड्या पोरीला त्यानें पाण्यांतून उचलून आनायची का नाय?"

"हहह पण आली ना ती पलीकडे?" रावजींनीं विचारलें.

"अव मंग केऱ्यान आनलान. त्व काय सोडतो? भावच ता! माजी फिऱ्याद हाय ती म्होरच हाय."

"हहह मग ती सांग रे प्रथम."

"घ्या बरी ध्यानात! त्या इस्लामाची आतोस मी जवा केली (जेव्हा तिच्याशीं लग्न लावलें) तवा इस्लामाच्या आज्यानें माजी पोर आपल्या नातवाला करायचीच असा गोतासामनी ठरवून ठयेवलान्. माज्या बावानीं पर व्हकार घेला. माजी पहिली बायको—इस्लामाची आतोस पोरबाळ व्हयाच्या आदींच मरुनशान् गेली. तरीपर माज्या बावाला नर्कात म्या का टाकू? त्याचा सबुद पुरता करायच्यासाटन माजी पोर गुनी मी इस्लामाला घेयाचें ठरवलें हाय. समद्या वाडीला ठावा हाय त्या पोरीवर या पोरान् माया लावावी का नाय? सागा बरी. का तिला धिसपिट्टुन लावावी? ता पोर आज ढायढाय रडला नाव?"—

—"अरे राजू हहह पण तू वेडा असा, दुसऱ्याला आपली पोर दिलीस तर चागलें घेज नाहीं का तुला मिळणार?"

"अव खोतानू, बापज्याद्याच्या सब्दापरिस घेजाला किंमत हाय काय? सबुद म्हजी सबुद! आपली ती इस्लामाला द्ययाचीच ती"

या सत्त्वस्थ हृदयाचें रावजींना क्षणभर फारच कौतुक वाटलें. आजच्या काळात वास्तविक याच्या उलट फिर्याद यायची.

"आपली ती इस्लामाला द्ययाचीच ती, तुमी कायबी म्हना." असें म्हणून राजबानें कमरेचा बटवा सोडून सुपारी फोडायला सुरवात केली.

"मग तुझें म्हणणें हहह मी विश्रामला रागवू?"

"त अअअ! रागवायाच व्हवा ता. ह्यरीं पोर काय दाणा हाय. पर पर हां! ती गुणी त्याच्या दिष्टीला नुको तिची माया लाव म्हंगुन त्याला सागा."

"सांगेन तर. चांगलें बजावून ठेवीन." रावजींनीं राजबाला हें सागितलें खरें. पण त्या बाबतींत कांहींहि न करण्याचें त्यांनीं त्या वेळींच ठरवून ठेवलें.

आपल्या खोत या नात्याचा ते केव्हांहि गैरफायदा घेत नसत अलीकडे कित्येक वर्षे.

"आन् योक बंदोबस्त करा."

"तो हड कोणता!"

"ती तात्या चालक्याची पोर चिमा! ती इस्लामाशीं लय लाडीगोडी करत्ये. तिच्या बापसाला तेवढी ताकिद द्या कीं तुजी पोर इस्लामाशीं बोलता कामा नाय म्हणून." राजबा रावजींच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. त्याना हें कितपत पटलें हेंच अनुमानण्याचा त्याचा हेतु असावा.

तात्या चालका व चिमा हीं नांवें ऐकल्यावर रावजी थोडेफार चमकलेच.

"तुला तोंड आहे कीं नाहीं? हडहड तूच का नाहीं सागत त्या हड तात्याला! गाढवासारख्या हड भलत्याच हड तक्रारी करायच्या? जा चालता हो!" रावजींचा स्वर एकाएकीं चढला.

"तुमच्या पायां पडतांय हेरींच रागावू नुका. मी मोप वकत कायसा केलां. पर ते मानतायत कुठ! सारां करून मगच तुमच्यापावत आलाय."

"मग हड आलास तसा परत जा. लोकांच्या पोराच्या हडहड तक्रारी मी हड कुठें ऐकत बसूं? माझ्या पोराबद्दल बोल काय तें" असें म्हणून रावजींनीं वर्तमानपत्र उघडलें.

"तसां म्हनायचां तर माजी तुमच्या पायाशीं तीबी तक्रार हाय."

झटकन वर्तमानपत्र बाजूला करून रावजींनीं विचारलें,

"काय काय हडहड तक्रार!"

"तुमच्या कांतुदाला साद घाला बरी. आज त्यांची सवारी जागल्यासंगं ग्यली व्हती मोर्चाच्या मालावर. थत केऱ्याचा आन त्यांचा काय झाला तां मरुद्ये. ता नाय मी सागत पर—"

राजबा खालच्या आवाजांत पुढचें बोलू लागला.

—"त्यानीं त्या चिमाला उचलूनशान् पऱ्ह्यापल्याड आनलानी. हा काय! म्हजी त्या इस्लामाला जोर चढला का नाय चिमाशीं ब्यस वागाया? इचारा बापड्या कांतूदाला, तुमच्या पायाशीं खोटां सागून मना व कुट जायाचां हाय!"

"कातू? ए कान्तू?" माडीवर अभ्यासांत गर्क असलेल्या कातूला रावजींनी हाक मारली.

त्याबरोबर कान्तू खालीं ओटीवर आला.

"आज तू हहद मोऱ्याच्या माळावर हह गेला होतास?"

"होय."

"तिथून चिमाला उचलून आणलीस?"

"हो."

"आन् ती का?"

"गम्मत म्हणून"

"खुळ्या हह ही कसली गम्मत?"

"खर सांगू का? मला सुमार राहिला नाहीं त्या वेळीं." खालीं मान घालून सुकांतने उत्तर दिलें.

माडीवरून अवती व नंतर मास्तरहि खालीं ओटीवर आले. अवतीसमोर काका आता आपली हजेरी घेणार म्हणून सुकांतला वाईट वाटू लागलें.

वरील उत्तरानें रावजींना किंचित् हसूच आलें.

"इश्श, सुमार कसला त्यात!" अवतीनें काकाना ऐकू जाण्यासाठीं म्हटलें.

रावजीकाका आळीपाळीनें अवतीकडे व सुकान्ताकडे पहू लागले. बगोबा मास्तर पडवींत येरझारा करीत होते. मात्र त्याचें सारे लक्ष या प्रसंगाकडेच गुंतून राहिलें. रावजींच्या मनात हे विचार येऊन गेल्यास नवल काय?—

'ही माझी मुलगी अवती, व हा माझा मानीव मुलगा सुकांत पुढें याला घरजावई करून मुचकुंददरीसह अवतीला त्याच्या ताब्यात देण्याचा माझा मनोदय. आन् आज सुकांतविरुद्ध एका कुळाची फिर्याद आन् तीहि एका रयत पोरीबद्दल—

'बाकी सुकांत म्हणतो त्याप्रमाणें हा प्रकार त्याच्या हातून सहज गमतीखातर झाला नसेल कशावरून? तसें नसतें तर इतकें खुलें उत्तर त्यानें दिलें नसतें—'

"बर तुला हहद गम्मत तरी कसली वाटली रे?"

"ही कसली घाणेरडी गम्मत! मीसुद्धां काका त्याला विचारलं हो! मला माहित आहे सारें." अवती लाडकें लाडकें तोंड करून वडलांना सागत होती.

"काका, त्यात हो कसला घाणेरडेपणा? तिला पाण्यातून पलीकडे होतां येईना. मी उचलून घेतली. तिच्या जागीं अवती असती तर नसती का तिला उचलून नेली?"

"बरं बर जा." वरच्या उत्तरामुळें थिजून गेलेल्या रावजींनीं हा अस्सा निकाल केला.

अभिमानाच्या नजरेनें सर्वांकडे पहात मुकात माडीवर गेला.

राजबाच्या एकंदर म्हणण्याच्या धोरणानें तात्या चालक्याला ताकीद देण्याचा हुकूम मात्र रावजींनीं मास्तराना फर्मावला.

अवतीलाहि त्यात थोडेंफार समाधानच वाटलें.

# ३. अवंती व उद्धव

आज शेवटचा श्रावणा सोमवार असल्यामुळें, बागोबा मास्तर मुचकुंद-दरींतील स्वयभू शकराच्या देवळात रुद्राच्या एकादशण्या करण्यांत गुंतला होता. त्यामुळें अवंतीला व सुकातला बरीच फुरसद होतीं. पोस्टानें कालच रावजीकाकाकडे ' अटकेपार ' कादबरी आली. सकाळपासूनच अवंती व सुकात एकमेकाना आळीपाळीनें प्रकरणें वाचून दाखवीत होती. सुकांतच्या मनोरचनेला त्यात तितकीशी गोडी लागली नाहीं. तासाभऱ्यात तो कटाळून खाडी किनाऱ्याकडे गेला. मात्र अवंती आपल्या खोलीच्या खिडकींत ' अटकेपार ' मधील मीनाक्षीला डोळ्यासमोर एकवटण्याच्या प्रयत्नांत तंद्री लावून उभी होती.

लुटुपुटीच्या खेळात लहान मुलें ज्याप्रमाणें निरनिराळीं माणसें बनतात त्याप्रमाणेंच कल्पनेच्या सप्तरगी फवाऱ्यात ती स्वतःच मीनाक्षी झाली. पण मीनाक्षी ही मुसलमानीण असल्याचें तिच्या लक्षांत आल्याबरोबर तिला कसेंसेंच वाटलें. तिला हिंदू न दाखविल्याबद्दल प्रो० फडक्याना आपल्या निर्णयाबरहुकूम तिनें दोषीहि ठरवलें. इतक्या सुदर व गोड लाघवी मुलीला मुसलमानीण करायचें म्हणजे काय? तरीहि पण मीनाक्षीचा रुबाब, तिचें सौंदर्य, सौंदर्यसाधनें, कलासक्ति आदिकरून ग्रथित सौंदर्याचा अवती अगदीं तल्लीन होऊन विचार करीत होती —

उद्धव मडलीक माडीवर अलगज आला. त्याच्या हातात कसली तरी चौपट कागदी पेटी होती. ती त्यानें बळेंच लपवली होती. खोलीच्या दारांत आल्याबरोबर अवती खिडकींतून बाहेर पहात असल्याचें त्याला दिसून आलें. कठड्याच्या आडव्या दांड्यावर उजव्या हाताचें कोंपर टेकून तिनें आपल्या

हनुवटीवरील अवघ्या उत्तमांगाचा भाग त्याच करतलावर ठेवून दिला होता. डाव्या हाताच्या चिमुकल्या बोटानीं त्या गोल कठड्याला आवर घालण्याचा तिचा प्रयत्न अर्थातच अयशस्वी होऊन राहिला. सकाळीं न्हाणें झालें असल्यामुळें आपले कोंवळे व तुळतुळीत केस तिनें पाठीवर सोडले होते. नाहीं म्हणायला शेवटचीं अग्रें मात्र एका बारिकशा वेणींत गुतवलीं होतीं. पाठीमागून ढोपरापर्यंतचा अगभाग उजव्या बाजूला कलथूला असून, अद्याप निराकार स्थितींत असलेला नितब भाग खिडकीच्या उभ्या बावखडाला टेंकला होता. मेंदीनें लाल झालेलीं पायाचीं नखें, लालुंग्या वर्खे टिकली-सारखीं चमकत असलेलीं पाहून उद्धवाची नजर काहीं काळ तिच्या पाया-जवळच स्थिर झाली. तशा स्थितींत तो अवतीकडे कित्येक वेळ पहात राहिला.—

एकदा त्याला वाटलें, कीं आता हाक मारून आपण आल्याचें जाहीर करावें. एकदां वाटलें कीं या बाहुलीकडे असेंच पहात रहावें. पण हें त्याचें कोडे वाऱ्याच्या झुळकीनें लागलीच सोडवलें. तो ज्या दरवाज्यात उभा होता त्या दरवाज्याची फळी ‘कू’ असा आवाज करीत वाऱ्यामुळे मिटूं लागली. अवतीनें झटकन् वळून पाहिलें.

“कोण उद्धव? अन् तूं मुबईहून केव्हा आलास?” खिडकींतून ती स्मित करीत पुढें आली. “मध्येंच का रे?”

“बाबांची तार गेल्यामुळें. बाबा आमचे साऱ्या मुलखाचे भित्रे. मुबईला हल्लीं दगा सुरू असल्याचें समजताच केली तार नि काय!”

“म्हणून आलास वाटतें?”

“त्याना वाटलें कीं मी दग्यांत मारला जाईन जसा कांहीं!”

“इश्श! असें रे काय बोलतोस? त्याचें बरोबर!”

“त्याचें बरोबर खरें पण माझी कॉलेज टर्म बुडते ना!”

“हो खरेंच! तूं प्रीव्हियसमध्यें आहेस नाहीं का?” वर्गाचें नाव निश्चित करून घेण्यासाठींच अवतीनें हा प्रश्न केला होता.

“Oh yes. एका अर्थी आलों तें ठीक झालें. दगा बंद होऊन जाई-पर्यंत तुझा तरी सहवास लाभेल!”

"अन् सुकातचा पण!" असें म्हणत असतां अवतीचें लक्ष त्याच्या हातातील कागदी पेटीकडे गेले. गालावर हसें ओघळता ओघळता दोन खळग्याहि पडल्या. जणू काय त्या हास्यरसाची ती उगमभूमीच होती.

"अन् तें हातात काय तुझ्या? सुकातकरता काहीं Present आणलीं असशील!" अवती म्हणाली

त्यामुळें उद्धवाचा थोडासा रसभगच झाला. सुकात त्याच्या ध्यानींमनींहि नव्हता.

"कुणाकरता का असेना? तू तर घे अत्ता!" असें म्हणून उद्धवनें त्या कागदी पेटींतून अस्सल इग्रजी ब्रिलियन्टाइन् व एक मोठा कगवा काढून अवतीसमोर धरला.

अवतीनें त्याच्या हातातून ते सारें घेऊन बाटलीच्या लेबलावरून ओझरती नजर फिरवली. नतर बुचाची झाकणी दूर करून वास घेतला. सेंटच्या खुशबूबरोबर तिला फिरून तेवढ्यातल्या तेवढ्यात 'मीनाक्षी'ची आठवण झाली. सुवासाच्या आनदभरात तिचे टपोरे डोळे अधिक मोठे व पाणीदार झाले. उजव्या हातीं कगवा घेऊन सहजासहजीं ती आपल्या विपुल केश-भारावरून फिरवूं लागली.

"आधीं थोडें केसाना चोळ व मग विंचर ग!"

"इश्श, अत्ताच कशाला? मग करीन रे तें सारें."

"अन् माझ्यादेखत केलेंस म्हणून ग काय झालें?"

"अरे होणार काय? पण अत्ताच कशाला! आन् त्यात अजुनी केसहि वाळले नाहींत रे!"

"बर दुपारीं. खरच आज आपण शंकरास जाऊ अन् मग कुठेंतरी फिरायला जाऊं, अ?"

"जाऊ ना! पण लौकर यायच. आज सोमवार आहे म्हटलं!"

"म्हणजे सध्याकाळीं लौकर जेवणें व्हायचीं हेंच ना?"

"सुकातलाहि सागून ठेव अं फिरायला जायचं!"

"भेटला तर ठेवीन, पण तो कशाला! तो कुठेंतरी आपल्याला लांब लाब डोंगरात नेईल अन् उशीर होईल मग." उद्धवाच्या मनातून सुकात

बरोबर नकोच होता सुकातच्या आवडीनिवडी उद्धवापेक्षां आमूलाग्र निराळ्या होत्या. सुकात बरोबर असण्यानें उद्धवाचा मोकळेपणा पार निघून जाई. आडगावच्या रहाणींतहि शहरी वातावरण मुद्दाम आणण्याची उद्धवाला आवड तर आडगावच्या निसर्गरमणीय उदात्ततेंत एकजीव होण्याची सुकात-ला सवय. अवतीची मात्र या दोघांच्या आवडीनिवडींत चमत्कारिक अवस्था होई. उद्धव हा मुचकुंददरीचाच रहिवासी असून त्याचे वडील गावातील धारेकरी होते. होते म्हणण्याचें कारण आता त्याचा बहुतेक धारा रावजी-काकाकडे गहाण होता. ऋण काढून सण काढण्याच्या सवयीचा परिणाम उद्धव मंडलीकच्या साऱ्या घरादारावर स्पष्ट दिसून येई. सारा अव्यवस्थित कारभार! लाडुकपणाच्या देखरेखींत उद्धवहि वाढला असल्यामुळें त्याच्याहि जीवनात बेशिस्त अदाधुंदी माजली तर आश्चर्य कसलें? सुकातपेक्षा तो तीनचार वर्षांनीं मोठा होता. पण घरच्या परिस्थितीची त्याला मुळींच जाणीव नव्हती.

अवतीकडे पहाण्याची दृष्टि त्याची याच खेपेला प्रथम बदलली. कॉलेज-मधील दोन महिन्यांनींच त्याला 'यौवनात' आणून सोडलें असल्यामुळें आज त्यानें अवतीकडे तरुणाच्या दृष्टीनें पहायला सुरवात केली. अशा दृष्टींतहि एक प्रकारचा निर्दोष खेळकरपणा असतो. उद्धवाच्या नजरेची धावहि अद्याप तितकीच होती. मात्र शक्य तर सुकातपेक्षा अवतीवर आपलेंच जास्त आकर्षण घडावें या अवखळ धडपडीला त्याच्या हृदयात सुरवात झाली. त्यासाठींच उद्धव आज तिच्याबरोबर जाणार होता.

"अवू, जातों अता मी. दुपारीं दोनतीन वाजायला यीन बरं का? खालीं काकाजवळ बसतों जरा!" असें सांगून उद्धव जिना उतरून गेला.

वैशाखअखेर मुंबईस जाणारा उद्धव व आजचा उद्धव--

अवंती आळीपाळीनें दोघाचेंहि निरीक्षण करू लागली.

पूर्वीचा उद्धव बहिरंगानें साधा होता; आजच्या उद्धवाच्या भुरक्या केसात भागाची बारिक रेषा स्पष्ट दिसत होती सुती बटणाचा हाफ्शर्ट जाऊन सोन्याच्या बटणाचा पोलोशर्ट त्याच्या अंगीं झगझगत होता. काच्याचा रुबाब तर आज अवतीच्या नजरेला फारच चमत्कारिक वाटला. उद्धवाच्या

एकदर हालचालीला अभिनवता आली असून त्याच्या भोंवतीं कसल्यातरी मद सुवासाचें वातावरण घुटमळत असल्याचें अवतीच्या प्रत्ययाला आलें होतें. त्याचा चेहरा जरी सुंदर नव्हता तरी तो पूर्वीपेक्षां बराच तरतरीत झाला आहे, डोळ्यात तरलता आली आहे, मानेला कळावी प्राप्त झाली आहे, असले कितीतरी प्रकार तिच्या लक्षात येऊन चुकले.

या नव्या उद्धवानें तिच्या मनावर जरी अनुकूल परिणाम केला तरी सुकांतची व त्याची तुलना करण्याची इच्छा तिला चुकूनसुद्धा झाली नाहीं. तिच्या घरच्या साऱ्या माणसाचें प्रेम सुकांतावर किती आहे याची तिला पूर्ण खात्री असून साहचर्यामुळें सुकात आपला कोणीतरी आहे अशीच तिनें आपली धारणा केली होती. तो तिच्यापेक्षा मोठा असूनहि आपणापेक्षा तो लहान आहे या भावनेनें ती त्याच्याशीं वागे!

या गोष्टीचें मात्र सुकातला कित्येकदा आश्चर्य वाटे.

दुपारचे फराळ झाल्यावर--

"कान्तू तुला उद्धव भेटला का?"

"कोण उद्धव? नई. तुला भेटला?"

"आलाच होता आपणा सर्वांना भेटायला. आज आपण तिघानीं शकराला जाऊ. जायच ठरवून ठेवल आहे आम्हीं. तीन वाजतासे जाऊं, होय ना?"

"अग पण मी आज होडी खेळवायला जाणार आहें. सकाळीं येसू भोयाला सागूनसुद्धा आलों आहें. आपण तिघेहि तिकडेच जाऊ. होडी वलवायची काय मजा येत्ये पहा तर खरी!"

"या वादळी हवेंत कोण जातो होडी वलवायला? इश्श, त्यात मी आज हें नवें पातळ नेसलें!"

"परत जुनें नाहीं वाटतें नेसता येणार? त्यात काय मोठंस? हें सोडायच अन—"

"—मी सो--ड--णा--र नाहींऽऽ! व होडीवरहि येणार नाही. अन् तूहि जाऊं नको. तुला अगदींच कशी भीति नाहीं वाटत रे? लाटामुळें होडीच काय होतं माहित आहे ना?"

सुकांतला हसूंच आलें.

"तू नाहींच ऐकायचास!"

"का बरं भलतीच समजूत करून घेतेस? तुला मीं चागलें सागतोंय कीं नुसतें शकराच्या देवळाकडे जाण्यापेक्षा होडी खेळवण्यात किती तरी गम्मत येईल म्हणून. पाहिजे तर चल आपण काकाचें मत घेऊ" असें म्हणून सुकातने तिची शेंगदार अंगुली हातीं धरली.

"कशाला? आहे मला ठउक. तू म्हणतोस तेंच काका म्हणायचे! त्यांचें मुळीं असेंच आहे. मग असेंच तर! तू होडीकडे जा. मात्र जप हा! आन् आम्ही शंकराकडे जाऊ."

"खुश्शाल!" असें म्हणून बेफिकीर चपळतेनें सुकात आपली खाकी शॉर्ट चढवूं लागला.

अवतीहि नतर माडीवरील आपल्या खोलीकडे निघाली.

नवा कंगवा अन् सुवासिक ब्रिलियन्टाइन—

त्यांचा केव्हां एकदां उपभोग घेईन असें तिला झालें होतें. थोड्याच वेळानंतर आरशासमोर बसून सुवासाच्या मधुर हेलकाव्यात व कगव्याच्या सफाईदार सळसळींत स्वतःच्या सौंदर्याविषयीं तिचें गोड गोड मनोराज्य चाललें होतें, तर लाटाच्या प्रमाणबद्ध हेलकाव्यात व पाणलोटाच्या चपल सळसळींत आपल्या नाविकगिरीचीं भरीव स्वप्नें सुकात अगदीं तल्लीनतेनें अनुभवीत होता. त्याच वेळीं उद्धवहि आपल्या घरीं आपण मुंबईकडील शहरी वातावरणात अवतीला कसें गुंग करून टाकायचें, आडगावी आवडी-निवडींविषयीं तिच्या मनात कशी अप्रीति उत्पन्न करायची, तिच्या रहाणींत शहरी सुधारणा कशा सुरू करायच्या, वगैरेबद्दल इझीचेअरवर पडल्या पडल्या चाळवाचाळव करीत होता.

मनासारखी तयारी झाल्याचें पाहून अवती खालीं यायला निघाली. पण इतक्यांत फिरून एकदा ब्रिलियन्टाइनची बाटली उघडून मधल्या बोटानें त्यांतील चागलें अधेलीएवढें काढून घेऊन ती खालीं आली; व सुकातसमोर जाऊन त्याच्या काळ्याभोर कुरळ्या केसाना '–थाब ना जरा–' म्हणून लावू लागली.

"अवू, किती ग छान वास आहे याचा."

"कुठल ओळख बर!"

"कुठल का असेना. त्याच्या सुवासापेक्षाहि अत्ता तूं मला जास्त आवडलीस एवढें मात्र खरें."

"हें खर ना! मग झालें तर. उद्धवानें मला Present दिलें. याला Brillintine म्हणतात. एक कगवाहि कसा छान् आणला त्यानें माझ्याकरता! पहायचाय!"

"पाहीन ग मग केव्हातरी. जातोंच आता." असें म्हणून सुकांत बाहेर झटकणार तोंच त्याच्या पाठीवर उद्धवानें थाप मारून—

"अहो महाराज! तुम्हाला शोधायच तरी किती अन् कुठें!"

उद्धवाकडे पाहून सुकात अगदीं ऐन दिलदारीनें हासला.

"वः! खूबच मुबई झळकत्येय रे आज! हा तुझा रेशमी शर्ट, अन् परिटघडी धोतर, सध्याकाळला येशील तों पार मळून जाईल. या आमच्या मुचकुददरींत ही खाकी अन् हा मुढेछाट पाहिजे. येतोहेस खाडीवर? तू कुठला यायला! बरय, सध्याकाळीं मारू गप्पा तुझ्या कॉलेजच्या." सुकात ताड् ताड् निघाला.

अवंती व उद्धव डोंगराच्या दिशेनें निघालीं.

पाऊस नव्हता तरी वाटेला चिखल मात्र भरपूर होता.

शभर दोनशें पावलें चालल्यावर उद्धवाचा काळा कुळकुळित स्लीपर चिखलानें बहुतेक झाकाळून गेला.

"कवा र आलास उध्या बामना!" डोंगरातून खालीं येणाऱ्या राजबानें ओसार घेत घेत विचारलें.

"आज."

"जला ता बूट कशास मराया घतलास या चिखलांत!" राजबानें उपदेश केला.

उद्धवाला या रांगडी शहाणपणाचा तिरस्कार वाटला.

आणखी पुढें गेल्यावर त्याला तात्याबा चालका भेटला.

"कृयत्या बुटांनीं फुकट मरशील र बामना! आता काय नाय; पर

मगती फिरूनशान् उतराया लागलास म्हजी दात पडतील आन् चिखलान् पार बरबटशील! तायबाय! जपुन चला बरीं ग्वास जाताव वाटता? यव काय पोचवाया?" तात्याबाने अदबीनें विचारलें.

"तेवढें नको हं! जा तू आपल्या मार्गानें" अवतीने सहज सांगितलें.

तात्याबाच्या सल्ल्याचा मात्र आता उद्धवाला रागच आला.

वाटेने येणाऱ्या या शेतकऱ्यानीं उद्धवची टिंगल केली असेच अवतीला वाटले. पण वास्तविक त्यात तो काहींच भाग नसून उद्धवाला शेतकऱ्याचें—कुळब्याबद्दलचे जितकें अप्रेम होते तितकेंच कुळब्यानाहि उद्धवाबद्दल होते. तरीहि त्यानीं उपदेशाच्याच गोष्टी सांगितल्या होत्या!

आणखी काही वेळानें समोरून दोन कुळब्याचीं पोरें आलीं. वाट सोडून तीं त्याच्याकडे आ करून पाहू लागलीं

"बघतोस रे काय माझ्याकडे?" त्याच्यापेकीं पुढें असणाऱ्याला उद्धवानें खेकसून विचारलें ते मुलगे थोडे बिचकले मात्र—

उद्धव व अवती पुढें गेल्यावर—

"म्यलाम बूटा घालनार." असे खूब मोठयानें ओढूरन ते पळून गेले. अवतीसमोर झाल्या अपमानाने तर उद्धवाची तळआग मस्तकापर्यंत गेली.

"काय उर्मट कुळब्याची जात! आन् सुकात नेहमीं या लोकात वावरतो."

"तेवढे मात्र मला खरच आवडत नाहीं सुकातचे" अवती म्हणाली.

"तसाच तो! त्याला नागरी वळण असें मुळीं नाहींच व पुढें कधींहि येणार नाहीं!"

"असे मात्र नाहीं हा उद्धव!"

"म्हणजे माझ्या म्हणण्याचा तसा नाहीं ग अर्थ! आलें तरी तितकेंच. त्याला खरी आवड आडगावी जीवनाचीच असणार.—नव्हे तीच कायम रहाणार. तुझे माझें तसें नाही. अपल्याला खरी आवड शहरची. नाइलाजानें आपण या रागडी, अडाणी, खेडवळ, हेंगाडया गावात रहातों. मी म्हणतों हें खर ना?"

"तसच काहीं नाहीं, पण आडगावातही शहरी सुधारणा हव्यात एवढें मात्र खरें." एकामागून एक चढण चढताना तीं बोलत होतीं. उद्धवाच्या

म्हणण्याचा स्पष्ट बोध अवंतीला झालाच नव्हता मुळीं. शिवाय चढावामुळें ती दमलीही होती.

"मला बाई दम लागला. आपण बसू या थोडीं."

"त्या समोरच्या मुचकुदाखालीं बसू" असें म्हणून उद्धव मुचकुंदाच्या रोंखाने निघाला.

मुचकुदाखालीं असणाऱ्या दोन धोंडींवर समोरासमोर दोघेंजणें बसलीं. झाडाच्या गडद फाद्यामधून पश्चिमच्या खाडींतील पाण्याचे कांहीं भाग चुटमुटके त्याना दिसत होते.

मुचकुदाखालील एक ताजेंसें दिसणारें फूल उद्धवनें उचलून अवंतीच्या हातीं दिलें एकदा हुगून तिनें तें आबाडयात खोंचलें.

"अता हेंच पहाना! सुकात आज होडी खेळवायला गेला. इकडल्या बेढब होडया अन् आडानिड वल्हीं! यात काय Charm येणार? शहरांतल्या सुदर पातळ होडया अन् पल्लेदार वल्हीं असलीं तर तें Boating असल्या सुधारणा इकडे केल्या पाहिजेत मग तुला अन् मला खरोखर Boating आवडेल. पटतें माझें म्हणणें हें तुला?"

"हें खर! आनु म्हणूनच मी सुकातबरोबर जात नाहीं."

या अवतीच्या वाक्याने उद्धवला हातभर उच वाढल्याचा आनद झाला. परत तीं हळूहळू चालू लागलीं. शकराच्या देवळाजवळ पोंचल्यावर गावच्या कित्येक बायकाचा घोळका बाहेर पडताना त्याना दिसला.

कित्येकजणींनीं अवंतीकडे हासून पाहिलें कुणीं डोळे खोचूनहि पाहिलें.

आज अवतीबरोबर आपण आहों ही गोष्ट त्यांनीं लक्षात घ्यावी असें उद्धवाला फार फार वाटत होतें.

तीं दोघेंहि देवळात शिरलीं.

गावच्या गुरवानें दोघांच्याहि हातात बेलपरा दिला.

अवतीने देवासमोर पैसासुपारी ठेवली.

"नारळ न्यायला घरीं ये अं!" म्हणून गुरवाला तिनें बजावलें.

"जी व्हय!" गुरवानें उत्तर दिलें.

उद्धवानें बेल वाहून नुसताच नमस्कार केला.

"पैसा नाहीं वाटतें आणलास?"

"नई. विसरलों घाईत!"

"घवाच्या पैशाला इसरताव काय? ज्यवाया नाय काय इसरत?" गुरवानें फटकन् विचारलें.

"चुप बस गुरवड्या! फाजील बोलतोय!" उद्धवानें ताणल्यामुळें कांहींसें पुटपुटत गुरव कोपऱ्यात गेला.

प्रदक्षणेकरता म्हणून उद्धव व अवती बाहेर पडलीं. प्रदक्षणा करून तीं आल्या वाटेनेंच निघालीं.

"आपण आतां दूर कुठेंतरी गप्पा मारीत बसू."

"बसूं ना." अवतीनें कबुली दिली.

तीं दोघेंहि त्या देवळापासून लाब असणाऱ्या एका दीपमाळेच्या चौका-वर बसलीं. या देवाळावाटोळया चागल्या दहापधरा दीपमाळा होत्या त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशीं दिव्यानीं त्या अगदीं फुलून जात असत व त्या साऱ्या दिव्याचा उजेड या स्वयभू मदिरावर लख्ख पडत असे.

"असल्या सणावारी मुबईत काय बहार असते. मुबईच्या पोरीबाळी व नागरिक स्त्रिया काय थाटमाट करून देवाला निघतात म्हणून सागू! अवती, तूसुद्धा खूब रुबाबात राहिलें पाहिजेस! तुला ग काय कमी? काकाना नुसतं तू सुचवलस तर ते तुला पाचपचवीस तऱ्हेवार पातळें आणून देतील जरीचीं. काय नाना प्रकारचे ब्लाउज निघाले आहेत हल्लीं! वारे वा!" उद्धव आता अगदीं रमून गेला होता.

"मी सागणारच आहें मुळीं काकाना. शिवाय आता वर्षभऱ्यानें आम्ही मुबईसच शिकायला जाणार आहों. सातवीच्या प्रिलिमिनरीला मुबईस जाऊन बसायचें व फार्म घ्यायचा असें काकानीं ठरवलें आहेच मुळीं! मग समजेल तुला अवंती म्हणजे कोण आहे ती!" अवतीनेंहि अगदीं आपलें मनचें बोलून दाखविलें

"सुकांत नी तूं एकाच ठिकाणीं राहाणार ना?"

"अर्थात्."

"मग आपण टॉकीला जात जाऊ अं?"

"अत्ता कशाला पाहिजे तें!" अवंतीला टॉकी म्हणजे काय हें खरोखरच माहित नव्हतें. तिनें मोठ्या चतुराईनें आपलें अज्ञान लपविलें.

"तू कोणचा ग कोर्स घेणार मॅट्रिक झाल्यावर?"

"मला काय माहित? काका सांगतील तो."

"आन् सुकात?"

"त्याला आवडेल तो. पण बहुधा डॉक्टर होईल!"

"तू मात्र माझ्याप्रमाणें बी. ए. होण्यासाठीं आमच्या कॉलेजांत आलें पाहिजेस हा?"

"म्हणजे तू तिथपर्यंत नापास होत राहाणार कीं काय?"

या विनोदाच्या सफाईनें उद्धव क्षणभर अगदीं गोंधळला, काळा पडला. अवतीच्या तें लक्षातहि आलें आपलें हसें थाबवून त्याला उचलून धर[illegible]ण्याच्या उद्देशानें ती विषयाला मुरड देवून म्हणाली—

"उद्धव, तुझें कॉलेजमध्यें चांगला वक्ता म्हणून [illegible] म्हणे?"

तुला [illegible] कुणीं सांगितलें?"

"तुझे [illegible] हूने" [illegible]

[illegible].

"असें [illegible] कानावामुळें, [illegible] तुझी [illegible] हसवण्याच्या [illegible] असे म्हणे[illegible]"

"[illegible] तुला हा हा म्हणता [illegible] टाकील त्याच्या [illegible] असते!"

पाहु [illegible] पुढे [illegible] नें!"

"खर सांग हं उद्धव! तुला सुकात आवडतो कीं नाहीं रे?"

"मला मुळींच आवडत नाहीं."

अवतीला याचा खरोखरच राग आला.

"का रे?"

"स्वभाववैचित्र्य, दुसरें काय?"

या दिवसापासून ही महत्त्वाची बाब मात्र अवतीनें पूर्ण लक्षात ठेवली.

"तुला राग आला असला तर माफ कर."

तरीहि अवती बोलली नाहीं.

"तुला वाईट वाटलें?"

"हो."

"मग मी त्याच्यावर प्रेम करायला उद्यापासून सुरवात करीन, मग तर झालें?"

"झालें. आपण तिघानींहि एकमेकाशीं प्रेमानें वागू."

"कबूल! एकदम कबूल!" उद्धवानें तत्काळ उत्तर दिलें.

प्रेमाचा रुजवा कायमदाराच्या ओलाव्यानें क्वचितच होत असतो. त्या अप्रौढ उद्धव–अवतीला कसें कळावें?

दोघांचीं मनें कांहीं काळ अगदीं रितीं होऊन राहिलीं. बराच वेळ स्तब्ध राहिल्यावर अवती उठली.

"परत जायचं न?"

"जाऊं या."

दोघेंहि उठलीं व चालूं लागलीं.

चालूं लागल्याबरोबर मात्र काय असेल तें असो. उद्धवाच्या मनांत योजलेल्या साऱ्या विकारांची गर्दी माजूं लागली. आजच्या भेटींत आपल्याला यावें तसें यश मुळींच आलें नाहीं, उलट अवतीनेंच आपणावर सत्ता गाजवली—–अवतीनें का? सुकातनेंच सत्ता गाजवली व तीहि आपण लाब खाडी किनाऱ्यावर राहून—या गोष्टीमुळें तो मनातल्या मनात बेफाम संतापला

त्या संतापाच्या भरात चालत असतांना पूर्वींच्याच ठिकाणाजवळ तींच दोन व्रात्य पोरें त्याला दिसलीं. "म्येलास बुटा घालनार." हे त्याचे अपमानकारक शब्द त्याला आठवले. तीं पोरें कसलीं चलाख! उद्धवाची चाहुल लागताच टाकळ्याची भाजी निवडण्याचें काम तसेंच टाकून पार पळूं लागलीं. एक शिवी हासडून उद्धव त्यांच्या पाठीस लागला मात्र पाचपचवीस पावलें पळाल्यावर बुटाचा पाय घसरून तो जोरानें आदळला, उतरणीवर घसरला. परीटघडीचें धोतर व रेशमी शर्ट चिखलानें पार बरबटला व हातांतील छत्री अंगाखालीं सापडून मोडलीहि!!

अवंतीला अत्ता त्या कुळब्यांच्या शब्दांतील तारतम्य पुरेपूर कळून चुकलें.

मोठ्या भारदस्तपणाचा आव आणून—

"लागल नाहीं ना?" असे तिनें विचारलें.

उद्धव काहींहि न बोलता तसाच चालू लागला त्याचा चेहरा त्या चिखला-इतकाच काळवडला होता.

घरीं पोंचेपर्यंत दरम्यान, राजबा गोठल व तात्या चालका भेटतात कीं काय ही उद्धवाला फार मोठी धास्ती पडली.

अवती घरीं जाऊन पोचते तो काय—

लाटाच्या माऱ्यांत होडी उलथी झाल्यामुळें, पाण्यात पडून बहुतेक बेशुद्ध झालेल्या सुकाताला जगविण्याकरिता कित्येक मडळींचे उपचार चालू होते.

अवंती चोराप्रमाणें एका बाजूला उभी राहिली.

तिच्या अतःचक्षूसमोर सुकात व उद्धव दोघेहि दिसू लागले.

निसर्गाशीं खुळेपणानें वागून एक तोंडघशीं पडला होता तर दुसरा निसर्गाशीं वीराप्रमाणें झगडून लढवय्या ठरला होता.

पण त्या अल्लड बालिकेच्या मनात हा प्रकाश कसचा पडणार——!!

# ४ गौरींतला नाच

सुकातला उपचार करण्यात वाडींतील बहुतेक कुळवाडी भागले होते. खाडीकिनाऱ्यापासून दोन भोयानीं सुकातला डोळींतून उचलून आणल्याचें पाहिल्यामुळें जो तो इसम रावजीकाकाच्या [illegible] कडे धावू लागला. [illegible] दवापाणी क[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] त्या मा[illegible]ाला काय उ[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] म' [illegible] सारेजण ये[illegible] [illegible] च्या करामतीवर प्रामु[illegible]न अ[illegible] बू[illegible] [illegible]इल अमल त[illegible] -यात आश्च[illegible] [illegible]

काडपाऱ्या खोलातील भान घिरट यचा घिरट प्रथम च[illegible]ल्या ऐसपैन जागा घेण्यात आला. नतर सुकातला येसू भोई धरून बस[illegible]. घिरटाची वरील पेड गरगर गरगर फिरू लागली, त्याबरोबर सुकात व यसूहि गरगरू लागले.

बऱ्याच वेळानें सुकातच्या पाटातून बहुतेक पाणी वातीच्या रूपानें बाहेर आलें. घिरटाचा वेग सहज सहन करणाऱ्या येसू भोयाचे मात्र सर्वांनाच कौतुक होऊन राहिले. त्याला कशी वाति झाली नाहीं!

"तो म्हजे भोय ना! रातदिस जसा काय लाटेच्या घिरटावर ऱ्हानारा! हा येग म्हजी व्हयत्याला भुसकाट निसता!" कित्येक कुळब्यानीं याच शब्दात त्या आश्चर्याचा उलगडा केला.

नतर बगोबा मास्तराच्या सूचनेप्रमाणें श्वासोच्छ्वास सुरू होण्यासाठीं कृत्रिम उपायांचा अवलंब झाला.

रात्रीं अकरा–बाराच्या सुमारास सुकातचा श्वासोच्छ्वास चागला सुरू होऊन त्याला ओटीवरच निजवण्यांत आलें जवळ रावजीकाकाहि झोंपले होते.

पडवीला ते भोई व दोनचार कुळबीहि निजायला होतेच

दुसऱ्या दिवशीं सुकात बोलू बसू लागला मात्र त्याला अतोनात थकवा येणें साहजिक होतें

भीतीचें कारणच न राहिल्यामुळें आता कुठे रावजीकाकांनीं येसू भोया-जवळ सारी चौकशी केली.

"शाबास जगनाराची!! व्हडी उलकाटली तवा त्यासनी भाईर यया मुल्लींच गवसला नाय! मगशान् आस्ते आस्ते तडीसरपे बत आले, पर मग काय इचारताव? काटाला मड्यागाणी लटाकले! आमचा तो बारका पोर आला बोंबलत, बावा का असा नाय असा झालाय! जाऊन बगतों तों हा भविस!" येसू सागत होता.

"अरे पण हहह तू का नाहीं बरोबर गेलास होडींतून?" रावजींनीं विचारलें.

"मुल्ली ते येवूच देईनात ना व? मी यकस्यान जायाचा हाच घेउन बसले त्ये!" तदनतर सर्व मडळी घरीं जायला निघाली

"हें बघा, तुमच्या सर्वांच्या मेहनतीने हहह हें माझे पोर जगले. गौर आलीच आहे हहह जवळ इथें गौरीचा नाच घेऊन याल तेव्हा हहह काय हवें असेल तें पोस्त मागून घ्या. हहह समजलें ना?" रावजींनीं सर्वांना खुषींत येऊन सागितलें.

"ता कुट पलताय व्ह!" राजबा म्हणाला व सर्वजण "पाढरी उभी ऱ्हाली म्हनून हा वकत" म्हणत गावदेवीचे आभार मानीत निघून गेले

सुकात आठ दिवशीं चागला पूर्ववत् झाला. या आठ दिवसात अवतीने त्याला 'अटकेपार' 'सुशिलेचा देव' 'मृत्यूच्या मांडीवर' या तीन कादबऱ्या वाचून दाखविल्या पण त्यात सुकातला आपली जीवनसृष्टि कुठेच दिसून आली नाहीं अभ्यास सुरू झाल्यानतर—

एक दिवस, बगोबा मास्तर अवती व सुकात याचा अभ्यास घ्यायला सुरवात करणार तोंच,—

"मास्तर! आडगावीं अगर दर्यावर्दी जीवन ज्यात बरेंचसें दिसून येईल अशीं कांहीं पुस्तके मराठींत आहेत का हो?" सुकातनें विचारलें.

या प्रश्नानें तर मास्तर गूढांतच पडले. आपलें अज्ञान मुलापासून लपविण्या करता मास्तरवर्ग नाना तऱ्हेचे उपाय योजतात त्याप्रमाणेंच या मास्तरानींहि सुकातला गप्प बसवण्याचा बेत केला मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध मास्तर तरी कुठून व कसे जाणार? "मराठीत रेट पुस्तकें आहेत, पण तुला एकहि वाचून घ्यायचें नाहीं तूर्त. त्यात परवाचा तुझा दर्यावर्दीपणा विसरलास वाटतें?"

"विसरायचें तर लांबच राहो—क्षणोक्षणीं मला त्याची गोड गोड स्मृति होत रहाते."

"विसर अता याच्यापुढें तुझा दर्यावर्दीपणा! अता नाहीं हा होडीखाडी वर जायला मिळणार! वारे वा!"

"म्हणजे?"

"म्हणजे काय? नाहीं जायला मिळणार मुळीं. काका जाऊ द्यायला पाहिजेत ना यापुढें?" अवतीनेंहि मास्तराचेंच म्हणणें ठसवलें.

"असें असेल तर मला शिकायचेंच नाहीं तुमच्याजवळ" सुकातनें ताडकन् सांगितलें. कुठूनतरी ताव काढायचा! तो शिक्षणावर काढला इतकेंच!

आपल्या टिनच्या चष्म्यातून मास्तरनीं क्षणमात्र डोळे मिटले आपण त्या दिवसाची आठवण देवून सुकातला उगच चिडवलें याची बगोबाना जाणीव झाली. पण आता काय उपाय? आपली छाप ठेवण्यासाठीं तोच कापूस मास्तर आणखी पिंजू लागले. पण थोड्या हलक्या हातानें—

"नसेल शिकायचें तर नको शिकू माझें काय? माझा तितकाच व्याप कमी होईल"

"म मीं सांगू तसें काकाना?" सुकातनें झटकन् विचारलें

"आपण दोघानीं सांगू" अवतीनें सुकातकडे पाहून त्याला अनुमोदन दिलें मुंबईकडे शिकायला जावें असें अलीकडे फार फार तिला वाटू लागले होते

मास्तरनीं डोळ्याचा चष्मा काढला व धोतराच्या शेवानें डोळेहि पुसून काढले.

"सांगावयाचें असेल तर खुशाल सांगा त्याचा ते विचार करणारे समर्थ आहेत. मॅट्रिकपर्यंत तयार करून एकदम उपान्त्य परीक्षेला बसवून, मोठी

मजा उडवायचा माझा बेत! पण तें श्रेय तुम्ही मला लाभूंच देणार नसलांत तर मी काय करूं?" असें एकेरी व क्षीण स्वरात म्हणत बगोबा मास्तरनीं फारच मोठा विश्वास सोडला बारिक छिद्र पडलेलें एखादें अरुद तोंडाचें भाडें घगाळभर पाण्यात उपडें दाबल्यावर त्या छिद्रातून जसे सारखे बुडबुडे फेसाळू लागतात तशीच, मास्तराची वृत्ति आता सारखी थलथलूं लागली.

"अरे सुकात! तू खाडी–होडीवर जावू नकोस, म्हणजे इतकेंच कीं, मोठा होईपर्यंत अन् एकटा दुकटा जाऊ नकोस. दरम्यान तुला Captain Marriyatचीं समुद्रविषयक पुस्तकें–कादबऱ्याच म्हणसना–आणवून देतों, समजावून सागतों, मग तर झाले?"

"खरच आणवून देणार?"

"Oh yes, of Course!"

"तरी पण मास्तर आम्हाला जाउ द्याच हो मुबईला शिक्षणासाठीं आता–" अवतीहि थोडी काकुळतीस येवून म्हणाली. त्याच्या मनातील ती मघाचची अढी मोडल्यामुळेच सुकातनें मघाचचा सवाल केला असावा, असेंच अवतीला वाटल्यामुळें आपल्या आवाजाला तिनें काकुळतीची मुरड घातली.

अवतीच्या या विनवणीनें मास्तराना क्षणभर असेच वाटलें कीं जाणार पोरें आता आपल्या हातून!! फुकट होणार आपलें जीवन!!

"कुठल हें वेड तुझ्या डोक्यात भरलें आज? त्या उद्धवाने तर नाहीं कोंबलें?"

"इश्श, उद्धव कशाला कोंबील?" मास्तराकडे क्षणभरच नजर रोंखून अवती म्हणाली. नतर आपली नजर दुसरीकडे वळवीत तिनें चेहऱ्यावर असा भाव व्यक्त केला कीं "नी उद्धवनें कोंबलें असलें तर तुम्हाला काय करायचें आहे?"

"हें मास्तर तुमचें आपलें काहीं तरीच हां!" सुकात म्हणाला.

"तसें असलें तर उत्तम झालें!"

"खरच आणवाल ना मॅरियटच्या कादंबऱ्या?"

"नुसत्या आणवीन् काय! शिकवीनसुद्धा. डरतोस काय असा?"

नतर अवंतीकडे पाहून फिरून मास्तर बोलले.

"आन् तुला ग कसली पुस्तकें पाहिजेत अवू?"

"मला कसलींच नकोत! मी सागायला जायची अन् तुम्ही विचारायचेत कीं तुला उद्धवानें का हीं नावें सागितलीं म्हणून!" तिचा पूर्वीचाच घुस्सा कायम होता.

एकदम धूमकेतू उगवल्याचें दिसून येताच सर्वसाधारण लोकाना भावी आपत्तींचें तें एक जसें आगामी चिन्ह म्हणून भासतें, तद्वतच बगोबा मास्तर-ना आजचा हा एकदम प्रकार वाटला. बगोबा मास्तर खरोखर अत्यत ध्येयप्रधान होता. हीं दोन पोरें एकदम प्रिलिमिनरीला बसवून मोठी बहार करावी हा त्याच्या चालू आवडीचा एक महत्त्वाचा भाग होता मास्तर म्हणजे तो ब्रह्मचारीच असला पाहिजे ब्रह्मचारी असेल तरच त्याच्या वाणींत तेज उत्पन्न होईल विद्यादान हेंसुद्धा तेजोमय शद्बानीं झालें तरच तें टिकावू होतें वीर्यसपन्नतेशिवाय तेज नाहीं तेजाशिवाय विद्येला मोल नाहीं. तेजहीन विद्या म्हणजे पानें न फाडलेला ज्ञानकोश!

अशासारखे अत्यत प्रामाणिक विचार, आमच्या बगोबा मास्तरात त्याची विद्यार्थीदशा सपल्यापासून, उद्बोधित झाले होते. इन्टरपर्यंत शिकल्यावर त्यानीं मुलामुलींच्या समिश्र हायस्कुलात नोकरी धरली. पाचसहा वर्षे नोकरी केल्यावर अविवाहित असलेले सारे शिक्षक त्या शाळेंतून सेवानिवृत्त करण्याचें नियत्रक मडळाने ठरवलें. यामुळेंच बगोबानीं ती नोकरी सोडली. बगोबा-ना लग्न करण्याचा पुष्कळ आग्रह केला गेला. प्रत्यक्ष त्या शाळेच्या हेड-मास्तरानींच त्याच्या गुणावर लुब्ध होऊन त्याना आपली बहीणहि देण्याचें ठरवलें. बगोबाना तें तत्त्वच—समिश्र पाठशाळेंत असणारे शिक्षक विवाहितच असले पाहिजेत हें—मान्य नसल्यामुळे आपलें म्हणणें त्यानीं शक्य त्या अभिनिवेशानें माडलें. पण काय—

नियम म्हणजे नियम! पोलाद म्हणजे पोलाद!

तेव्हापासून बगोबानीं कायमची मुंबई सोडली.

थोड्याच दिवसांनीं रावजींकडे त्यांचा जम बसला व तेव्हापासून ते रावजींकडेच असत. आज बगोबाचें वय जवळ जवळ चाळिशीपर्यंत असावें.

विद्यादान व वाचन याखेरीज, रावजींचे हिशेबठिशेब पहाणें आणि बाकी सर्व वेळ देवदेवतार्चन व अक्कलकोटच्या स्वामींचें भजन! त्यांच्या कोटा-वरच एक लहानशी चौपटी तसबीर लटकावलेली होती. कोटाच्या कॉलरवर ज्या ठिकाणीं रंगेल तरुण गुलाबाचें फूल ठेवून देतात त्याच ठिकाणीं बगोबाची ती तसबीर असे

वरील प्रकारानीं आलेली उद्विग्नता अक्कलकोट स्वामींच्या स्मरणानेंच घालवावी म्हणून "राजाधिराज योगीराज श्री स्वामी समर्थ महाराज की जय" करीत ते अभ्यासाच्या खोलींतून उठून गेले.

अवती व सुकात पूर्ण समजुतीनें एकमेकांकडे पहात राहिलीं.

मास्तर खरेंच बिथरले ही गोष्ट त्या दोघानाहि समजून आली.

अवती उठून चोरासारखी स्वयपाकघरांत गेली व सुकात मावळतेस दिसणाऱ्या खाडीकिनाऱ्याकडे विलोल नयनांनीं पाहू लागला.

* * *

गौरीचा सण.

गौरीचा सण म्हणजे कोंकणच्या कुळब्यामाळब्यांचा अगदीं अव्वल सण. तो सण जसजसा जवळ येवू लागतो तसतसे गावचें चैतन्य जास्त-जास्त फैलावू लागतें. सणवार म्हणजे चागलें चागलें लेणें, गोडधोड करून खाणें आणि पोटभर नाचणें. पाश्चिमात्य समाजात तरी दुसरें काय करतात? नाहीं म्हणायला एक गोष्ट जास्त करतात व ती म्हणजे समिश्र नाच. आमच्या पाढरपेशा समाजाला नाचाचे मात्र वावडें. नाचणें म्हणजे शरिरानें व्यक्त केलेलें समाधान, आनद व चैतन्य. आडगावच्या शेतकरी कुळब्याना मात्र अद्यापहि नाचाचे महत्त्व वाटतें.

आठ दिवसावर गौर येवून ठेपली म्हणजे प्रत्येकजण आपापल्या घरच्या माहेरवाशिणींना माघारी दवडतो माघारी म्हटला कीं तो हटकून सजून नटून जायचा. अगात पाढरी पैरण, त्यावर चिटाचा काचला व डोकीला रगदार पटका, क्वचित जरीचादेखील. नेसू कोरें धोतर—खळीमुळें मलिन दिसणारें—! पण हे सारे कपडे, गरीब माघारी फक्त सणावारींच बोचक्यां-तून बाहेर काढतो.

वर सांगितलेल्या काचल्याच्या खिशांत एक रंगीबेरंगी हातरुमाल हटकून असायचा.

या कपड्यात, जगातले उपभोगण्यासारखें सारें सुख एकवटलें आहे–असेंच त्याला वाटत असतें.

अन् तसें तरी त्याला का वाटू नये ?

एक घोंगडी, एक दोन हात औरस चौरस नेसूंचा रुमाल, एक फाटकेंसे बिन बाह्यांचें कुडतें व एखादें चिंध्या झालेलें उपरणें डोकीला याच कपड्यावर सारी हयात काढणाऱ्या गरीब शेतकरी कुणब्याला तसें का वाटणार नाहीं ? कोंकणच्या खडकाळ भूमीला वर्षातील तीनचार महिनेच जसें रंगीबेरंगी वैभव प्राप्त होत असतें तद्वतच तिच्या शेतकऱ्यानाहि वर्षांतून तिनचार दिवसच काय ते सुख. बाकीचे सारे दिवस खडकाळ, ओसाड व तापदायक—

थेट अगदीं कोंकणच्या डोंगरासारखे

माहेरवाशिणी घरीं आल्या–दरम्यान घरोघरच्या सासुरवाशिणीहि माघा-[illegible] असतात–[illegible] जो तो कुणबी गौरीचा सण [illegible] करण्याच्या [illegible] लागतो क्वचित् [illegible] चारदोन [illegible] [illegible] जीं [illegible] पान [illegible] [illegible] गौरीच्या नाचा [illegible] महत्वाचे [illegible] चोडून [illegible] बरोबर नेण्याचे ते मुळींच विसरत [illegible]

शेतकरी [illegible] काहि बाजार आणायला जातात—नव्हे [illegible] बाजार करतात [illegible] फार तर चारदोन बकरे खरेदी करून [illegible] दहा वीस बाटल्या माडी आणायची बाकी सारा बाजार [illegible] जाणे.

आणि तो म्हणजे तरी काय ?

चारदोन आण्याचा गरम मसाला, चारदोन आण्याचा गूळ कांदा, चारदोन आण्याची मिरची लसूण, व चारदोन आण्याचा एकाददुसरा माहेरवाशणीला खण. शेवटीं चारदोन पैशाचे चणे कुरमुरे, पोराकरतां—!

नी यातच काय तो सण !

पण तेवढ्यातहि समाधानी किती? तेवढ्यांतहि आनंद किती! तेवढ्यांतहि विलास किती? अगदीं लक्षाधिशानेंहि मान खालीं घालावी व म्हणावें कीं देवा, हजारावारी रुपये खर्चून याच्या अर्ध्यानें तरी मला समाधान मिळू दे, अर्ध्यानें तरी आनद होवू दे, विलास केल्याचें अर्धें समाधान तरी लाभू दे!

समाधानाची, विलासाची, क्रीडेची अगर आनदाची उत्कटता रोजच्या क्षणाला कुठून येणार? ती परिपूर्णता वर्षातील एखाद् दुसऱ्या क्षणांतच असणें साहाजिक आहे.

महासागरातील दर्या–खाड्यांना दिवसातून दोन वेळा भरती येते, पण धरित्रीच्या डोंगर–माळांना वर्षातून एकदाच वसताची भरती येत असते.

वाडींतली सारी वडीलधारी मडळी बाजाराकडून आपापला बाजारहाट करून येणार, त्यांना आपण वाटेंतच भेटून एकदर अदमास घेऊ, अशा इराद्यानें विश्राम, चिमा, केरू वगैरे गुराख्यानीं सारीं गुरें त्याच बाजूला नेलीं होतीं. कासराभर दिवस राहिल्यापासून त्याचे डोळे लाबवर वाटेकडे लागून राहिले.

"त्ये त्ये बघ केरुदा, त्या त्या चिंचेजवल." येणाऱ्या मडळीकडे नजर पोचताच विश्राम ओरडला.

"मना नाय दिसत त्ये?" केरू चिंचेच्या रोखानें पहात म्हणाला.

"अर नाय कसा र! काय डूले हायत का गुडगुडीचीं भोका?" पड्या पाणकरानें पहात पहात सागितले.

"बावानीं मला चोली आनलनी आसल" चिमा म्हणाली. तिची आई हयात नसल्यामुळें चोळी तिचा बापच आणणार, दुसरा कोण?

"मना पर माजे बावा आनतील." विश्रामची बहीण रमा म्हणाली. तिचीहि आई पाच वर्षांपूर्वी गमावली होती.

"मीव धोतार आन् योक इस्कित पटका आनाया सागतला हाय." विश्राम म्हणाला.

–"आन् पेराण नाय सांगतलीस?" केरूनें विचारलें

"नाय. मना कलच कातुदानें आपली नवी पैरान दिली."

"तुम्हांला ब्यस × × घतात!" हेवेखोरी व्यक्त करीत केरू म्हणाला.

"इस्रामान त्याची चाकरी तशी क्यलान् जागुनशान्! रातभर त्याचा अंग रगडीत बसला व्हता परवाच्या दुकन्यात. तू बसतास तर तुला पर देतारी, पर इकता तरक हाय कुट तुला!" चिमानें खोंचदार उत्तर दिलें.

"अन् तुला नाय काय चोली घलान्?" केरूनें रागानें विचारलें.

"मला चोली घया तो काय बाय मानुस हाय काय? इद्रा म्यला! काय तरी आपला भकतो आन् मग बाप्साला जाऊन सांगतो."

तिथून दूर जात जात चिमा म्हणाली.

"तां न्हाउद्येर केरूदा! पर तू काय आनाया सांगतलास तुज्या बावाना?" विश्रामानें सवाल केला.

"मी कदीच नाय त्यास्नी सांगत. त्ये कुटले आनाया? कपडा त मुळ्ळी नाय आनायचे. शेवट खायाचा मेला आनतील! सागोती आनायचेच म्हना, दारूबी आनायचे, नाय कायता कपडा. अगदीं कुनालाच नाय! बायला पर नाय." केरू म्हणाला. "कवाच नाय."

बाय म्हणजे आई व बावा म्हणजे बाप हें कुळव्या माळव्यात अगदीं ठरलेलें.

थोड्याच वेळात हीं सारीं जागळी मुलें, कुणी आईजवळ तर कुणी बापाजवळ जाऊन उभीं राहिलीं. प्रत्येकाच्या हातावर थोडे थोडे चणे-कुरमुरे देवून—

"आता सांज झाली. रातीं फुरसदीन् बगा काय काय आनलाव ता." असें सांगून त्या बाजारकर मंडळींनीं वाट धरली. त्यानंतर घरीं जाऊन त्यांना घरकामें उरकायचीं होतीं.

जागळी मुलांना जो आनंद व्हायचा तो झालाच. मग कशाला करतील जिकीर? कुठल्याहि सुखाच्या प्रत्यक्ष अनुभवापेक्षा आगामी आभासच जास्त आनंदायक असतो.

गणेश चतुर्थीच्या दिवशीं सारे कुळबी रावजीच्या पडवींत "गौरीचा नाच" करायच्या हेतूनें आले.

रावजींच्या घरचा नाच तो! तो काहीं तरी विशेष कसबाचा होणार, या भावनेनें वाडींतल्या चिमा, रमा, लाडी, गुणी वगैरे पोरीहि नव्या चोळ्या

व पातळें नेसून आल्या होत्या. विश्राम, पंड्या, केरू जांगळीहि शक्य तो रुबाब करून आले.

रावजीकाकाच्या ओटीवर ते स्वतः, मास्तर, वगैरे मोठी मडळी बसली होती. पायठण्यावर अवती, सुकात ही बसलीं. मागच्या पडवीच्या दारात मावशी येऊन उभ्या राहिल्या.

"हा करा र पोरानू सुरवात." रामाण्या नावाच्या अगदीं नव्वद वर्षांच्या एका म्हाताऱ्यानें सुनकावलें.

शिल्पकार फडक्याच्या "प्रवचन" या अद्वितिय पुतळ्यातील अद्भुत म्हाताऱ्याप्रमाणेच हा म्हातारा पवित्र व रसाळ होता. पाढऱ्या चंदनाचा रुपयाएवढा टिपका त्यानें कपाळावर लावून डोक्याला पाढरें पागोटें मराठी पद्धतीचें कसेंतरी बसवलें होतें. जाडजूड माणसाच्या अगाला येईल असा जीर्ण व सुरकुतलेला सदरा त्यानें चढवला होता. काठीवर दोन्ही हात टेंकून त्या खोबणींत आपली हनुवटी ठेवणाऱ्या त्या म्हाताऱ्याच्या मायाळू नजरेंत पूर्वकालचे त्यानें स्वतः बसवलेले सारे नाच भरून राहिले होते. या नाचणाऱ्या फळींत त्याचे मुलगे, नातू व पतूहि होते. जोडीदार मात्र नव्हतेच [illegible].

"आजोबा, [illegible]" सुकात त्याच्याजवळ जावून म्हणाला.

"बाब [illegible] मर्जी काय नाय! वायच नाचाया लावता भोवरी धरू [illegible], आन् मग बगता हा बा!" प्रसन्न चेहऱ्यानें सागून रामाण्यानें फिरून हुकूम सोडला.

"बगताव र काय! हाव कुट! कुनाच्या घरीं! उटवनीस आलेव व्हय!"

ढुढुम् ढुढुम् ढुढु ढुम् ढुम्—

मुरदुग वाजवणारा वाजवू लागला व त्याच्या भोंवती फेर धरून लहान थोर कुणबी रुमाल फडकावीत नाचू लागले.

अगणात उभे असलेले गारदी सूरसनई वाजवूं लागले. स्वतः रामाण्याच चकवा सागू लागला.

"हिरव्या दुरवा, हिरवी पाच
द्यव गणपती रुमूझुमू नाच"

नाचणारे सारेजण एकेक हात उजव्या गालावर ठेवून म्हणू लागले. वरचे चरण दोनतीनदा घोळून झाल्यावर–परमावधीच्या तिसऱ्या चरणाला सुरवात झाल्याबरोबर मुरदुगाचा बोलहि बदलला व एकदम सूरसनईच्या पचमासहित, कडकडाट झाला. नाचणाऱ्यानींहि एकदम रुमाल हवेंत फडकावून विरुद्ध दिशेला तोंडें फिरवलीं. याच चरणात काय तो नाचाचा सारा रग भरून येतो.—

"असा गनपती घाली थैमान"
"असा गनपती घाली थैमान"
"असा गनपती घाली थैमान"

क्षणभर साऱ्या प्रेक्षकानाहि आपणच नाचतो आहों, असा भास झाला! नाचणाऱ्याची, वाजवणाऱ्याची व म्हणणाऱ्याची हौसच इतकी रसरसून आली. तोंवर वाद्ये ऐकून उद्धवहि आपल्या घराहून आला व पडवींतील एका खुर्चीवर बसला.

एक चकवा पुरा झाल्यावर सधी साधून—

"हें रे काय वेड्यासारखें नाचता? जरा पद्धतशीर नाचा. मुबईचे बाल्ये काय सुरेख नाचतात. सगळ्याचा उजवा पाय पुढें तर उजवा पुढें. शिवाय तुमच्या पायात चाळ नाहींत रे?" उद्धव शहरी सुधारणा करण्याच्या उद्देशानें पण स्वतःच्या मोठेपणाखातर म्हणाला

"आता तू पायात चाल बाध आन् दाव नाच करून." रामाण्या आपल्या वयाला शोभेशा रागानें म्हणाला, "य बरी, व्हवुय थयथयाट?"

त्याबरोबर सारींजणें हासलीं.

"इस! म्यलार यडा." चिमा हळूच रमाजवळ म्हणाली.

"ह्यरींच नाय ता भकल्! कातुदा बग बरी कसा रमलाय ता?" रमानें आपलें मत व्यक्त केलें.

"हहह उद्धव, असूं दे. आडगावात पचेल तेवढीच नवी सुधारणा करायची असते. तूं आपला चिपकन् पहा." रावजींनींहि हासत उद्धवाला उपदेश केला.

"विश्राम तूं म्हण रे एक चकवा." नतर काकाकडे वळून सुकांत म्हणाला,

"विश्राम फार गोड चकवे म्हणतो काका."

"म्हण म्हणरे विश्राम!" काकानींहि सुचवलें.

आता विश्राम म्हणणार म्हणून चिमाला व रामाला फार फार आनंद झाला.

चिमाकडे चोरटा निक्षेप करून विश्रामनें सुरवात केली.

"तू माजी मखमल, मी तुजा कळा
दारात महामुर, अळवाचा मळा
तू माजी जाय ग, मी तुजा केवडा
शेंगीं ओथबलाय् दारीचा घेवडा
मी तुजा अनत, तू माजी तगर
घरामागे शिंपूं ग पोफळिचे आगर
तूं माजी करदळ मी तुजा साग
आजु बाजु उभवु ग नारलिची बाग
कळामळा, क्यवडा घ्यवडा, तगर आगर, साग साग
आजु बाजु उभवुं ग नारलिची बाग ॥१॥

× × ×

या ऐन कोंकणी चकव्यानें तेथील प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात भलभलतींच आदोलनें उत्पन्न झालीं.

दर चरणागणिक चिमाला तर असेंच वाटलें कीं विश्राम स्वरास्वरांतून आपले हृदय मला समजावून सांगत आहे, तर वाडकर मडळी माझ्याशीं विश्रामाने बोलूंदे नये अशी ताकिद फर्मावतात! देवा! काय हा अन्याय! इतका गोड गळा, इतका गोड चकवा व इतका गोड विश्राम! या व असल्या कित्येक भावनाचा आउर येवून चिमा खरोखरच अश्रू ढाळूं लागली. नाचणाऱ्या मडळीकडे चिमाने आपली पाठहि फिरवली.

अवंतीच्या हृदयात सृष्टिसौंदर्याची पहिली वहिली भावना आज कुठें प्रथम ओलावली.

सुकात तर या चकव्यानें इतका बेहोष झाला कीं विश्रामाला बाजूला काढून त्याच्याकडून तो फिरून म्हणवू लागला.

"अरे कातू! फिरून चकवा म्हणायला सागतोस तर इइइ म्हणावें इकडेच म्हण अगदीं मघाचसारखा नाचून"

फिरून विश्रामानें गाऊन दाखविला.

आता कुठें त्याचें चिमाकडे लक्ष गेले तिची आपणाकडे पाठ फिरलेली पाहून त्यालाही क्षणभर कसेसेच झाले. म्हणून ती बाहेर जाऊन—

"काग चिमा! तुला क्रण ब्वालला व्हय?" करून कुजबुजू लागला. त्याबरोबर राजबा ताडकन् उठून रावजींजवळ आला व म्हणाला.

"ता बगा कायता. ताकिद घेलीव तरी फिरून हा असा."

"गाढव आहेस तू राज्या!"

"आता मी गाडाव का ता पोर इस्न्या?"

"कुणाला रे गाढव म्हणतोस? विश्रामाची सर तुझ्या वाडींतल्या एका पोराला तरी आहे काय?" सुकात ताडकन् राजबापुढें जाऊन उद्गारला. खबरदार त्याचा हेवादावा कराल तर. तो माझा दोस्त आहे समजलास! बस चिपकन्"

"काय दोस्त!" अवतीकडे पहात उद्धवानें उद्गार काढले.

"हो हो दोस्त. गाढवाना गुळाची चव काय!" असें म्हणत सुकात आपल्या जागेवर येवून बसला. त्या शद्वाचा धपका योग्य माणसाच्या पाठींत बसला.

क्षणानतर तेथील वातावरण विषण्ण होऊन राहिलें.

त्या क्षणापासून विश्राम मात्र सुकातला आपला देव समजूं लागला. त्या एकंदर वातावरणावर बादळानंतरचा प्रकाश पाडण्यासाठीं मास्तर पुढें झाले.

"विश्राम! विश्राम! ये बुवा आणखी होऊ दे तुझा चकवा एखादा."

"नका. हवा कशाला उगच! राजबानाच म्हनाया सागा!"

"हां बग मुला! सणाचा दिवस ना! असलीं खेकटां जनमभर येयाचीं आपना कुनब्यांवर! पर सन् यतो वर्सांतून यक दिस. जन्माचां रडगाना यक दिसभर तरी इसरूंया माजी बाय ती" या रामाण्याच्या लाख शद्वांनीं मात्र सान्याची कळी फिरून उमलली.

नंतर निरनिराळे आलटून पालटून चकवे झाले.

नाचहि अगदीं जीव तोडून रंगला.

रावजीकाकांनीं पोस्त म्हणून आज पांच रुपये रामाण्याच्या अंगावर टाकले. सारे खेळी मारे खूष झाले. प्रत्येकाला आपल्या नाचण्याचें चीज झालें असें वाटलें.

"हा बग काका! तुजा बापा बाबजीकाका मातुर आजच्यावाणी पांच रुपये घ्यत असे बग. या हातान घ्यतले मोप वकत. मना अगदीं 'हा चकवा बोल, ता बोल,' करून घुमवायचा ता! आन् आमचे का नाय, लय लय लाब चकवे! म्हजि यका चकव्यात सारा पुरान् असायचा नाव! पर आता त्ये शिकतोय कोन आन् म्हनतोय कोन! घ्यनारा असता त घ्येले असतेरी. अन् पर अता, मनाव नाय ता गाना उलटत!! बाबजीकाकाचा लय ध्यान हा! तो मातर गान्यान गाना ध्येनांत धरी. नायत तू!" रावजीकाकांना अरे तुरे करणारा हा एवढाच म्हातारा मुचकुंददरींत होता. रावजीकाकानाहि त्याचा फार फार आदर वाटे का तो कोण जाणे!

काळोखीच्या दिवसात, रावजीकाकाना या उदंड व थोर मनाच्या कुणब्यानें कित्येक वेळा आपल्या थोर मनाचा उजेड दाखविला होता.

पण त्याला फार वर्षें झालीं!—

आज रावजीकाकासमोर ते काळोखे दिवस उभे राहिले. त्याबरोबर त्या प्रसंग–गुफेचा प्रत्येक धागादोरा, वेली, पानें, सारें सारें त्यांच्या अंतःचक्षूसमोर उलगडू लागलें.

त्यानतर, ती पलीकडे अदबशीर अंग चोरून उभी राहिलेली चिमाहि त्याना दिसू लागली. तिच्या बाल-हृदयापलीकडे—बालहृदयातून पलीकडे—ते दूर कुठें तरी पाहू लागले.

क्षणाभऱ्यानें त्याचे साद्र झालेले डोळे, भरल्या स्नेहानें अवंतीकडे वळले.

अवतीला वाटलें कीं काका आपलें मत विचारताहेत, म्हणून ती चटदिशीं म्हणाली.

"कित्ती कित्ती छान नाच झाला हो काका!"

"खरच, काका! मला असें वाटलें कीं आपणहि त्यांत सामील होऊन नाचाव!" सुकात त्याच्यासमोर येवून म्हणाला.

काकाच्या मनांत त्याच वेळीं कसली खळबळ माजून राहिली होती याची त्या अव्याज मुलांना कशी चाहूल लागणार?

"बर त काका यताव अतां." असें सांगून वाडकर पडवींतून बाहेर निघूं लागले.

"या या. हहह मास्तर द्या त्याना चार सुपाऱ्या." असें म्हणून काकांनीं त्याना निरोप दिला.

सुपाऱ्या हातीं पडताच ते चालू लागले

नाचणाऱ्या लोकांनीं ज्या ठिकाणीं राखडी धरली होती त्या ठिकाणीं चांगलें हातभर रुदीचें व सहासात हात व्यासाचें वर्तुळ बनलें होतें. तेवढाच भाग रोगण केल्याप्रमाणें चकाकत होता.

मोरीपडवींत अवतीशिवाय दुसरें कोणी नाहीं असें पाहून—

त्याच वर्तुळावर पावलें टाकीत—

तोंडानें 'तूं माझी मखमल, मी तुझा कळा

दारात पिकवू अळवाचा मळा'—

हा चकवा बडबडत—

व अवतीकडे खेळकर वृत्तीनें पहात पहात—

सुकांत अगदीं त्याच्यासारखा नाचू लागला. त्यासरशीं—

"इश्श" करून पण खेळकर वृत्तीची तोडीस तोड देवून अवंतीहि खदखदा हांसली. तोंच--

उद्धवानें मागून—

"अवू!" हांक मारली.

त्याबरोबर त्या दोघाचें हासणें नाचणें गार लयाला गेलें.

# ५. हौसल्या–व–ववसल्या

"चलतेस ना अवू?"

"कुणीकडे रे?"

"भले! विसरलीस वाटतें? धरणाच्या पल्ल्यात गौरी आणायाला जायचें ठरलें आहे ना? अत्ताच जाऊं ग कुळवाडणी माळवाडणी झाडून साऱ्याजणी तिथें गेल्या असतील बघ.

"बरेंच लांब कारे आहे?"

"छे ग! आपल्या धरणाच्या वरच्या आडव्यात. आन् तूं दमलीस तर मी उचलून घेईन् माझ्या बबीला—"

वरच्या पापणीच्या कडसरेंतून सुकातकडे तिरक्या नजरेनें पाहून अवतीनें मोहक स्मित केलें.

"बरं तर मी थाटी घिउन येतें ह घरातून गौरींकरता" असें म्हणून अवंती घरात मावशीजवळ बोलत राहिली, "मावशी अ! ए मावशी! ती गौरींची थाटी दे. मी गौरी आणायला जाते! आम्ही आल्यावर, पायावर दूध अन् गरम पाणी ओतायला तू तयार अस ह?"

"सुकात आहे ना बरोबर? मग झालच! तुम्हीं केव्हा याल नी केव्हा नाहीं. चागली तिनसन्ना करून यायचींत. तिथपर्यंत मी काय दारातच बसून राहू! मावशींनीं अवंतीला सागितलें.

"ऐकलेंस ना कातू! आपण लौकर यायच अ?" असें म्हणत अवती बाहेर झटकली. दोघेंही झपकन् वाटेला लागलीं

धरणाच्या आडव्यात मजूळ स्वराना आज अगदीं पीक आले होतें. वाडींतील बहुतेक कुळव्याच्या बायका व मुली गाणीं म्हणत म्हणत गौरी आणायला निघाल्या होत्या. वाटेने, गौरींची पत्री–गौरींचे डोळे, गौरींचे

हात, गौरींच्या जिभा—आदिकरून राजवैभव त्या बोरखडीत निघाल्या. कारण तें त्याचें पूजासाहित्य.

कपाळाच्या कुंकावर तादूळ लागलेले असून, काजळतिटीच्या नीटनेटक्या लेण्याची आज त्यात भर पडली होती. बहुतेकानीं नवा साडा, नवी चोळी. व नवा चुडा लेवून पोरीबाळींनाहि खिरड्या अगर रगीत चिटें नेसलीं होतीं. कुळबी बायकाचें नेसणें म्हणजे अगदीं सुटसुटित व अर्ध्या मांड्यापर्यंतच चापूनचोपून नेसलेलें असायचें. डोकीवरून लांबसा पदर घेतलेला असे. काठाच्या पट्या नीटनेटक्या बसवलेल्या व अगात नवी चोळी घातलेली दिसली कीं कुणबी बाईचा आज सणावाराचा पेहराव आहे असें खुशाल समजावें.

आपआपल्या कोऱ्या सुपात—

तेरड्याच्या फुलारलेल्या डहाळ्या त्या जमवीत होत्या.

याच त्या गौरी.

इतक्यात सुकात व अवती तिथवर पोंचलीं.

"अगबाय्! अवूताय् व कातुदा आल्ये" कित्येकजणी म्हणाल्या.

"गौरी आनाया काय आलींव?" अवूच्या हातची थाटी पाहून रामाण्याच्या वृद्ध बायकोनें विचारलें.

"तुम्ही जमवल्यात का गौरी? इश्श, हीं तेरड्याचीं डेखें कशाला ग?" अवूनें एका सुपाची चाळवाचाळव करून विचारलें.

"अव त्याच गौरी. कनाय् घरीं जायाचा, व्हयत्यात मुकवटा लावायाचा, व्हयत्याला साडीचोली करायाची अन् मग पुजा!" चिमानें उत्तर दिलें. चिमा आज तांबड्या काठाचें पाढरें पातळ पेहरली होती बाकी बहुतेकजणींचीं हिरवीं, काळीं, पोफळीं, जाभळीं आदिकरून रगाचीं माणलुगडींच होतीं. त्यांच्या चेहऱ्याचा काळा रंगहि त्याच रगात मुरून गेला. चिमाच्या लाल चोळीनें तर तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा लालिमाच पसरला होता. मात्र, दडवाकींच्या दाबानें अधिकच उठून दिसणारे तिचे दंड, माड्या, पोटऱ्या वगैरे अवयव अवतीला पिवळसर दिसले

दोडकीं, घोसाळीं, तोंडलीं, पडवळें आदिकरूनच्या हाराभर भाजींत

फुलकोबीचा एखादाच गड्डा जसा शोभून दिसावा तद्वतच त्या कुळबिणी-च्या रमण्यात चिमा दिसत होती

त्या साऱ्याजणी अवतीवाटोळ्या अगदीं चिमण्याप्रमाणे किलबिलाट करीत होत्या कुळबी बायाचा आवाज अतिशय झारदार असतो त्यात मुळींच भाग न घेता सुकात, चिमा व अवती याच्या चेहऱ्याचें आळून-पाळून निरीक्षण करीत होता.

आन् आश्चर्य हें कीं, दोघींच्या चेहऱ्यात खूबसे साम्य आहे असेंच त्याला आढळून आलें

"चिमा! धर ग माझा हात. त्या त्या पाणझोताजवळ चल. मला तिथुन-च्या गौरी वेचायच्या आहेत." अवती चिमापुढे हात करून म्हणाली.

"भिजाल हा दोघीहि!" सुकात म्हणाला

"भिजलों तर भिजलो" म्हणत अवती चिमासह पाणलोटाकडे निघाली. पाणलोटात उभी राहून अवतीने आपल्या थार्टीत सात दगड बारिक बारिक जाभ्याचे–उचलून घेतले

"याच काय तुमच्या गौरी?" चिमा उद्गारली

पाणलोटाच्या चचलतेंत जवळजवळ उभ्या असणाऱ्या या मुली, भविष्य-काळच्या जीवनौघात केव्हातरी इतक्या निकट येणें शक्य आहे का? आमच्या सुकातला मात्र क्षणभर–

याच खऱ्या गौरी असें वाटलें

"चला जाऊ या मावशी वाट पहात असेल." सुकातजवळ येऊन अवती म्हणाली

सुकातचा इथें आणखी रमण्याचा विचार होता

त्याच्या पाठीमागून त्या कुणबी बायाहि निघाल्या वाटेनें त्याचीं 'गौरी-चीं गीतें' चालली होतींच.

"आज अगर उद्या रात्रीं—उद्या गौरी हौसायच्या नाई का?–आपण वाडींतच जायचें का गाणीं ऐकायला?"

"इश्श, त्या घाणींत मी नइ बइ यायची"

"असं ग काय अवू? त्याच्याकडे तू आपलेपणानें का ग नाहीं पहात?"

"तीं घाणेरडीं असतात म्हणून."

"तू जाऊ येऊ लागलीस म्हणजे त्याना वाटेल कीं आपण स्वच्छ असावें म्हणून"

"मला नको रे वाद घालायचा तुझ्याशीं मला अगदीं कंटाळा आला आहे आडगावचा आधींच! खरचनारे आपण दिवाळी झाल्यावर जायचं मुंबईला?"

"तें तर नक्कीच."

"पण काका कसें कबूल करतील?"

"पाहू या."

याच विचारात गुंग असताना दोघें घरीं येऊन पोंचलीं. मावशींनीं दोघांच्या पायावर दूध व नंतर गरम पाणी ओतलें गौरींना आरती केली, नतर अवती ती थाटी घेऊन देवघरात गेली. पायठण्यापासून देवघरापर्यंत मावशींनीं रागोळी घेऊन गौरीचीं पावलें रेखाटलीं. जणूकाय याच पावलीं गौर देववरात गेली! देवदेवताच्या भावनेंत वृद्ध माणसें कशीं तल्लीन होवून रहातात याचा हा एक मासलाच म्हणाना!

दुसऱ्या दिवशीं सारी मुचकुददरी गर्जू लागली खाडीकिनाऱ्याजवळील भोयाच्या वाडींत, महारवाड्यात, कुळव्याच्या वाड्यातून मुर्दुंग व सूर-सनयाची मारे ही दगल! पाऊसझड सपून हळवीं पिकें (गौरीच्या टिपणात तयार होणारीं) घरात आलेलीं! पावसाचें पाणी झिरपून झिरपून झाडांचे सरळसोटहि हिरवाळून गेलेले! इतकेंच काय तर शेवाळून गेल्यामुळें दगडहि हिरवाळले होते.

वाड्यावाड्यातून आज अख्खी रात नाच चालू असायचे.

रावजीकाकाच्या परवानगीनें सुकात रात्रीं वाडींत गेला. त्याच्यामागून थोड्या वेळानें मास्तरहि गेले.

वडीलधारी मडळी बहुतेक 'अमलांत' होती. तरीपण मास्तराना बसाय-करता त्यानीं चागली जागा करून दिली.

नाचाचा पहिला भर ओसरून विसाव्यासाठीं मंडळी बसल्यावर मास्तर म्हणाले, "तुम्ही नाचताबिचता तें छान पण दारूत पैसे रे का घालता?"

कोणी कांहींच उत्तर दिलें नाहीं.

मास्तरांनीं तोच प्रश्न पांचसहादां निरनिराळ्या आविर्भावांनीं केला, तेव्हां एकजण वरकाती म्हणाला.

"त्यात आमची लय चूक हाय."

"कार तोंडादेखला बोलताव? नाय चूक. अव मास्तर, असा बगा! वर्सान् वरीस आम्ही लोक खाद्ये मलताव, धरतरीची उलटापालट करूनशान् टाकताव! हा सारा वर्साचा शीण घालवाया आमास्नी काय नाटका हायूत का तमाशे हायूत, का बुका हायूत, का कपडालत्ता हाय, का लाड्डूगाड्डू हायूत का काय हाय? हासू नाय त शीण घालवायाचा कसा बरी?" वाक्य-गणिक आवाज चढवीत राजबा गोठल बोलूं लागला.

"शीण दबडायला देवाचें भजन का नाहीं करीत? अक्कलकोटच्या स्वामींचें भजन करा. मी शिकवीत जाईन तुम्हाला." मास्तरनीं छातीवर हात मारून सांगितलें.

"भजन आपला शिकू कवातरी. हाय आमचा इस्राम त्यातला. पर सनावारीं दारू व्हॊवीच!" विश्रामाचा बाप शिवराम नवरत म्हणाला. कधींहि पुढें म्हणून न बोलणारा माणूस, पण आज इतकें तो बोललाच दारूच्या अमलात!

"दारू द्यवान् ही केलेली कशाला? ज पियाची नाय त पैदाशी तरी त्या द्यवान् का क्यलान्? बोल र मास्तरा?" रामाण्या पुढें होऊन म्हणाला.

मास्तर गडबडले.

"कार वाचा नाय उकलत? सणावारीं जो तू हत सागाया आलास ता हाच काय? आमानां पिवू नुका म्हणून सागायापरिस माडच मुळीं व्हावबू नुका, आपले माड व्हावाया द्येवू नुका, म्हनून बामनांना आन् भडाऱ्याना का नाय सागत व?" रामाण्या पुढें जोरात येऊन बोलला.

मास्तर तर आणखीच गडबडले. सर्दच झाले म्हणाना!

"अर यवडा तू शना म्हनवतोस पर सनावारीं नायताच बोलना का करतोस? ह्यरींहुरीची गोष्ट वायली! यकुदाजण फरकन् वाकडा बोल्यल!"

"जाऊद्या हो मास्तर! तुम्ही गप्प बसाना! त्याचें म्हणणें काय चूक

आहे? बिचाऱ्याना दुसरा काय विरंगुळा?" सुकांतनें केवळ तानमान पाहून मास्तराना उपदेश केला.

"गप्प बस तू. तुला काय समजतय त्यात?" मास्तर आवेशानें म्हणाले. "तू अलीकडे फारच फाजील होत चाललास!"

"मला रागवायचें तें घरीं रागवा. इथें प्रथम गप्प रहा. या कुळव्या-कडून आणखी शोभा करून—

दरम्यान, मास्तर ताड्ताड घराकडे चालू लागले अगदीं काळोखातून! पाठीमागून एकजण त्याना उजेड दाखवावयाला कंदील घेऊन निघाला

मास्तराना अगदीं वैताग आला होता. त्या वैतागातच ते घरीं जाऊन झोंपले. झोंपण्यापूर्वी मात्र आपण सणावारीं हा उपदेश करायला नको होता एवढें त्याना पटलें.

इकडे नाच सुरूच होता.

बायकाहि जमाव भरून गाणीं गात होतीं.

चिमा मात्र आपल्या घरींच ओटीवर बसलेली होती. तिचा बाप, तात्या चालका, अगदीं फिस् होऊन नाचत होता.

मध्येंच पानसुपारी खाण्याकरिता सारे लोक बसले

"पड्या, पड्या, या साऱ्या मडोळीला कान हालवून दाव र?"

विश्रामनें मडळीचें लक्ष वेधले.

"काय म्हणतोस? पड्या कान हालावतो? दाव दाव र पड्या." कित्येकजण उद्गारले.

"बगा हा!" असें म्हणून पड्यानें चागले बैलाप्रमाणें कान हालवून दाखवले त्यावेळीं गुलामाचे डोळेहि अगदीं पहाण्यालायक हालत होते.

हसून हसून बहुतेकाच्या मुरकुड्या वळल्या. पोटावर दोन्ही हात देवून सुकात हासला.

"काय र अकरित हा?" कित्येकजण आश्चर्यानें उद्गारले.

नतर फिरून चकवे सुरू होवून नाच चालू झाला.

सुकात घरीं जाण्याकरिता म्हणून काळोखातून झटकला. चिमाच्या पडसरीजवळूनच वाट होती. सुकात निघून जात असता चिमानें हातातील

डबरें पुढें करून विचारलें.

"निघालाव काय! दिवा दावाया येंव काय!"

"पण तू घरातचशी?"

"मना वायली ठेवलनी हाय! तका तूं यव नुको म्हनतात. माझ्यावर या साऱ्या वाडीचा–इस्लाम मातर नाय हा!–राम हाय. म्हुन एकली बसलांय आपली." रडकुडीस येऊन चिमा म्हणाली.

सुकात तिच्या ओटीवर गेला.

"फटकुरावरच झोपतेस तू?—

"आणखी चिरगुटेंच नाहींत घरांत?"

ती काहींच बोलेना.

"आण पाहू दिवा" असें म्हणून तो घरात–घराच्या आंतील भागात शिरला.

दोन चार भाडीं, दोन मडकीं. एक मोडकी पेटी, जातें, सूप, मुसळ एक कणग ( भाताची ), कणगुली ( नाचण्याची ), याशिवाय त्या घरात दुसरें काहींहि नव्हतें.

"हाच तात्याचा संसार?"

ती गप्पच होती.

"अरेरे इतकी कगाली आहे का तुम्हा लोकाची?" खरोखरच सुकातला आज हें प्रत्यक्ष ज्ञान झालें.

"साऱ्या कुणब्याच्या घरात हेंच?"

"नाय त काय! हाच न्ह हाच!" चिमा हळूच बोलली.

आज सुकांतच्या हृदयात एकदम नवीन कळ आली. या दैन्यावस्थेची आजपर्यंत त्याला कल्पना नव्हती. कुणबी लोक खाऊन पिऊन बरे असतील अशीच आजपर्यंत त्याची कल्पना. या दारिद्र्याची कुणालाच कल्पना होणार नाहीं.

क्लांत व जड अंतःकरणानें सुकांत बाहेर पडला. त्याच्यामागून वळचणी-वळचणीनें दिवा दाखवीत चिमा घराच्या कोपऱ्यावर आली. कोपऱ्यातील एका वाशाला गाधिलमाशीचें पोळें होतें. राकेलच्या धुराचा त्रास होऊन

कीं काय कोण जाणे, दोन माश्या कुणूकन् येऊन चिमाच्या ओंठाला कड-कडून चावल्या.

"बायग" करून चिमा किंचाळली.

सुकात झटकन् मागें फिरला. चिमाने हातीं खालचा ओंठ धरून, दिव्याजवळ काय झालें हें पहाण्याचा प्रयत्न केला. ओंठातून रक्त गळत होतें.

नाचणाऱ्या लोकाना याची दखलच नव्हती मृदगाच्या आवाजात चिमाचें किंचाळणें पार लोपलें.

चिमासमोर बसून, सुकात तिच्याच पदरानें तें रक्त टिपीत होता.

सुकातच्या उजव्या चिमटीचा स्पर्श होताच, चिमाच्या अगावर शहाऱ्यांच्या तरगवीची शिणशिणू लागल्या ओंठाचा ऊबदार व सतेज लालिमा सुकातच्या सर्वांगात सचारला. सुकातला तें सुख असह्य झालें.

"रक्त नइ थाबत!" सुकांत काहींसे स्वतःजवळ म्हणत बिंदुस्राव टिपीतच होता.

"नाइं थांबत तांच बेस, घरीं हे कुट माज्याजवळ बसाया." हेच विचार चिमाच्या डोक्यात घोळत होते.

"या ओंठावर ओंठ ठेवून—"

सुकात सणूकन् दूर झाला. मनात चुकचुकणारे हे विचार त्याचे त्यालाच भयंकर वाटले.

इतक्यात नाचहि बद झाला. कारण——

कित्येक गाधिलमाशानीं नाचणाऱ्या लोकाना आपला प्रभाव दाखविल्या-मुळें नाच बद ·रून जो तो गाल चोळू लागला.

तात्याच्या ओटीवर दिवा दिसल्यामुळें तात्याबरोबर दोघेचौघेजण तिकडे निघाले.

"काय ग पोरी! तुलाव गाधिल डसलां काय?" तात्या ओटीजवळ येत म्हणाला.

"गांधीलच चावले. हां. बरोबर. तात्याबा! चिमाच्या ओठांतून सारखें रक्त वाहतंय?" सुकात त्याच्याकडे पहात म्हणाला.

"ऱ्हय? हात्तिच्या ता काय अता बद ऱ्हयल!" असें म्हणत कुपणी-जवळील कसलासा पाला चुरगळून त्यानें चिमाच्या ओंठावर लावला.

"बरा आता जाताव का बसताव?" तात्यानें सुकातला विचारलें.

"जातों आता."

सुकात निघाला. त्याला कंदील दाखवायला दुसरा एकजण निघाला.

सुकातला त्या रात्रीं बिलकूल झोंप आली नाहीं.

त्याच्या डोळ्यासमोर चिमाचा तो मनोहर अगलट, तो पिवळट गोरे-पणा, ते रसरसून आलेले गाल, ते उपरे पातळ ओंठ, गोल मुखावर कायमचें ठाणें देवून बसलेलें तें हास्य, सारें सारें कांहीं एकसमयावच्छेदेंकरून दिसत होतें. कुणब्याच्या वशाला असलें सौंदर्य! हें झालें तरी कसें काय? अवती-च्या जागीं जर चिमा असती--

पण आपल्याला अवतीपेक्षा चिमाच का बरें आवडावी? वास्तविक, साहचर्यानें, संस्कृतीनें, आपलेपणानें, अवती जास्त निकट नाहीं का? पण चिमाप्रमाणें गूढलाघवानें अवती कुठें आपणाजवळ वागते? अवती आपल्या कडे "वडील बहिणीच्या" अधिकारी नजरेनें पहाते, शिस्त लावण्याच्या दृष्टीनें पहाते, उपकारकर्त्याच्या ताठरपणानें प्रेम करते. त्यात बेफिकिर लाघव नाहीं, प्रसन्नता नाहीं, अगर असंकोच ममत्वहि नाहीं. आणि तीच चिमा--!

अवती--व--चिमा--!

पहाट होईपर्यंत सुस्तपणानें सुकात याच दोन मुलींसंबधीं विचार करीत होता.

मावशीच्या भूपाळ्या ऐकत ऐकत अखेर तो झोंपला.

दुसऱ्या दिवशीं सुकात व चिमा हीं जोडनावें ज्याच्या त्याच्या तोंडीं झालीं. उद्धवानें येवून सारी हकिगत अवतीला सांगितली. मात्र कित्येक बाबतींत अपलाप करण्यात आला होता.

रावजीकाकांच्याहि ही हकिगत कानीं आली राजबा गोठलानें सकाळींच हें सर्व मास्तर व रावजीकाकास सांगितलें.

मास्तरनीं हें सारें झूट असा आपला निर्णय दिला. ते सुकातला बरोबर ओळखीत होते. शिवाय, असल्या खुळसट गवगव्याला जर प्रसिद्धि मिळाली

तर रावजीकाका खरोखरच सुकातला ताबडतोब मुंबईस पाठवतील असेंहि मास्तराना वाटलें. मास्तरनीं राजबाची कस्सून उलट तपासणी करून उठलेली बातमी फोल टरफल् अशी रावजींची बालबाल खात्री केली.

तरी पण चिमा व सुकात काहीं वेळ दोघेंच ओटीवर ( चिमाच्या ) होतीं ही गोष्ट ज्यानें त्यानें खरीच धरली.

झाली हकिगत सुकातनें अथपासून इतिपर्यंत सांगितली. सुकातचा निर्दोषीपणा शाबित झाला. तरी पण—

रावजीकाकानीं मनाशीं ठाम ठरविलें कीं यापुढें सुकातला मुचकुंददरींत राहूं न देता, अवती व सुकात याना मुंबईत एकाच ठिकाणीं ठेवायचें. हा आपला निर्णय रावजीकाकानीं त्याच बैठकींत जाहीर केला.

अवतीला फार फार आनंद झाला.

सुकातलाहि बरें वाटलें. उद्धवाला तर ब्रह्मानंदच झाला.

मास्तरना मात्र खेद झाला. "गेलीं पोर हातचीं!" ते मनांत म्हणाले.

शिक्षणाकरता सुकात मुंबईस जायचा हें ऐकून पड्या, चिमा, रमा वगैरे जागळ्याना मात्र कमालीचें दुःख झालें

मुचकुंददरींत आता आपलें असें कोणी राहिलें नाहीं असेंच विश्रामाला वाटलें.

गौरीचूशा काय? कुठल्याहि सणासुदीचें, प्रेमाचें, ममतेचें, हसण्या-खिदळण्याचे असेंच आहे—!

जसें हौसायचें तसेंच ववसायचें!

# ६. मनसूर व बहादुऱ्या

आषाढात पिंपळाचे कोंवळे पाले घालून—दरएक पिंपळावरील कोंवळ्या पाल्याचे ओझें विश्राम हम्मेश आणित असे—विश्रामनें आपला लाडका पाडा मनसूर चागला "तयार" ठेवला होता. घामणी, दिंडा, चिवा, माणगा, मेंड, इत्यादि पालेचरानें मनसुऱ्याची श्रावण महिन्यातहि आबाद् होऊन राहिली. रात्री मोठ्या होऊ लागल्यामुळें खास राखणेंतल्या गुराना आता "पसारा" हि लाभू लागला होता. पहाटच्या पसाऱ्यानें गुरे हा हा म्हणता तयार होतात!

भल्या पहाटेस उठून विश्राम, केरू व पंड्या आपआपले बैल पहाट-पसाऱ्याला नेवू लागले. मात्र जो तो अलग अलग. विश्रामचा जसा मनसूऱ्या तसाच केऱ्याचा बहादुर व पंड्याचा पठाण पाडा, दिवाळीला पाचपचवीस बैलाबरोबर झुंजून "आपल्या बैलाला मारनारा अजून कोन निपजला नाय." अशा तऱ्हेचें अजिंक्यपत्र मिळवण्याची प्रत्येकाला हौस होती. टेनीस, क्रिकेट अगर घोड्याच्या, बैलाच्या व कुत्र्याच्या शर्यतींबद्दल पांढरपेशा नागरिकाला जी जिद्दी वाटते तीच जिद्दी मुचकुददरींतील प्रत्येक तरुण जागळ्याला बैलाच्याबद्दल वाटे.

विश्रामचा मनसूर व केऱ्याचा बहादुर.

अवंती व सुकात हीं दिवाळीनतर मुबईला जाण्यापूर्वी ही झोंबी व्हायची असें सुकातच्या सल्ल्यानें साऱ्या जागली पोरांचें ठरलें होतें. आडगावच्या लोकाना प्रत्येक गोष्टीची मोजदाद पैशानेंच करायची हा पोंच नसल्यामुळें बक्षिसें बिक्षिसें काहींएक ठरलें नव्हतें. आपआपल्या बैलाचें नाव व्हावें हें काय लहानसान बक्षिस?

पहाटच्या मऊ मऊ मतलपी, डोंगराडोंगरात ओथंबून आलेल्या हलक्या

मेघावलीचा निळसरपणा, बारीक पांढरें पीठ उधळून गेल्याप्रमाणें दिसणारें हवेचें वातावरण, पायाचा पिरामिडप्रमाणे कोन साधून उताण्या सर्वांगावर हिरव्या घोंगड्या लपटून निजलेले डोंगर, चुन्याच्या रेघेप्रमाणे दिसणारे शुभ्र पऱ्हे, टपूटपू चिवकणाऱ्या झाडांतून होणारा किलबिलाट, व मधून मधून त्यात उठावाने मिसळणारे अलगुज्याचे सूर व त्याहूनहि, पहाट--कोंबड्याचे आरव —

किटसनच्या तेजाळ दिव्याच्या उजेडाचा, दुरुन पहाणाराला नुस्ता फवाराच दिसतो, प्रत्यक्ष दिवा दिसत नाहीं तद्वतच चारसहा घटका रात्र राहिल्यावर उगवत दिशेच्या एका कोपऱ्यात आकाशात फैलावणाऱ्या उजेडाचे रुद रुद होत जाणारे पदरच दिसू लागतात. नतर हळूहळू गोंडा फुटतो, लालिमा प्रसृत होत जातो, मावळतच्या क्षितिज-कडसऱ्या ताबूस होऊ लागतात व दरम्यानच्या अधुक टापूचा पुसटपणा जाऊन हरएक दरी-खोऱ्याला झाडझडोऱ्याला आकार येवू लागतो. वाडीवाडींतून निळसर धूर तरगत असल्याचें नजरेस येत व न्याहारीची याद होते--! या दरम्यानच्या वेळात, मनसुऱ्याचें तडीतड पोट भरते राखलेल्या गवतासभोवार असणाऱ्या दगडी कसवावरून, अलग उडी मारून, तो घरची वाट धरतो.

त्याच्या अगातून व जागळ्याच्या तोंडातून नतर सारखी वाफ निघत असते--चागली अर्धी घटका!

दाव्यावर आणून बाधताच, विश्रामानें मनसुऱ्याच्या सर्वांगावर मायेनें हात थोपटावा, गळ्याला कवा देनून भोकरासारख्या तजेलदार डोळ्यालगत चार दोन मुके घ्यावे, चार पावलावर जावून मायाळू नजरेनें मागें वळून पहावें व न्याहरीसाठीं वर गाठावे.

असें चार महिने हें आपलें चालायचेंच!

आपल्या बहादुऱ्यावर केरूची जरी तितकीशी माया नव्हती—माया कशी करावी हें केरूला तितकेसें समजतच नव्हते—तरी केवळ चुरशीखातर बहादुऱ्याची तो चागली जतन करी. मनसुऱ्याचा म्हणजेच विश्रामाचा पाडाव कसा होईल? हा एकच विषय केरूच्या डोक्यात. जेव्हा जाग येईल तेव्हां उठून तो पसाऱ्यावर जाई. बहादुऱ्याला हा अनियमितपणा मुळींच नसे

पण करता काय? मोहन—जात ती! रागारागानें चरगण गाठीत असे झालें!

पड्याचा पठाणपाडा अद्याप कोंवळाच होता. तरीहि विश्राम केरू-प्रमाणेंच तोहि त्याला पसाऱ्याला घेऊन जाई. जात्याच पड्या चिटवळ असल्यामुळें, बैलाला पसाऱ्याला नेल्यावर, एकून एक पक्ष्याप्रमाणें अनुकरणा-दाखल ओरडायचें, मध्येंच बैल डिरकल्याप्रमाणें स्वतः डिरकून दाखवायचें, मध्येंच जणू काय भूत रडले आहे असा भास करायचा, एखाद्या वृक्षावर चढून भुताचाच आव आणून जागळ्याना भेवडवायचें, वानराप्रमाणें हूप हूप करून मारे दणका उडवायचा, असले कित्येक खेळ करायला मिळावेत हाच त्याचा प्रमुख हेतु असे. आपल्या मालकाप्रमाणेंच पठाणहि मोठा चिटवळ बनला होता एका जागीं स्थिर असा तो मुळींच रमत नसे. सारखा पळत राही. यामुळेच एक भलें मोठें लोढणें त्याच्या गळ्यात अडकवणें भाग पडलें होतें. मूठभर मीया तर हातभर दाढी असाच त्या लोढण्यामुळें भास होई वास्तविक पठाण काहीं मस्त झालेला नव्हता, तरी पण केवळ लोढण्या-मुळेंच—

"काय र तरी माजोरी बयूल." म्हणून इतर जागळी त्याची चेष्टा करीत व फिदिफिदि हसत.

"पर कदिनाकदीं तरी, योक दिवस साऱ्या गावाला भारी व्हयूल माजा बैल, बगा! आता हसताव, पर बगाल म्होरं!" म्हणून पड्याहि त्याना उत्तर देत असे.

मनसूर व बहादूरची पोरापोरानीं ठरवलेली झुज, अखेर वडीलधाऱ्याच्या एकदाची कानावर गेलीच!

विश्रामचा बाप, शिवराम नवरत व केरूचा बाप राजबा गोठल याना ही गोष्ट तितकीशी पसत नव्हती.

"नायता उगच कशालरं लचाड इस्रामा? झुजताना यकुदा बयूल पडला, न मोडला, नायत म्यला, म्हजी जायाचा कुट?" शिवरामानें घरात एक दिवस दुपारच्या जेवणावर विषय काढला.

"नाय, कशान् मोडतोय?"

"आदि काय सागून यतय काय्?"

"पर तुमच्यापावन नाय् आला म्हंज झाला ना?" विश्राम म्हणाला.

"बगाबा! यकुदा गोटलाचा बयूल पडला झडला त भरून कुनी द्यायाचा?"

"त्या थराला नाय यनार पाता अन् झुजीत पडला झडला तर कोन काय करनार! आमचा ठरलाच हाय तसा."

लाडक्या विश्रामच्या मर्जीखातर शिवरामनें मग गिळले. बाकी त्याला हें मुळींच आवडलें नाहीं.

तीच गोष्ट राजबाची. तो अत्यंत चोख व करारी होता.

"क्यन्या, नाय झाबी लावायची" राजबानें एक दिवस आपल्याहि मुलाला सांगितलें.

"हं! काय? ठरुनसुद्धा न्यला. आता नाय म्हंजे भियाले म्हनतील!"

"भियाले म्हनाले तर काय बांगड्या पिंजतात काय?"

"पर व्हयाचीच ती. मी . . . . . . ची कोयतीन शिंगा व्हातीं—दाबणा सारी—करून ठ्यवनार हाय बगा. फाडुन काढिल मनसुऱ्याला नि म्हनताव् काय?" भावी विजयाबद्दल केरूनें बापाची खात्री करण्याचें ठरविलें.

"हट्, यडा कुटला. शिंगा व्हाती बीती नाय हा करायची. यकुदा नवरताचा बैल न्यला म्हंजे? नाय ता अरेश! न य ता क्यलास तर मान तोडीन बग." रागानें राजबा गोठल एवढें सांगून आपल्या कामावर निघून गेला.

बापाला न जुमानताच पोरानें बैलाचीं शिंगें तासून चांगलीं अणकुचीदार करून ठेवलीं व तीं सुद्धा झोंबीच्या आदल्या रात्रीं.

नवरात्रातील नऊ दिवस तर आठ आठ घटका बैल पसाऱ्यावर सुटत. झोंबीकरता बैल माजवण्याचें काम जुरशीनें सुरू होतें. कारण दिवाळींतच झोंबी लागायची होती.

त्या दिवशीं आणखीहि झोंब्या ठरल्या होत्या.

एक कोंबड्याची, मेंढ्याची व रेडयाची.

मनसूर व बहादूरच्या झुजीकडे मात्र, या वाडीबरोबरच सुकाणचेंहि, लक्ष लागून राहिलें होतें.

अवतीला, केव्हा एकदा दिवाळी होऊन, आपण मुंबईकडे रवाना होऊ असें झालें होतें.

या मुलाना घेऊन मुबईस जायचें रावजींनीं स्वतःचें स्वतःच ठरवलें होतें. चागलें महिना दोन महिने ते मुलाजवळच रहाणार होते. एकदा त्याना वाटे कीं मावशींना घेऊन मुंबईसच बिऱ्हाड करावें, पण फिरून त्याचें त्यानींच ठरवलें कीं, मुलाना स्वतत्रच राहूं द्यावें. पण एवढ्या मुबईत हीं दोन मुलेच कशीं बरें ठेवावीं? हाहि विचार डोकावल्यावाचून राहिला नाहीं.

"मास्तर, मास्तर, अस केल तर? हहह तुम्हीच रहा मुलाबरोबर वर्ष दोन वर्षें."

"कुठें? मुबईत? तेवढें सागू नका. मला त्या मुबईचें यापुढें तोंड बघायला नको. तिथें हालात रहाण्यापेक्षा इथें एक वेळ जेवून राहिलेलें परवडलें. काकासाहेब! माझें ऐका तुम्ही. आणखीं वर्षभर इथेंच ठेवा मुलाना." मास्तरनीं मुळीं मूळ विषयालाच हात घातला.

"अस काय हह मास्तर करता? पोराचा विरस हहह काय म्हणून करा? शिवाय एकदर परिस्थितीचा विचार करता यापुढें सुकात व अवती मुबई-सच एका ठिकाणीं हहह राहणें चागलें. त्याचें एकमेकावर प्रेम बसावें, हहह आवडीनिवडी जमून याव्यात! थोडक्यात म्हणजे हहह आमचे पुढील हेतू, त्याचे त्यानींच हहह जमवून आणण्याची हह परिस्थिति निर्माण करावी. मी हहह काय म्हणतों तें हह आल नाहीं तुमच्या ध्यानात?" तोंड उघडेंच ठेवून रावजी मास्तराच्या चेहऱ्याकडे पाहू लागले.

"तें मी सारें समजतों व मला पटलेंही. पण मी इथेंच राहतों!"

'आनू मी तरी कुठे सोडणार आहे मुचकुददरी? हहह कॉलेजातलीं हहह चारदोन वर्षे सोडून बाकीचे सारे हहह दिवस माझे इथेंच हहह गेले ना? बाकि असेंच करायचें! एक महिनाभर मी जाऊन राहतों हहह त्याच्या-जवळ, व मग त्याचें त्यानाच येईल स्वावलबन. असेंच!! आम्ही तरी काय हहह जन्मभर पुराणार आहों म्हणा?" रावजींनीं पुढचा सारा बेत याच उत्तरानें कायम केला.

ससाराचे सारे पाश सुटून एखादा मनुष्य जसा अगतिक होतो तसेंच

मास्तराचें होऊन राहिलें. येवून जाऊन त्यांचा भर कायतो अक्कलकोट-स्वामींच्या भजनावर. मावशींना तर ते या भजनामुळेच आवडून राहिले होते. रावजींनीं मुलाबरोबर जायला मावशींनीहि समति दिली

काकाच बरोबर येणार म्हणून सुकात व अवती यांना फार फार आनद वाटला.

उद्धवाला मात्र तितकेसें बरें वाटलं नाहीं

"आपण मुबईत मुरलेले! आपणाबरोबरच मुलांना पाठवतील सारी व्यवस्था आपणालाच करायला लागतील, इतकेंच काय तर आपणाला त्याच्याच बिऱ्हाडात रहायला विनति करतील, आपण जणू काय त्याचे पालकच! आपण मग सुकातवर खूब खूब सत्ता गाजवू, अवतीला आपलीशी करू, आणि मग—!"

अशा तऱ्हेच्या विचारात तो चूर असे. या ठरलेल्या निर्णयाने तर त्याच्या विचाराचा बगला पार कोमळून पडला होता.

तरीपण या मडळीबरोबरच जाण्याचें त्यानें ठरवलें दगा वगैरे पार नाहींसा होऊन मुबईला अगदीं पूर्ववत् शातता आली होती तरीहि दग्याच्या धास्तीमुळें आपण एका ठिकाणींच रहावें म्हणून त्यानें अवतीजवळ सूतोवाचहि केलें.

अवतीनें सुकातची कबुली मिळव म्हणून त्याला जबाब दिला.

त्यानें सुकातजवळ गोष्ट काढली सधी पाहून!

"आपण एकाच बिऱ्हाडीं राहिलों तर फार फार छान होईल नई?"

"छान कसलें?" सुकांतनें विचारलें

"छान म्हणजे असें. आपण एकाच गावचीं एकमेकाना दुखण्या-बाण्यात मदत करूं. दगे आहेत, धोपे आहेत, एकमेकाना तितकाच आधार!"

"पण हें सारें दूर दूर राहूनहि आपणाला करतां येईल." सुकातनें सरळ उत्तर दिलें

"काय गाढव लेकाचा आहे. माझा अगदीं घात करतोय!" असले

शब्द उद्धवाच्या जिभेवर उभे होते पण त्याचा आविर्भाव फक्त त्यानें चेहऱ्या-वरच होऊ दिला

"येईल्गे पण तुझ्या लक्षात येत नाहीं मी काय भावनेनें म्हणतों तें!"

"त्यानून तू पाहिजे तर काकाना विचार." सुकातने एका झाडाकडे पाहून सागितलें

"तू समति देशील का?"

"नई"

"का?"

"का तें नाहीं येत सागता"

"Alight" म्हणत उद्धव आपल्या घराकडे वळला

"चोर ××× ! कुठून भिकारी आला अन् या घरचा जावई झाला! काय नशीब आहे गुलामाचं मला वाटते—!" स्वत.जवळच उद्धवाची असली कितीतरी चुळबुळ चालली होती.

दसऱ्याच्या दिवशीं उद्धवानें माऱ्याजणाना सोनें दिलें मात्र सुकातला देण्याचें पार टाळलें

सुकात व अवती रीतसर साऱ्या गावभर (ब्राह्मणवाडींत) सोनें देवून आलीं काकाना देण्यासाठीं ओटीवर येताक्षणींच—

"हे पहा हहह पोरानों! आज तुम्ही एकदम दोघानीं माझ्या समोर अगदीं जवळ जवळ उभें राहून—माझ्या हहह ओंजळींत—हहह एकदम सोनें द्या. मावशी अहो मावशी! हहह तुम्हीहि बाहेर या मावशींना पण हहह तसेंच सोनें द्यारे" रावजीकाका अगदीं आनदनिर्भरानें म्हणाले तेवढ्यात मावशीहि हसत हसत बाहेर आल्या

"इश्श मी नई जा. हें होकाय काका!" म्हणून नेसूच्या तपकिरी पातळाचा जरीचा पदर अवतीने तोंडासमोर केला व जिव्हणीच्या टोकाना गोड मुरड घातली.

"हहह लाजायला ग काय झालं? हहह सुकात कुठें लाजतो आहे?"

"मी लाजलों नाहीं तरीपण--"

"बरे! हहह भावनाशून्य आहेस झाल." काका त्यावर मध्येंच म्हणाले!

"मी सांगतों तसे करा ना. इइइ तुमच्या जन्माच्या गाठी आहेत नर इइइ यातच कायतें समजा"

सुकांत क्षणभर स्तिमितच झाला. त्याला रावजींच्या म्हणण्याचा अर्थ बरोबरसा उलगडला नाहीं.

"हेंरे काय? ऐकायचे नाहीं वाटतें?"

दोन्ही मुलांनीं रावजींच्या ओंजळींत एकदम सोनें दिलें नंतर दोघांनींहि नमस्कार केले सुकांतनें पायावर डोकें ठेवलें

तीं खालीं वाकलीं असताच त्यानीं मावशींकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें मावशींनीहि मान हलवून—

"बर केलत" असेंच सुचविलें

नंतर तेंच मावशींसमोर.

मावशींनीं दोन हातांनीं दोघांना जवळ जवळ केलें. त्याबरोबर सुकांतचा डावा बावसा अवतीच्या उजव्या बावशावर अलगच घासला गेला.

"इश्शऽऽ! मावशींच आपल काहीं तरीच—" अवती गोड शब्दात उद्गारली. असल्या प्रसंगातील गोडवा मुलांपेक्षा मुलींनाच बरोबर समजत असतो.

सुकांतला मात्र थोडासा घुस्साच आला.

त्या घुश्शात मास्तरांना अगर अवतीलाहि सोनें द्यायचें तो विसरलाच.

× × ×

अखेर कार्तिक शुद्ध प्रतिपदा आली!

याच दिवशीं झोंब्या व्हायचें ठरलेलें. आडगावांतून अद्यापही झुंजी याच दिवसात होतात.

सार्वजनिक गुरुचरासाठीं म्हणून रावजींनीं बारकोंबडा हें माळ–ठिकाण ओसाड ठेवलें होतें. भल्या चांगल्या मैलाच्या लांबी रुंदीचें तें पठार आज-पर्यंतच्या कित्येक झोंब्यांचें रणक्षेत्र होऊन राहिलें असावें. त्या ठिकाणात जमू लागलेले म्हातारे कोतारे, आपल्या पूर्ववयात होऊन गेलेल्या कित्येक झुंजींचे प्रसंग ऐसपैस वर्णन करण्यासाठीं, बैठका मारून बसले होते. सकाळीं ८।९ ची वेळ, पारवानें कशीं अगदीं फुलून गेलीं होतीं सूर्यकिरणामुळे तर

माणिक मोत्याची अगदीं दाटी होऊन राहिली झाडझडोऱ्यावर विखुरलेलीं कोळयाचीं जाळीं तर वनवल्लरीच्या बिंदीबिजोऱ्याप्रमाणेच भासत होती.

हळूहळू प्रत्येक वाडींतील लोक जमावाजमावानें फिरकू लागले होता होता लहानापासून थोरापर्यंत, पोरीबाळीसुद्धा, पाननसहाशें माणूस जमले. थोड्याच वेळात रावजीकाका, अवती, सुकात, उद्धव, मास्तर आदिकरून पाचपचवीस ब्राह्मण मडळीहि हजर झाली त्याच्या बैठकीकरता शेतकऱ्यानीं आपल्या घोंगड्या अथरल्या. प्रथम कोंबड्याची झुज व्हायची

"व्हवू द्या काय सुरवात काका? अजून कोन ययाचा हाय काय?" रामाण्यानें आपला गावकराचा मान फुकट दवडला नाहीं

"हह होऊ द्या सुरवात" काकानीं समति दिली

"वाट वाटोलीं बसार तुरुत!" जमलेल्या मडळीला रामाण्याने ताकिद दिली.

मधल्या रगणात दोन कोंबडे सोडण्यात आले

दोघाच्याहि मालकानीं "पक् पक् पक् पक् शुः शुः" असे तोडानें इशाऱ्यादाखल आवाज केले.

कोंबडा हा प्राणी किती डौलदार, मर्दानी, व लढवय्या असतो याची अशा प्रसगीं खात्री पटते. मान खूब उच करून प्रत्येकानें प्रथम दुसऱ्याचें सागोपाग निरीक्षण केले व अचानक टिपण झेपून, पकाक् पकाक् करीत ते एकमेकावर तुटून पटले. पाचपचवीस झडपी झाल्यानतर, गुजेप्रमाणें लाल झालेले डोळे नतर एकमेकावर वटारून चोचींचा कडकडाट करू लागले. सारे प्रेक्षक एकतान होऊन झुजींतील त्या त्या मुरडीप्रमाणें फक्त मान हलवीत होते. मधून मधून प्रोत्साहनादाखल कोंबड्याचे धनी "पकाक, पकाक" आवाजानें लढवय्याना उमेद आणीत इकडून तिकडे वावरत राहिले.

होता होता एकानें दुसऱ्याच्या तुऱ्याला चोच घालून, चागला पाचपचवीस पावलें फरपटीत नेला त्याबरोबर झुजीचा निकाल झाला असें समजून ते ते मालक पुढें धावले जिकणाऱ्या कोंबड्याला त्याच्या मालकानें उचलून घेऊन आजारलें गोंजारलें व प्रेक्षकातील कित्येकाच्या समोर आणलें. सर्वानींच रीतसर त्याचें कौतुक केलें.

"कसाय माजा वाग! अर यकुद्या बैलाला फालुन खाइल." तो मालक खुशींत येऊन सागत होता. काहीं वेळाने—!

भोई लोकानीं दोन मेढे आणले

दोघांचींहि रुबाबदार शिंगें असून कापेच्या रगानें रगविलेलीं होतीं. एकाच्या शिंगाला तर सोनेरी वर्ख डकवलेला होता.

एक यार्डभर अतर सोडून दोघाहि मालकानीं आपापले मेढे समोरासमोर उभे केले.

"हिर्र्र्र्र्र्र्र्इया" करून प्रत्येकाने मेढ्याच्या पाठाणात एक एक रट्टा दिला. त्याबरोबर एका सेकंदात "थाड्" असा आवाज झाला. नतर दोघेहि मेढे मागे मागे जावून पूर्व ठिकाणी आले दुसऱ्या क्षणाला पवनवेगानें धावत जाऊन एकमेकाना पूर्वीपेक्षाहि अधिक वेगानें धडकी मारली.

ठराविक वेळानें सारख्या धडक्या होऊ लागल्या.

"एक, दोन . ... बारा, तेरा, चौदा . पचवीस, सव्वीस." अवती अगदीं धडधडत्या छातीनें मोजीत होती

आता तर ते दोघेहि अगदीं डोळे मिटून धडका देत होते

थोड्या वेळाने त्यातील सोनेरी वर्खवाला मेढा पळ काढू लागला. धडकीची वेळ चुकल्याचे लक्षात येताच विजयी वीरानें आपले डोळे उघडले व पराजिताचा, वाऱ्याच्या वेगानें पाठलाग आरभला

"छे बइ! काय भयकर धडका तरी!" अवती सुकातजवळ म्हणाली.

"मस्तकावर रुपया बाधला तर तो चपटा होतो समजलीस!" सुकात सागत होता

"मला वाटलें कीं आता पाठलाग इकडेच येणार कीं काय!" उद्धव म्हणाला पाठलागावर गेलेले कित्येक लोक अद्याप परत आले नव्हते त्यामुळें प्रेक्षकात थोडी पागापागच झाली

"खरी झोंबी हाय म्होरच," पडया दोघातिघाना सागत होता

"म्हजे ती सुताराच्या न् सोनाराच्या रेडयाची?" त्याच दोघातिघातील एकानें विचारलें.

"अव रेडयाना काय करताव? आमच्या इस्लामाच्या मनमुऱ्याची व्हयूल ती खरी झोंबी घटाकभर डोला नाय हलवायचन!"

"दाव बरी ता बयूल?"

"आदि नाय दावायचा. यकुदा दिश्टालेल (दृष्टाळेल) ना?" पङ्याने त्याची खात्री केली "तो थकड झुडपामागे लाव उबा हाय. आता काय न्होकतोय? आदि रेडयाची व्हवुद्या अन् मग बगा."

साऱ्या फडाचे लक्षहि मनसुऱ्या व बहादुरच्याच झुजीकडे लागून राहिलें होतें.

दरम्यान रेडे आणण्यात आले.

दोघाच्याहि गळयात भर्ली चागली जोखडासारखीं लोढणीं होतीं एक काळा कुळकुळीत असून त्याच्या सतेज अगावर कावेचे लाल पजे मारलेले होते बेफाम माजल्यामुळें अगलट ब गडदा एक होऊन त्याच्या अगात हाड तरी असेल कीं नाहीं हें सागणें मुष्कील होऊन राहिलें होतें मारेदार शिंगामुळे तर खोल पहाणाऱ्याला असेंच वाटावे कीं केवळ झुजीसाठींच याची पैदास झाली आहे.

दुसरा रेडा रगानें भोरा होता तो वरच्याइतका माजाळलेला नसून अगाबरोबर, चणीनें शेगेसारखा, लाबलचक रुद खुराचा, उतरत्या पाठाणाचा, खपलेदार शिंगाचा व लालभडक नजरेचा होता मान नेहमीं वर असल्यामुळें आजहि तो वरच्या मानेनेंच रेंकत होता.

"हे पाहिलेस सोरब आणि रुस्तुम" उद्धवाने त्या लढवय्याना ऐतिहासिक पर्शियन् वीराची उपमा दिली. नतर थोडक्यात अवतीला ती गोष्टहि सागितली ती उपमा ऐकून मास्तराना व काकानाहि हासूच आलें.

"वाय्, वाय्" करीत ते रेडे समोरासमोर उभे राहिले आस्तेकदम एकमेकाजवळ चालत गेले, थोडेंफार फुरफुरून, हुगून त्यानीं अलगज् माथ्याला माथें टेकले.

थोड्या वेळातच सारा भार गडग्यावर देवून झुजू लागले. त्याचे मागले पाय उचलले गेले आहेत कीं काय असेंच प्रेक्षकाना वाटे. पाव घटकेंतच "ताड्ताड्" असा आवाज येवून झटक्यावर झटके सुरू झाले काहीं वेळ

काळा रेडा मागें मागें होई तर काहीं वेळ भोरा मागें सरून अवसान घेई. प्रेक्षकातहि त्या मानानेंच हालचाल सुरू होती.

पोरीबाळींना यावेळीं मात्र पळायची तयारी असू द्या म्हणून ताकिद देण्यात आली. न जाणो! दपाटा कोणत्या बाजूला जाईल याचा नेम नसतो रेड्याचे मालक हातीं काठया घेऊन रावजीकाका बसले होते त्या बाजूलाच तयारीनें होते अवतीचा एक हात सुकातनें हातीं धरला होता

"कस अगदीं माझ्या छातींत धडधडतय!" अवती म्हणाली.

"काग?"

"नइ बइ पहावत माझ्याने या टकरा झाडे तोडताना घाव उठतात न, तस्सें चालले आहे याचें! छे: बइ, डोळाबिळा फुटायचा एखाद्याचा!"

"काहीं नई ग होणार मुलींच भिऊ नको काय रगीस आले आहेत गुलामाचे!" सारें रक्त यावेळीं सुकातच्या डोळ्यात गोळा होत होतें. त्याच्याहि सर्वांगात आता चमक भरू लागली होती. वीरश्रीचें वारें म्हणतात तें हेंच.

साऱ्या प्रेक्षकाच्या वृत्तीहि आता परिपूर्ण 'चढल्या' झुजींतल्या हरएक आदोलनाबरोबर मानवी हृदयातील खळबळीलाहि लाटा येऊ लागतात झुजींतील चढउताराबरोबर प्रेक्षकाच्या हृदयातहि चढउतार सुरू होतो. आता झुजीचे क्षेत्र शभर शभर पावलानीं बदलू लागलें झुजीलाहि आता अधिकाधिक तेख येऊ लागली

दोन्ही रेड्याच्या तोंडाजवळ फेसाचे गोळे जमू लागले. मानेच्या हसड्याबरोबर ठिकठिकाणीं फेस गळू लागला.

दरएक हसड्याबरोबर शिंगाचा "कडाड" असा आवाज होई.

प्रेक्षकातहि क्षणाक्षणाला मोठमोठाले सुस्कारे सुटत. काहींजण तर अगदि शहारल्याप्रमाणें करीत!

मध्येच झुज सोडून दोघेहि रेडे धिम्मेपणानें समोरासमोर उभे रहात.

फिरून कडकडाट करीत—!

फिरून उभे रहात

दोन तीन घटका गेल्यावर—

"सोडवा अता. इहइ समान आहेत गुलामाचे." म्हणून रावजीकाकानीं समाधानानें सागितले.

"अताव कोन सोडवायला जानार?" रामाण्यानें भीत भीत सागितलें.

"सोडवाया जायल ता ठार मरल ना ओ!" भोऱ्या रेड्याच्या मालकानें उत्तर दिलें.

"तासणीन् तोडलाव तरी नाय सुटायचा" सुतारानें ठासून सागितलें.

इतक्यात फिरून एकदा झुज ऐन कडाक्यात आली.

आता दोघानाहि दोंघाचें बळ समजलें.

ते आपण होऊनच जणू काय ठरावच केल्याप्रमाणें दोहोंकडे झाले व आश्चर्य हें कीं, दोघे दोन दिशाना चालू लागले!

झुज आपोआप सुटली.

या अकल्पित प्रकारामुळें पड्यासारखे चिरवळ पोरगे हासू लागले.

"कायर तरी रेड्याचा शेनपन्. जशीं काय मानसाच! झुज झुज झुजले आन् गपकन् बाजूला झाले" पड्या बोलतच होता.

दोघेहि रेडे दूरदूरच्या झाडाखालीं जाऊन ऐसपैस लोळू लागले. आता शेवटची व महत्त्वाची झोंबी सुरू होण्यापूर्वी प्रत्येकानें आपापली बटवी सोडून पानतबाकू सुरू केली

प्रत्येकजण नव्या उत्साहानें पहाण्याची व उपभोग घेण्याची तयारी करू लागला.

"आता माझ्या विश्रामाचा मनसुऱ्या येईल. काय जनावर आहे उद्धव!" उद्धवाला सुकात सागत होता

"पण बहादुरहि कमी नई हा महाराज! खास खास मनसुऱ्याला मारील असें केऱ्या सागत होता काल." उद्धव म्हणाला.

"अरे ज्यागे काय तोंड लागलयू! मनसुऱ्याला तू झुजताना पाहिला नाहींस! गोचडीसारखा चिकटेल!" सुकातनें ऐन उन्मादानें सागितलें. "तो पहा आला मनसुऱ्या" म्हणत सुकात उभाच राहिला.

टपोऱ्या जाभळासारख्या रगाचें तें जनावर होतें. कलमी अंब्याप्रमाणें तजेल व रसरसलेलें, मानेंत वारुणी रगाचें, पोटाखालीं पाढुरलेलें कोव्हाळया-

सारखें भरलेलें वशिड ( कोळें ), खजिराएवढालींच पण मारेदार शिंगें, आटीव बाधा, व भरदार म्होरा! वशिडाकडून ढुगणाच्या बाजूला गेलेला, व मानेंत कमालीचा मजबूद.

क्षणभर प्रत्येकाचीच नजर मनसुऱ्यावर खिळून राहिली

अत्यत अभिमानाने व ऐन कुऱ्यांत, त्याच्या पाठीवर हात ठेवून विश्राम उभा होता.

दुसऱ्या बाजूनें हातीं दावें धरून केरूनें बहादुऱ्याला आणला विश्रामनें बहादुऱ्याकडे नजर टाकली. बहादुऱ्याचीं शिंगें दाभणासारखीं अणकुची दार, व मुद्दाम कोयतीनें तासलेलीं त्याच्या ताडकन लक्षात आलीं.

बहादुर हे जनावरहि तोडीस तोड होतें पण पोट सुटल्यामुळें तितकेंसें दमदार नसावें असेंच गावकऱ्याच्या लक्षात येऊन चुकलें. बहादूर हा मनसुऱ्यापेक्षा जास्त तडफदार दिसला तर चिकाटीने मनसुऱ्याच श्रेष्ठ ठरेल असेंच बहुतेकाना वाटले.

बहादुऱ्या हा गाजरी रगाचा होता. पाय बदामी असून खुरकींत प्रमाणाबाहेर रुद होता. पाठाणात पऱ्हळ, वशिंड थोडे डुललेलें, व ढुगणाच्या बाजूनें उचावलेला! मनसुऱ्या गोलबद तर बहादुर चोपटी!

"ऐकताव काय?" विश्रामने उभ्याउभ्याच मोठ्यानें सागण्यास सुरवात केली.

गावकरी उत्सुकतेनें ऐकू लागले.

"व्हयत्या बयलाचीं शिंगा बगा बरी. मुद्दाम व्हातीं करायची हा काय? हा काय सत्य धरम झाला? बैलाला फाडुन टाकिल." विश्रामानें तोंड वाईट केलें. त्याला मनसुऱ्याच्या मानेला इजा होण्याची कल्पनाहि सहन होईना!

"लय वायट हा केऱ्या!" कित्येकजण उद्गारले.

"म्हणजे भियालेव का काय?" दुसरे कित्येकजण म्हणाले.

"भियाचा नाव सोडा. हा दागिना हत उबा केला केलाय ता भियासाठीं काय? पर हा खोटा काम करून झुज जिकायची म्हणजे काय? गाव जमलाव हत. तुमीच न्याय करा बरी." काकाकडे पाहून विश्राम थाबला.

सर्व तऱ्हेनें बाजू अगावर येणार हें पाहून केऱ्या ओरडला.

"तग़ा काय झाला तर बैलास बैल घ्यईन जा "

"ऐका र बावानू." विश्रामने सर्वत्राना बजावलें व नतर—

"चल" म्हणत मनसुऱ्याच्या पाठीवर थाप मारली.

तिकडून बहादुरहि सुटला—!

मनसुऱ्याने बहादुर समोर जाऊन खोल आवाजात गभीर डिरकाळी फोडली व थ्हु: थ्हु: करून विजेसारखे वतरण टाकलें उजव्या पायानें जमीन उखळली. काही काळ नुसतीच रेटारेटी सुरू होती

पहिला दम ओसरल्यावर झटक्याझटक्यानीं वतरणें सुरू झालीं दोघे बैल नागासारखे तळपत होते. प्रथम प्रथम बहादुऱ्यानें मारलेले कसोटे मनसुऱ्याला मागें खेचीत बहादुऱ्याच्या मुडीफेकीनें गावकऱ्याना वेध लावला. मध्येंच दिशा बदलून कबरफेक करावी, शिंगखळया माराव्या अगर मुस्क्यावर मनसुऱ्याला उचलण्याचा प्रयत्न करावा, असले तडफेचे प्रकार घटकाभऱ्यात मदावले व मनसुऱ्या गोचडीसारखा चिकटला. शिगाचा मारा चुकवण्यासाठीं मनसुऱ्यानें अशा काहीं तेखीनें मुडी चिकटून ठेवली कीं बहादुऱ्याला मुडीच हालवता येवू नये.

बहादुऱ्याचें सर्वांग झपझप हालत होते तो पार दमून गेला दम घेण्यासाठीं बहादुऱ्यानें मुडीला ढिलाई दिल्याचें समजताच एखादी मिठाची फरी जशी ढकलीत न्यावी तद्वत अत्यत चपळाईने मनसुऱ्या बहादुऱ्याची "गोणीलोट" भरी

मनसुऱ्या—ते दमदार जनावर—आता कुठे झुजीच्या ऐन रगात आलें होतें. गावकऱ्यानाहि आता पुरा उन्माद आला.

टापेवर टाप होऊ लागताच "व्हावा शेबास र वाघा" म्हणून ते ओरडत. पडघ्या तर नुसता नाचत होता.

खुबीखुबीने मनसुऱ्या मागे होत होत बहादुरला अंगावर घेई व नागमोडीनें तिरका होवून ऐन अवसानानें शेसवाशें पावले रेटीत नेई.

फिरून दोघेहि मान टेंकून उभे रहात.

लोहाराच्या भात्याप्रमाणें दोघाचेहि श्वास सुरूच होते.

घटका झाली, दोन घटका झाल्या, मनसुऱ्या चिकटला तो चिकटलाच!

शेवटीं बहादुऱ्याचें अवसान पाहून तो इतक्या वेगाने झुजू लागला, इतक्या चपळाईने टकरा मारू लागला, कीं बहादुऱ्यानें पुढचे दोन्ही पाय दुरमडले. त्याबरोबर मनसुऱ्यानें अनावर मारा सुरू केला.

केवळ दमच न राहिल्यामुळें बहादुरनें पळ काढला

त्याचा दपाटा न धरता — !

डिरकाण देत, वर मान करून, चोहोंकडे पहात मनसुऱ्या विजयानदानें धुद होऊन उभा राहिला.

डोळयात आनदाश्रु आणून विश्राम धावत गेला व गळयात गळा घालून मनसुऱ्याला आजारू गोंजारू लागला तों त्याच्या हाताला रक्त लागलेलें दिसलें !

सारे गावकरी मनसुऱ्या वाटोळे जमले

मनसुऱ्याच्या मानेंतून कित्येक ठिकाणीं रक्तस्राव सुरू झाला होता

शिवाय—

त्या रक्ताला एक प्रकारचा दर्पहि येत होता. गावकऱ्यात दूर उभा असलेला एक महार पुढें येवून म्हणाला

"इश्रामदा, पोरा, दगा झाला ! त्या दुसऱ्या बैलाच्या व्हात्या शिगाला दवा—इख—लागलेला असावा आन् ताच परमालताय ! "

"काय इख ? " विश्राम भाबावल्या माणसाप्रमाणें ओरडला.

"व्हय इख "

"मग ? त्यावर उतारा ? बोल बोल र ! "

"उतारा हुः ! बैल घटका नाय काडायचा " तोच महार म्हणाला.

विश्राम मट्कन खालीं बसला.

अगात वीष भिनल्यामुळें मनसुऱ्या तिथल्या तिथेंच एका प्रहराभऱ्यानें तडफडून मरण पावला त्यावेळीं—

काय बरें वाटलें असेल त्या विश्रामाला ?

"मी केलें काय् अन् झालें काय ? " काहीं काळ नुसतें या वाक्यानें त्याला वेड लावलें

इकडे मुचकुददरींत तर विश्रामच्या बैलावर "ग्याव" पडला म्हणून एकच हाकाटी उठली.

दुसऱ्या दिवशीं मात्र प्रत्येकाला खरी हकीकत समजली.

केऱ्या तर मनसुऱ्याच्या मरणापासून कुठें नाहींसाच झाला होता

दुसऱ्या दिवशीं रावजीकाकाच्या पडवोत सारे गावकर जमले. त्यात विश्रामाचा बापही हजर होता.

विश्राम मात्र घरींच बसून होता तो जेवला नाहीं कीं कुणाजवळ एक-चकार शद्बहि बोलला नाहीं

सात्विक संतापामुळें, ^ ८, पोरानें कुळाला बट्टा लावल्यामुळे व पातकाच्या भयानें राजबा गोठल अगदी व्याकूळ झाला. सर्वांच्या हातापाया पडून शिवराम नवरताला आपला बहादूर बैल देण्याला त्यानें तात्काळ संमति व्यक्त केली

तें अपेशी ढोर आपल्या वाड्यात घेण्याचें शिवरामानें साफ नाकारलें.

बैलाच्या नुकसानीबद्दल शंभर रुपये राजबाने एक महिन्याच्या आत द्यावे असा रावजींनीं निर्णय केला

तो सर्वांना मान्यहि झाला घरीं गेल्यावर—

राजबा गोठलाने साऱ्या मनःसंतापाचा ताव घरातल्या माणसावर काढला. पुढे त्याचे पर्यवसान अवघ्या वाडीला शिव्या देण्यात झालें. चिमा ही दुसरी तिसरी कोणी नसून मूर्तीमंत जखीण आहे, तिच्याच नजरेचा हा प्रभाव! तीच आम्हा सर्वांना भोंवली वाडीचा नायनाट केल्याशिवाय ती सोड-णार नाहीं. राजबाच्या त्राग्याने शेवटीं स्थूलमानाची ही मर्यादा गाठली!

विश्राम!—

मनसुऱ्याचे आकस्मिक मरण हा कुठें पहिला तडाखा होता. मात्र—

या तडाख्यानें विश्रामाचे सारे पोरपण लयाला गेलें.

# ७. स्थित्यंतर

भों ओं ओं ओं ओं—!

मुचकुददरीपासून दूर—चागलें चारपाच मैल—असणाऱ्या एका बदरात आगबोटीनें शीट दिली

तो आवाज कानीं पडल्यामुळें खाडीकिनाऱ्यालगत आलेली मडळी जरा वेगानें चालू लागली.

मुचकुददरीच्या बदरात रावजीकाकाचा "पगार" तयार होताच.

ट्रंका, वळकट्या, फराळाचे डबे, दह्याच्या शिकाळ्या वगैरे सामान पगारात ठेवण्याची धादल चालली होती.

बोटीवर जाणाऱ्या नातेवाईकाना पोचवण्यासाठीं म्हणून आलेलीं, मुचकुददरींतील कित्येक माणसें हजर होतीं. सुकाताला पोंचवायला म्हणून आलेले विश्राम, पंड्या, व दुसरे पाचसहा गुराखी पोरं केव्हापासूनच येऊन बसले होते माणग्याच्या टोपल्या पोंचवण्याच्या निमित्तानें चिमा सकाळपासूनच एका भोयाच्या घरीं येऊन बसली होती सागीच्या टोपल्या! वेळोवारींच पोंचवलेल्या बऱ्या. हेतू इतकाच कीं आपण मुद्दाम पोचवायला आलों—असें कुणालाहि वाटू नये. टोपल्याच्या किंमतीऐवजीं भोयानें तिला मासे दिले होते.

"विश्राम, पंड्या, येतों हा!! अरे वेड्यानो असे रडता का? वैशाखाला येतों मी परत! हे कपडे तुम्ही घ्या वाटून!" असें म्हणत सुकाननें, आपणाबरोबर मुद्दाम त्याना देण्यासाठीं म्हणून आणलेले जुनेपाने कपडे, विश्रामच्या हातात गुडाळून दिले. नंतर जवळच अर्धवट पाठमोऱ्या असलेल्या रडक्या चिमाकडे त्याचें लक्ष गेलें.

त्याच्या हृदयात भयकर कालवाकालव झाली. सुकातने मनाचा हिय्या केला व विश्रामला जरा बाजूला बोलावून—

"विश्राम त्या चिमाला साभाळ! तुझ्याशिवाय सारी वाडी तिचा हेवा दावा करते हें तू जाणतोसच! शिवाय, तूहि कष्टी होऊ नको समजलें ना?"

"व्हय."

हीं दोनच अक्षरे विश्रामच्या तोंडून कशीबशीं बाहेर पडलीं

सुकात पगारावर चढताना, पगार थोडासा एका अगाला कलडला

रावजीकाका, अवती, उद्धव आगावूच बसून राहिलीं होतीं

पगार चालू झाला. भोयानीं आडवल्हींहि मारण्यास सुरवात केली. एका मैलावर दूर असणाऱ्या बदरात, बोटींत बसण्याकरता त्याना वेगानें जाणें भाग होतें पगारहि पण तीरासारखा निघाला. मागाहून निघणाऱ्या दुसऱ्या मचव्यात कित्येक माणसें बसत होतीं, व त्याना पोंचवायला आलेलीं—

"ये व बावा!"

"बाय, ये ग माज्या वासरा!"

"जतन जावा, आग सबालुन कामधदा करा!"

"आमचे डोले तुज्याकडे लागले र बावा आजधरन्!"

"अशा नाना प्रकारच्या नाना उद्गारानीं मनाचा दुःखावेग रडत रडत, ओरडून कित्येक माणसें व्यक्त करीत होतीं

बराच वेळ झाला तरी विश्राम, सुकातच्या होडीकडे टक लावून, जशी शून्यात नजर रोखावी, तद्वत पहात होता

"मुचकुदददरींतला रग वसारला याच्या म्होर!" नाकाला व कपाळाला आटया पडल्या पडल्या विश्राम कितीतरी वेळाने एवढें वाक्य बोलून परत घराकड येण्यासाटीं निघाला त्याच्यामागून पडया, त्याच्यामागून चिमा! व मागून बाकीचे जागळी. प्रत्येकाच्या मनात किंचित् भिन्न पण जवळ जवळ हेच विचार होते.

गावचा रग गेला आमची किमत करणारा कोणी राहिला नाहीं. गावात आता खेळ नकोत, झोंब्या नकोत, धावपळ नको, शहाळीं खाणें नको कीं खदखदा हासणेंहि नको. त्यात मनसुऱ्या गमावल्यामुळे तर वाडींत दोन

तट झालेले! त्यांच्या जोडीला चिमावरून दुफळी! रावजीकाका कुठें तटा-बखेडा मोडायला असायचे, तेहि गेले मुंबईला—!

मुचकुंददरींतला रंग चालला ओसरत दिनमान-दिवस—!

वास्तविक मुचकुंददरीचा रंग ओसरला नसून, प्रत्येकाचें बाळपण मात्र ओसरून जात होतें! त्या शेतकऱ्यांच्या मुलांना कसा उमज पडावा त्याचा!

त्या तिघांपैकीं प्रत्येकजण आणखी असेंहि मनाशीं ठरवीत होता—या पुढें आता आपला धंदा बरा कीं आपण बरे! रोज चोवीस तास मेहनत करायची,—शेतीकडे, गुराकडे, गवतकापणीकडे, माणग्याच्या विणकामाकडे! एकसारखें गुंतून पडायचें! त्यातच खरा संसार आहे

सुकांतच्या जाण्यानें केवढे स्थित्यंतर झालें?

सुकांतचा विरह तो काय व त्यात हीं पोरें इतकीं दुःखी होतात तीं काय! पण मनाला विषण्ण करणाऱ्या विरहाच्या क्षणिक भावनेंत स्मरणातील यच्चयावत् दुःखांना एकामागून एक उभें करण्याची विलक्षण शक्ति असते. विश्रामला, पूर्ववयातील सारीं दुःखें आठवूं लागलीं पहिल्यानें त्याच्या आईचें मरण, नंतर वाडा जळाल्या वेळीं झालेली वडलांची अवस्था, त्या-नंतरचें अगदीं ताजें दुःख म्हणजे मनमुग्याचा घातपातानें झालेला मृत्यू! हीं सारीं दुःखें आळवीत आळवीत तो भविष्य काळातील अज्ञात दुःखाकडे भांबावल्या मनानें पहात होता अगदीं अस्पष्ट, तरीहि त्याला तीं स्वच्छ दिसूं लागलीं निदान त्याला तसें भासलें!

इकडे, बोटींतून मुंबईकडे निघालेल्या सुकांत, अवंती उद्धवादि मंडळी-चेंहि, स्थित्यंतरासंबंधीं विचार चालू होतेच. मात्र फरक इतकाच कीं मुच-कुंददरींतील पोरांवर काळसर मळश्री आली होती तर बोटींतील लोकांवर पिवळसर सूर्यप्रकाश पसरत होता विश्राम आदिकरून विषण्णतेत चाचपडत होते, तर सुकांत, अवंती, मुंबईच्या काल्पनिक वातावरणात नाचत बागडत होतीं. उद्धव तर प्रवासी पोरांतच दंग होऊन गेला.

मुंबईचें वातावरण—!

अवंतीनें आजपर्यंत मुंबईकडील फक्त गप्पाच ऐकल्या होत्या मुंबई शहराचें असें तिला जे कांहीं ज्ञान होतें तें बरेचसें पुस्तकी, वर्तमानपत्रीय,

व घरात मुंबईहून येणाऱ्या चीजवस्तूंच्या अनुरोधानें झालेले. हवेचे एकावर एक थर बसत जाऊन जसें वातावरण उत्पन्न होतें तद्वतच अवंतीच्या मनश्चक्षूसमोर मुंबईविषयक कित्येक प्रकारच्या थरांनीं तिच्यापुरतें एक तिचें स्वतंत्र असे मुंबईचें वातावरण तयार होऊन राहिलें होतें. तें तिच्या अगदीं डोळ्यासमोर मूर्त स्वरूपात दिसे! बोटींत तर तें तिच्या नेत्रासमोर सारखें नाचत राहिले. तीहि आलटून पालटून सारखी चाळवाचाळव करीत राहिली. मुचकुंददरींतील जिवंत निसर्गाचा आनंद उपभोगण्याइतका तिला समज आलेला नसल्यामुळे मुचकुंददरीची तिला चुकूनहि आठवण येत नव्हती. केव्हा एकदा मुंबईच्या यक्षभूमींत पाय ठेवू असेंच तिला होऊन राहिलें.

सुकांतच्या नजरेसमोर प्रामुख्यानें मुंबईच्या एल्फिन्स्टन् हायस्कूलचें चित्र नाचत होतें पहाटफेरीच्या उन्मादात मनुष्य वेगानें पावलें टाकीत जात असावा, तोंच मागून व्याकुळ रूदनाचा एकाकी व क्षीण स्वर कानावर आदळावा, तद्वतच या ज्ञानपिपासेच्या उन्मादात मुचकुंददरींतील अनुकूल आठवणींची कळ सुकांतला दुखवीत राही. मग मुचकुंददरीचे चित्रपट त्याच्या अंतश्चक्षूसमोरून सारखे सरकत रहात. फिरून मुंबई! फिरून मुचकुंददरी!

उद्धव मंडलीक मात्र बोटींत पाय ठेवल्यापासून सारखा फिरत होता. या नाहीं त्या माणसाजवळ थोडेसें बोलावें, नागमोडीने वाट काढीत काढीत पुढें जावे, साधारण बऱ्याशा दिसणाऱ्या प्रवासी स्त्रीकडे पहावें, कुणा चर्चीवाजाजवळ पान खातच उभें रहावें, फिरून एकदा अवंतीजवळ येऊन चारदोन शब्द किनाऱ्याकडील आडगावासंबंधीं बोलावे, फिरून--

"खरा तो प्रेमाऽऽऽ ना धरि लोभऽऽ मनीं."

--म्हणत इकडे तिकडें वावरावें असे त्याचे सर्वसाधारण तरूण प्रवाशाप्रमाणें चाळे सुरू होते. टिकावू भावनाचें असें दडपणच त्याच्यावर नव्हतें.

व तेंच कित्येक वेळां फार सुखावहही असतें.

भावनाच्या दडपणामुळें आमचें बगोबा मास्तरच पहा किती उद्दाम होऊन राहिले ते!

मुलें गेल्यापासून ते सारखे अक्कलकोटस्वामींची बखर (हस्तलिखित)

वाचीत बसले होते. वाचीत होते म्हणजे—त्याची नजर अक्षरांवरून फिरत होती !

स्वतःचा स्वतःला फार राग येऊन एकसारखे मनातल्या मनात ते आप लीच निंदा करीत होते—

" मीच मुर्ख! यत्किंचित् दोन मुलेंहि मला आपल्या कह्यात ठेवता येवू नयेत? कसला मी ध्येयशील गुरु! गुरु म्हणून उगाच ब्रम्हचर्य पत्करलें आपण नालायकच! मुलानीं तरी असल्या मुर्खाजवळ कां म्हणून रहावे? मला योग्य तेंच बक्षिस मिळालें मलाच जर कुवत नाहीं तर पोगना थोपवून धरायचा मीं प्रयत्न केला हाच गाढवपणा!!—"

अशा प्रकारानीं त्रागा करीत ते स्वतःजवळच स्वतःला दोषी ठरवीत होते.

"हें काय? मास्तर, आघोळ करून पुजाबिजा काहीं उरकायची आहे कीं नाहीं?" सोंवळ्याच्या घास्तीखातर अंग चोरीत चोरीत मातुश्रींनीं विचारलें

न बोलता मास्तर उठले

पुढचा सारा क्रम गुपचुपीनें सुरू झाला

विश्राम आला तो तडक आपल्या घरीं गेला घरावर चढविलेले भोपळ्याचे वेल चागले फुलले होते. पण ते बरेच खालवर ओथबलेले दिसले म्हणून पडसरीचा लाबसा बाबू घेऊन त्यानें ते वर चढवले

घरात शिरताना, आत कुठेंतरी रुपयाचा आवाज त्याच्या कानावर आला. इतर वेळीं मोहक वाटणारा तो नाद विश्रामला मुळींच सहन झाला नाहीं. मनसुऱ्याचें रुपयानीं झालेलें मोल त्याला कुठून पटणार! भावनेच्या कारभारात पैशाला प्रतिष्ठाच नसते. आवडत्या मनसुऱ्याचें मोल हजारों रुपयानींहि होण्यासारखें नव्हतें. रुपयाच्या नादापासून दूर पळण्यासाठींच कीं काय—

—कमरेला आकडी विळा बाधून विश्राम परस्पर बाहेर पडला.

# ८. वाघबारशी

सेन्ट झेविअर हायस्कूलच्या सातवीच्या वर्गात नावे दाखल झाल्यापासून गेल्या सातआठ दिवसाचा अनुभव मुकात—अवतीला नवोनव, अगदीं नवोनव, असा वाटल्यास नव्वल ते कोणते? घरची शाळा व कोंकणचें एक खेडेगाव विरुद्ध युरोपीय शिक्षक असलेली सात आठशे मुलामुलींची शाळा व मुबई शहर!! याची तुलना तरी कशी नी कुठे करावी याचे मुकातला मोठें कोडें पडे अव्वल सुवासिक फुलांनीं भरलेल्या परडींत आपण एक गवताची पात आहो असे, तर कधीं अत्तराच्या हौदात एकाद्या पाण्याच्या थेंबाप्रमाणें आपले अस्तित्व अलग आहे असें, किंवा—! परतु—

ते सारे विचार बाजूला ढकलून अत्यत अघोऱ्या चित्तानें तो मुचकुंद-दरींतील गावकऱ्याच्या जीवनाकडे वळू लागे वरील तुलनेनें अत्यत क्षुद्र ठरलेल्या आणि म्हणूनच कींव करण्यासारख्या शेतकरी दिनचर्येकडे किल किल्या नजरेनें पहाता पहाता त्याची तद्रीच लागल्यावर चिमा, विश्राम, पड्या व त्याच्या पायाखालची धरित्री त्याच्यासमोर नाचूबागडू लागत काय बरें चिमा करीत असेल? विश्राम कुठल्या गडबडींत गुतला असेल? येत्या वाघबारशीला ते कसा बरें खेळ खेळतील?

कार्तिक शुद्ध द्वादशीची—वाघबारशीची—आठवण होताच त्याची किलकिली नजर अचानक विस्तृत झाली मुद्रेने हास्य धारण केलें व बऱ्याचशा अलग होणाऱ्या ओंठातून समाधानाचा श्वास सुटला झटकन् मनिऑर्डरचा फॉर्म घेऊन विश्रामच्या नावें त्यात एक रुपया (अक्षरीं मात्र) ही रक्कम नोंदली इतर लिखाण पुरें करून कूपनमध्यें खालील मजकूर लिहूं लागला:—

"रामराम तुम्ही सर्वांनीं हा एक रुपया खर्चून वाघबारशीचा खेळ साजरा करावा. खूबशी खीर करून माझी आठवण ठेवावी. पक्याला वाघाचें सोंग रंगदार करायला सांग.

तुमचा

कातुदा"

फक्त त्याच्याच डोळ्यांना त्या मजकुरांतूनहि दिसणारें वाघबारशीचें दृश्य तो किती तरी वेळ पहात होता.

"कधीं बरं पोंचेल ही मनीऑर्डर? हो! बारशीपूर्वी दोन दिवस! ठीक आहे" असे म्हणून तो धावतच [पो]स्ट ऑफिसकडे

"कुणीकडे रे जाताहेस?" अवंतीने विचारलें

"वह्या आणायला"

"मला पण आण हं दोनचार."

"Oh, yes"

खोटें बोलणेंहि या वेळीं त्याला गोडच वाटलें

प्रत्यक्ष वाघबारशीच्या दिवशीं शाळेंत जातांना तो अत्यंत विमनस्क झाला धोबीतलावाकडे जाणाऱ्या ट्रॅममधील एका मधल्याच बाकावर अवंती व सुकांत बसलीं होतीं आपल्या पत्र्याच्या पेटींतून ट्रॅमचीं तिकिटें उपटून देत देत ट्रॅम कंडक्टर सुकांतजवळ आला

"तिकिट तिकिट!" त्यानें दोनदा स्वगतवजा उच्चार केले.

तरीहि सुकांत वाघबारशीच्या खेळांतच दंग होता

नंतर हातांतील "पंच" जोराजोरानें पत्र्याच्या पेटीवर वाजवीत—

"तिकिट." म्हणून तो त्रासिक मुद्रेनें ओरडला

"अरे असें काय करतोहेस? तिकिटें घे कीं!" अवंतीनें सुकांतची उजवी बाहि धरून गदगदा हालवली.

"हो हो हो! तिकिट नाहं का?" सुकांतनें शर्टच्या खिशांतून एक दुणेली देवून "धोबितलाव दो" हे शब्द झटकन् उच्चारले.

अत्यंत त्रासिक मुद्रेने तिकिट देवून तो कंडक्टर दुसऱ्या बाकाकडे वळला.

"आज तूं जाग्रणाचा आहेस वाटतें?"

"नइं."

"मग अस काय धाद्रटासारखें करतोहेस?

"आपलें उगीच!"

"हें रे काय सुकात? तू किनी माझ्यापासून चोरून ठेवतोस सारें काहीं! अत्ता तुझे खास खास काहींतरी विचार रगत होते. साग ना कसला विचार चालला होता तो?"

"पण तुला तो आवडणार नाहीं."

"मी घीन आवडून. साग ना रे!"

"सागूच? मी आज मुचकुददरीत असायला पाहिजे होतों. मला तिथली वाघबारशी दिसत्यय." आपल्या भावनेशीं अवतीने समरस व्हावें असें सुकातला मनापासून वाटत असे. पण त्याची कित्येक वेळा निराशाहि होई. निदान आज तरी तसें होणार नाहींना, या शकाकुल मुद्रेनेच तो अवतीकडे पहात राहिला.

माडीवर असलेल्या पुस्तकाच्या चवडीची उलटापालट करीत अवती म्हणाली.

"मला मुळींच नाहीं आवडत हें तुझें! इश्श! वाघबारश्या कसल्या खेळतोस? मुचकुददरीचें आता आपण नांवसुद्धा घ्यायचें नाहीं. खूबसा अभ्यास करायचा व खूबसें मुबईत राहायचे! तुझें आपलें सारें लक्ष इरून फिरून मुचकुददरीकडे—"

"तू म्हणालीस मी आवडून घेईन! हेंच का तुझें आवडून घेणें? तुला मुळीं भावनाच नाहींत."

"नसू देत!"

"अस्सें होतें पाहिलेंस? आणि म्हणूनच माझें अंतरंग मी तुझ्यापासून नेहमीं लपवून ठेवतों. तुझ्या आग्रहाखातर एखादे वेळीं तोंड उघडावें आन् तूं हें अस्सें घुम्में वर्तन करावें! अवती, तुझें कुठें तरी खास खास चुकतय!"

"बर बाबा राहिले! चल ऊठ! उतरायला पाहिजे ना! का इथेंच वादविवाद करीत बसायचेंय!" असें म्हणून ती उभी राहिली.

दोघेंहि उतरून गेलीं.

असल्या तऱ्हेचे आक्रमण सुकांतला मुळींच आवडण्यासारखें नव्हतें.

तीं वर्गात जाऊन बसलीं नेहमींप्रमाणें क्रम सुरू झाला.

मुचकुददरींत मात्र त्या वेळेला सुकातच्या नावाने मारे गडबड उडून राहिली होती.

एक रुपयाची मनिआर्डर पोंचण्यापूर्वीं त्या जागळी मडळीच्या मनात उत्साहच नव्हता. विश्रामचा बैल मेलेला ! केऱ्या कुठें पळून गेलेला ! त्यात सुकातहि नाहीं ! त्याच्या समजुतीनें सारीच गुलमाल झालेली ! पण सुकात-कडून बोटभर सदेश व एक रुपया आल्याबरोबर प्रत्येक जागळ्यात एकदम उत्साहाचा सचार झाला

पोस्टाचा शिपायी विश्रामला घेऊन बगोबा मास्तरकडे गेला. बगोबा मास्तरानीं आपला टिनचा चष्मा डोळयावर ठेवून कूपनातील मजकूर विश्रामला समजावून सांगितला.

विश्रामनें रुपया हातीं घेऊन आगठयाचे ठसे उठवून दिले.

"मास्तर व्हयता मन्यारीचां चिटोरा घ्या" विश्रामला त्या कूपनची किंमत कित्येक रुपयाच्या मनीआर्डरीपेक्षा सरस वाटली. कारण तें चिटोरें खुद्द सुकातच्या हातचें होतें

"कशाला रे तुला पाहिजे तें?" मास्तरानीं विचारलें.

"असावा आपला पाशीं !"

"बरं तर घे हें." मास्तरानीं त्याच्या अगावर तें चिटोरें फेकलें.

विश्राम आपल्या वाडींत धावतच गेला.

चिमाच्या घराजवळ पोंहचताच—

"चिमा, हां बग काय ता?"

"कांतूदाचा पतोर काय?" चिमानें ओळखलें.

इतक्यांत तिथें पड्या, लाडी वगैरे जांगळीहि जमले.

सुकातनें लिहिलेला सारा मजकूर विश्रामनें हासत हासत त्याना समजावून सांगितला.

"कसारे कांतुदा हाय?" चिमी उद्गारली.

"आता वाघबारशी र, वाघबारशी " असें ठराविक प्रकारच्या गाण्याच्या स्वरांत पड्या म्हणू लागला. एकीकडे नाचतहि होताच तो पोर

त्या रुपयाचा बाजारहि केला गेला आदल्या दिवशीं. (वाघबारशीच्या).

बाजार म्हणजे तरी काय?

गूळ, पानें, सुपाऱ्या वगैरे--

चुना, कात--

खिरीला दूध--

वाघबारशीच्या दिवशीं गोठणीवर विश्रामच्या वाडींतील पाचपन्नवीस पोरें जमलीं. आडगावच्या गोठणी या बहुधा चांगल्या मोठ्या पऱ्ह्याच्या काठीं अशा असतात. या ठिकाणीं साऱ्या वाडींतील गुरे दुपारीं दहा वाजल्या पासून तीन वाजेपर्यंत उभीं करून, जागळी लोक भाकऱ्यातुकडे खावून जागळपणातले खेळ खेळत रहातात पऱ्ह्यात उगवणाऱ्या तांबोळीचीं पानें--भाबुरडीच्या पानासारखीं पण लहानसर--शेवरीच्या काट्यासोबत खावून ओठतोंड लालीलाल करायचें, मोठ्या शेतकऱ्याची ऐट आणायची, वादराची, बैलाची, म्हसराची नक्कल करायची, दगड मारून नेमकी वस्तू टिपण्याचे खेळ खेळायचे, या व यासारख्या खेळानीं आश्विन ते शिमग्यापर्यंत, हरएक गोठणी गजबजलेल्या असायच्या गोठणीजवळच्या भल्या मोठ्या वृक्षाखालीं शेंदूर थापलेला एखादा "जागळदेव" असला म्हणजे वाघबारशीच्या दिवशीं त्याची झेंडूच्या फुलानीं पूजाहि व्हायचीच

गोठणीवर साऱ्या वाडीचीं गुरें रवथ करीत बसलीं.

दोनचार जागळीं तांबडे, पिवळे, लाखी अगर पांढुरके दगड जमवून निरनिराळ्या पथ्थरावर उगाळीत बसले

एकानें गूळचुन्याचें लाल मिश्रण केलें.

"इस्रामदा! आज वाघर कन व्हायाचा?" एकानें विचारले.

"पड्या. ता आपला दरसालचा हाय ना!" विश्रामने पड्याकडे पाहून म्हटलें.

"यकून मीच व्हयाचा काय अदू दुकून?" पड्या अंगातलें कुडतें काढीत म्हणाला.

इतक्यांत कौंडळें व कारिंटें यांनीं भरलेली टोपली घेऊन लाडी, चिमा वगैरे मुलीहि तिथें आल्या. रानातून न वाडींतून हिंडून त्यांनीं ही पैदाशी केली होती.

"अग बया बया! इकतीं जमवूनशान् आनलीव? हा सारा ग्वलीबार आमावर व्हयाचा यकून? मग बगाया नुको आज पर इस्नाम योक मातूर कर. व्हयन्या दुधाची समदी व्हनारी खीर मना यकस्याला मातुर पिया द्य. हाय कबूल?" पड्या पाणकर आधींच मिस्किल, त्यात तो आज वाघ होणार होता व सारींजणें त्याला कारिंटें–कौंडळानीं मारणार होतीं

"व्हय, त्या कौंडळाच्या माऱ्यातून जगला वाचलास तर!"

"आन् धाव धाव धावून दमून पडला म्हजी?"

"म्हजी काय? फुकनीतून व्हय त्याला गुरावानी खीर पाजायची!" चिमा म्हणाली

त्याबरोबर सारींजणें खोखो करून हासलीं

विश्राम आता पड्याला सजवू लागला

नाना तऱ्हेच्या रगाचे पट्टे—उगाळलेल्या दगडाचे—पड्याच्या आगभर ओढण्यात आले गवताच्या दोरीची एक शेपटीहि त्याला लावली गेली.

पड्यानें नतर बरोबर वाघासारखी डिरकाळी फोडली

हों ओं ओ ओं ओ ओ!

सारीं खदखदा हासलीं गायरेंहि पड्याच्या दिशेकडे पाहू लागलीं.

प्रत्येक जागळ्यानें हातीं राहातील तेवढीं कारिंटे कौंडळें घेतलीं

पड्या पुढें पळू लागला

त्याला कारिंटें मारीत--

"धरारे धरा" ओरडत सारे जागळी त्याच्या पाठीस लागले.

ही वावटळ वाडींतून जाऊ लागली.

सारे शेतकरी हौसेने त्याच्याकडे पहात होते

रामाण्या तर अगदीं खूश झाला पड्याच्या सोंगावर तोही दोन कारिंटें मारीत पड्याच्या बाजूनें धावला. म्हातारा माणूस! दहापधरा पावलें धावल्यासारखीं टाकल्यावर—

"धावारे पोरानू वाइच!" तो म्हणाला.

सारीं पोरें थाबलीं. एक फर्लांगावर पड्याहि थाबला. आता काहीं तरी मजेदार जुनी गोष्ट हा म्हातारा सागणार अशी सर्वांची खात्री होती व त्या-प्रमाणे झालेहि! रामाण्या हातवारे करून सागू लागला.

"फारा वर्सांची गमतुऽ मुलारे! (विश्रामास अनुलक्षून) मी तुज्या शिणेचाच तवा व्हता बग वाघ व्हवूनशान् डिरकत मी जवा चौकूर पलला तवा माज्या मागा हीं मानसा! मी वरडत रानात शिरला आन् सागायची गोस्ट म्हजे अशी, अव खराखुरा वाघ रानातून माझ्या अगावर धावलानि काय! त्यास्नी मीबी खरा वाग असा वाटला नाव? मग काय? मी असा डिरकलाव, असा डिराकलाव, का आमचे समदे जागली धावून आले मग काय इचारताव? दगडी घालूनशान् ता वाघ ठार केला आमी!! त्या कातळ्यावर रावजी खोत अजुनधर बसतोय! बेस, बरी पला आता"

त्यानतर सारी हुल्लड खाडीकडे निघाली.

"धरारे धरारे" ओरडत ते खाडीवर पोंचले

प्रथम वाघानीं खाडींत उडी टाकली

त्याच्या मागोमाग डिरकाण फोडीत प्रत्येकजणानें उडी फेकली.

इस्रामानें पोहण्याचा व डुबे मारण्याचा सपाटा चालवला

सर्वांची मनसोक्त क्रीडा सुरू झाली. रेड्याचें अनुकरण करीत प्रत्येकजण चिखल माखू लागला मध्येंच गरम गरम पुळणीवर लोळायचें, परत पाण्यात बुडी मारायची!

"चला र पोरानू" विश्राम बाहेर येत म्हणाला.

सर्वजणें वर आलीं

आता गोठणीवर जाऊन खीर पिणें एवढाच महत्वाचा कार्यक्रम उरका-वयाचा होता.

तीं सारीजणें गोठणीच्या वाटेनें निघालीं तोंच मागल्या बाजूला कोणी तरी जोरानें खोकल्याचा आवाज निघाला म्हणून विश्राम मागे पाहू लागला.

लाब अतरावरून तीन असामी येत होते.

ते आपल्यापैकींच तिल्लोरी कुणबी आहेत हें विश्रामानें ताडकन् ओळखलें पण त्याचे कपडे पाहून तो बिचकलाच!

अगदीं पुढचा माणूस फत्तरासारखा कुळकुळीत असून साठीचा असावा. कमरेंत आलेलें पोक साभाळून तो खोकत होता. डोकीला फेटा, अगात कोट, नेसूं धोतर, सर्वांगावर रेशमी उपरणें! अगदीं पाढरपेशा रुबाब.

त्याच्या मागून त्याच्याच रंगाचा, खुप स्थूल व भरलेला, बूट सूट घातलेला माणूस असून त्याच्या मागें एक ट्रंक व वळकटी घेतलेला साधा कुणबी होता. मधल्या माणसाची साहेबी टोपी शेवटच्या माणसानें दडात टाकती घेतली होती. ते सर्वजण जवळ येईपर्यंत विश्राम व त्याचे खेळगडी उभेच होते.

"कुट व जायाच?" विश्रामने पछानलें.

"तुज्याच वाडींत" पुढच्यानें हळूच उत्तर दिलें.

"कुनाच्या घरात?"

"समद्याच्या घरात" गुळचट गोडव्यानें तो पुढचा माणूस बोलू लागला.

"हा बडा सायब हाय आपल्या जातीचा. आपून आज तुमच्या गावीं मोटी सबा करायची. हा सायब समद्या कुलवाड्याना ताराय आलाय! तुमस्नी ही शतीभाती स्वाडुनशान याच्यावाणी सायब व्हावासा वाटतं का नाय? तुम्हास्नी चिखलातून काडाया आम्ही आलाव तुमास्नी जमनी द्याया आलाव! या सायबान् आता खोताचा राज्य घ्यातलान्. आतां समद्या खवताच्या जमनी तुमच्या व्हनार"—

"आमच्या व्हनार आन् खवात काय मरनार?" पड्यानें ताड्दिशीं फेरसवाल केला.

"अर मरनार त काय जगनार? समद्या खवताचा, जमिनदाराचा उटाव करूनशान् टाकनार हा खांडक्या! तुमी या सायबाचा नाव ऐकलां नाय काय? खाडके बालिष्टर! खाडके बालिष्टर म्हनतात ता हाच! म्हशूर हाय हा आमच्या मुलकात. माजाच पुतन्या हा. हाच तुमचा या म्होर राजा—"

हें त्याचें भाषण सुरू असतानाच विश्रामच्या मनातून खालील विचार सरकून गेले.

समद्या ख्वताचा उटाव म्हजी कातुदा पर जायाचा काय? त्याच्या सगळ्या जमिनी आमी घेऊनशान् त्याला काय हाकलुन लावायचा? असा होन्यापरीस आपुनच म्यलल काय वाईट? कातूदाला घालवाया बसलेले यमदूतच नव्हेत तर कोन? काळतोंड्ये येताया कशाला आमच्या गावात? याना जर इथूनच परत फिरवलें तर?—

विश्रामनें आता आपल्या नजरेंत करडेपणा आणला. या लोकाबद्दल त्याच्या मनात कायमची अढी बसली.

विश्रामचे हे मनोव्यापार चालू असतानाहि तो म्होरक्या बोलतच होता "तवा मुलानू, असा करा तुमी गावात पळत जा. समद्या कुलवाड्याना यकारून आमास्नी इतवर सामोरं या. तवसर आमी इतच बसताव! आमास्नी वाजत गाजत घ्यवून चला वाडींत. जाताव काय?"

"नायर बा आमच्यान ता व्हनार!" विश्रामनें उत्तर दिलें.

"मग धा इस वाडकराना तरी इतवर लावून द्याल काय?"

"आमी लय मरगाळलाव धावुनशान! आज वाघबारशी ना?" पड्यानें डोळे खोचून सांगितलें.

"चला र!" म्हणून ते सर्व धूम धावू लागले

आपल्या गावात हें एक नवे दुखणे आलें असेंच विश्रामला वाटू लागलें

पाच पाच मिनिटांनीं ते मागें वळून पाहत—

तों ते तिथे फेरिस्ते बसलेले आढळले

"रात ज असती तर व्हयत्याना वाघावाणीं पिटाळे असते गावाभाईर." पंड्या म्हणाला.

"बरा तुम्ही असा करा. ठेपी गोठणीवर चला. ता मी मास्तरास्नी ही वर्दी द्यवुनशान् यता" असें म्हणत विश्राम रावजीकाकाच्या घराकडे निघाला.

मास्तर दुपारचें जेवणखाण उरकून ओटीवरच आडारले होते.

"मास्तर, व मास्तर?"

"योगिराज!" म्हणून अंगावरील उपरणें दूर करीत मास्तर उठले.

"काका व कदी ययाचे?"

"इतक्यांत नाहीं!"

"मंग कस व्हनारऽऽ!"

"का रे?"

"तो कोनसा खाडक्या यका सायबाला घ्यवुनशान् खाडीपावत आलाय."

'यका साहेबाला' हे शब्द ऐकून मास्तर टुणकन् उभे राहिले.

"साहेब?"

"व्हय व्हय."

"मग त्याच्याशीं इंग्रजी बोलायला गेलच पाहिजे मला." असें म्हणत मास्तर कोट, फेटा झडपू लागले खुटीवरील!

त्या साहेबाबद्दल मास्तरहि इतका आदर व्यक्त करतात म्हणजे हें आहे तरी काय? तो साहेब आलाय ख्वताचा उठाव करायला अन् हे निघाले त्याच्याशीं बोलाचाली करायला!

विश्राम पार गोंधळून गेला.

मास्तरहि घाईघाईनें निघाले.

"अव तुमी जाताव तरी कुट?"

"कुठें म्हणजे साहेबाला भेटायला! गोरा साहेब आला, काका मुंबईस. अशा स्थितीत मलाच गेलें पाहिजे सामोरें. बोलून गार करतों गुलामाला."

"अव म्हनताव काय? ता गोरा साब नाय. व्हयत्या पायरी वाणी काला हाय. त्या खाडक्याचा पुतन्या ता?"

"अरे म्हणजे तो खाडक्या होय? बालिष्टर!"

"व्हय व्हय ताच."

"याची वळली का धाड आमच्या गावाकडे? हे कुळाचे म्होरके. कुळवाड्याजवळून वाटेल तसा पैसा उकळतात त्याना थापा मारून—"

"मग म्होर काय करताव?"

"झोंप काढतों झाल." मास्तर कोट फेटा जागच्या जागीं ठेवीत म्हणाले.

"त्यास्नी गावात ययाची मना करा म्हाराकडून?" विश्रामनें सल्ला दिला.

"मरू देत! येईतना का? कोंबडीं बकरीं खातील! कुळवाड्यांना चार

थापा मारतील! एखादी सभा करतील, पैसे उकळतील आन् पळून जातील!"

"बगा बा. मी आपला तुमच्या कानावर हां घातलांय" असें म्हणून नाराज अतःकरणानें विश्राम निघून गेला.

वाघबारशीच्या मुहूर्तावर गावात माणूसखाऊ वाघ आले असेंच विश्राम-च्या मनानें घेतलें व तें खरेंहि ठरलें.

कारण त्या दिवसापासून खाडके हा मुचकुंददरींत वाघाप्रमाणें डिरकाळू लागला.

# ९. खांडक्यांची चळवळ

त्याच दिवशीं सध्याकाळीं चागले ऊन असता असताच आकाश निळ्याचें काळे झाले. पूर्वेकडून सोसाटयाचा वारा सुरू होऊन पूर्वेकडील ढग पश्चिमेकडील सूर्यप्रकाशाला झाकाळून टाकू लागले पूर्वेकडे सह्याद्रीच्या खोऱ्यात खूबसा पाऊस पडत राहिल्यामुळे व मावळतच्या सूर्याने किरण त्या पावसावरून परावर्तित झाल्यामुळें इद्रधनुष्याचा एक चतुर्थांश भाग अत्यत ठळकरीत्या उगवत डोंगरावर दिसू लागला जणू काय त्या डोंगरातून एखादा सप्तरगी कुतुबमिनारच अवतरला असावा मध्ययुगीन भारताचे कित्येक मिनार पृथ्वीच्या पोटात गडप झालेले आहेत, त्यापैकींच एखादा, त्या क्षणाच्या भूकपाने, वावटळीच्या घडामोडीनें जणू काय एकदमच प्रगट झाला त्याच उच्चीवरून त्याच परावर्तित झालेल्या किरणाचा प्रकाश दक्षिण उत्तर लाबच्या लाब पडला होता. मात्र बाकीचा प्रदेश झाकाळला असून क्षणाक्षणानें जास्त जास्त भेसूर दिसू लागला

त्या वाऱ्याकडे, ओथबून रहाणाऱ्या पावसाकडे, मध्येंच दिसणाऱ्या त्या प्रकाशाच्या पट्टीकडे व त्यातून उठावानें दिसणाऱ्या त्या धनुष्यखडाकडे पहाता पहाता कोणत्याहि साकेतिक नावाने व्यक्त न होण्यासारख्या कित्येक रगछटा बदलत जाऊ लागल्या. ज्या रगाचें नाव घ्यावें त्यापेक्षा काहींतरी निराळाच प्रकाश दिसू लागे ! मध्येंच सधिप्रकाश तर मध्येंच क्षयी माणसाच्या चेहऱ्यासारखी काळोखी ! मध्येंच लोखडाचा निळसरपणा तर मध्येच गुलाबी रग व शेंदरी रग या दरम्यानचा कसला तरी रग ! चादण्याचा भास तर सारखा होतच होता चिनी चमकताऱ्याप्रमाणें वीज मधून मधून रेघोट्या ओढीत होतीच ! पावसाचे ठिपके झणकू लागल्यावरहि जागळी मुलें व ढोरें तें दृश्य पहाण्यात रममाण झालीं. एका झाडाच्या आडोशाला

चिमा एकटीच उभी होती. दिवसा उजेडीं लख् करणाऱ्या विजेचा चक-चकीत चादीसारखा चमकारा--जणू काय चादीची तारच निघत आहे--चिमाला नजरेआड करवेना! नतर पावसाची सर जोराजोरानें सळसळूं लागली.

सारीं जागळी पोरें वाडीकडे धावत सुटलीं

चिमा मात्र त्या मनोहर दृश्याशीं एकजीव होऊन राहिली. यावेळीं जर सुकात इथें असता तर--

झटकन् तिनें अग शहारले. आपणाला सुकातची आठवणच होण्याचें --निदान असल्या प्रभावानें--मुळींच कारण नाहीं हेहि विचार तिच्या मनात आल्याशिवाय राहिले नाहींत कुठे सुकात व कुठें आपण!!

पावसाची सर उबवीत ती याच विचारानें व्याप्त होऊन तिथेंच बसून राहिली

खाडीकाटीं बसून राहिलेले ते खाडके चुलते पुतण्ये निराश झाले व पावसाच्या धास्तीनें अखेर मुचकुददरींत शिरले!

कुळवाड्याच्या वाडींतील पहिल्याच घरात त्यानीं आसरा घेतला

तें घर तात्या चालक्याचे--चिमाचेच होतें.

त्या वेळीं जर पाऊस पडत नसता तर वाडींतील पोरेंढोरे त्या खाडके-साहेबाला पहायला माशाप्रमाणें घोंघावलीं असतीं.

टोपल्या सुपे वळण्याचें काम आता तात्यानें आटोपतें घेतलें, ओटीभर झालेला कीस व भुमा त्यानें गोळा करून बाहेर टाकला व पाहुण्याना बसण्या-करता घोंगडे अथरलें. थोरला खाडके त्यावर बसला. साहेब खाडके बूट काढण्याच्या उद्योगात होता. नोकरवजा असणाऱ्या त्या तिसऱ्या माण-साच्या डोकीवरील ट्रंकेला तात्यानें हात दिला

अचिट कसा पाऊस आला व?"

"नाय ताच झाला" हे दोन्ही पेंडीचे खडे त्या म्हाताऱ्या खाडक्यानेंच टाकले. कुणीकडून तरी त्याला बोलणें सुरू करावयाचें होते

"सोपला ता असाच धाण करतो." तात्यानें पावसासबधीचें आपलें सर्वसाधारण मत व्यक्त केले. नतर--

"पन् आपुन इकड कुट निगालाव?"

"या सायबासगे आम्ही तुमच्याच गावात येयाचा व्हताव. आमास्नी मोप मडली सामोरीबी येयाची व्हती पन् या पावसान सारा सत्यानास क्यलान्. या तुमच्या गावात तुमी कुलवाडी लोक लय हैराण झालाव समद्या जिल्ह्यांतील कुणबी हैराण झालायत नी काय? तुमच्या लोकाची सबा करायचा आमचा इचार हाय. सबा करूनशान् तुमासनी जमिनी द्यायाच्या, घराखालच्या जागा तुमच्या नावान चढवून घ्यायाच्या, तुम्हास्नी गुरचर तोडून द्यायाचा, तुमच्या पोराबालास्नी शिक्षान् द्यायाचा! हा नाय ता ता नाय हा—करूनशान् खोताच्या जाचातून तुमास्नी मोकल करूनशान् टाकायच हाच ह्यतू या सायबाचा ह्य साहेब बालिष्टर हायत, बालिष्टर!"

"असा नाय? म्यवच पावला त! ह्येरी कुटून माज्या घराला पाय लागायचे तुमच्यासारक्याचे!" तात्या चालक्याच्या लक्षात आता सारें काहीं आलें इतर गावातील खाडके चळवळीची हकिकत त्याने कित्येक वेळा उडत ऐकली होतीच त्याच्या दर्जानुरूप आगतस्वागत आता कसें करायचें याचा तो विचार करू लागला. घरात नजर टाकीत तो स्वगतच म्हणाला.

"पोर पर नाय आली अजून!"

"जवणाची सका नुको हा आमचा ज्यवण्या हायच सगाती. सुऱ्या, जा बरी आत चूलबिल पेटव आन् च्याय साहेबास्नी कर. दूध मिलल काय इत?"

"बगता बरी वाडींत." म्हणत हातीं एक वाटी घेऊन तात्या घराबाहेर पडला.

"या पावसान अपसकून क्यालान्" बालिष्टर म्हणाला.

"तू दमान घ्य उद्या सबा करू घरपट योकेक रुपया काढू आपुन चळवळ करायची म्हजी घाबरून कसा भागल! तुजा नाव जिल्ह्यांत म्हशूर क्याला ना? कुणबी जातीला तू द्यवावाणी वाटतोस ना? आनी ही सारी अक्कल कुणाची बरी? या काळु खाडक्याचीच कीं नाय? यका वर्साभऱ्यात माज्या घरासमोर हजार हजार कुलवाडी जमवतों बग. तूं मातर मोट्या

बुकातून विंग्लिश वाचून दावीत जा या कुळब्याना. विंग्लिश चार यत्ता तुज्या झालेल्या ! म्हजी काय लहान सान गिन्यान ? ता तू इसरू मातर नको ! ब्यस धरून ठयव चागली प्राटिस कर अर मी इकता म्हातारा. म्यासपाट मदून म्वली लागून आल्याला तीस वर्सा झालीं पर हिंदी शबद् इसारला नाय ! आन् तू तुझा ताजा विंग्लिश इसरून कसा चालल ? मोटासा बुक काढून बस " काळू खाडक्यानें आपल्या पुतण्यास आज्ञा केली. आपला काळ्या भोपळ्याएवढा तोंडवळा चटकन् बालिष्टराने ट्रंकेकडे वळवला कुलुप काढून ट्रंकेतून आनडेलची डिक्शनरी काढली व हुकमे हुकूम वाचीत बसला.

सूर्यानें चहाचे अधण चढवलेंच होतें.

ट्रंकेतून "चाय" व "साकऱ्या" हि काढून नेण्यासाठीं सूर्या बाहेर आला

इतक्यात ओली चिंब झालेली चिमा ओटीजवळ आली

"मुला, भिजलीस वाटता ?" तिच्याकडे पहात काळू खाडक्यानें विचारलें त्याच्या गुळचट गोड शद्बाचा चिमावर जितका परिणाम झाला त्याहूनहि अधिक परिणाम चिमाच्या रेखिव सौंदर्याचा, गोरेपणाचा, व भरगच्च बांध्याचा काळू खाडक्यावर होऊन राहिला

"सुऱ्या, सुऱ्या, व्हयत्या बायोसाठने बी आणीक चाय ठेव पोर गारठली असल् !" नतर परत चिमाकडे वळून काळू पुढें बोलू लागला

" जा बया घरात ! न्यसुनचा पालट ! घाबरू नकोस तुजा बाबा दूध आनाया वाडींत न्यलाय काय बरी तुज्या बाबाच नाव ?"

"तात्या चालका " चिमानें अगदीं खालीं मान करून पाटमोऱ्या उत्तर दिलें

"अन् बाय, तुजा नाव ?"

"चिमा" म्हणत ती घरात गेली थोडी घाईघाईनेंच !

बालिष्टरनें वर मान करून तेवढ्यात त्या पोरीचा आढावा घेतला.

काळूनें बालिष्टराकडे पाहून काहींसें सांकेतिक हास्य केलें.

इतक्यात दूध घेऊन तात्याबाहि आला. तोहि अदबीनें आत गेला.

"भिजलिस वाटता ! बरां आता भाडीं उजळूनशान् दे बरी व्हयत्यास्नी"

असें म्हणून तात्याबा बाहेर येवून बसला.

"व्हय ती माजी मुलगी व !"

"लगीन व्हायाचा हाय ना?"

"तव अ!"

बालिष्टरच्या चेहऱ्यावर समाधान झळकलें. काळया भोपळयाएवढा त्याचा चेहरा लालुगा दिसू लागला त्याच तावात मोठयानें तो इग्रजी वाचू लागला. डिक्शनरींतील लागोपाठ पाचदहा शब्द त्यानें उद्गारले.

"आमच्या बालिष्टराचाबी अदू लगन हुरकायचा हाय मनातून पैसे-वाल्याच्या पोरी अमास्नी नुकोत. गरीबाचीच पर चमकदार पोर आमास्नी व्होवी." काळू बोलत होता

"आमीबी गरिब हाव" तात्यानें तोंड वेंगाडलें.

"अन् तुमची पोरबी हुश्शार हाय." काळूने सागितलें

तात्याला भलताच एकदम आनद झाला

आतापासूनच आपली जन्माची ददात गेली अशी त्याची ठाम खात्री झाली. त्याच समाधानात त्याने कमरेचा बटवा काढला.

"वायच दम घ्या आदि चाय अन मग पान." काळूनें सागितलें.

सुर्यानें प्रथम बालिष्टराला चाय दिला

मागून सर्वांचा झाला

त्यानतर काळूने तात्याबाला आपल्या जवळ बसवून घेतला.

पानसुपारी सुरू झाली

"तात्याबा, तुमी आता आमचा योक काम करा. आज रात्रीं तुमचे समदे कुलवाडी गाववार इत बसाया बोलवून घ्या. त्यास्नीं आमी बातचित करूं आन् मग उद्या सबा करू थत सायबाचा लेक्चर व्हयल!" काळूनें मुख्य कामाला सुरवात केली

आपण काळू खाडक्याचे "इवाय्" व्हनार याच दमानें तात्या आता वाटेल ती जबाबदारी अगावर घेऊं लागला.

डोकीला टापशी बाधून निघालाच तो आमंत्रणाला

आगणात चिखल साचल्यामुळें तात्या वरच्यावर उड्या मारीत निघाला.

चिमाला वाटत असलेल्या साऱ्या गौडबंगालाचा आता खुलासा झाला विश्रामानें ही सारी हकिगत पूर्वींच सर्व जागळ्याना सांगितली असल्यामुळें चिमाला त्याची खित्तबातमी होतीच हें सारें किटाळ आपल्या घरीं आल्या मुळें तिला फार फार वाईट वाटले "खरच का आपलें लगीन त्या भोपळतोंड्यजावळ व्हनार?"

ती कल्पनाच चिमाला सहन होईना

मुचकुददरी सोडून जाणे हें तिच्या स्वभावाला मुळींच सहन होण्याजोगे नव्हतें.

त्याला कारण एकच—

आणि तें म्हणजे मुचकुददरी हा विश्राम—सुकातचा गाव होता.

मनाच्या असल्या गढूळ अस्वस्थतेत जेवणखाणाच्या तयारींत सुर्याला ती मदत करीत होती

तात्या चालका कुळवाड्याच्या हरएक वाडीवाडींतून आमत्रणें करीत होता.

मध्यम वयाच्या शेतकऱ्यानीं येण्याचे कबूल केलें यात त्याला समाधान झालें.

मात्र हा एकदर चाललेला प्रकार विश्रामला तितकासा आवडला नाहीं

अगदीं तिन्हीसाजा झाल्यावरहि तो फिरून मास्तराकडे गेला झाली हकिगत त्याच्या कानावर घातली.

"तुमी आन् गावचे दुसरे ख्वात जमूनशान् यत या ना!"

"तुमच्या वाडींत? कोण तुमच्या वाडीचें तोंड बघेल? मागें गौरीच्या रात्रीं आलों होतों तों माझा अपमान केलात! तुमच्या वाडींत फिरून पाऊल घालिल तो हराम!" मास्तर एकाएकीं भयकर पिसाळले

विश्रामला त्याचें मात्र उलट हसूच आलें

आपल्या मनाविरुद्ध सुकात अवती मुबईस गेल्यापासून, मास्तर असेच चिरचिऱ्या, त्रागेखोर स्वभावाचे बनत चालले होते.

विश्रामनें तेथून पाय काढला मास्तराच्या तत्रीपणानें तो बिचकून गेला. नतर मास्तरानीं स्तोत्रें म्हणण्याचा सपाटा लावला. स्तोत्रें म्हणता म्हणताहि मात्र, आपण जावे कीं काय हे विचार त्याच्या मनात घोळतच

होते. इतर दोनचार ब्राह्मण मंडळी, मराठे मंडळी घेऊन खाडक्याची बैठक उधळून लावणे आपले कर्तव्य आहे असेंहि त्याना वाटलेंच! पण अखेर वाडीवरील राग आडवा आला त्यापलिकडे त्याच्याने जाववेना!

शिवाय खाडक्याच्या बैठकींना इतकें महत्त्व आहे असेहि त्याना वाटेना

"स्वामी समर्थ आहेतच सांकडें दूर करायला!"

"अक्कलकोटचे स्वामी!! देव मामलेदार!!"

त्याच्या बखरींत बिचारा मास्तर कायमचं गुंग पडला

श्रद्धेतूनच कांचेत क्रियाशून्यता अवतरते ती ही अशी!

हेंच जर रावजीकाका असते तर तर—

त्यांनीं खाडक्याना लाथ मारून गावाबाहेर कहाडला असता

आणि त्याचें कारण म्हणजे कुळवाड्यांना ते अत्यंत उमद्या पद्धतीनें वागवीत असत

तरीहि मनुष्यस्वभावाचा बखेडेखोरपणा गावच्या कुळवाड्याना भोंवलाच.

× × ×

तात्या चालक्यानें अंगणात गिन्हाइकाकरता विणलले तट्टये पसरले.

हळू हळू गावकर मंडळी जमू लागली.

प्रथम प्रथम जो येई तो लांब कुठल्यातरी कोपऱ्यात बैठक मारी.

होता होता विश्रामचा बाप व इतर मध्यम वयाची मंडळी जमली

रामाण्यासारखीं बुढ्ढक माणसे घरातच राहिलीं

विश्राम व त्याच्या शिणेचीं मुलें केवळ कुतूहलानें जमू लागलीं

सर्वांच्या शेवटीं राजबा गोठलहि हजर झाला

"या गावकर" म्हणून काळूनें त्याला आपल्याजवळ घेतलें.

"आता कोण हाय काय मंडली यायाची?" काळूनें सर्वांना उद्देशून विचारलें.

"येयाचे ते येतील! तुमचा आपला व्हंउद्या सुरू" पेटवून आणलेली गुडगुडी राजबाच्या हातीं देत तात्याबा बोलला.

"बाबानू आमी आलाव ता व्येस झाला का नाय?" उत्तरासाठीं काळू थांबला.

"व्यस त व्यसच." विश्रामचा बाप उत्साहानें म्हणाला. विश्रामला मात्र त्या उत्साहाचा राग आला.

"आमी समद्या जिल्याभर चलवल सुरू क्यली हाय. ती इकतीच. तुम्हा कुलवाड्याना खोत लोक कुत्र्यापरमान वागवतात तुमास्नी पिळून काढतात तुमी हाडाचीं काडा करताव आन् समदा भात खोताच्या दारात न्यताव! तुमच्या घराखालच्या जमिनीबी ख्वताच्या गुरचरा ख्वताचीं समदा ख्वताचा. तुमाकडून जबरीन् ते येठ (बिनमजुरीचे काम) घ्यतात तुमास्नी डोल्यापालने व्हाया लावतात ग्यवावर धर्मावर हक्क त्याचा पाल-कीला खांदे घालायचे तुमी आन् नारलपाणी घ्ययाचा गुरवाच्या हातून ख्वतानीं हा काय?"

आपलें म्हणणे कुठपर्यंत त्याना पचतय याचा आढावा घेण्यासाठीं काळू जरा थांबला! तोंड रडवेलें केलें! डोळे पुसू लागला!!

तसतशी दूर बसलेली मंडळी ढुगणें हालवीत हालवीत पुढें आली हें पाहून काळू खांडक्याला अधिकच हुरूप वाटला आवाजात शक्य तो घोगरेपणा आणून तो पुढें बोलू लागला

"गेल्या सबर वर्सांची तुमची ही थिती पाऊन मला लय रडू कोसलता!" फिरून डोळे पुसले. "तुमी शाने व्हावेत, तुमच्या जमिनी ज्या तुमी आज सबर वर्सो नागरताव त्या तुमास्नी मिळाव्या, तुमास्नी गुरुचर मिलावेत, घराखालच्या जमिनी तुमच्या व्हाव्यात म्हगुनशान् हा सायब सरकारशीं झगाडतोय, मोट्या बुकातून कायदे काडतोय, कालिकटरला भेटतोय, गवनेर पावत जातोय!! समद्या परकारी जीव तोडतोय तो सारा तुमास्नी— आपल्या तिह्लोरी कुणबी जातीसाटनें हा तुमास्नी मजूर हाय काय?" काळू उत्तराकरता थांबला.

"मजूर म्हजी हा काय इचारना? आमास्नी चिकलातून वर काढाया तुमी झटताव म्हजी काय तुमी ग्यावच हाव!" राजबाला वाचा फुटली

"तुमास्नी काय व्हवा ता आमची जात पुरवील" विश्रामचा बाप म्हणाला. त्या वेळेपासून काळूनें या माणसाला विशेष प्रकारें लक्षात ठेवण्याचा प्रयत्न केला.

"तुमी म्हनताव तां समदा व्हवुद्याच." तिसरा कुळंबी बोलला.

"पर हा समदा व्हाया वरसा तरी किती लागायाचीं?" विश्रामनें सडेतोड सवाल केला.

"काय र हा?"

"नकावडा पोर आन् नायताच भकल "

"तू व्हय त्याना इचारनार व्हय?"

"चिपकन् बस."

विश्रामवर जिकडून तिकडून मारा झाला तो पोरगा त्यामुळें पाठ फिरवून बसला.

"वाइच् फाजिल हाय पोर ता." काळूनें आपलेंहि मत व्यक्त केलें. खाडीवर घडलेल्या हकिगतीमुळें विश्रामवर त्याचा रोष होता

"मग काय? तुमी हाव तर आमा सागाती?"

"व्हय व्हय "

"मग म्होर काय करायचा ता सायबच सागल तुमास्नी." साहेबाच्या व्याख्यानाची ती प्रस्तावनाच होती

सायब पुढें आला डोक्यावर त्यानें प्रथम हॅट चढवली चादण्याचा प्रकाश हॅटनेंच गिळल्यामुळे आधींच काळा असलेला तोंडवळा अधिकच काळा दिसू लागला काळ्या कापडावरील चुन्याच्या बोटाप्रमाणें त्याचे प्रथम दात दिसू लागले डुलुडुलु हालत त्यानें भाषण सुरू केलें.

"गिरिस्त व! सरकारपावत मी तुमची दाद लावनार. कालिकटरशीं माजी दाटी हाय. जमनी ध्यनार तोच! गवनेरशीबी माझी वळख हाय. तो तर मायबाप तुमची खोतानी क्यल्लेली अवस्था पाहून तो तर ढायढाय रडतोय! तो मला म्हणला तू घरपट कुळवाड्य जवळून योक्क रुपया जमव. त्या रुपयावर बालिष्टरी कर खोताशीं भाड. अर्ज कर, अर्जावर टाप लाव!! सारके अर्ज कर सया मेळव हजार सयाचा अर्ज आम्हापावत यवद्य! मग आम्ही समद्या जमेनी तुमच्या कुलवाड्याच्या नावान करूनशान् द्यवू. रेकार्ड म्हजी लय मोठा कागाद! त्यावर तुमचीं नावा चढवायची. त्याला खर्चपाणी हा हायच! ता खर्चपाणी तुमचा, अक्काल माजी!

हीं बुका म्हजी सारी भकाल हाय टापाला खर्चबी फार येतो लय नाय पर घरपट योकक रुपया द्या म्हजी तुमचा काम झाला—"

"यकोकच ना?" राजूने विचारलें

"पर आताच कुटला? खवताकडे बगाया हवा जाऊनशान्!" दुसरा म्हणाला.

"द्ययाचा तर बगुनशान् उद्याच्या उद्या" प्रत्येकाची तयारी झाली.

"समद्यानीं यक टिकानीं जमवूनशान् द्या तुमास्नी पावतीबी द्यता. खोत कदी पावती द्यतो काय? आमचा तसा नाय पावती द्ययाची!"

बालिष्टर छातीवर हात मारू लागला. त्याने फड जिंकलाच होता तसा!

"व्हयना? मग असा करू या माशीं बैलाचे पैसे हायत तीन इसा (साठ) ते मी म्होर करतो! आन् तुमी समद्या गावकऱ्यानीं मना जमवूनशान् द्या चार दिवसात!" विश्रामच्या बापानें स्वयस्फूर्तीने पुढें होऊन सांगितलें

"आर व्ह र व्ह! ताच ब्यस!" एकजण म्हणाला

"म्हजी व्हयत्याना लॊंबाया नुको" दुसऱ्यानें आपला मथितार्थ जाहीर केला.

"तसाच ब्येस!" राजबानेंहि सांगितले

"मग जावा आन् आना तर" काळूनें गुळचट तोंड करून सांगितलें

"व पुन्हा सायब भरा पावती साट रुपयाची" असें साहेबाला बजावलें.

"आनता बरी" विश्रामाचा बाप घराकडे निघाला.

विश्रामहि त्याच्या मागोमाग गेलाच. हें पाहून राजबा उद्गारला:

"ता पोर बखेडा करणार! वायट् बा. त्यास्नी कायबी चांगल व्हया नुको."

"म्हजी तो त्या गावकराचाच पोर व्हय?" काळूनें विचारलें

"व्हय. थोरल्या खोताचा जागळी हायता ना? म्हुन त्याच्या समद्या गमज्या."

तात्याबानें ही नवीन माहिती दिली.

"बरा अता मात्र या नावातली वायशी फोड सांगा बरी! हत मोटा खोत कोन?"

काळूनें विचारलें,

रावजीकाका गावातल्या भवर्‍येक जमनी ग्याच्याच हयत असं म्हना. दुसरे पाचदहा बामन हायतपर त्याचा बायच हिस्मा पैपैचा मराठे ख्वात हायत त्याचाहि बायच हिस्मा! म्हजी एक चौत गावाचा त तीन चौत रावजीकाकाचे"

राजबानें फोड करून सांगितलें.

"पर तुम्हास्नी लय तरास असा कुनाचा?"

"रावजीकाकाशिवाय बाकी समद्याचाच म्हनाना" राजबानें उत्तर दिलें.

रावजीकाकाबद्दल एकूण गावकर्‍यांचें मत चांगलें आहे ही गोष्ट काळूच्या चळवळीला मुळींच पोषक नव्हती आपल्याला यावें तसें यश कदाचित् येणार नाहीं हेंहि आता त्यानें ओळखलें

मग तूर्त उद्या सभा कराच कशाला?

आज रुपये साठ मिळल्यासारखे आहेत तेवढेच घेऊन पाय काढला तर?

आपल्या घरींच या लोकांना बोलावलें तर?

हे असेंच! उद्या सभा न करताच आज रातोरात निघून जावें.

काळूच्या गुळचट थोरपणाला हें सारें पटलें.

"मग तुरुत तुमी असा करा! परतम खोताकडे यठ बिगार बंद करा. त्याच्या मांगारणीच्या डोल्याला खादे घालू नका. पाळणे मेणे आणू नका सप करा खोताच्या इरुद"—

"हा मातर तुरुत व्हायचा नाय आमच्यान—सपष्ट सांगताव!"

"आता असा! मोंप गावातल्या कुलवाड्यानीं असा कयाला म्हजी आमी बगू."

राजबानें कुरकुर केली.

"ताबी बरोबर." काळूनेहि वेळ पाहून माघार घेतली.

इतकें चालू असेपर्यंत रुपयाची मोटळी घेऊन शिवराम नवरत–विश्रामचा बाप फडावर येऊन दाखल झाला

विश्रामचा काहींहि इलाज चालला नाहीं! त्यानें शक्यतोंपरी विनवून पाहिलें. पण भलत्याच भावनांच्या इरईला पडलेला शिवराम त्याचें काहींहि चालू देईना.

विश्रामच्या चेहऱ्यावर निराशेतला प्रक्षुब्धपणा आला होता

शिवरामनें काळूजवळ मोटळी दिली.

बालिष्टरानें शिवरामच्या नावानें "सबद गावची वर्गणी हस्तें—शिवराम नवरत" अशी साठ रुपयाची तयार करून ठेवलेली पावतीहि दिली.

"तुमी ह्य पैसे आमास परत द्या —"

"ते आमच्या बैलासाठनी ठयवलेले हाईत "

"गरीबाना असे नाडू नुका."

"बावाच काय ऐकताव? आमी उपाशी मरू ना?"

"हा तुमचा ब्यस नाय!"

"घ्या बरी मोटली परत!"

दर वाक्यागणिक विश्रामचीं पावलें काळूकडे वळत होतीं.

"मुला असा काय करतोस? चिपकन बस " काळूनें उत्तर दिलें.

"ता काय नाय? पैसे परत द्या नाय तर या गावातून कसे भायर जाता ता मी बगता."

विश्रामच्या या वाक्यानें तिथें जमलेल्या प्रत्येक माणसात एक प्रकारची उचल उठून राहिली

"कायर पोरा तू बगणार?" बालिष्टर ओरडला

"कस भाईर जाताव ताच "

"अर जा र चिमकड्या." काळू बोलला व थैली ट्रंकेंत नेऊन ठेवूं लागला.

पड्या बगतोस काय?"

हे विश्रामचे शब्द तोंडातून बाहेर पडायला व पड्यानें ती थैली झटकन् हिस्कावून घ्यायला एकच गाठ पडली

विश्राम व पड्या त्या थैलीसह तडक् रावजीकाकाच्या घरीं जाऊन बसले इतक्या थरावर गोष्टी आल्याचें पाहून जो तो गावकर न बोलताच घरोघर निघून गेला.

तिथें फक्त शिवराम नवरतच खालीं मान घालून बसून राहिला.

खाडके चुलते पुतण्ये एकमेकाकडे तोंड वासून पहात होते.

# १०. गांठीभेटी

केनेडि ब्रिज जवळील टयुटोरियल हायस्कूलच्या मागल्या बाजूस एक छोटेखानी बाग असून तिच्या दक्षिण व पश्चिम बाजूंना काटकोन साधून दोन बैठ्या दुमजली चाळी आहेत. एकेक चाळ नेमक्या आठ बिऱ्हाडाची!

मुंबईच्या मानानें या चाळींत व आवारात कमालीची शांतता आहे. केवळ या शांततेच्या मोहाखातरच रावजीकाकांनीं दक्षिणच्या चाळींतील दुसऱ्या मजल्यावरील अगदीं उगवतचा गाळा आपल्या मुलांकरता भाड्यानें ठरवून घेतला होता.

त्या गाळ्यात, अवंती सुकांत इतक्याच दोन लहान लहान खोल्या असून, उजेड, हवा व पाणी यांची अगदीं रेलचेल होती

दोघांकरता दोन किर्लोस्कर खाटा, दोन टेबलें खुर्च्या, दोन स्टुलें, दोन आरसे वगैरे एकाच तोलाचें व एकाच मोलाचें सामानसुमान रावजीकाकांनीं आणवलें होतें.

अवंतीच्या आतल्या खोलींत जास्त अशी एक कुकवाची पेटी मात्र होती. जेवणाचीं ताटें, फराळाचे डबे, बालड्या, खुजे आदिकरून लागणारें सामान अवंतीनें आपल्या स्त्रीस्वभावानुरूप आपल्याच खोलींत हक्काने ठेवून दिलें होतें.

ज्यावेळीं मुचकुंददरींत खाडक्यानें गावकर जमवले त्याच वेळीं इकडे मुंबईत—त्या गोकुळदास देवजीच्या चाळींतील—अवंती सुकांतच्या गाळ्यात मुचकुंददरींतील मुंबईस असणारे गावकरी रावजीकाकांवाटोळे जमले होते.

त्या दिवशीं पांच वाजल्यानंतर रावजीकाका मुलांना घेऊन परळ भागात या गांवकरी मंडळींच्या आग्रहामुळें गेले ते नुकतेच परतले असून गावकरी मंडळीहि त्यांच्यासमोर बसली.

पुढच्या खोलींतील एका कोपऱ्यात कॉटखालीं निरनिराळ्या आकाराच्या पुड्यानीं भरलेली एक टोपली होती

त्या सर्व रावजीकाकाना मिळालेल्या भेटी होत्या

मुलाना मिळालेले खाऊचे पुडे होते

मुबईसारख्या बकाली शहरातहि टिकून राहिलेला गावकरी या नात्याचा तो गोड अवशेष होता.

खिशातून गोल्डफ्लेकचें पाकीट काढून रावजीकाकानीं एक सिगरेट पेटवली. बाकीचें पाकीट पुढेंच बसलेल्या धोंडबा अवेऱ्याच्या अगावर फेकलें

"हहह घ्यारे. ओढा एकेकानें." रावजींनीं नतर आगपेटीहि फेकली

"काका, तुम्ही मुबईस आल्यापासून भारी सिगरेटी ओढता ह! सागून ठिवते. घसा खवखवला म्हणजे मग?" अवतीने हासत विचारलें काकाच्या या सिगरेटीच्या लज्जतीबद्दल अवतीला मनातून खरोखरच गम्मत वाटत असे मुबईस आल्यामुळेंच काका हा रुबाब करताहेत! केलाच पाहिजे त्यानीं. या गेल्या पधरा दिवसात काका किती मजेंत असतात याहि गोष्टीचे तिला कौतुक वाटलें.

"माझी काळजी घेणारी हहह आईच किनहीं तू?" काकानींहि त्याच गोड तानमानानें उत्तर दिलें

"धोंडबा ओढरे एक. बाकीच्याना पण दे. लाजू नका. तुम्हीं आज कसें छान वागवलेंत आम्हाला हें पहा मी दर रविवारीं तुमच्या भागात येत जाईन." सुकात धोंडबाजवळ बसून बोलत राहिला

"लय ब्यस ता! तुमी यत चलाच. आता तुम्हास्नी आमचा मकानबी म्हाइत पडलया." धोंडबानें काकाकडे पाठ फिरवून—केवळ अदबीखातर—सिगरेट पेटवली. आणखीहि पाच सात जणांनीं शिलगावल्या. थोडा वेळ खोलींत धूरच्या धूरच झाला. गुडगुडीच्या बबानेंहि तलफ न भागणाऱ्यांना सिगरेटचा दम म्हणजे पाण्याची वाफ!! तकवा नाहींच म्हटलें तरी चालेल.

"आता किती दिवस मुक्काम काका?" धोंडबानें तोंड वळवून विचारलें.

"हहह आता जाणार लवकरच."

"हें हो काय काका! नाहीं जायचें इतक्यात."

"अग बरेच दिवस नाहीं का झाले?"

"झाले तर झाले!"

"तिकडे कामें आहेत ना बरे! आता मक्के यायला सुरवात होईल! भातेंच जमलीं नाहींत तर तुम्हाला पैसा कुठून पाठवायचा?"

"कुठून म्हणजे? आ आ! मला फसवता ठवूक आहे मला! कातूऱ्या नावाने बॅंक बुकात इथेच पाचशे रुपये टेवले आहात ते! कातूनें मला सारें सांगितले." असे माना हालवीत बोलताना अवतीच्या पितृप्रेमाला बहर येत होता

"धोंडबा, तुम्हाला सवड होईल तसतसे व्याज व मुद्दल इथेच कातूजवळ देत जा"

"व माझी पावती घेत जा" कातूनें वाक्य पुरें केले

"पावतीचा काय मोटासा" धोंडबाने आपल्या इतर जमलल्या लोकाकडे पाहून विचारलें

"काय र बावानू? म्हइन्याला परतिकजण दोन दोन रुपये द्याल काय? उकता गट बाधून टाका"

नतर बराच वेळ त्याच्या आपसात व रावजीकाकाजवळ हिशेबाची बोलणीं चालली होतीं कातूचे त्यात लक्ष असावें.

अवतीला मात्र, व्याज, मुद्दल, मुदत, कर्जखत, तारण वगैरे शब्द ऐकावे लागले.

ही हिशेबाची भानगड चालू असताच त्या हिशेबाबाहेरचा एक बिनहिशेबी एक गृहस्थ—अगदीं आकडेबाज मिशाचा असा—जोडा फटफटवीत आत शिरला.

"या बाळभटजी" एवढें बोलून काका फिरून हिशेबात गढले. बाळभटजींनीं पगडी डाव्या हातीं घेऊन प्रथम उपरण्यानें टाळू व कपाळ टिपलें. पगडीचा आतील भागहि उपरण्याने पुसला.

इकडे तिकडे पाहता खुटी दिसेना! टेबलावर पगडी ठेवणें त्यांना भाग पडलें. नतर रावजीकाकाजवळ शुः शुः करीत त्यानीं बैठक मारली.

उपरण्याखेरीज अंगात इतर कपडे नसल्यामुळें त्याचा आणखी वेळ मोडला नाहीं.

"हिशोब चाललाहे वाटतेंए!" ते स्वतःच्या मिशाजवळच पुटपुटले. तोंच त्याची नजर कॉटखालच्या त्या टोपलींत गेली. तसेंच फरपटत त्यांनीं टोपली गाठली. पुड्या खालींवर करता करता त्याना एक सिगारेटचा डबा मिळाला उलटापालट करून तो फोडायचा कसा याचाच ते विचार करीत होते.

नंतर हातीं तिरका धरून धाड्कन खालीं हापटला.

सर्वांची नजर एकदम तिकडे वळली.

"भटो हा काय करताव? ता डबा काकास्नी घरीं न्याया मी घेलाय! ही घ्या ना वऽ!" असें म्हणून सिगारेट पेटी व काडी धोंडबानें भटजींच्या अंगावर फेकली.

परत त्याचा हिशेब सुरूच झाला

एक सिगारेट काढून भटजींनीं बोटात धरली तिच्याकडे नाकाच्या शेंड्यातून ते पाहू लागले.

त्या सिगरेटला अखेर मिशामधून तोंडापर्यंत मार्ग मिळाला.

थोड्याच वेळात धुरालाहि नाकामधून मार्ग सापडत चालला.

अवंतीनें अलगच त्याच्यामागून जाऊन मुकातला खूण केली

दोघानींहि एकमेकाकडे पाहून मिस्कील हास्य केलें.

बाळभटजी अगदीं धुरात पोहत होते. आपण रावजीकाकाच्या गावचे एवढ्याच नात्यावर वाटेल तें स्वातंत्र्य घेणें म्हणजे रावजीकाकावरच एका प्रकारें उपकार करणें आहे अशी त्याची ठाम समजूत होती.

सिगरेट ओढता ओढता डबींतील आणखी एक सिगरेट घेऊन त्यांनीं उजव्या कानावर ठेवून दिली.

इतक्यात "ठोक ठोक" करीत उद्धवहि आत आला.

कोपऱ्यात स्लीपर काढीत त्यानें विजयी वीराप्रमाणें आत नजर फेकली.

हीं सारीं मुंबईत आलेलीं नवीं माणसें! आपण मात्र पक्के मुरलेले. याना काय समजतय मुंबईचें!!

त्याच्या क्षणिक नजरेंत प्रामुख्यानें याच भावनेचा अंतर्भाव झाला होता.

"काय भटजी! करीमभाय गिरणीप्रमाणें फवारे सोडताहा!" कॉटवर धाड्कन् बसत उद्धव म्हणाला. तो किती वेळ तरी डुलक्याच खात राहिला.

"अरे, तशी कॉट मैल होईल ना?" सुकातनें सुनावलें.

"अवू, काका ग केंव्हा जाणार?"

"कुठ इतक्यात जाताहेत?"

उद्धवला थोडेंसे वाईटच वाटलें त्यात.

इतक्यात धोंडबाचीहि नजर उद्धवकडे गेली.

"व्हयता नानाचा मुलगा ना व अ काका?" काकानीं होकारार्थी मान हालवल्याचे पाहून धोंडया पुढें म्हणाला.

"लय पावर हायशी दिमति या सवारीची. नाना आपला आमचा सादा! आन् हा आपला अगदीं झ्याटलीमेन!" झ्याटलीमेन (Gentleman) या शब्दात, ऐटबाज, मिजासखोर, कर्तव्यशून्य, पोकळ डोक्याचा, गप्पीदास आदिकरून सर्व अर्थांचा समावेश होतो अशी धोंडबाची खात्री होती.

गावचे सारे कुळवाडी मग ते शहरात राहिलेले असोत अगर अगदीं गावढळ असोत, आपणावर नेहमींच असे का उखडतात याचा उद्धवला अर्थच समजत नसे. त्याच्यासमोर बिचकून जाण्याचा प्रसंग मात्र उद्धववर नेहमीं ओढवे.

"उद्ध्या, तुझी पारख या धोंडयानेसुद्धा केली. हा धोंडया अवेरा आपल्या गावचा! हथ चागला पैका मिळवतो गिरणींत!" बाळभटजींनीं उद्धवावरचा आपला बरेच दिवसाचा रोष काढून घेतला.

"तुम्हाला काय समजतय? नव्या पिढीवर टीका करीत बसायचें, जांभया द्यायच्या, वात सोडायचे, पिचक्या टाकायच्या हेंच तुमचें जीवन." उद्धवानेंहि रोकडा जवाब हाणला.

भटजींना आता संताप आला. ते करमेवर हात देवून उभे राहिले. हनुवटी व खालचा जबडा दक्षिणोत्तर फिरवू लागतां कानावरचे केसांचे झुबकेहि उद्धवाला हाल्लेले दिसले.

"काय म्हणतोस रे उद्ध्या? गद्ध्या, तुझा बापूस फजोत झुडून गेला

आहे तरी तूं ऐटया नी इस्क्या करतोस? कशाला रे! कालिजात मरतोहेस तो पोष्टात नाहींतर अन्तु देसायाच्या टोप्याच्या दुकानात नोकरी रे का नाहीं करीत? चल तुला अन्तु देसायाकडे ( अनत शिवाजी देसाई—मोतीबाजार मुबई ! ) नोकरी देतों पचवीस रुपयाची. माझी त्याच्या बगल्यावर आज पचवीस वर्षांची भिक्षुकी आहे—!" बाळभटर्जींचें हें तारेतलें बोलणें—

एक तारवाला आल्यामुळें तितकेंच राहिलें.

"रावजी अभ्यकर."

"हहह मीच." पुढें येऊन रावजीकाकानीं तार घेतली

घाबऱ्या घाबऱ्या लिफाफा फोडून रावजीकाका वाचू लागले.

भटर्जाची समजूत कोणत्याहि तारेबद्दल अशी होती कीं तार व रडणें हीं एकदमच कोसळलीं पाहिजेत!

"काय मावशीबाईचे बरे वाईट झालें कीं काय?" ते आपल्या भुवयाकडे पहात पुटपुटले.

"गप्प बस रे!" काकांनी खेंकसून सागितलें व सही करून वाचू लागले.

Khandke's sensation among village tenants start —Master

हाच त्या तारेतला मजकूर!

ह खाडके कोण?" रावजीकाका स्वतःला उद्देशून विचारीत होते. तें ऐकता- धडबा व इतर मजूर "झाला खुलासा" या समजुतीच्या नजरेनें एकमेकाकडे पाहू लागले.

"हाय ठावा त ! आम कुलद ड्यान नाडाया बसलाय. गावगन्ना फिरुनशान् पैसा खातो आन् ह्यव करीन, त्यव करीन म्हुनशान् थापा मारतो. ता मूल फ्यडसनर हाय. कुट फल्टणींत मराया ग्यला व्हता! आज वरिसभर तो या नाय त्या गावात घुमतोय! त्याचा योक पुतन्या वाच विंग्लिश शिकला ता तवा झालाय बलिष्ट ! आमची कुलवाडी येडा त्याच्यामागे मनशापरमान घोंघावतात. त्यस्नी भ्यटी काय न्यतात, कोंबडी काय चारतात, तादुल काय द्यतात! चपट रुपया त्यास्नी व्होवा. काका, ता

म्हजी तुमा ख्वताचा काल हाय काल!!" धोंडबा काकाना सागत होता.

घोडबा हा शहरात राहणारा असल्यामुळें आजपर्यंत असल्या कित्येक खाडक्यानीं त्याला चागलाच अनुभव आणून दिला होता. त्यामुळें या नव्या कोंकणी खाडक्याबद्दलच्या ऐकीव माहितीवरून त्याने जें वरीलप्रमाणें आपलें मत बनवले तें बोलनहि दाखवले

असें काय? हहह एकुण हा खाडके आता हह आमच्या गावाकडे वळलाय म्हणायचा?"

"तुमी काका उद्याच त निगा व्हयत्याला हाकून लावा गावाबाहेर पाहू!" धोंडबानें सागितले

"पोरानो करा माझी तयारी. सकाळच्या बोटीनें निघणार तो!"

उद्धवला बरें वाटलें

अवती व सुकात उठून उभीं राहिलीं.

"त आम्ही पर आता घ्यातांव रजा?"

ठीक तुम्ही हहह इतके प्रेमानें माझ्याजवळ हह वागता यातच मला भारी आनद झाला " काकानीं मनापासून अहेर केला.

सर्व मडळी उठून आपल्या वहाणा पाहू लागली

बाळभटजीहि तिथेंच टुणकन् उठून गेले कदाचित् आपला फाटका जोडाच कोणी घालून जायचा हेच त्याच्या धादलीचें कारण होते.

"यवू कारे तुमच्या परळात भिक्षुकीला?"

"ता नकोर बा गावचा प्वार जिवानिशी मारायचा!" धोंडबा उत्तर देत देत निघून गेला मागून दुसरे मजूरहि निघाले.

सुकात—अवतीबरोबर उद्धवहि सामानसुमानाच्या बाधाबाधींत गर्क झाला. काय वस्तू नेताहेत हें पहाण्याच्या हेतूनें भटजीहि त्यात सामील झाले.

आपणाला उद्याच जाणें भाग आहे! पण हीं पोरं —!

आपणापासून आज घटकेपर्यंत परतीं न झालेलीं हीं बुबुळें! उद्यापासून एकटींच इथे या मुबईत राहणार! कुणाला काही झालें तर? पाच पाच मजली इमारतीच्या कचाट्यात, मोटार ट्रॅमच्या हमरीतुमरींत, खटारे-व्हिक्टोरियाच्या शिवीगाळींत, चोराचिलटाच्या हातचलाखींत अगर लक्षावधी

माणसाच्या गजबजाटात आपलीं हीं दोन बाळें पिशवींत गळफटलेल्या पत्या-प्रमाणे कुठे गडप तर नाहींना होणार? मवाल्यानीं त्याचा अपमान केला तर? मजुरानीं त्याना धक्की दिली तर? वर्गांतल्या मुलानीं मारलें तर?

या शेवटच्या कल्पनेनें तर काकाचा जीव अधिकच हळवा झाला. त्याना काहीं सुचेना पाण्याने भरलेले डोळे डचमळू लागले. माझीं हीं पिलें!

"अबू, कातू, या इकड"

तीं दोन्हीं मुले त्याच्या अगदीं जवळ येऊन बसलीं.

अबूला तर त्यानीं इतकी घट्ट बगलेंत धरली कीं एकमेकाच्या नाडीचे ठोके एकमेकाना स्पष्ट कळू लागले

"भटजी, हहह तुम्ही याच्याजवळ रहाता का?"

"अहो नाहीं कुणी म्हटले?" एखादा गाव इनाम मिळाल्याप्रमाणें भटजींना झालें

"ही कुठली ब्याद इथ!" तिघा मुलाच्या मनात हेच विचार एकदम उगवले

"म्हणजे तुमच्यासाठीं नव्हे हहह आमच्या मुलाना तु तु तुम्हीं जपा इथे राहून! त्याना मात्र यत्किंचितहि उपाधी होता कामा नये तुमची!"

"माझी उपाधी? वेड लागलेंय तुला काका! तू जसा त्याना जपशील ना तसा मी जपेन मग तर झाले? वेळेवर शाळेतून आलीं कीं नाहीं, कोणी आजारी आहे की काय, कीं चाललों डॉक्टराकडे! कुणाला काहीं हवें लागलें कीं चाललो आणायला पैसे घेऊन असेंच ना?" भटजींनीं आपली मान उभ्याउभ्याच उजव्या बाजूला उशीवर टेकल्याप्रमाणें केली.

"होय पण तुमची मला भिती वाटते ती ही! त्याचीं पुस्तकेच कुठें उधळून पहाल, त्याच्या हहह कॉटवरच लोळाल—हहह असें काहीं करू नका. थोडक्यात म्हणजे त्याच्या कलानें प्रत्येक गोष्ट हहह तुम्ही घेतली पाहिजे."

भटजींनीं सारें कबूल केलें. आपण अगदीं कोपऱ्यात पडूं, तिथेंच आपली पेटी ठेवू, त्याच्या कुठल्याहि बाबतींत बोलणार नाहीं वगैरे वगैरे!

"आता मला निघून जायला धीर हह आला. उद्धव, तूहि मधून मधून

इइइ येत जा हा! घरीं पत्र पाठवशील ना, तेव्हाहि इइइ याची खुशाली कळवीत रहा."

"नक्कीच!" उद्धवनें उत्तर केलें

फक्त त्याला वाईट वाटत होतें तें इतकेंच कीं भटजींना जो चान्स मिळाला तो आपल्याला मिळायला पाहिजे होता. तरीहि पुढे मागे आपण होऊनच इथें राहायला येण्याचें जमवू--

उद्धवच्या मनात खोल कुठेतरी हा बेत ठरला!

"म्हणजे मी याचा Guardian च समजा ना मुंबईतील!"

"मुळींच नाहीं हा उद्धव! माझा Guardian कातू आन् कातूचा Guardian मी" अवतीनें झपकन् उत्तर दिले.

"मी भटजींचा व उद्धव, तुझा खरा Guardian!!" मुकात म्हणाला.

काकानाहि त्याचें हासू आलें

"मग अ! येवू घेऊन माझे ब्याड बिच्छाड?" भटजी पगडी घेत घेत उद्गारले.

"कायरे कातू, येऊदेत ना?"

"येऊदेत. आम्हालाहि तितकें एकटे एकटे वाटणार नाहीं. खर ना अवू?"

"येवूदेत! पण मी त्याना आतल्या खोलींत मात्र सहसा येवू देणार नाहीं." अवूनें सांगितलें "चालेल ना भटजी?"

"माझें अडलय खेटर! शिवाय त्या खोलींत जेवणाचे डबे घेऊन तुम्ही जेवणार! तें खरकटे एखादा कुळबट काढणार घड शेणसुद्धा लावलेलें नसायचें तियें. केवळ वडीलधारा म्हणून मला राहायचें तर मी कशाला येतोंय आत?" म्हणत म्हणत भटजी जोडा फडफडवू लागले

जेवणाचे डबे घेऊन "माधवाश्रमा"चा नोकर आतल्या खोलींत शिरला.

"मग काका तुम्ही जाणार उद्या तर?" उद्धवानेंहि जाण्याची तयारी केली.

"हो. तुझी खुशाली सांगेन इइइ आमच्या नानाला."

"बरय! येतों मी"

"मात्र हें बघ! इहइ उनाड्ड नकोस. चांगला अभ्यास कर तुला भराभर पास होऊन नोकरी इह धरली पाहिजे लवकर! समजतय ना?"

"हो तर!"

"कर्ज फेडण्याची जबाबदारी किती भयंकर असते ही जाणीव ठेवायला हवी बरं!" काकानीं उद्धवला आठवण करून दिली

"कर्ज कर्ज म्हणजे काय? हातचा मळ मी स्वस्थ नाहीं बसलेला. माझे एकेक बडे स्नेही आहेत. प्रत्येकाकडून हजार हजार रुपये घेऊन फेडून टाकीन! कॉलेजमध्यें माझ्याच वर्गात देवजी सुदरजीचा मुलगा, मुलगी, माझीं जानी दोस्त! लक्षाधीश साव्याचा मुलगा माझा Fast friend आहे. सागा नानाना हें सर्व!"

पम्प शू खरवडीत उद्धव निघून गेला.

ग्यालरींत अवती डोकावत आहे कीं काय हें मागें वळून पहायला उद्धव कसा विसरेल?

दुसऱ्या दिवशीं काकाना पोचवण्याकरता मुले भाऊच्या धक्क्यावर गेलीं

कोंकणाकडे जाणारी बोट काकाना घेऊन निघाली

व्हिक्टोरियातून सुकात–अवतीहि परत आपल्या बिऱ्हाडाकडे चाललीं.

अवंतीचा चेहरा अश्रूनीं फुलला होता.

"खुळीच आहेस तू! पूस डोळे." मान वळवून सुकात तिच्या अश्रूतच पहात होता.

"बररे एए!" अश्रूंना जास्तच मार्ग मिळाला

सुकांतनें तिच्याकडे पाहण्याचेंहि बद केले.

दरम्यान अवतीला सारे शून्यसें वाटत राहिले.

भावनेचा आवेग ओसरल्यावर—

"आपण खूब खूब अभ्यास करायचा ह!"

"अर्थात्!"

"डॉक्टरीचा."

"इंजिनियर होरे?"

"मुचकुंददरींत माझ्या इंजिनिअरिंगचा काय उपयोग होणार बुवा?"

"म्हणजे— तू मुचकुंददरींत जाऊन रहाणार वाटतें?"

"अर्थात्! म्हणूनच मी डॉक्टर होणार! मुचकुंददरीबाहेर रहाणें माझ्या जिवावर आलें आहे. काकाबरोबर आजच गेलों असतों तर——"

सुकांतनें खूब मोठा सुस्कारा सोडला.

"तें कांई नांई चालणार अं! शहरांत राहून आपण खूप खूप पैसे मिळवूं, नांव कमावूं! गमती करूं."

"तें कांई नांई चालणार अं!" या वाक्यावेळचा अवनीचा गांडवलशाही आवाज सुकांतच्या हृदयाला खंजिर मारल्या जाऊन भिडला.

पुढचें त्याला कांहीं ऐकूं आलें नाहीं.

# ११. फजितवाडा

पंड्या व विश्राम रावजीकाकाच्या घरात शिरल्या वेळीं त्याच्या कामाशीं अत्यंत विसगत असा प्रकार त्याच्या नजरेला आला.

एका भला मोठा आधेला बेडकीची तगडी धरून चालला आहे, ती बेडकी अत्यत आर्त स्वरानें कैंकारत आहे व मास्तर त्याला साप समजून ओटीवर कोपऱ्यात थरथरा कापत उभे आहेत!

पंड्या–विश्रामची चाहूल लागताच तो आधेला पडवींतील बिळाकडे धावू लागला. विश्रामानें एका फटकाऱ्यात त्याला जमीनदोस्त करून बेडकीची सोडवणूक केली. मास्तर पुढें आले आता त्याना पूर्ण अवसान आलें होतें.

"घोपट अजून. पुरता मरू दे जात्या साप आहे साप तो!" मास्तराचा हा अचाट दूरदर्शीपणा पाहून पंड्याला तेवढ्यातहि हसू आलेंच.

"आव आदलां ता! ता काय करतोय?"

"छे: छे: साप तो."

"तरीच भियालव घाटता."

"होना! तुम्ही आलेत म्हणून बरें झालें"

"बरां तां ऱ्हाउद्ये! आदी हा येवढा ठयेवा बघू" असें म्हणून विश्रामनें ती रुपयांची मोटली मास्तरापुढं केली.

"काय आहे हें?"

"आदीं आटपून ठेवा बरी."

मास्तरांनीं ती थैली घेतली.

"कोनबी मागाया आला तरी द्येव नुका"

इतकें होतें न होतें तोंच विश्रामचा बाप, राजबा, तात्याबा आदिकरून लोक मास्तरांच्या पडवींत हजर झाले.

काठीवर लोंबता टाकून पड्या त्या आधेल्याला घेऊन दूर टाकण्याकरता केला.

"मास्तर, व मास्तर, व्हयत्या पोरान मोटली दिली काय आणून?" विश्रामच्या बापानें विचारलें.

"बर मग?" मास्तरनीं पुढें बोलायला सूचना केली.

"त पैसे मार्शी द्या माज हायत त्य"

तेवढ्यात विश्रामनें सारी हकीकत जशी घडली तशी मास्तराच्या कानावर घातली, व 'खबरदार पैसे परत द्याल तर, रावजीकाकाना हव तर पतर लिहा' वगैरे वर शक्य ती व आपल्या परी त्यानें जरूर ती मखलाशीहि केली.

"ता पोर कोन सागनार नुका द्यव म्हुन? श्यन्यावानी तुम्ही माजे पैसे द्या मार्शी म्हजी मी व्हयत्या खाडक्यास्नी वाटेला लावता"

मास्तरानीं काहींच उत्तर दिलें नाहीं

"राजाधिराज! राजाधिराज अक्कलकोट स्वामी!"

स्वामीची आठवण करीत असताच—

"मग काय व्हयत्या खाडक्यानाच बोलावू काय? म्हजी आपले त्यार्शीच द्या!" राजबानें सांगितलें.

"खाडके यवो नायतर खाडक्याचा बा यवो! मास्तर नाय पैसा द्यायचा" विश्रामनें फिरून बजावले.

इतक्यात मावशीबाईहि घरातून बाहेर आल्या.

"मी मघापासून सारें ऐकत्येय! म्हटलें बोलू नये पण बघत्यें तों मास्तर आपले घुम्यासरखे बसलेले! जारे ऱ्या खाडक्याना बोलाव राजू! मेले कोण आहेत ते तरी बघूदेत मला. कुठें आले आहेत ग्वाली बुडवायला आमची ती! मास्तर, अश्शी त्याची हजेरी घ्याल कीं ज्याचें नाव तें. फिरून गुलामानीं वेस नाहीं ओलांडता कामा आमच्या गावची!

या राजाधिराज अक्कलकोट स्वामींनीं मास्तराचा सर्वस्वी घात केला होता असेंच त्याचें मनोविश्लेषण करणाऱ्याला दिसून आले असतें. साध्या गोष्टींचाहि निर्णय त्याच्यानें होतच नसे हा मी कीं ता मी? हें बराबर कीं तें बरोबर? गवताच्या दोन राशींमध्यें उमें असणाऱ्या एका गाढवाची गोष्ट आहे कुठेंशी!

प्रथम हें गवत खावें कीं तें खावें याचा निर्णयच न झाल्यामुळें तें गाढव कित्येक दिवस जसेच्या तसे उभेंच होतें. मात्र आता मावशीबाईच्या सूचनेनुरूप मास्तरांनीं खाडक्याची चागलीच हजेरी घ्यावयाचे ठरवलें

खाडके आले

नमस्कार चमत्कारहि उरकले गेले

"तुमी अक्कलकोट सामीचे शिष्य हाव काय?" काळूने गुळचट वाणीने प्रश्न केला

"होहो! अक्कलकोटस्वामी म्हणजे माझे जीवन!"

"काय म्हनताव काय? अव मी पर त्याच चयला हाय. त्याच्या पायाशीं मी पाच वर्सो व्हना अक्कलकोटात! ही ही माळ हायना माज्या गल्यात ती ती खुद सामीनीं मना देली!!

"काय खुद्द स्वामीनीं दिली?" टुणकन् उडीमरून मास्तर माळेजवळ आले माळेला नमस्कार करण्यासाठीं मास्तरांनीं आपलें डोकें माळेच्या आसपास म्हणजेच काळूच्या छातीवर ठेवले.

"आहाहा! काय ही भक्ती!!" काळू सहजच उद्गारला.

हें चित्र पाहाणाऱ्या विश्रामचे तर कबरडेच मोडलें

मावशीबाईहि भक्तिरसात वाहून गेल्या! शक्य तर ती माळ—ती अक्कलकोटच्या स्वामींच्या हातची माळ—त्या परमपावन हातांनीं पुनीत केलेली माळ आपणास मिळाली तर जिवाचे सार्थक होईल!

या विचाराने एकदम—मास्तर व मावशीबाई—दोघांच्याहि हृदयात कायमचे ठाणें दिलें

सारे विषय बाजूला राहून काळूचे अक्कलकोटचे अनुभव—स्वामींच्या दैवलीला, चमत्कार अगर बखरवजा गोष्टी—ऐकण्यात सारी मडळी चित्रासारखी स्तब्ध झाली. मावशीबाईनींहि ओटीवरील खाबाजवळ बैठक मारली होती मधून मधून त्या आपली माहेरची चौकटी आगठी फक्त रापून पहात होत्या इतकेंच.

शेवटीं माळ नाहीं पण माळेंतले दोन मणी—एक मास्तराच्याकरता व दुसरा मावशीबाईसाठीं—काळूनें देण्याचे ठरवले. ते माळ तोडून काढूनहि दिले.

"मग ते माजे पैशे मला द्यताव ना?" विश्रामच्या बापानें हळूच विचारलें

मास्तरनीं मावशीबाईकडे पाहिलें.

"दबुन टाका मास्तर! वाडकरानींच जमवून दिलेले ना ते? इवी कशाला नस्ती भानगड! दबुन टाका." मावशीबाईनीं सांगितलें व तो मणी घेऊन त्या घरात गेल्या

अखेर थैली काळूनें कोटाच्या आतल्या खिशात कोंबली

विश्रामची शेवटची आशाहि अशा तऱ्हेने पार निकालात निघाली

× × ×

गरीब पोरगें, विश्राम! राजबाकडून बैलाबद्दलचे मिळालेले ते रुपये! वाडीकरता म्हणून वर्गणीदाखल शिवरामने पुढें केलेले! अन्यायाचा प्रतिकार व्हावा म्हणून विश्रामनें ते मास्तराजवळ आणून ठवलेले! आणि अक्कलकोटस्वामींच्या भक्तीखातर ते फिरून काळूच्या खिशात जाऊन दडलेले!! प्रतिकारशक्तीलाहि एक मर्यादा असते ठरावीक बिंदूपावत पोंचल्यावर तिचे पर्यवसान खेदात होऊं लागते रडवेल्या चेहऱ्यानें तो बाहेर पडला. मागोमाग पड्याहि निघाला

मागील दारीं मावशीनी हटकलें "विश्र्या, ए विश्र्या?"

कोण बघणार मागें वळून!!

रावजीकाका मुंबईहून येईपर्यंत विश्रामानें त्या घराचे तोंड पाहिलें नाहीं.

विश्राम वाडींत जाऊन पोहोंचतो तोंच समोर गुणी– राजबाची मुलगी आली. तिनें प्रत्यक्ष विश्रामला न विचारता पड्याला विचारलें.

"काय झाला र पैशाचा पडदा?"

"झाला तुजा कपाल!" पड्याने उत्तर दिले

"लय गमजा लावताव! तुम्हास्नीं तमाच व्होवा! माजे बाबा (राजबा गोठल) हायतना व्हयत्याच्या पाटीशीं! इस्काणा काडताव नाय काय?" गुणीनें अकारण वर्मावर घाव मारला. विश्रामला त्याचा तर अत्यंत खेद झाला.

पुढें जातो तों चिमा वाटेवर आली

चिमानें विश्रामच्या चेहऱ्यावरूनच सारें काहीं हेरलें.

"तू कष्टी व्हवूं नको इस्रामदा! थोरला खोत त यवुद्या (रावजीकाका) ता आला म्हजी हा सारा बड मोडून काढील! बाबा र चिप्! रावजीकाका नाय आन् कातुदा पर नाय! सारा गाव रडका झालाय तवा धरनं"

"व्हय ग बाय!" पड्यानेहि अनुमोदन दिले.

चिमाच्या या सांत्वनपर शब्दांत व त्याबरोबरच तिच्या कोमल मुद्रेतही जलाशयाचा गारवा भरलेला होता विश्रामच्या तप्त मेंदूला थोडासा खरोखरच गारवा आला

"आपुन साऱ्या हकीगतीचा आजच्या आज पोष्टयाकडून (कुळवाडी माळवाड्याचा खासगी पत्रव्यवहार बहुधा पोष्टाच्या शिपायाहातूनच लिहविला जातो) कागाद लिहून शान् धाडू कातुदाला! व्हय का नाय?" विश्रामनें चिमाचें मत विचारलें.

पोष्टमन आला म्हणजे त्याच्याकडून या साऱ्या मजकुराचें पत्र लिहून कातुदाला पाठवायचें असें तिघांचें एकमत झालें

विश्राम नंतर तडक रामाण्याकडे गेला.

रामाण्या म्हणजे खरोखर साऱ्या वाडीचा आजोबा. डोंगरासारखें हृदय, व सांत्वनाकरतां सदाचेच दोन्ही हात पसरलेले! कुणीहि पोराबाळानें यावें व खुशाल मुसंडी मारावी त्या छातीवर! रामाण्याच्या कानावर हे सर्व घालून ठेवावें, तसें झालें तरच आपल्या मनाला शांतता येईल ही तर विश्रामची ठाम समजूत

पावसाळ्यातील आळींवारवीं उस्कटून, आंगणाची जमीन करण्याकरतां, कुदळणी चालली होती म्हाताऱ्याची.

"आज्या, माशीं द्या कुद्ला" असें म्हणून विश्रामानें त्याच्या हातातला कुदळा घेतला व भरभर खणू लागला

रामाण्या कमरेवर हात देवून कित्येक वेळ त्याच्याकडे कौतुकानें पहात होता.

"बस कर मुला. य माशीं चार गोष्टी बोल बसुनशान् आता! माज्या वाडींत काय ता हा यवडा पोऱ्या बाकीचे सारे हल्ये (रेडे) इचिभन्! य. य. माजा मूल तो!" रामाण्याचें खरोखरच इतकें प्रेम होतें विश्रामवर.

"आला हा! मनाव लय लय बोलायचा हाय तुमापाशीं."

"मग य बरी वट्यावर."

दोघेहि ओटीवर जाऊन बसले.

विश्रामने साद्यन्त हकीकत म्हाताऱ्याला कळवली. अगदीं त्या घटकेपर्यंतची!

"अर म्हनतोस काय पोरा!" हें वाक्य मध्यतरीं रामाण्यानें शभरदा तरी उच्चारलें असेल!

हें सारें ऐकून म्हातारा खवळला

तडक् तो रावजीकाकाच्या घराकडे निघाला. घरीं पोंचताच "मास्तर, मास्तर, मावश्ये, व मावश्ये, इत भायर् ये." म्हणून ओरडला.

तो कुळवाडीच होता. पण राग व शील हीं दोन्हींहि दुर्वास ऋषीइतकींच कडक होतीं दुर्वास ऋषीबद्दल जितका आदर आपण बाळगतों, तितकाच आदर त्या कुळवाड्याबद्दलहि बाळगला असता. पण—पण—तो गरीब गरीब कुळवाडी होता इतकेंच!

"मास्तर, तुजी आक्कल चुलींत ग्यली कायरे? रावजीकाकाचा आन खाऊन खाऊन माजलास व्हय? रावजीकाकाच्या गावाला आग लावाया तो खाडक्या आलाय आन् तुम्हीं दोघांनीं त्याच्या हातात चूड देताव व्हय? मस्नात ग्यली त्याची माल आन् मनी त्येऽऽ! त्या पोरान् (विश्रामाने) तुशीं मोटली घेली आन् तू? त्याच्या (खाडक्याच्या) पदरात वयरलीस! व्हय-त्यान् गावात काय दगा माडलान् हाय, काय याच्या म्होर माडील, याची तुम्हास्नी गिनती तरी हाय काय? दिवसातून चार वखत खा खा खायाचा आन् ×××××× गायचा! आता त्या पोराच पैसे कोन् तुजा बाप देनार काय? बोल, वाचा ग्यली वाटतीं? का ग म्हातार बाय? बयस काकाच्या मागें गाव सबालताव! ये ये ये शन्या मानसा! आदीं टोपी घाल आन् जा श्यरात, रावजीकाकाला तार ठोक. अस्सील तसा निघून य म्हणून! उटतोस का नाय?"

मास्तर आ करून उभा होता.

एकदर प्रकारातील मतितार्थ आता कुठें मास्तरच्या ध्यानांत आला.

खाडके हा कुळाची चळवळ घसास लावण्याकरता आपल्या गावीं—

रावजीकाकाच्या गावीं आला आणि आपण त्यास उलट मदत केली हें जर रावजीकाकाना समजलें तर? शिवाय त्याच्या गैरहजेरींत आपण उलट खाडक्याशींच मैत्री केली. छेः छेः छेः छेः!

"करू काहो तार मावशी?"

"इतकें अगदीं हेंऽऽऽऽ असेल तर हवीच करायला! आपलें त्याना कळवलेलें बरें! न जाणों मग एखाद भलतच व्हायच" मावशीनीं रुकार दिला.

मास्तर तडक् निघाले तार करण्याकरता

"जातों बुवा! तुझेंच म्हणणें बरोबर. मीच गाढव, नीच, हलकट, पाजी, मूर्ख, शतमूर्ख—!

आत्मसतापाच्या भरात स्वतःला लाखोली वाहून घेत घेत मास्तर शहराच्या वाटेला लागले

मागील प्रकरणात रावजीकाकाना मिळालेली तीच ही तार.

* * *

रावजीकाका मुबईहून परत आल्यावर गावातील यच्चयावत् माणसांविरुद्ध त्यानीं नारसिंह अवतार धारण केला. एकूण एक कुळाना त्याजकडे येणें असलेल्या बाकीबद्दल निर्वाणीचा तगादा करण्याकरता बगोबा मास्तराना अलीकडे वेळ पुरेनासा होऊन राही! बगोबा मास्तरानाहि रागाचा प्रसाद मिळालाच होता. मावशीबाई मात्र रावजींच्या सौजन्याखातर सुटल्या इतकेंच. शिवराम नवरत तर रावजींच्या तावाखालीं चागलाच नरम आला होता चोवीस तास रावजींच्या घरीं कामानिमित्त हजर राहाण्याची रावजींनीं त्याजवर सक्ती केली होती त्या सक्तीचा हेतु इतकाच कीं खाडक्याच्या चळवळीला शिवरामाकडून आणखी मदत होऊ नये. शिवरामाला तर या चार सहा महिन्यात मुक्याचा अनिवार मार खावा लागला. विश्रामनें तर त्याच्याशीं बोलणेंचालणेंहि मोडले होते! काम नसलें तरी चोवीस तास रावजीकाकाच्या घरीं हजर राहणे भाग पडल्यामुळें चळवळविषयक त्याच्या आवडीचीं कामें त्याला करता येत नसत त्यापुढील चार आठ महिन्यात त्यामुळें मनाला मरण प्राप्त झालें असल्यास आश्चर्य तें काय?

प्रमादाचें शल्य हें इतकें भयंकर असतें कीं एकाच वेळीं हजार नसांना हजार ठिकाणीं तें सारखें बोचत राहतें. साठ रुपयांपैकीं एकाहि वाडकरानें एखादाहि रुपया अद्याप आणून दिला नव्हता. बरें कुणाजवळ मागायला जावें तर जो तो प्रथम रावजीकाकाची बाकी कशी चुकती करायची या विवंचनेंत! घरांत मुलाकडून धड गोड शब्द नाहीं, रावजीकाकांचा तर पाठीवर हात लकडा, रामाण्याच्या तोंडचा रोज गोळीबार. या सान्या फजितवाड्यापायीं शिवराम कसे तरी दिवस लोटीत होता.

रामाण्याचें मात्र रावजीकाकांना वरच्यावर साह्य होऊं लागलें. सान्या चळवळीचा मोठा शत्रू म्हणून जर कोणी असेल तर तें म्हातारें खोड अशी यच्चयावत् गांवकऱ्यांची समजूत पटली होती. दरएक वाडीवाडीवर जाऊन प्रथम खाडक्याचा उद्धार, व नंतर आपल्या कुळबी जातीची खरडपट्टी या दोन प्रकारच्या मालेराईत सारा गांव रामाण्यानें चीत केला.

चिमा व विश्राम!

हीं दोन्ही पोरेंहि आपापल्या प्रकारानीं हैराण झालीं होतीं. भोपळतोड्या खाडक्याच्या पदरीं आपल्याला तात्या चालका बांधणार—सान्या वाडींत ही कंडी उठली होती—या धास्तीनें त्या पोरीला कसेंसेंच होई! सुकांत—! पण सुकांताचें कशाला हवें—विश्रामसारखा आपला जिवलग—हो! होताच तो तिचा एकार्थी जिवलग—सोडून त्या रेडकोबाशीं संसार करायचा ही कल्पनाच तिला असह्य होई! या बाबतींत आपली कशी बरें सुटका होईल? विश्राम करील का? पण तो तर बिचारा स्वतःच्या दुःखांत इतका चूर! रावजीकाकाकडे जाऊन त्याच्यापुढें हें गान्हाणें मांडलें तर कसें? आमच्या खासगी बाबींत ते लक्ष घालतील का? का नाहीं घालणार?—

एक दिवस निश्चय करून ती गेलीच रावजीकाकाकडे.

तिला पहातांक्षणींच रावजीकाकांना त्यांच्या अवंतीची आठवण झाली. ओठांची, नाकपुडीची अगर गालाची हालचाल थेट अवंतीसारखीच असल्याचें त्यांच्या आज नव्यानें निदर्शनास आलें.

भीत भीत चोरट्या शब्दांनीं तिनें सारी हकिगत त्यांना सांगितली.

"हहह हें बघ! तुमच्या लग्नाच्या कारभारांत आम्ही खोतांनीं ढवळा

ढवळ केली तर इइइ बरें नाहीं दिसणार ! तुमची तुम्ही इइइ ! काय समजलीस म्हणून हो !"

"पर तुम्ही मायबाप ना ?"

"होय खरे ! मीं पाहिन इइइ तात्याला सांगून."

आणि त्याप्रमाणें तात्या चालक्याला शक्य तितकें निक्षून त्यानीं खाडक्याशीं संबंध न ठेवण्याबद्दल सांगितलेंहि.

त्याचा परिणाम— !

आता तात्याचा चिमाला जोराचा जाच होऊ लागला.

शेवटची आशा म्हणजे राहून राहिला सुकात ! !

सुकातचें नाव मनात उभें राहिल्याबरोबर गोड शिरशिरीनें तिच्या देहाचा ताबा घेतला.

जावें का सुकाताकडेच पळून मुंबईला ?

या धाडशी विचारानें तिचा तिलाच एक अचका दिला. गावातल्या चुटमुटक्या ओळखीपायीं सुकात आपलें मुंबईतहि रक्षण करील का ? कुठें सुकात व कुठें आपण !

"श्रीमान खोताचा जावई–होणारा जावई–! आन् मी कुळंब्याची भिकार पोर ! !" तरीपण तिच्या खोल हृदयातून सुकातबद्दलचा तिला कसलातरी विश्वास वाटेच वाटे.

"हुः हुः तसेंच कर." हृदयाचें पाखरू तिला सारखा हुकार देत राही. आणि त्याप्रमाणें तिनें साद्यंत हकिगतीचें गावच्या पोस्टमनकडून सर्वांच्या नकळत–अगदीं विश्रामच्याहि—सुकातला पत्रहि लिहवलें.

## १२. हाहा:कार

पाढरपेशाची दिवाळी झाल्यानंतर बरोबर एक महिन्यानें मजूरपेशांची दिवाळी येते. पहिलीला धाकटी दिवाळी तर दुसरीला थोरली दिवाळी अगर देवाची दिवाळी म्हणण्याचा ग्रामीणांत अद्यापहि प्रचार आहे गौरी-च्या सणाइतकाच थोरल्या दिवाळीचा सण मजूरपेशाला महत्त्वाचासा वाटतो. पण काय ते असेल असो, मुचकुददरींत मात्र त्या वर्षी या सणाला सामुदायिक स्वरूप मुळींच आलें नाहीं खाडक्याच्या भानगडी, वसूलीनिमित्त रावजी-काकांची भुणभुण, के-या गोठलाचें नापत्ता होणें, विश्रामचा मनःसताप, रिमाची भयभीत अवस्था—!

एकंदरींत खाडक्यानें मुचकुददरींत पाय ठेवल्यापासून, काकतालीय न्यायानें का होईना पण त्या गावात जिकडे अशांतताच वावरू लागली. शिवराम नवरत तर अलीकडे मूर्तिमंत अशांततेचा पुतळाच बनला होता. त्याचें खाण्याजेवण्याकडे, कामधंद्याकडे, अगर सणावाराकडे मुळींच लक्ष नसे. सांगतील तें रावजींचें काम करायचें, लहर लागली तर समोरचा भाकरी-तुकडा चावायचा व आली तर झोंप घ्यायची! विश्राम व रमाच्या लक्ष्यांत ही गोष्ट येऊन चुकली होती. पण त्याची समजूत घालण्यापलीकडे तीं पोरें तरी जास्त असें काय करणार? शिवरामाला आवडणारी अशी नाचणीची भाकरी व लसणीचें तिखट हें त्याच्यापुढें नेमानें ठेवण्यावाचून रमा तरी आणखी काय करू शकणार मनधरणीबाबत!

त्या दिवशीं सकाळींच—थोरल्या दिवाळीच्या आदल्या दिवशीं—शिवरामनें विश्रामला सांगितलें.

"मना योक पांयडा करूनशान् द्ये वरी माडावर चढाया!"

"तुम्ही नुका चढूं माडावर."

"त्या थोयल्या उचात उच माडावयले नाराल काढ म्हुन परवाधारनें रुवात सागताय ना!"

"तरी तुमी नका जाव त्यावर! मी बगता बरी मना झाला तर." असें म्हणून विश्राम पेळ्याचा वेठ घेऊन त्याची दोरी वळू लागला. चागली मजबूत दोरी वळून सर्वसाधारण माडाला चवड्यासह तिचा कवा बसेल अशा बेतानें दोन्ही टोकाना ताठ गाठ दिली.

"तू नुको. मीच जाताय." असे म्हणून शिवरामाने त्याच्या हातातील पायडा ओढून घेतला.

"अवो तुमी जाव नुका."

"बावा, व बावा, जाउद्या व्हयत्या दादालाच." रमानेंहि विश्रामप्रमाणेंच काकुळतीनें सांगितलें.

"काय ×× मी मरत नाय. आन् त्यातून म्यला तर व्हयत्याला बेसच वाटल." असें म्हणत शिवराम तरा तरा निघाला. "व्हयत्याला" म्हणजे विश्रामला हाच शिवरामाचा अभिप्राय होता. तो शब्द ऐकून विश्रामाला पराकाष्ठेचें दुःख झालें.

आपल्या ठिकाणीं त्याने बैल मेल्यापासूनचा आढावा घेतला. आपलें कुठें चुकले की काय? आपली प्रत्येक कृति न्यायी असून सुद्धा बापानें आपणावर इतका रोष ठेवावा याचा त्यालाहि रागच आला. म्हणून तोहि रागारागाने आकडी कोयती घेऊन डोंगरात जायाला निघाला दहावीस पावलें गेलाहि. पण! डाव्या बाजूच्या चिंचेंतून हुमणाचा हुऊऊ हुउ हा भयानक शब्द त्याच्या कानीं पडला. कुळवाडी लोक मोठे अंधश्रद्ध असतात. त्या स्वरात काहीतरी खास भयसूचक आहे अशी त्याची खात्रीच झाली व तो मागें परतला.

शिमराम बागेकडे त्या माडावर चढण्याकरता जात असता कुथ्यें पाखरू सारखें कुथ घालीत होतें. कुथ्यें पाखरू हे साऱ्या आजाराचा अरुण असतो अशी साऱ्या कुळवाड्याची समजूत आहे. आजाऱ्याचें कुथणें व या पाखराचा आवाज अगदीं एक. जणूकाय विनोदानें तें आजारी माणसाची नक्कलच करीत असतें. शिवरामाच्या हृदयात इतर वेळीं त्या आवाजामुळें

चर्रर्रर्र झालें असतें. पण त्या वेळीं त्याच्या झपझप चालण्यामुळें तें ध्यानांतहि आलें नाहीं. तो तडक रावजीकाकाच्या पडवींत गेला, एक हारा डोक्यावर घेऊन वाडीकडे (माडाच्या) चालू लागला.

माडाच्या वाडींत यावेळीं चागले ऊन पडलें होतें. नुकत्याच ओसरून गेलेल्या पाच महिन्याच्या पावसळयामुळें माडाच्या बुध्यावरहि हिरवळ चढली होती. माडाचे वरील विस्तार काळसर हिरवे, त्यातून हळ्याप्रमाणें लोंबणाऱ्या पिवळसर, सुकडीमध्येंच छोट्या मनोऱ्याप्रमाणें दिसणाऱ्या पाढुरक्या नव्या पोई व त्या सर्वांवर पडणारें ऊन! जणूकाय उन्हानेंहि हिरवट रगच धारण केला आहे असाच कुणालाहि भास व्हावा. कमी अधिक उंचीचे पण सम प्रमाणात उभे असलेले, पश्चिमेकडील वाऱ्याशीं चागलें खेटून उभें राहता यावें म्हणून बराचसा तोल पश्चिमेकडेच झुकवणारे असे ते तरुण वृद्ध माड पाहिले म्हणजे पौर्वात्य तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष वस्तुपाठ मिळाल्याशिवाय रहात नाहीं. वाऱ्यापावसाशीं, उन्हामळभाशीं, झगडायचें पण माणसासारख्या अर्धवट प्राण्याच्या सर्वस्वीं उपयोगी पडायचें! छाया सुद्धा किती अल्प! यत्किंचितहि कुणाला उपाधी द्यायची नाहीं स्वतःसारखें आनदानें वाऱ्याच्या तालावर डोलत राहायचें! ठिपकणाऱ्या पावसाच्या तालावर बोलत राहायचें! फावल्या शाततेंत समाधिस्त व्हायचें!

शिवरामानें पायडा घालून झपाझप पाचदहा माड उतरले. त्यानंतर सर्वांत जुन्या, उच व वाकलेल्या अशा एका माडाला कवा दिला. कवा देवून पाचदहा हात वर गेल्यावर "कर कर कर कर" असा चमत्कारिक आवाज त्याच्या कानीं आल्यामुळें तो किंचित् थबकला. वर विस्तारात पहातो तों दोन घुबडें तिथून पळण्याच्या तयारींत असल्याचें त्याला दिसून आलें. कित्येक दिवस मुरलेल्या मनःसतापाच्या भरात शिवरामानें दोन अचकट शिव्या हासडल्या व फिरून जोरानें चढण्यास सुरवात केली. अगदीं वरच्या विस्तारात बसून भराभर नारळ तोडले. नारळ तोडीत असताना त्याचें सारें लक्ष एकाग्र झाल्यामुळें कडाड आवाज होत असून माड मोडून पडत आहे हें त्याच्या लक्षातहि आलें नाहीं!

कडाऽऽऽऽड कड कड कड कड धप!

आसमंतातील यच्चयावत् पक्षी आकाशांत एकदम उंच उडून, जोराचा किलबिलाट करीत चक्राकार फिरत फिरत काय झालें याचा आढावा घेत घेत ते गगनात तरगत राहिले. अघटित घटनेचा भवकारा त्यांच्याहि हलुवार हृदयाना ताबडतोब पोंचला होता. वृक्ष व त्यातील प्रत्येक भाग हा आपल्याच जीवनातील एक महत्त्वाचा घटक आहे अशी कीटमात्राची खात्री असल्यास नवल तें काय!

"हहह काय वाजलें!" करीत कित्येक लोक रावजीकाकाप्रमाणेंच घराबाहेर आले. कुळवाड्याच्या वाडींतील लोकहि कानोसा घेत घेत बाहेर पडले. वैऱ्याप्रमाणें विश्रामच्या मनानें जे चिंतलें तें अखेर तंतोतंत खरें ठरलें. माडाखालीं धांवत येवून विश्राम पहातो तों छिन्नविछिन्न होऊन शिवराम पडला आहे व त्याचे अगावर माडाचा राक्षसी सोट लवडला आहे.

"अग बाय ग अअअ" म्हणत विश्रामनें शेजारच्या एका उभ्या माडाला कडकडून मिठी मारली.

त्या ठिकाणीं दुसरा कुणी मनुष्य असता तर आपली बेहोष स्थिति सावरून धरण्यासाठीं विश्रामनें खात्रीनें त्यालाच मिठी दिली असती. पण माणसाच्या अभावीं केवळ प्रतिक्रियेखातर विश्रामला तसें करणें भाग पडलें. होता होता, रावजीकाका, मास्तर, मावशी, हां हां म्हणतां शंभर सवाशें माणसें गोळा झालीं आसपास. जो तो चिपूचाप! काय करावें हेंच कुणाला सुचेना. ज्याला त्याला असेंच वाटलें कीं आपल्याच शरीराचा एकेक अवयव तुटून पडला आहे. भयानकतेची पहिली झडप ओसरल्यावर पांच पन्नास माणसांनीं प्रथम त्या मोडक्या माडाचें खोड बाजुला केलें.

तो छिन्नविछिन्न झालेला मासाचा गोळा—एका काळचा शिवराम—नजरेआड करण्याकरता रामाण्यानें त्याच्या अंगावर एक घोंगडें टाकलें.

वाडींतल्या कित्येक कुळवाडणी जवळपास बसून रडू ओरडू लागल्या.

कित्येकजणी नाना प्रकारच्या आठवणी काढूं लागल्या.

बऱ्याच जणींनीं आपापल्या पोरांना "आतां झाडाला पाय लावूं नुका गाऽऱ्या म्होर" म्हणून ताकिदीहि दिल्या.

आपण जगांत पोरके, अनाथ, दीन झालों अशी विश्रामची त्या क्षणीं नव्यानें खात्री झाली.

प्रहराभऱ्यानें सारा गाव जमा झाला. पोलिस पाटलानें पंचनामा केला. त्यानतर प्रेताला कुळवाड्यानीं माती दिली.

× × ×

दिवसवारे करायचे! पण शिवरामच्या घरांत काय होतें? अठरा विश्वें दारिद्र्य!

वाचकानीं आपल्या कल्पनाशक्तीला कितीहि ताण दिला तरी कुळवाड्या-च्या दारिद्र्याचें त्यांना बिनचुक असें आकलन करताच येणार नाहीं. दिवस-वाऱ्याकरता विश्रामला मदत करायचा बूट राजबा गोठलानें काढला. त्या-प्रमाणें दोन तीन मण भातहि त्यानें विश्रामकडे पोंचवलें. शेजारकरणीनीं कांडण केलें नी एकदाचे दिवस झाले.

त्यानतर लगोलग विश्रामच्या लग्नाचा प्रश्न निघाला.

राजबाची मुलगी गुणी—! राजबानें परतीची म्हणून देण्याचें ठरवलें होतेंच.

"मुला र! तू ऱ्हयतीच पोरगी कर. तुज्या संसाराला—श्यतीभातीला—ऱ्हयता राजबाच बेस हातभार लावील! तुजीं श्यता लावूनशान घल! ना सारा ब्येस ऱ्हयल!" रामाण्यानें विश्रामची अनेकदां समजूत घातली.

राजबाच्या पोरीचें लग्न लावायचें म्हणजे विश्रामाला लहानपणापासूनच तें एक प्राणसंकट वाटत असे. पण आज—! तो प्रत्येक परिस्थितींत नाडला होता. तशा स्थितींतहि त्यानें रामाण्या मार्फत चिमाला मागणी घालण्याचें ठरवलें.

पण काय!

चिमाचा बाप—तात्याबा चाळका—तो तर फारच मोठ्या घोड्यावर आरूढ!

"खांडक्याचा इवाय ऱ्हनार आपून नी काय!" या वैभवाच्या गोडव्यांत त्याला काहींएक अन्य सुचत नव्हतें.

असेर नाइलाजानें विश्राम गुणीपुढें उभा राहिला.

त्याच मुहूर्तावर पंड्याचें पामीशींहि लग्न झालें.

विश्राम राजबा गोठलाचा जावय झाला.

"अखेर आला का नाय माज्या भयनीच्या–गुनीच्या पाया पडत" असें केन्या लाव–कामाठीपुऱ्यात राहून–म्हणत होता मुबईला.

त्यानंतर—

थोड्याच दिवसात गिरणींत कामधदा मिळवण्याकरता विश्रामची बहीण रमा, गोठलाची पोर लाडी, आणि दुसरीं कित्येक माणसें मुबईकडे रवाना झालीं. दादाच्या ससाराला मदत करण्याच्या थोर बुद्धीनेच रमा निघाली होती. नुकताच्च विश्रामाच्या लग्नाला खर्च झाला होता! पाठीवर देणें तुबल्यास आपल्या भावाला भाकरी तरी कशी गोड लागेल? आपण काय बोलून चालून इघव! आपण मुबईला जाऊन मोलमजुरी करून मुल्खात पैसे पाठवावे या हेतूनेंच रमा बाहेर पडली.

राजबाची लाडी–तीहि बाहेर पडली तिचा हेतु जरी बापाला मदत करणें हा होता, तरी अतरथ हेतू—मुबईस जावें, गोडधोड खावें, रगदार पाताल ल्यावें! नी चाकरमानीण होऊन यावें!—हाच प्रमूख होता. तिला जीवनात बदल झालेला पाहायचा होता. मुचकुददरीच्या गावठी वाता-वरणाला ती पार कटाळली होती.

"आपल्याला जायला मिळेल तर काय बहार होईल" असें चिमालाहि राहून राहून वाटे.

खांडक्याशीं आपलें लग्न होणार तें चुकवायला मुबईस पळून जाणें हाच एक मार्ग आहे अशी अलीकडे तिची खात्री झाली होती पण प्रत्यक्ष पळ काढायचा तिला धीरच होईना जायचें कसें? तिकिटाला पैसे कुठले? बोटीवरून आपला बाप धरून नाहीं का आणणार आपणाला? आणि मग? पुढचें मरण आजच ओढवेल!

छेः छेः छेः छेः!

"तात्याबा, ओ तात्याबा?" मास्तर पडवींत येऊन ओरडूं लागले एक दिवस.

"जी बाबा घरांत नायत."

"जा त्याला बोलावून आण. आजच्या आज बोटीच्या धक्क्यावर दोन तीन गडी जागला पाहिजेत आज पोरें येनाहेत मुंबईहून"

"व्हय काय?" चिमाला ब्रह्मानंद झाला ती धावतच सुटली वाटेत विश्रामाला, पड्याला तिनें ही हकीगत सांगितली ' कातुदा आल्ये"

थोड्याच वेळात दोनतीन गडी बोटीकडे रवाना झाले

विश्राम, पडया व चिमा हींहि बोटीकडे धावत सुटलीं.

"कातुदा ययाचा ना?" प्रत्येकाच्या मनात या नुसत्या बातमीनेच प्रचण्ड उलटापालट केली होती आपण एकदम लहान झाला असेंच प्रत्येकाला वाटलें म्हणाना?

ती होडी मुचकुंददरीच्या किनाऱ्याला लागल्याबरोबर सुकातनें टुपकन् उडी फेकली.

मागें वळून अवूला हात दिला. अवूनेंहि उडी घेतली.

"धूच्च्या!" सुकात मोठ्यानें हासत म्हणाला.

"इश्श!"

इतक्यात विश्राम, पड्या व चिमा दिसू लागलीं.

नंतर उद्धव उतरताना म्हणाला, "हीं सोंगें कशाला प्रथमदर्शनीं?"

"विश्र्या!" सुकातनें त्या पोराच्या पाठीवर दणदण आवाज केला. असल्या उज्वल मायेच्या थापेने अवघे रक्त विश्रामच्या डोक्यात साठू लागलें. समाधानाचा एक गंभीर श्वास विश्रामनें सोडला.

"ताय बाय?" चिमानें अवतीला हाक मारली. वास्तवीक त्या हाकेचा अर्थ "कातुदा" असाच होता.

"कस ग पोरी? बरी आहेस ना? अवूनेंहि विचारलें

"कातू? बग कशी माजरीसारखी गुबगुबीत झाली आहे ती."

कातूचे डोळे आपणाकडे वळल्याचें तिला समजताच तिनें झटकन् पाठ फिरवली.

सर्वजण चालू लागलीं.

वाटेंत विश्रामाजवळ कातूनें एकूनएक गावची चौकशी केली.

"अरे उद्धव! कातू गावीं आलाच नाहीं असे समज हा आजपासून."

"नाइं त काय! जेवायपुरता तरी घरीं आला म्हणजे झालें."

"कीं कातु तू चिमाकडेच जेवशील!"

"न जेवायला काय झाल! चिमा, वाढशील काय मला!"

"इस् बा. काय तरीच आपला!" ती म्हणून गेली. पण—पण—

"खरच जेवशील का कातू, माझ्या हातचें?" ती स्वतःजवळ लगेच म्हणत होती.

रावजीकाका अंगणांतच उभे होते. मास्तरनीं दोघा मुलावरून तादूळ ओंवाळून टाकले. प्रथम दोघानीं पाय धुतले व आत आलीं.

"अवूनें मावशीच्या कमरेला कवा दिला.

"कशी झालीय माझी सोनू!" मावशीनीं अवूला चांगली थोमाळून पाहिली.

उन्नत होणारा—झालेला—उरप्रदेश मावशींच्या झटकन् ध्यानात आला.

रावजीकाकांच्या पायांवर सुकातनें डोकें ठेवलें. मुग्ध प्रेमानें तो थोडा स्फुंदू लागल्यास नवल तें काय? आदरार्थींहि अश्रूच तळपू लागतात.

रावजीकाकासह सर्वांनाच वाटलें कीं मुचकुददरीचा आज एकदम रग पालटला.

● ❀ ●

दुसऱ्याच दिवशीं सकाळीं सुकातची स्वारी अवतीला विचारूं लागली

"अवू, येत्येस माझ्याबरोबर!

"कुठें! आन् तुझ्या हातांत विळा कुणाचा!"

"या हत्याराचें तुला नाव माहित आहे हेंच फार! अग आज आपल्या "बारकोंवडा" ठिकाणांत गवताची कामगत आहे. चागलीं सवाशें माणसें आहेत गवत काढायला. चला माझ्याबरोबर. गवताच्या वरडी पहा कशा काढतों तो! ऐद्यासारखें काय करायचें? पोटापुरती मजुरी चल मिळवूं गवत काढून!"

न्हाणीघरांतून लुगडें गुंडाळीत गुडाळीत अवती येत होती सुकांत तिच्या समोर उभा राहिला.

"आतां मला प्रथम जाऊं तरी देशील कीं नई?"

"चिमाप्रमाणेंच माडचोळणा–लुगडें नेसतेस का? ह चल आटप तसें नेसून चल गवत काढायला. तें नेसणें भारी सुटसुटीत कामाकाजाला." असें म्हणत म्हणत सुकातनें तिच्या पातळाला बोटानें स्पर्शहि केला.

अवतीलाहि गम्मत वाटली क्षणभर! डोळे किलकिले करून जणू काय कसें नेसायचें तें ती आठवूच लागली.

"कसें बरें?"

"तें आपल्याला माहिती नाइ बुवा! ह ह मावशींना विचार."

"बइ, मावशी यवढाला डोळा करतील!"

"बर मग येतीस का?"

"अह! कइ नको जायला."

"काय आपलें ठरलेंय? मी बोलवीन तिकडे यायचें ना? आलें वाटतें पिशाच फिरून? अवू, अवू, आपण यामुळें तीळ तीळ दूर दूर होत चाललों आहों एकमेकांपासून—!"

हीं शेवटचीं वाक्यें रावजीकाकांनीं ऐकलीं.

"हहह अवू, जा ना त्याच्याबरोबर? हहह आपल्याला सर्व कांहीं माहीत असलें पाहिजे. कुळेंडाळें जमीनजुमला हहह घरीं आलें कीं हेंहि शिक्षण घ्यायला हहह पाहिजे."

अवतीला काकाचा आज प्रथम राग आला. ती तडक माडीवर गेली. पुढून करण्याच्या उद्देशानें आरशासमोर बसली."

"आजच काय? येईला उद्या विद्या." सुकांत काकाच्या तोंडावर हात फिरवण्याचा प्रयत्न करून निघाला.

बारकोंबडा ठिकाण! माळच माळ जिकडे तिकडे. छातीभर उच वाढलेलें गवत जमिनभर पडलें होतें शेवटच्या अग्रावरील प्रत्येक फुलावर पसा पसा द्रवबिंदू झळकत होते हिऱ्यामाणकाचा ताटवाचा ताटवा, गवतफुलाचा उग्र सुवास, मुग्या गवतावरील पिवळसर फुलाचा गोडवा आणि त्यातच शें सवाशें माणसाच्या हातातील विळयाचें "सर्क सर्क." मनापासून होणाऱ्या कामांतहि एक प्रकारचा ताल उत्पन्न होत असतो. त्या तोलाचा कित्येक वेळपर्यंत विश्रामच्या पाठीमागें उभा राहून सुकात गोड अनुभव घेत होता.

रामाण्यासारखे दोन चार म्हातारे गृहस्थ माणग्याचे विळे काढून बंदाची तयारी करीत होते. (याच बदानीं वरडीचे भारे बाधले जातात ) विश्राम-च्या उजव्या हाताला चिमा बसली होती, डाव्या बाजूला पड्या पाणकर!

सुकातच्या हातीं विळा पाहून मिस्किल पड्या म्हणाला.

"योक नवा कामकरी आलाय?"

सुकातला गम्मतच वाटली आपणाशीं हा पोर इतके स्वातंत्र्य घेतो हें पाहून त्याला खरेच आनद झाला होता.

"पर तुजी मजुरी हिस्कवून घेईन बघ आता." असें म्हणून उकिरवा बसून सुकानहि गवत काढू लागला. चिमा जरा बाजूला झाली कामगर्ती-तील साऱ्या माणसाना गम्मत वाटली

"अव बुदापासून इळा चालवा. वर वर काय हा?" चिमा खालीं मान घालून सुचवीत होती

"आता बघ." सुकात पूर्वीच्यापेक्षा निराळ्या पद्धतीनें गवत काढू लागला.

"लय ब्यस" चिमाला पसत पडलें.

"इळ्याच्या म्होरल्या टोकाला वाइच हालवा. लय जोर घ्ययाला नुको." विश्रामनें सुचवलें

"आपण अकारण प्रमाणाबाहेर जोर देत होतों विळयावर!" सुकातनें मनाशीं विचार केला विळा वापरण्याची कला त्याला समजली. तो त्या सराईत माणसाबरोबर चागला तासभर गवत काढीत राहिला.

गवत काढता काढता खाडक्याच्या हकीगती निघाल्या

विश्रमने हळू हळू सर्व काहीं सागितले "आन् म्होर म्हजी—बाजूला या म्हजी सागता" असें म्हणून विश्राम उठला. दोघेहि जवळच्या आम्र-वृक्षाच्या सावलींत बसले.

"व्हयत्या चिमाला तिचा बाप त्या भोपालतोंड्या खाडक्याला द्ययाचा हाय."

"काय खरेंच?" सुकातनें विचारलें,

"त अ अ व्ह!"

"चिमा, ए चिमा" सुकांतनें हाक मारली.

त्याबरोबर कामगर्तीत दूर असलेला तात्या चालका उभा राहून पाहूं लागला त्या दिशेला.

"चिमा, चिमा, खरं साग खाडक्याच्या घरीं तुझ्या इच्छेविरुद्ध का तात्या तुला देत आहे? लाजू नको."

"व्हय व्हय! मला त्या मेल्याचा मुक्सा बगाया नुको. सागा तरी माज्या बावाना! मी काकाना दुकून् सागतला. पर त्ये म्हनतात तुमच्या लग्नाच्या भानगडींत म्या खवतान पडू नये" असे म्हणून ती झटकन् कामाला गेली. तात्या चालका हें सर्व पहात आहे याची तिला पूर्ण जाणीव होती म्हणूनच ती ताबडतोब चालती झाली.

एकदर प्रकाराचें सुकातला वाईट वाटलें नतर राग आला. कोणाहि माणसाच्या मनाविरुद्ध कोणाहि वडीलाधऱ्या माणसाला कसलीच गाजवण्या-सारखी जुलमाची सत्ता असू नये असेच त्याचें मानवविषयक तत्वज्ञान होतें. त्यानें झटकन् तात्याबाला हाक मारली. तात्याबा आला. विश्राम कामाला निघून गेला.

"तात्याबा?"

"जी."

"चिमा तुझी मुलगी ना?"

"मुलगी त मुलगीच! नव्ह कशी?"

"मग तिच्या मनाविरुद्ध तू तिला खाडक्याला का देवून टाकणार!"

"नाय ता काय! तो पोर (विश्राम) नायताच भकतो."

"जास्त बोलू नको त्या पारानें एक चकार शब्द नाहीं काढला त्या बाबतींत तुझी मुलगीच म्हणत्ये कीं तिच्या मनाविरुद्ध तू हें सारें गोताडें जमवीत आहेस म्हणून."

"पर तुम्हाला काय करायचा हाय त्याच्याशीं? तुमीं खोत त खोत. व्हसुलापुरते धनी! नायता आमच्या घरगुती कारबारात पडायचा ब्यस नाय. यकदा सागून ठयवताय!" तात्याबानें सुकातच्या कल्पनेबाहेर त्याला धक्का दिला.

"तात्याबा, फाजील बोलू नको. × × वर लाथ मारून घालवून देईन

आजच्या आज तुला गुण्यागोविंदानें वागतों कीं तिच्या मनाविरुद्ध कांहीं करू नको म्हणून तो तू खाडक्याची भाषा वापरतोस! तुला मी किती शिकवतोंय बापानें कसें वागावें तें."

"मना नुको तुमी शिकवाया."

"फिरून सागतों कीं खबरदार खाडक्याला चिमा देण्याच्या गोष्टी बोलशील तर!"

"मग खांडक्याला द्यवूं नको त त त काय तुमाला द्यवूं!"

सुकात प्रमाणाबाहेर भडकला. तात्याबाच्या मुस्कुटात सुकातनें कडाडकन् भडकावली.

म्हातारा माणूस, तिरामिरी येवून एकदम् कोसळला

"रामाण्या, रामाण्या," सुकातनें रामाण्याला हाक मारली तात्याबा फारच मोठ्यानें बोलत होता. त्याच्या भाषणाचा सर्वच कामकऱ्यांना अचबा वाटत होता.

रामाण्यानें तात्याबावर पाणी शिंपडलें.

तात्याबा बसला राहिला.

"दादानु, माजा लय ळय चुकला. ती पोर—! मी तिचा नाव सोडला आजपासून—ह्यरीं तरी ती माजी कुटाय" असें म्हणत तात्याबानें घरचा रस्ता धरला.

"ह्यरीं तरी ती माजी कुटाय" या वाक्याचा अर्थ सुकातला मुळींच लागेना.

थोड्या वेळानतर रामाण्याला त्यानें जवळ घेऊन विचारलें.

"नाय व ता ह्यरींच वडबाडला नायता."

"तरी पण रामाण्या! रामाण्या! खर खर साग कायतें?"

रामाण्या—! रामाण्या असा तसा नव्हता. सुकात हा रावजीकाकांचा जावई व्हायचाय! त्याला कसलीच माहिती सागणें चागलें नाहीं, त्याची मनस्थिती विषसकूल होणें अगदीं गैर आहे, या गोष्टी त्या कुळवाड्याला बरोबर समजत होत्या. रामाण्यानें म्हणून त्या विषयाला मुरड दिली.

"अवो ती आयती पोर! तात्यबानें न्हावेर क्याला. तवा सग आली!

दुसरां काय कपाळ!"

सुकातचा जीव खालीं पडला.

सुकातहि घराकडे गेला.

तात्याबानें मात्र त्या वेळेपासून भलतीच धास्ती खाल्ली. शक्य तों खाड-क्यांना टाळायचें असें त्यानें ठाम ठरवून टाकलें.

रावजीकाकांना ही हकिकत सुकातनें गेल्याबरोबर निवेदन केली.

शेवटीं--

काका पार गोंधळून गेले. काळे ठिक्कर पडले.

सुकातला जास्तच अचबा वाटला काकाची मनस्थिती उजू करण्या-च्या उद्देशानें रामाण्यानें सांगितली "आयती" असल्याची हकिगतहि काकांना सांगितली.

"हहह तेंच खर." एवढेंच काका म्हणाले. पण त्या दिवसापासून त्यांच्याहि मनाचा हाहाःकार उडाला हें निश्चित.

# १३. मुंबईचें टपाल

"नाताळच्या सुट्टीला अक्कलच नसते. हा हा म्हणता सपते बेटी!"

सुट्टीपैकीं सात आठ दिवस खपले तरीहि सुकातच्या प्रभातफेऱ्या, साज-फेऱ्या सुरूच असत. आज सुकातनें अवंतीला पोहायला शिकवण्याचें ठरविलें असून तिच्यासह तो खाडीवर निघाला होता. उद्धवाला मुळींच पोहणी येत नव्हती. मात्र आपण बेफाम पोहणारे आहों असें तो नेहमींच सांगत असे. त्यालाहि सुकातने आमंत्रण दिलें. तो उद्या जाऊ म्हणत होता त्यावर सुकातचें तें वरील वाक्य होतें

"काय उद्या उद्या करतोहेस? चल."

"कायग अवू, नको ना जाऊ?"

"मला काय विचारतोस? मी तर निघालें."

"काय? तू पोहायला जातेस? अखेर सुकातनें दिला वाटतें बाप्टिस्मा."

"चल अवू, काय त्या आळश्याजवळ बोलत रहायचें!" असें म्हणून दोघेंहि चालू लागलीं. त्याचे कपडे घेऊन गडी पुढें गेला होता.

अवंती पोहणीला पडणार! तिचीं वस्त्राच्छादनें विरल—विरल—

"आलोंच मी सुकात." उद्धवाला रहावेनाच.

खाडीचें पळ भरतीच्या पाण्यामुळें अर्धेअधिक भरलें होतें. भोप्याच्या झुडुपाच्या चारी बाजुला वेष्टण असल्यामुळें तलावाचीच शोभा आली होती त्या पळाला.

"मार काचा बाध पदर झालें! चल, ये माझ्याबरोबर." अवंतीचा डावा हात हातीं धरून सुकात कबरभर पाण्यात उतरला.

"आतां फेक अंग पाण्यावर!"

"हा आ आ आ आ!" हा आ आ म्हणून जोरानें श्वास सोडून अवंतीनें

पाण्यावर अंग झुकवलें. दिल्या सूचनेप्रमाणें हात पाय आळीपाळीनें हालवूं लागली. सुकातचे दोन्ही पजे अर्थातच तिच्या पोटाजवळपास होते. 'डुबुक, डुबुक' आवाजामुळें तीं काय बोलत होतीं हें किनाऱ्यावर असलेल्या उद्धवाला ऐकूच आलें नाहीं

उद्धवाच्या हृदयाची त्या पाण्याप्रमाणेंच चुळबुळ होऊं लागली. आपण उत्तम पोहणारे म्हणून सांगितलें त्यासंबधींच तर हीं दोघे आपली टिंगल करीत नसतील ना? खरंच करीत असतील! सुकात कसा रोमरोमीं जिवंत आहे व आपण—आपण—! आळशी, थापाडे, डबक्यातल्या कुजक्या पाण्या सारखे, पायाखालीं बूडहि नसणारे पण हवेंत नसत्या नगरी उभे करणारे—अरेरे!

उद्धवाला मनापासून खेद झाला

त्या भरतीच्या पाण्याइतक्याच गंभीर व चंचल वृत्तीनें तीं दोघें पाण्यात हासत खिदळत होतीं. अवतीची भीति मरून जावी म्हणून सुकातनें स्वस्थाळपणाचा बेगुमान अवलंब केला अवती पोहण्याची शिकस्त करीत असता सुकातनें दोन्ही हात बाजूला घेतले व थोडा बाजूला सरला. अवती "क्याक्" करून ओरडली पण झटकन् वेगानें पाण्याबाहेर उसळी घेत तिनें सुकातच्या गळयाला दोन्ही हातांनीं कडकडून कवा दिला

त्या वेळीं ती फारच मोहक दिसल्याचा सुकातच्या खेळकर मनाला गोड प्रत्यय आला. अवतीच्या हृदयांकुराची ऊब, क्षणभरच का होईना, पण सुकातच्या हृदयाशीं विलीन झाली. त्याच्या उजव्या गालाजवळ कुठेंसे तिचे फिक्कट झालेले ओंठ क्षणभरच अरेंगानें बिलगले सुकातच्या चेहऱ्यावरील मस्तवाल हास्यानें क्षणभऱ्यानतर तिच्या भयभीत मुद्रेचेंहि स्मितातच पर्यवसान केलें.

हें सारें निरखून पहात असणाऱ्या उद्धवाच्या हृदयात त्यामुळें हेकेखोरपणाची जबरदस्त कळ आली. आपल्याला पोहायला येत असतें तर असले प्रासंगिक दिव्य अनुभव आपल्याहि वाट्यास आले असते. सुकातच्या हातातून अवतीला हिस्कावून घ्यायची!! आपलें अवतीशीं लग्न झालें तर अवतीचें कर्जच मग द्यायला नको. पण हें सारें साधायला नाहीं नाहीं त्या अक्षम्य

मार्गाचा अवलंब करायचा, आणि तो कां तर सडेतोड जिवतपणाच्या आपल्या ठिकाणीं असणाऱ्या अभावामुळें. उद्धवाला अतिशय वाईट वाटलें.

"काय पण मीं घाबरलें!" तसाच राहू देवून अवंती म्हणाली.

"पण आतां भीती मोडली ना?"

"तूं जवळ असल्यावर मी भिऊंच कशाला रे?"

"मग हं, मार पाहू एक बुडी!"

"एवढच ना! ही पहा." असे म्हणून अवंतीनें खोल बुडी मारली.

"उद्धव, उद्धव, पहा. तुझ्या दसपट धीट आहे ही पोर. तिच्या नादाला लागून भलताच नामोहरम होशील बरं!"

"पण तेंच तुलाहि नाहीं का लागू!" उद्धवानें फेर उत्तर दिलें.

"अवतीसारख्यांच्या नादाला लागणारा मी नाहीं हें विसरलास. मला अवती सारखी आणि तूहि सारखाच."

अवंतीला सुकातचें हे वाक्य मुळींच आवडलें नाहीं. सुकातवर—सुकातवरच कां, कुणावरहि सर्वस्वी आपलीच सत्ता गाजवायची हाच तर तिचा स्वभावविशेष असल्यामुळें तिला तें कसें रुचणार!

"बर बर आहे ठवूक!" रागानें मान वळवीत ती म्हणाली व ताड् ताड् पाण्याबाहेर किनाऱ्यावर आली."

"उद्धव, नुसती अघोळ तरी उरकून घे अता."

सुकात बाहेर येत म्हणाला.

वस्त्राची आलटापालट होईपर्यंत उद्धव पाण्यांत भीतभीत जाऊन डोंबकावळ्याप्रमाणें स्नान उरकून बाहेर पडला.

अवंतीनें मनातल्या मनांत त्याची कींव केली.

त्या दिवसानतर रोजच हा कार्यक्रम सुरू झाला. मात्र उद्धव फिरून तिकडे फिरुकहि झाला नाहीं.

सुट्टी संपल्यावर सर्वजण मुबईकडे रवाना झालीं.

* * *

नाताळची आणखी वर्षाभऱ्यानें सुट्टी येईपर्यंत सुकांत व अवंती मॅट्रिक होऊन कॉलेजमध्यें पहिल्या वर्गात हुशार विद्यार्थी म्हणून सविख्यात होऊन

राहिलीं होतीं. उद्धवानें नापास होण्याचें पत्करून त्याच्याच वर्गात ठाणें दिलें होतें. उद्धवाच्या नावाचाहि वर्गात बराच गवगवा होता.

एक दिवस भटक्या उद्धवाला केन्या गोठल भेटला.

केळयाचीं सालें, विड्याचीं थोटुकें, लाल पिचक्याचे शिटकाव, तेलकट कागदाचे चोळेबोळे या औरसचौरस जहागिरीच्या आत कॉर्नॅक ब्रिजच्या फूटपाथवर हेलहमालीच्या पाटीचा लोढासारखा उपयोग करून केन्या लावणी बडबडत बसला होताः—

"सातारवाली बन्सी नारी बोलह किंग मागं फिरून्, मुका घेतिस का—"

"आ ददानू, हकड कुट?" केन्या गोठल उद्धवाजवळ उभाच राहिला.

"कसें काय केन्या, तू मुंबईतच आहेस वाटतें? काय खबर मुचकुंददरीची"—

"प्याटली मुचकुंददरी! व्हयत्या इस्रामान माज्या भयनिला—म्हजी त्याच्या बायकोला—ऱ्यपाटुन लावलान् नाव? कायसा म्हनतात बा! ती चिमा त्याच्याच घरात रातदिन असत्ये. हकडून कात्या बामन व्हयत्यास पैका रुक्का पाठवतो! अव आमची लाडी मना कालच भ्याटली व्हती! नायनाय ता सागत व्हती! इसऱ्याची भइन हतच लालगिरनींत हाय—व्हव्ह, हा वाचा बरी काय हाय ता. रमा ना ती इसऱ्याची भइन्! व्हइतीन हा कागोद एका गाववाल्यासगें थकड इस्रामाला पाटवलान व्हता. ता भि दडापला. बगा बरी. उकलून सागा काय काय हाय ता—" असें म्हणत केन्यानें एका मळक्या कागदाची चिट्टी उद्धवाच्या हातीं दिली. उद्धव मोठयानें वाचूं लागला.

"दादास (विश्रामास) दडवत. मी जीव सबालून कामधदा चालावलाय. काळजी नुको. पर तू माडलास काय? हकड गावकरी नाय नाय तां बोलतात बा. चिमास्नी भाकरी तुकडा द्यव नुको. तिच्या सार्टी काम धंदा करूं नुको. तिला घरात थारा द्यव नुको. गुनीला असशील तसा जाऊनशान् घरात आन. न्हायतर दैवगोत, गावगंगा तुला लय दंड लावील. कातुदार्शी पैसा कशापाय मागताव? मी हथ हाय का म्याला? कातुदाच्या पैशान् चिमाचा वूं सांबाळ करीत असलास तर तसा सपट गोताळा साग

म्हजी तुज्यावर काय नाय  हकड गावकरी तुज्यावर लय गराम झाल हायत. नाग ता काय हा? यकडून लाडीच्या नावावर कागोद यतान  त्यात त लय लय समदें काय थकडल लिवलेल असत्यारी  आदि चिमाला घालवून ध्य आन् गुनीला आन  कातुदाचे पैसे मण्यारीन तसेच मागे लाव. असा नाय व्हयल तर मी तुजी भयन नाय, तू माजा भाव नायस. माज्या लिवन्या वर वतरू नुकोस  रामाण्या आज्याला दडवत, गोटल मामास्नी दडवत, सुबान्या दादाला दडवत, गोतास दडवत, गावच्या बायला दडवत! हात पाय सबालून काम धदा करावा. पड्यादास पर दडवत व्ह

हा रमाचा कागुद हाय."

"हाय का नाय बरी! हा ता तुमचा कात्या बामान  व्हय त्यानच त्या इसऱ्याला आन् चिमाला शेफरवलान! हा केऱ्या म्हजी मुबयचा दादा हाय! यक दिन्—पर कशाला बोलून दावा!" केऱ्यानें कानावर ठेवलेलें विडीचें थोटुक शिलगावलें

"पण कायरे केऱ्या, चिमाचा बाप आहे ना?"

"हाय व जल्लाता! पर तो तिला घरात ठयवाया कबूल नाय्  तो न्होवरा सोधतो व्हयत्या पोरीसाठीं ता हा कातु बामण फिस्कारवतो ना? त्याला ती जाया नुको गावातून"

"अरेच्या!"

उद्धवाच्या या उद्गारात केवढा तरी जीवनाचा प्रश्न सामावला होता

"तुमी शेट कायबी करा पर ती धिंडका गावातून सोंपवा."

"पाहुया कसे काय जमतें तें" असें म्हणून उद्धवानें ती चिट्टी खिशात कोंबली. "हें पत्र असूदे मजजवळ."

"ठयवा नाव. आनिक मोप यत जाईन नाव तुमास्नीं."

"बराय." उद्धव जाऊ लागला.

"पर तुमचा पत्ता द्या"

उद्धवानें लिहून दिला पत्ता एका कपट्यावर.

"पर शेट, वाइच च्ययला काय द्यताव काय?" मागून चालणाऱ्या केऱ्यानें भिकाऱ्याचे वळण व्यक्त केलें.

"घे ही." एक दुणेली उद्धवानें त्याच्या हातीं दिली.

उद्धव झटकन् ट्रॅममध्ये शिरला एका बाकावर एकटीच पारशी मुलगी बसली होती. तिच्या शेजारीं ही स्वारी जाऊन बसली तेवढ्यातल्या तेवढ्यात तिच्या ढोंपराला त्यानें स्पर्श केलाच चटकन् त्या मुलीनें उद्धवाकडे मान वळवली व तिथून उठून ती दुसऱ्या एका रिकाम्या बाकावर जाऊन बसली. ट्रॅम कंडक्टरच्या ध्यानात ही खुबी तेव्हाच येऊन चुकली असल्यामुळें तो हासत हासत उद्धवजवळ येऊन तिकीट मागू लागला. उद्धवकडे पाहून चमत्कारिक हास्य करीत "किदर जाने का?" हा त्याचा आवडता सवाल त्यानें फेकला.

"ऑपेरा हाऊस." उद्धवच्या मनात तडक जाऊन अवतीलाच भेटायचें होतें.

× × ×

अवंती व सुकात त्याच वेळीं सकाळींच आलेल्या काकाच्या पत्रासबधीं सवाल जबाब करीत होतीं.

"सुकात, तुझ्यामुळें तिकडे काकाना किती अकारण त्रास होत आहे!"

"काय माझ्यामुळें?"

"तूच नाहीं का तात्या चालक्याला भडकवलास? त्या मेल्यानें तेव्हां-पासून खाडक्याच्या चळवळींत अवघा गाव सामील करून घेतला आहे. मेले मजुरीला सुद्धा येत नाहींत. वेठ नाहीं, बिगार नाहीं! गरीब बिचारे काका! तूं त्याचा मार्ग सुकर करायचास कीं—"

"अग पण खाडक्याची चळवळ त्याहि पूर्वींचीच आहे"

"पण तू ती जोमास लावलीस ना?"

"Nonsense."

अवंतीला या शब्दाची भयकर चीड होती. हा शब्द उच्चारणारा माणूस, आपल्या मेंदूच्या मागल्या बाजूला जोराची चापटीच मारीत आहे असें तिला वाटे. ती एकदम सुकातवर उसळली.

"कायरे Nonsense? तू आपलें नातें विसरतोस! मी काकाची मुलगी आहें व तूं—"

सुकात इतक्या प्रक्षुब्ध चेहऱ्यानें तिच्याकडे पाहूं लागला कीं पुढचें वाक्य तिच्यानें पुरेंच करवेना. मिनिटभऱ्यानें सुकातच्या टपोऱ्या डोळ्यात दोन मोठाले जलबिंदु उभे राहिले ते दूर कुठें तरी उडवून लावण्यासाठीं त्यानें झटकन मानेला हिसका दिला व तो खोलीच्या बाहेर झटकला. त्यातील एक अश्रुबिंदु अवतीच्या मनगटावर उडाल्याचें तिच्या ध्यानात आलें होतें.

सुकात दिसेनासा होईपर्यंत ती व्हराड्यातच उमी होती.

सुकात ताड् ताड् ताड् निघाला. खूबसें चाललें कीं मनक्षोभ बराचसा आहारात येईल अशी त्याची खात्री होती.

उद्धवाच्या ट्रॅमशेजारून सुकात जात होता. आता अवंती एकटीच सापडेल या हर्षामुळें उद्धवाने एकवार अवतीकडे डोळे खोंचून पाहिलें. ( हवेत कुठेंतरी ! )

सुकात दिसनासा झाल्याबरोबर अवती धाडकन् एका खुर्चीवर बसली झाल्या प्रकाराचा तिला अतोनात पश्चात्ताप झाला मनगटावरील सुकातच्या अश्रून तिला केवढातरी जबरदस्त चित्रपट दिसू लागला. आपल्याला त्याच्याशीं लग्न लावणें भाग आहे, गेल्या पधरा वर्षांचा काकाचा तसा सकल्पच आहे, पण अशाने काय होईल? सुकात कदाचित् कायमचें घर सोडून––आत्ताच गेला तो कायमचा नाहींना गेला––?

अवतीच्या हृदयात धडकी भरली.

काय म्हणतील काका? जग काय म्हणेल?

ती फिरून फिरून त्या अश्रूकडे पाहू लागली. पण तो केव्हाच वाळून गेला होता

त्या वाळलेल्या अश्रूबरोबरच सुकातहि कायमचा अदृश्य झाला कीं काय?

त्याच मनस्थितींत ती मनगटाकडे पहात असताच उद्धव आत आला.

"मनगटावर ढेंकूण बिकूण होता कीं काय?

ढेकणाची कल्पना अवतीला कशीशीच वाटली.

"हो." म्हणून तिनें खालचा ओंठ डाळिंबी दातानीं आवळून धरला.

आकाशी रगावर ताबड्या चादण्या असलेलें पातळ तिनें पेहेरलें होतें व तसलाच ब्लाउज् पेहरला होता. आणि कोपऱ्यातहि आज तसल्याच रंगाच्या

—पट्ट्यावर तशाच तांबड्या चादण्या असलेल्या—चपला काढून ठेवलेल्या होत्या. या तिन्ही वस्तूचे नितात साम्य असणारे "सेटस्" अवतीच्या कपाटात पाचसात तरी होतेच होते.

चपलाच्या बाबतींतील या व्यक्तिवैशिष्ट्यानें, गेल्या दोनचार महिन्यात तर अवतीनें नाटक सिनेमातील विशिष्ट व्यक्तींतही बरीच खळबळ उडवून दिली होती. सुकात हा अर्थातच तिच्याबरोबर असे, पण त्याचे ठराविक खाकी कपडे—हाफ पॅट व हाफ शर्ट, बूट व खाकी मोजे—त्याचा ठराविक क्लोज क्रॉप—यामुळें वाघिण व तिचा दरवेशी, अशीच त्याच्याबद्दल लोकाची कल्पना होऊन राहिली होती या दोघात घुसण्याचा उद्धवाचा नेहमींचाच प्रयत्न असे. पण लौकिक दृष्ट्या अद्यापहि तो ममत्वाला असा चढला नव्हताच.

उद्धव तिच्या समोरच कॉटवर बसला

"आज रुबाब दिसतोय भलताच? अवू, तू खरोखरच सिनेमा नटी होण्यालायक आहेस."

"ती कशी काय?"

"तुझ्या निवड करण्याच्या पद्धतीमुळें. तुझें सारे काहीं वेचक आहे. परवाच तो लेकाचा चोइथराम—शृगार सिनेटोनचा मालक मला म्हणाला कीं मडलीक, एकदा तिला आमच्या सिनेटोनमध्ये घेऊन ये. पडद्यावरच्या पहिल्या एन्ट्रीकरता तिला हजार रुपये देवू बघ. आपले नटवर्य दाते इथें नाहींत म्हणून, नाहीं तर आपण दोघानींहि त्याच्याजवळ नाट्यविषयक शिक्षण घेतलें असतें."

"मला दात्याच्याबद्दल नितात आदर आहे. कला आणि शील याची गाढ अनुरक्ति जर कोणा महाराष्ट्रीय नटात असेल तर ती दात्याच्यात असें आमचे इंग्लिशचे प्रोफेसर (बगाली) नेहमीं म्हणतात. (महाराष्ट्रीय प्रोफेसर अनुल्लेखाचे भोक्ते!) ते बगाली असल्यामुळे व त्याबरोबरच नाटक सिनेमाच्या वातावरणात पूर्ण मुरलेले असल्यामुळें त्याच्या विधानाला फारच मोठें महत्त्व आहे."

"त्याच्याबरोबर तू म्हणे एकदा दात्याना भेटली होतीस?"

"चोरा, तुलारे कसें समजलें?"

"मला त्या नथ्थुलालनीं सांगितलें. महिंद्र पिक्चरस् सिंडिकेटचा मालक तो."

"उद्धव, तुझ्या भयंकर ओळखी बुवा! हीं नावें तू खाड् खाड् घेऊ लागलास म्हणजे असें वाटतें कीं एकतर तू थापाची तरी फलटण उभी करीत आहेस, अगर तुझी लायकी आम्हाला समजली तरी नाहीं"

उद्धवच्या तोंडावर अवती फाजिलपणाचे हास्य फेकू लागली

"देखा जाय एक दिवस असा येईल कीं—असे कशाला? तुला आत्ताच्या आत्ता भेटवू या साऱ्याना?" असें म्हणून तो उभा राहिला

"पण सुकात नाहीं ना? नाहींतर खरोखरच गेलो असतों आपण—"

"सुकात—जिथें तिथें सुकात—अवती! काय ग तू त्याला समजत्यस? तो जसा दिसतो तसा खास नाहीं वरून दिसायला भलताच साळसूद पण मोठा पाताळयंत्री आहे तो खुशाल रागव. त्याचे धंदे तुला कुठें माहीत आहेत? साऱ्या मुचकुददरीला त्यानें आग लावली आहे आग—"

"काकाच्या पत्रावरून दिसतें तसे खरे थोडें फार—" अवतीहि म्हणाली. उद्धवाला त्यामुळे दारू प्यायल्याइतका जोर आला.

"अग चिमाच्या व त्याच्या भानगडी तुला माहीत आहेत?" खालच्या आवाजांत तो म्हणाला.

"नई."

"अग तो विश्राम. याचा कुलुल्या ना! त्याच्यामार्फत चिमाला हा पैसे काय धाडतो, पत्रें काय धाडतो! शिः Bad taste. तिचें लग्नहि यानें फिस्कटवलें ग!"

आता मात्र अवतीच्या डोक्यात विजेसारखा लख्ख प्रकाश पडला. तिनें झटकन् साऱ्या गोष्टींचा आता मनाशीं बरोबर मेळ बसवला "असा का हे तो ओ ओ ओ!"

"हें पत्र वाच." उद्धवनें रमाचें पत्र अवंतीच्या हातीं दिलें. पत्र वाचीत असता उद्धव तिच्याकडे ननाभ'नाच्या दृष्टीनें पहात होता. आपण व अवती यांच्यामधील अतर आता पार तुटलें अशी त्याची खात्रीच झाली.

"असू दे हें पत्र माझ्याजवळ. काकाकडे पाठवून देतें हें"

"पण मीं दिलें असें सांगू नको"

"का? एवढी धास्ती कसली?"

"छेः छेः उगाच माझें नाव कशाला त्यात?"

"अगदींच तू गाढव आहेस उद्धव! एवढे सुद्धा Moral courage तुला नसावें?'

तिला उद्धवाचा त्या क्षणीं एक नव्यानेच तिटकारा आला

"तुझें मला Complete backing आहे का?"

"म्हणजे तू वाटतें रेसचा घोडा आहेस?"

उद्धवनें एकदम आँ केला

"हें काय बरें अवू, भलत्याच वेळीं कसली थट्टा? तू मला सुकातची जागा देत असलीस तर तू माझ्या नावाचा वाटेल तो उपयोग कर तुझा आश्रय असेल तर मी सुकातशीं वाटेल तेव्हा दोन हात करीन."

"That's right. उद्धव, एका अर्थी तुझे मजवर उपकारच आहेत– आणि तितक्यापुरती मी तुझीच आहें बर काय?"

हें वाक्य ऐकल्याबरोबर उद्धव अवतीच्या खुर्चीमागें जाऊन उभा राहिला, व तिच्या केसावर आपले ओठ ठेवून—

ती झटकन् उठली पायात चपला चढवल्या—

"चल जाऊ तुझ्या चोइथरामाकडे?"

"Oh yes."

दोघेंहि निघालीं

"आज College ला बुट्टीस." अवतीनें ठरवलें

तिकडे सुकात University Gardens पर्यंत धाड्धाड् चालत गेला त्या स्थानीं जाऊन पोहचेपर्यंत––

आजच्या आज प्रथम जागा पालटायची, काकाकडून–अवतीचा–अमा एक पैसाहि यापुढें घ्यायचा नाहीं. अवतीचें तोंडहि पाहायचें नाहीं. मुचकुंददरींत–हें काहीं नाहींच जमलें तर–त्या गावीं जाऊन एक खोपट उभारायचें व शेतीभाती करून गावसुधराईचें कार्य हातीं घ्यायचें. काय कुळव्याची

हीन स्थिति आहे! नऊ दशांश लोक उपाशीं मरत आहेत ते संघटनाच्या एकीच्या, सहकार्याच्या अभावीं! आपण जाऊन प्रथम सहकारी चळवळ हातीं घ्यायची—

पण पण—

धोबीतलावाजवळ तो निश्चल उभा राहिला.

पण पण—आपण अवनीपासून निराळे रहातों, तिचें तोंडहि पहाण्यास आपण तयार नाहीं हें सारें काकाना कळलें तर त्याना काय वाटेल? म्हातारपणीं काकाच्या सद्धेतूच्या व सद्ध्येयाच्या नगरीचा भूकंपाने विध्वंस झालेला त्यांच्यानें पहावेल का? ते टचकन् "जग हें कृतघ्न आहे" असें म्हणत प्राण सोडतील—

टचकन् प्राण सोडतील हें मनात येताच सुकांतच्या डोळयातून खळखळ खळखळ अश्रुप्रवाह वाहू लागला. लहान पोराप्रमाणें उजव्या हाताचें मनगट त्यानें डोळयावरून फिरवलें पिंजलेल्या कापसाप्रमाणें त्याचें हृदय उचावू लागलें. डोळे विस्तृत झाले, मानेवरील भाग किंचित् मागें झुकला व तो स्वतःशींच म्हणाला—

"प्राण गेला तरी काकाना असें यत्किंचितही दुःख होऊ द्यायचें नाहीं. म्हातारीं माणसें म्हणजे ताजमहालसारख्या जुन्या भव्य इमारती. त्याचे संरक्षण स्वतःचे अवघे मनोविकार बाजूला ठेवूनच केलें पाहिजे. काकाना मुलगा नाहीं! त्या जागीं आपली स्थापना करण्यात त्याचा तरी केवढा स्वार्थत्याग—बस्स आहे हें असेच चालू ठेवायचे! मात्र अवतीच्या दमडी-लाहि यापुढें शिवायचे नाहीं.

गार्डन्समध्ये बैठक मारल्यावर, काय काय करून आपल्याला पैसा मिळवतां येईल याचा तो विचार करू लागला.

शिकवण्या, रात्रीच्या शाळेत मास्तर—

परळला धोंडबा अवेऱ्याची भेट घ्यायची, परळ भागातील मुचकुंददरी-च्या लोकाची एक संस्था स्थापन करायची, तिथेंच रात्रीच्या शाळेत मास्तर-की करायची व आपला शिक्षणक्रम स्वत.च्या पायावर उभें राहून पुरा करायचा—

आतां मात्र त्याच्या मनाला परिपूर्ण समतोलपणा आला स्वतःजवळ एकदां मोठयानें हसून या एकदर प्रकारचे त्यानें तात्पर्य काढलें व रस्ता धरला.

शृंगार सिनेटोनच्या दरवाज्याजवळून जात असता प्रत्यक्ष चोइथरामनेंच सुकांतला हटकलें. सुकातच्या तो मुळींच ओळखीचा नव्हता. मात्र चोइथराम अवंती–उद्धवमुळे सुकातला आज महिनाभर ओळखीत असे.

"सेट, तुमची फिगर—बस्ट—लय चागला! आमच्या सिनेटोनमदी नट म्हणून व्हायेल काय?"

"नक्कीच. काय पगार द्याल?"

"सबर!"

"ठीक. कधींपासून येवू?"

"उद्या साजे पाच वाजतां या. बांड करून टाकेल उद्यां आ?"

"येतो उद्या बराय."

"अन् सेट, ते उद्धवराव ना? तेनी आमच्यापासून पचीस रुपया घेतला. आन् ते तोंड कसला नाय दाखवीत? ते काय लोफड हाय काय?"

"छेः छेः तो खरोखर चागला माणस हाय. थोडा उत्शृखळ आहे इतकेंच आमच्याच गावचा, आमचा शेजारी!! ते पैसे मी देईन मग तर झालें! तो लोफड बिफड नाहीं हा मुळींच." सुकातनें त्याला बजावलें.

"आन् ते तुमच्या सगेची बाई. ती सिनेमात एक्ट करेल काय?

"छेः छेः ती तर फार श्रीमत आहे. शिवाय ती उच्च कुलीन अशी घरदाज मुलगी आहे."

"असा नै? ठीक ठीक! उध्या येल ना?"

"निश्चित." असे म्हणत सुकात चालू लागला.

चोइथराम आत शिरला.

पाच दहा पावलें गेल्यावर समोरून अवती व उद्धव येत असलेलीं त्याला आढळलीं.

तो नुसतें त्याच्याकडे पाहून हासला इतकेंच!

तीं दोघें शृंगार सिनेटोनमध्यें शिरल्यानें आढळल्यामुळें सुकांत क्षणभर तिथेंच थबकला.

" अवंतीला या सिनेमासृष्टींत ओढण्यासाठींच उद्धवनें पंचवीस रुपये घेतले नसतील ना?" हा विचार झटकन् सुकांतच्या मनांत आला

अवंतीला ताकीद देवून जरूर तर काकांना पत्र लिहिण्याचेंहि सुकांतनें ठरवलें.

नंतर तो तडक खोलीकडे गेला

कॉलेजला जाण्याची वेळ होईपर्यंतही अवंती परतली नव्हती

सुकांत आज प्रथम एकटाच वर्गांत गेला

# १४. अखेर गोत बसलें

फाल्गुन शुद्ध पचमी !

फाग पचमी.

शिमग्याचे नाव ऐकले कीं चट साऱ्या सुशिक्षिताना घाणच घाण वाटू लागायची ! आणि नाताळचें नाव ऐकलें म्हणजे ?

"आनदी आनद गडे, जिकडे तिकडे चोंहिकडे."

पण मी आपणाला निश्चिततेनें सागतों कीं कुळवाडी माळवाडी लोकांच्या शिमग्यात यत्किंचितहि घाण नसते. जिकडे तिकडे मारे खेळकरपणाचें वारें. त्यात बीभत्सपणा नाहीं कीं बेशरमपणाहि नाहीं पहिले दहा दिवस नितात सौख्यानें खेळायचें, होळ्या लावायच्या व पुढल्या पाच दिवसात गावदेवीची सेवाचाकरी व पूजाअर्चा करावयाची.

त्या दिवशींची फागपचमी मात्र मुचकुददरींत नागपचमी ठरली !!

पंड्या पाणकर.

फागपंचमीच्या रात्रीं सारे गावकर जमून आट्यापाट्यानीं खेळत होते. साऱ्या पोरीबाळी जवळच आम्रवृक्षाखालीं बसून त्या क्रीडा पहात होत्या. पड्या, विश्राम व त्याच्याच वयाचे तरुण होळीकरता गवत कवळ आणण्या-करता डोगर धुडाळीत होते. वरडी, कवळाचे भारे घेऊन येत असता पड्याला साप चावला.

"हायस् !" पड्याने केलें व डोकीवरील वरड टाकली.

सपकन् साप बिळात शिरला

"जनावर डसला, थाबा." पड्या ओरडला.

साऱ्या मुलखाचा पड्या चिटवळ ही पड्याची ख्याति असल्यामुळें बाकीच्यानीं तें चेष्टेवारी नेलें व कोणीहि थाबला नाहीं.

पड्या तसाच घराकडे गेला!

तासाभऱ्यानें पड्या कुठें आहे म्हणून हाकाटी झाली.

आता कुठें सर्वांना उमज पडला.

विश्राम वाडीकडे धावला.

आणि सर्वच धावले.

पड्याला रक्ताची उलटी झाली होती.!

साऱ्या वाडीभर आता धावाधाव सुरू झाली. चावल्या जागीं कोंबड्यीं लावण्यात आलीं. एक, दोन, चार, दहा! पण निरुपाय.

बगोबा मास्तर आपला टिनचा चष्मा व अक्कलकोटच्या स्वामींची तसबीर घेऊन आले.

"पड्या, पड्या, पोरा बघ रे एकदा या स्वामींकडे! तुझें वीष पार उतरून जाईल.!"

गावचे शेलके शेलके मंत्री आले.

शिवा न्हाव्यानें ताळूवर फासण्याहि टाकल्या—

पण उजाडायच्या सुमाराला पड्याचा अखेर प्राण गेला.

पड्याला माती देण्यात आली मातीहून परत आलेला विश्राम चिमाच्या ओटीवर बसला.

"चिमा, आपला पड्या म्याला!"

एवढेच शब्द! दोघांचीं हृदयें पिळवटून आलीं. पंड्या पाणकर हा या दोघांचें आश्रयस्थान होतें. समाधानाची एकच्या एक जागा!

"इस्राम, आता मना तुज्याशिवाय दुसऱ्या कुनाचा र आधार?"

चिमा स्फुंदू लागली.

"बाय ग चिपू! रामाण्या आज्याशिवाय आन् तुज्याशिवाय मनाव कोन हाय् दुसरा?" विश्रामहि डोळे पुशीत होता.

"बावा र, आपनाला बेस दिस नायूत!" चिमा

"सारा उलटा व्हत चाललाय." विश्राम

"हुंबईहून कागाद काय काय आले?" चिमा.

"रमाकुन आल्या पत्रात मना ती लिवत्ये कीं चिमाशीं बोलू नुका, तिला

घरात यव घव नुको, बायकोला घ्यवुनशान् ये, घरात नालग, झंव् नि त्यंव!" विश्राम.

चिमा क्षणभर सुन्न झाली.

"घा दिस झाले म्हजी जा मागारी आन् घ्येऊन ये बायकोला. तांच बेस. आन् मार्शी नुकोच बोलू–!" आता चिमा ओक्साबोक्सी रडू लागली.

आता इथें बसणें ठीक नाहीं असें समजून विदिर्ण हृदयानें विश्राम चालू लागला.

× × ×

दहा दिवस गेल्यावर विश्राम आपल्या बायकोला आणण्याकरता राजबा गोठलाच्या घरीं माघारी गेला. शिमग्याचा सण—घरात जेवण करायला, पुंजेची तयारी करायला कोण नाहीं, ह्या सबबीशिवाय दुसरी चागलीशी सबबहि नव्हती. वाडीभर कदाळ अलीकडे सहा महिनेच सुरू होती चिमाचे तात्या हालजाच करी म्हणून ती विसाव्याला विश्रामचा आश्रय शोधी, व विश्रामाला चिमाशिवाय दुसरें विरगुळयाचें स्थळ आता राहिलें नसल्यामुळें मनचें हितगूज तो तिच्याजवळ करी. या पलीकडे नाव ठेवायला कुठलीच जागा नाहीं हें जीव तोडून रामाण्या व इतर कर्ते सवरते गावकरी सागत असता कुणीच जुमानलें नाहीं. खाडक्याची चळवळहि जोराला लागलेली, विश्राम, पड्या, चिमा व रामण्या एवढेच फक्त त्या चळवळीचे शत्रू. (रावजीकाका आणखी दोनचार खोत सोडल्यास) बाकी सर्वजण उठपाय खाडक्याच्या सभाना व थापा ऐकायला पोट बाधून जाऊ लागले होते. आता गावच्या जमिनी आपल्या अगदीं झाल्याच अशीच त्याची खात्री होऊन राहिली होती.

"का व आल्यव?" बसायला पाट पुढें करीत राजबा म्हणाला.

"न्यया आलाय." विश्राम म्हणाला.

चुलीपासून राजबाची बायको कडाडली—

"चिमा हाय ना तुमचें पोट जालाया! थत माजी पोर कशाला."

"सणवार हाय शिमग्याचा, घरांत घव ययाचा!" विश्राम शांतपणानें बोलत होता.

" मग माज्या पोरीला कापून खानार का काय सनासुदीं? लगान् झाल्यापासून पोरीकडे डोळा वर करून तरी पालाव काय? पोरीला जनम् (नहाण) यवून सा म्हयने झाले पर लुगडा हाय, का चोली हाय, का त्येलपानी हाय, का काय हाय? पोर खाडींत लोटली असती तरी ब्येत्तर! श्यनाचे दिवे घेऊन गावभर हिंडा—" राजबाच्या बायकोच्या तोंडाला नुसता ऊत आला.

" हा काय बरी तुमचा भकना? तिलाच इचारा बरी! मी योक सब्दान तिला कदी दुकावला हाय काय? आन तीच माज्या नावान् लग्नाच्या दिसापासून सारके दगाड फोडत्यय का नाय? खोटा बोलेल तो इतल्या इत जनावर चावून मरल. बोलती करा बरी तिला वाइच—!" विश्रामनें शांतपणानेंच फिरून सत्य तेवढेंच सांगितलें.

गुणीहि आता म्हारवी सनईप्रमाणें केकाटूं लागली.

" चिमा राडेच्या म्होर म्होर करायचा आन् मी बोंबाल्ला म्हजी मातर चोर!"

" राडे खरा बोल आता. मी आन ती अशी काहीं येकटिंच तुला उमागलाव काय? आयशी बाप्साला सुमरून सांग." विश्राम उभा राहिला.

गुणीला काहींच उत्तर देता येईना

" आता वाचा का बसली? यका आयशी बाप्साची असशील तर चल माज्या संग घरला. तुला तरास व्हत असल तर याच्या म्होर चिमाशीं म्या सबुदबी नाय फ्यरनार. चल."

कोणी काहींच बोलेना.

" यतीस का नाय?" असें म्हणून बकोटी धरून विश्रामानें तिला बाहेर काढली.

" मारा ठार मारा पोरीला" करून मोठेमोठे हेल काढून राजबाची बायको ओरडूं लागली.

" चाल" म्हणत विश्रामने तिला हातीं धरून ओढीत नेण्याचा सपाटा चालवला. अखेर तो आपल्या घरीं—त्याचें घर दोनशें पावलावरच होतें राजबाच्या घरापासून—तिला घेऊन गेला.

सबंध दिवसभर राजबाच्या बायकोनें वाडीभर कल्लोळ चालविला होता. परंतु राजबानें तिकडे लक्षच दिलें नाहीं

शिमग्याचा सण!

सहा सहा महिन्याच्या फरकानें येणारे हे सण म्हणजे कुळवाड्याच्या वार्षिक जीवनातले दोन महत्वाचे टप्पे. गौरीचा सण हा वाडीवाडींतच केला जातो. प्रत्येक घरची वैयक्तिक गौर! पण शिमग्याच्या सणात गावच्या देवतेची पालखी प्रत्येक घरोघर नेवून पूजा घ्यायची! शिमग्याच्या सणाला सामुदायिकत्वाचेंच महत्त्व फार हा देवीचा सण सर्वच्या सर्व गावानें साजरा करायचा असल्यामुळे प्रत्येक व्यक्ति गर्दीच्या दृष्टीनेंच विचार करीत असते. पंचमीपासून पौर्णिमेपर्यंत होळीच्या कार्यक्रमात, आट्यापाट्या, कसरती, चार चार मण वजनाच्या गोल धोंडी उचलणें व शेवटीं तमाशे व बहुरुपी सोंगें काढणे या गोष्टींना प्रमुख स्वरूप असतें.

मुचकुंददरींत एक हजार माणूस होतें एकंदर गावच्या तिन्ही बाजवाच्या डोंगरावर मोठमोठ्या तीन वाड्या असून मधल्या खोऱ्यात ब्राह्मणवाडी व खाडीकिनाऱ्याला भोईवाडी! देवीचे अखिल कामगार पौर्णिमेच्या दिवशीं नटून सजून हजर व्हायचेच देवळात. प्रत्येक घरवाल्याकडून बारा बलुतेदारांचें स्वतंत्र वेतन बांधून गेलें असल्यामुळें, गावदेवींचीं कार्यें अंगमेहनतीनें पार पाडण्यात कोणीहि बलुतेदार कसूर करीत नसे पौर्णिमेच्या दिवशीं पालखी सजवली जाऊन आत चांदीचे मुखवटे अंगर टाक उभे करून ठेवायचे व नंतर गाव आमंत्रणासाठीं ढोल व निशाण बाहेर पडायचें. साऱ्या गावाला "होम लावायला चला" हें आमंत्रण व्हायचेच मुळीं नेमल्या वेळेला.

दरसाल पिढ्यानूपिढ्या बिनचूक होणारें आमंत्रण. पण प्रत्येकाला "अजून आवतान आला नाय्" म्हणून चुटपुट लागायचीच. सणातील प्रत्येक कार्यक्रम घोळून घोळून उपभोगायचा. पण या वाडींतील लोकांचें यंदा लक्षच नव्हतें. कारण पौर्णिमेच्या दिवशींच पड्याचे दिवसवारे व्हावयाचे होते.

दिवसानिमित्त झाडून सारे कुळवाडी जमले होते.

झाडून सारे कुळवाडी जमण्याचें विशेष कारण म्हणजे राजबा गोठलानें

टाकलेला डाव. गोतातील कित्येक लोकाचीं मनें विश्राम व चिमाच्या संबधीं त्यानें कलुषित करून ठेवलीं होतीं. गोतात त्यानें या दोघाविरुद्ध फिर्याद माडावी व दड वसूल करून मोठी जेवणावळ द्यावी! गोतातल्या फिर्यादीचा निकाल ठरलेला. दड वसूल करायचा व त्या पैशानें सर्वांनीं दारू खाऊन बोकड उडवायचे!

सारें गोत जमलेलें. पड्याचे प्रथम दिवस झाले. दिवसानिमित्त जेवणावळ झाली. मग जमल्या लोकात बोलणीं निघालीं. राजबा गोठलानें चिमाविरुद्ध, विश्रामविरुद्ध सर्व प्रकारची कागाळी माडली. आपल्या पोरीला —गुणीला—हा विश्राम पाळीत नाहीं—पाळणार नाहीं, त्याचीं कारणें काय वगैरे साद्यत भाषण केलें.

गोताच्या म्होरक्यानें विश्रामला उत्तर विचारलें.

कुळवाड्याचें गोत म्हणजे एका काळीं त्यात न्यायदेवतेचें उज्वल स्वरूप नादत असे. लोकशाहीतील सारे सद्गुण त्यात प्रतिबिंबित झाले असावेत. साऱ्या माणसानीं विचार करावा, साऱ्या जणानीं आपलीं मते व्यक्त करावीं, आरोपींनीं उत्तरें द्यावीं व निकाल घ्यावा. पण अलीकडे गोताच्या बैठकीलाहि स्वरूप निराळेंच प्राप्त झालें आहे. बसल्या गोताचा प्रमूख आता सुधारली भाषा बोलण्याचा आव आणतो. शब्दाचे कृत्रिम उच्चार करून तो लोकाना असें भासवतो कीं या कृत्रिम भाषेशिवाय जणू न्यायच होऊ शकत नाहीं. शिक्षाहि ठरलेल्या—

जमल्या गोतासमोर विश्राम आता बचावाचें भाषण करू लागला.

" गोत जमलाय म्हजी ती त गंगा हाय. गोत म्हजी दैव! (गोताला दैवहि म्हणतात) दैवाच्या भाईर मी नाय. माज्या कपाळीं जर दैवाचा ठोका असल तर या दैवाचा तरी कसा चुकणार? व्हयते मामाजी (राजबा गोठल) मातर लय आरोप करतात. त्यातला यकबी खरा नाय. चिमा! चिमा नि मी! आमास्नी धरून द्याया (एका जागीं!) कुन उपाजलाय त्यानें धरावें नी मंग गोतात फिर्याद माडावी. माज्या बायकोला नादवाया मी तयार हाय, पर तिच्या आयशी बापसाना ती घरात व्होवी. शेतीच्या कामाला मानुस व्हतें ना? म्हुन काय तरी बारा भानगडी काढून तिला

घरांत बालगतात. मना भाकरी तुकडाबि घालाया कोन् नाय कांधि शेजाऱ्या-पाजाऱ्यानीं घेली—चिमानच करुनशान् घेली त त्यात दोस काय बरी! दावावा गोतान मना."

"दोष म्हजी लय दोष हाय." एकजण.

"तिच्या बाबाला नाय् ना ता पसद?" दुसरा.

"बालिष्टर खाडक्याच्या नावरशीची ती! आन् चोरा, तुजी कारे थत दाटी!" तिसरा.

"कुट बालिष्टर आन् खापरा तूं कुट?" पाचदहाजण ओरडले.

"मी पर आता देवाला हात जोडून सागताय् की माजी पोर आतां देवाच्या मी हवाली करता. त्यानींच तिचा खाडक्याशीं लगीन हुकींवा." चिमाचा बाप उभा राहून बोलला.

गोताच्या साऱ्याजणाना आता एक नवाच हुरूप आला.

"आना त्या पोरीला हत." सर्वांचे एकमत पडलें.

"चिमा, व चिमा! चिमा ग! अग राडे चिमा!" तात्या चालका उभा राहून ओरडू लागला.

घारीच्या पखाची नुसती झाप ऐकूनच ससाचें हलुवार पोर जसें जागच्या जागीं घायाळ व्हावें तशी अवस्था चिमाची झाली पण तेवढ्यातल्या तेवढ्यात तिनें निवाऱ्याची जागा शोधली. मागल्या दारानें बाहेर पडून तिनें रावजीच्या घराकडे धूम ठोकली.

"जा. बकोट धरून घ्यवून या." गोत ओरडलें.

तात्या गेला. त्याच्या मागोमाग गोतातले आणखी दोघे तिघे गेले.

"नाय वाटता घरात!"

"नाय."

"लयच उडगी पोर दिसत्यय" गोतातल्या कित्येकानीं निकाल दिला.

रामाण्या—तो या वाडींतला म्हातारा—त्याच्यानें आता स्वस्थ बसवेना! तो उभा राहिला व एका खाबाचा आश्रय घेऊन बोलू लागला.

"हा गोतान माडलन् हाय तरी काय? आमची वाडी धुवून टाकायची हाय व्हय! का वसाड करायची हाय! त्या पोरीला हत बोलावताव म्हजी

काय ? ही काय मोंगलाय हाय व्हय ? याच्यामागं नाकातल्या नथींना दोऱ्या बांधुनशान् गोतान पलुन जाणाऱ्या बायकाना आनलान् पर आता ता काल ग्यला दैवान् ता यडपना आता करू नये. गोताला नाय कोन जुमानायचा याच्या म्होरं जावद्या त्या पोरीचा! आन् या इस्त्याचा पर न्हाऊ द्या. ता पोर लय लय शाना हाय. आमच्या उभ्या चतुरशिमेंत तसला पोर नाय. आन् दडखड पाडुनशान् त्याला गावातुन् तुमी पल्वुन् पर लाऊ नुका. हा एकदा सागताय माजा ऐका. मना बसवत नाय म्होर." असें बोलून रामाण्या आपल्या घराकडे निघाला.

दारूसाठीं लाचावलेल्या गोताला तो नकोच होता बैठकींत.

आता गोताचा बोलका पुढारी विश्रामला शिक्षा सागू लागला.

"तूच चिमाला कुटतरी पल्वून् लावलीस! मधी योक भासान बोलूं नुको तवा डोयवर व्हाना (डोकीवर वहाणा) घेउनशान् पयूल्यान् गोताला परदक्षणा घाल बरी"

ही शिक्षा ऐकल्याबरोबर विश्रामच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

"माजा मुडदा केलान् दैवान तरी हा आपुन नाय करनार. हेरिच बालाट घ्यया गोताला हक हाय?" विश्रामनें सडेतोड उत्तर दिलें.

"नाय ऐकत गोताचा?"

"नाय."

"दैवाचा हा गुना व्हतोय."

"व्हऊद्या."

"तुला गोत नुको काय?"

"मना गोत व्हवा पर वाजवी व्हवां. बालाट घेऊन पैशे खानारां गोत मना नुको."

"काय र हा माजोरी पोर." कित्येकजण उद्गारले.

"म मी म्हनताय ता ताच." राजबा बोलला.

"बास ऐक र पोरा, तुज्यावर गोताचा वाळित हाय आजपासून. आन् त्या पोरीवर पर. गोताला दड रुपये साठ तू दे, तवा मोकळा व्हशील!" नंतर तो पुढारी बैठकीला उद्देशून म्हणाला.

"हाय ना हां ग्वताला कबूल?"

"हाय हाय! फक्काड न्याव झाला" सर्वजण उद्गारले.

"पर माशीं एक फुटकी कवडीबि नाय" विश्राम ओरडला.

"त गाव स्वडून जा भीक मागाया." गावकार ओरडला.

विश्रामनें बैठक सोडली.

तो घराकडे गेला.

गोताची गुडगुडी झाली. पानसुपारी झाली. राजबा गोठलाकडून गोतानें दारूला दहा रुपये काढले. गोत उठून गेलें.

× × ×

चिमा जी धावत गेली ती थेट ओटीवर रावजीकाकांचे पाय धरून रडूं लागली.

रावजीकाकाच्या त्या वेळाच्या भावना किती विलक्षण स्वरूपाच्या असतील! एक कुळवाड्याची पोर! आपले पाय धरून रडत बसलेली! तिनें आपलेच पाय का बरें धरले? आपल्या अबूच्याच वयाची, सर्व प्रकारें अबूशीं साम्य असणारी! अबूवर असला प्रसंग आला तर आपण काय करू?

इतक्यात मावशी ओटीवर आल्या.

रावजींनीं हहह करीत त्याना चिमाची हकिकत समजावून सांगितली. मावशींना तें सहन होईना खांडक्याचें व मावशीचें बोलणेंचालणें झालेलें होतें.

"अगो रांडे, तूं खांडक्यांची सून होऊन का नाहीं जात पण!"

"आतां त धरित्रिच फाटली" असें म्हणून चिमा कोंपऱ्यांत तोंड घालून बसली.

खांडक्या हा आपला शत्रू आहे हें रावजीकाका जाणून होते. या शत्रूच्या घरांत आ—आपल्या वाडींतील एक पोर जावी! बर गांवांतच राहावी तर! ती नेहमीं अशी येऊन पाय धरणार. न जाणों पुढें अवतीला—सुकातला—!

पुढचे विचार मनात धावण्यापूर्वीच रावजीकाका ओरडले, "मास्तर, इइइ मास्तर!"

मास्तर डोळे चोळीत ओटीवर आले.

दुपारच्या पुरणाच्या पोळीचे थर मास्तराच्या पोटात सारखे डाचत असल्यामुळें ढेकरावर ढेकरा सुरू झाल्या त्याच्या.

"जा तात्याला बोलवा"

ढेकरत ढेकरत, पोटावरून हात फिरवीत मास्तर निघाले.

"चिमाला आजपासून घरातच बाळगावी!" रावजीकाकाचें मन सागूं लागलें.

"पण मग सुकात—अवतीला काय वाटेल?"

"साऱ्या गावाला काय वाटेल?"

"पण ती आ——"

रावजीकाकाच्या हृदयात कळ आली

ते ओरडले.

धाडकन् पडले

मावशी व चिमा धावून गेल्या.

"काका, काका," मावशींनीं हाक मारली.

मावशी तडक घरात गेल्या. सुठ उगाळून आणली काकाच्या डोळ्यांना काजळाप्रमाणें लावली

नाकातहि घासली.

थोड्या वेळानें 'हु' करू लागले काका.

मास्तर तात्याला घेऊन आले.

दोघेहि भयभीत झाले.

"गुरुमहाराज गुरू, जयजय परब्रह्म सद्गुरू" करीत मास्तर काकांना थोपटू लागले.

"मास्तर, उठा आधीं. अता चिपळूणला जा व पोराना तार करा कीं असाल तसे निघा म्हणून. डॉक्टरना आणा. उठा." मावशी म्हणाल्या. रावजीकाकानीं पाचदहा मिनिटात डोळे उघडले. ते चिमाकडे सारखे पहात

राहिले. जवळच मावशी सचिंत बसल्या होत्या. मास्तर कपडे करून निघाले.

"पाच रुपये देवून ठेवा."

"इतके कशाला?" मावशी कडोसरीच्या किल्या काढीत म्हणाल्या.

"अहो कशाला म्हणजे काय? अवती कुठेंशी शृगार सिनेटोनमध्यें राहते. सुकात दुसरीकडेच कुठेंसा राहतो ना? दोघाना दोन तारा करून ठेवतों, म्हणजे भानगड नको" मास्तर सागत होते

"मरो तें! राडेच्याच्या साऱ्याच भानगडी. म्हणावें काका असेपर्यंत तरी एकमेळानें रहा."

सुकातकडून आलेलीं पत्रें मास्तर चाळू लागले त्यानीं दोन निराळे पत्ते टिपून घेतले ओझरतीं पत्रेंहि वाचलीं. अवतीनें एकोणीसशें पन्नास सालात उडी मारली होती व सुकात एकोणीसशें छत्तीस सालाला चिकटून होता ही गोष्ट मास्तरच्या मनावर आज फिरून बिंबली.

# १५. निघालों परतुन घरट्याकडे

पांचव्या मजल्यावरील पाच फूट उंचीची खिडकी सताड उघडी होती. समोरील पलगाची मच्छरदाणी! बिचारीचा चोळामोळा होऊन वरच्या पट्टीवर लोंबकळत राहिली होती

त्या निद्रालयातील—निद्रालय कीं स्वप्नालय—प्रत्येक वस्तूचा रग—

पडदे, मच्छरदाणी, टेबल क्लॉथस, खोलीच्या भिंती—यच्चयावत् वस्तूचा रंग पिरोजी होता. सारी खोली म्हणजे उची मालाचें एक दालनच!

पलगावर निजलेली मुलगी—

कमरेंत फक्त एक पिरोजी रगाची शॉर्ट होती तिच्या. उशीच्या मृदुलतेंत दोन्ही हाताचे तळवे उताणे ठेवून त्यावर आपलें उत्तमाग तिनें ठेवलें असून तशीच पाठीवर झोंपली होती ती. तलावातल्या तरगवीचींबरोबर हालणाऱ्या कमलाच्या दोन कळ्याप्रमाणें तिचे हृदयाकुर मात्र श्वासोच्छ्वासाबरोबर हालत होते. या अर्धकृष्ण अवयवाकडे, पाहाणाऱ्याचे दुर्लक्ष झालें असतें तर ती मुलगी की मुलगा हें समजण्यासारखें नव्हतें केसाचा बॉब आणि उशागतच्या चारपायीवर सिग्रेटचा डबा, जवळ काड्यांची पेटी.

मार्च महिन्याच्या उन्हाळ्यामुळें तिला प्रथम झोप आली नसावी!

सकाळचे आठ वाजून गेले तरी ती साखर झोंपेंत—पण आली—आलीच जाग तिला.

बसली राहून तिनें आपलें सर्वांग न्याहाळलें त्या अत्यानदात तिनें सिग्रेट पेटवली आणि निळसर धुराच्या अकुराकडे सस्मित नजरनें किती वेळ तरी पहात राहिली.

शेवटच्या भागाचें शूटिंग सपायला काल रात्रीं ८।९ वाजले होते बोलपटाच्या कथानकानुसार नायिकेला शेवटच्या प्रवेशाकरता बॉब करणें भाग

पडलें. बॉबला नायिकेची हरकत नव्हती पण सुकातची हरकत होती. त्या वरून त्याचें, अवतीचें व श्रृंगार सिनेटोनच्या मालकाचें मोठे भांडण झालें त्या भांडणामुळें सुकातनें स्टूडियो सोडला असून तो आपल्या एका मित्राकडे मेडिकल कॉलेजच्या रेसिडेन्सींत झोंपायला गेला होता.

अद्यापहि अवती आपल्या कायेचा मुलाहिजा तपाशीत होती. बॉबमुळें चेहऱ्यात पडलेला फरक हातातील आरसा तिला दाखविला असताना, 'आपण आहों का सुंदर, बॉबमुळें आपली मुखशोभा वाढली कीं कमी झाली, आपली भूमिका मुंबईला चटका लावून सोडणार कीं उपडी पडणार, एक ना दोन हजारों प्रश्न तिच्यापुढें उभे राहू लागले. त्यातच काल रात्रीच्या भांडणातील दुवान्‌दुवा आठवून झालें हें चांगलें कीं वाईट याची ती मनाशीं चाळवा-चाळव करू लागली. सुकात नसला कीं त्याच्याबद्दल आदर, व समोर आला कीं वरचढपणा! हें असें आज वर्षभर चालू आहे. या गोष्टीची कटु जाणीव अचानक मला प्रथम होत आहे! आपण बहकत तर नाहीं ना चाललों? आपल्या या स्वातंत्र्याचा शेवट कुठें होणार? सुकातजवळच्या बेबनावाचा शेवट कशांत होणार? आपणाला या स्थितींत काकांनीं पाहिलें तर—

ती चटकन् उठली व पातळ पेहरू लागली.

वस्त्र पेहरायला सुरवात झाल्यापासून त्या उज्वलांग कायेची होणारी हालचाल एखाद्या मेंग टाकणाऱ्या नागिणीच्या हालचालीपेक्षाहि अधिक चपल व चुणुकदार होती.

अंगात नंतर तिनें बिन बाह्यांचें एक तलम जाकिट चढवलें.

नंतर विजेच्या घंटेला हात घातला.

थोड्याच वेळात बाईसाहेबांकरतां चहा व बटरचॉफ बिस्किटें हजर झालीं.

"मेगी!"

ती एक खिश्चन परिचारिका होती.

मेगीनें वर पाहिलें अवतीचा बॉब पाहून तिला कौतुक वाटलें

मेगी मोठी गोड मुलगी होती झटकन् ती अवतीजवळ गेली.

"तुम्ही जर पुरुषाचे कपडे पेहराल तर चारचौघांसमक्षहि चटकन् मुका घ्यायला मी मागेंपुढें पहाणार नाहीं."

"हहह" करून अंवती हासली.

"मग करू का आजपासून तसले कपडे?"

"हं! साहेबाना सागतें ड्रेपरींतून एक सेट पाठवून द्यायला"

"एकूण तू आज मोठ्या खुशींत आहेस तर? रॉडरिक, फ्रेडरिक, आल्मिडा, डिसौझा — आ, कुणीकुणीटाकलाहे वाटतें प्रेमपाश?"

चहा घेता घेता अवती चौकशी करीत होती

मेगीनें एक मोहक मुरका मारला. गेल्या रात्रीच्या स्मरणानें कानाकडे रक्तानें धाव घेताच हलुहलु गालाचे गोलार्धहि लालीलाल झाले मेगीच्या मनातून गेल्या रात्रीच्या प्रेमप्रसगाची माहिती द्यावयाची होती. पण इतक्यात खोलीबाहेरच्या बोळात बुटाचे आवाज ऐकल्यामुळें ती बाहेर डोकावू लागली.

"शेट आले."

"कोण चोइथराम ना?"

"हो."

मेगी टेबलावरचीं चहापात्रें घेऊन निघाली.

चोइथराम खूबशा वेगानें येत होता. त्याच्या हातात भिंतिपटाच्या काहीं घड्या व दुसऱ्या हातात हस्तपत्रिकाचें पुडकें होतें.

तो धावत धावत, अत्यत अधीर असा खोलींत शिरला.

"साहेब उठला का नाय्?"

अवतीसमोर उभा राहून चोइथराम आता नाटकातले (व्यवहारी) भाषण करू लागला.

"हाय्हाय्हाय्! साला काय मापुक काम केला तुम्ही काल! ग्रीटा गार्बोवाणी जत्रा का तुमच्या नाकपुड्या हाललेल्या दिसतील फिल्ममदीं, तव्हा साली अख्खी मबय् हादरुन् जायल्! तुमी कसा नाय आमाला इकते वरीस नाय गवासले! हे पोस्टग तर बगा!" असें म्हणून अर्धनग्न अवतीचें संपूर्ण चित्र असलेला पोस्टर चोइथरामनें तिच्या हातीं दिला.

अवती तो पहात पहात केवळ मत्रमुग्ध झाली. त्यात चितान्याच्या कसबाबरोबर तिच्या शरीराची विशिष्ट रचनाहि ( Pose ) अत्यंत मोहक

दिसत होती. नंतर तिनें घाईघाईनें हस्तपत्रकेंहि पाहिलीं. स्वतःच्या या कौतुकाखालीं पार खचून गेली ती समाधानानें.

या तिच्या बोलपटाचा अनावरणसमारंभ आणखी दोन दिवशीं होणार असल्याचें या पत्रकावरून तिला आज प्रथमच कळलें.

"हें पहा शेटजी, त्या दिवशीं माझ्या मित्राकरता एक राग "स्वाधिन" करून ठेवा बर का!" अवतीनें सांगून ठेवलें

"तेच्यामदी काय हाय? आमिबी तुमच्याजवळ बसूनशान् तो बोलपट बगेल!"

"एवढें मात्र करू नका हां महाराज!" अवतीनें तडकून इनकार केला. "विनाकारण नाहीं तो बोभाटा व्हायला संधी मिळायची लोकांना! वाईट गोष्ट गृहित धरली जाते, तर चांगला भाग पुराव्यानें शाबिद करावा लागतो."

"एबी सारू बात छे" असें म्हणून चोइथराम खोलीकडे पाहू लागला. त्याच्या चेहऱ्यावर आपल्या बोलण्याचा काय परिणाम झाला हें अवती पाहात होती.

"शेटजी, आपलें चित्र आपण पाहाण्यात तर आनंद असतोच; पण आपलें जीवन, तासादीडतासाच्या अवधींत सांगोपांग गुर्फटविलें असतां, त्यात आपली हालचाल आपण स्वतः पाहात राहाण्यात, केवढा बरें अत्यानंद असेल?"

ही आनंदमीमांसा शेटजीला समजण्यासारखी नव्हती! तो केवळ "लयू लयू म्हजी काय?" एवढेंच डोळे गुरकावित पण चांगल्या हेतूने बोलला.

अवती मात्र या दोन दिवसांवरच्या स्वप्नमोदयांत गढून गेली होती अत्यंत खुशींत येऊन ती स्वतःजवळ हांसली--

तोंच सुकांत धाड्धाड् आत आला.

"ही पहा वरची तार."

अंवतीनें ती हातीं घेतली. एकदा सुकांतकडे ओझरती नजर फेकली व वाचूं लागली.

"Start Both at once Kaka Serious"

Master.

पूर्व बाजूला सुंदर सूर्यप्रकाश असून त्यानें अर्धे आभाळ व्यापलें व मावळत बाजूनें धुळ्याच्या झोतच्या झोत गगनात फवारून झंझावाताबरोबर पूर्व दिशेकडे धावत सुटावे, या दरम्यान, आपण चालत असताना सबंध उभें राहून आल्टून पाल्टून दोन्ही दिशाकडे पहात रहावें! तसेंच अवतीला किती वेळ तरी झालें होतें आता ती डोळे मिटूनच जणू तार वाचत होती! दोन दिवसात ब्रह्मानंद तर आज!

"चल ऊठ तयारी कर." सुकातनें कावऱ्याबावऱ्या सांगितलें.

"आणि तुझी?"

"मी तयार आहें. ती पहा बाहेर बगलथैली."

"म्हजी असा झाला काय्?" चोइथराम विचारू लागला.

अवतीनें न बोलता त्याच्या हातीं तार दिली.

सुकातला ती सलगी या वेळीं मुळींच आवडली नाहीं.

"हे काका म्हजी कोण?"

"माझे वडील."

"मरूदेना म्हातारा! एएए तुम्ही दोन दिवशीं जावा."—

सुकातच्या तळपायाची आग मस्तकाला गेली "या हलकट गुजराथी माणसानें केवळ शृंगार सिनेटोनचा मालक म्हणून, आमच्या पूज्य माणसासंबधीं असें बोलावे कीं काय?"

"गप्प बसा शेट!" सुकातनें त्याला इतक्या करारी मुद्रेनें दरडावलें कीं चोइथराम क्षणभर सर्दच झाला.

"बर तर, आमी जाते" तो तडक खोलीबाहेर निघाला.

अवतीनेंहि त्याला परत बोलावले नाहीं.

मात्र तो फिरून दाराजवळ आला! त्याचेंच त्याला काय वाटले कोण जाणे!

"त्याच्यामधीं अपमान् बिपमान् नाय हां? काय! ते आमी सहज वायद्यावरली बोली बोलून गेले! बरा, आता तुम्ही लोक परत कदी फिरणार?"

"मी पत्रानें कळवीन." अवंतीनें उत्तर दिलें.

"तेंऽऽ जलदी कळवा हा!" चोइथराम गेला.

अवतीनें झटझट कपडे गोळा केले.

सुकांतनें त्याच्या घड्या करून ते होल्डऑलमध्यें ठेवले.

अवतीनें आपलीं इतर सौंदर्यसाधनें एका हात-पिशवींत घेतलीं.

आपली बगलथैली खाकेला मारून हातीं अवतीचा होल्डऑल घेऊन सुकात बाहेर पडला

"अरे तू कशाला सामान उचललेंस? '

"अग चल लौकर! कुलूप लाव."

अवतीनें कुलूप लावलें.

दोघेंहि लिफ्टमधून खालीं गेलीं.

"भाऊचा धक्का!" असा आदेश करीत सुकात, अवती, श्रृंगार सिने-टोनच्या खालीं उभी असणाऱ्या "प्रायव्हेट" मध्यें बसलीं

"काय रुबाब, काय थाटमाट!" रस्त्यानून जाणाऱ्याच्या मनात आलें.

"या सिनेमातल्या × × भारी पिसाळल्या आहेत या मुंबईत!" एका सनातनी मवाल्यानें दुसऱ्या मवाल्याला मोठ्यानें सांगितलें ओरडून.

सुकातनें वाईट तोंड केलें! अवतीनें तिकडे लक्ष नाहीं असें भासवलें.

× × ×

बोटीच्या बदरात रावजीकाकाचा खासगी "पगार" (होडी) आला होता त्याना न्यायला.

सुकात अवती पगारात उतरलीं.

बोटीच्या वरच्या मजल्यावरील लोक कठड्याला टेंकून या दोघाकडे चमत्कारिक कुतुहलानें पहात राहिले! सबंध दिवसभरच त्या नजरेनें ते पहात होते म्हणा!

कुणाला वाटलें हीं नवराबायको आहेत!

आणखी कुणाला वाटलें, सुकातनें या "फटाकडीला" पळवून आणलें असावें!

दुसऱ्या काहीं जणानीं त्याना ओळखलें.

"ती मुचकुंददरींतल्या अभ्यंकराची पोर! कुठल्याश्या गुजराथ्याजवळ असते." एकजण पांढरपेशा.

"छेः हो! ती सिनेमांत असते!" दुसरा

"आणि तो घटिंगण कोण?

"तो चोर त्या खोताचा भाचा. त्याचें—हुः, काय समजलेत?" दुसऱ्या एका पांढरपेशानें सांगितलें

बोटीवर हीं अत्यंत भारदस्त (?) भाषणें चांगलीं अर्धा तास चालू होतीं. हेंच तिकडील भाषण-पावित्र्य

मुचकुंददरीच्या बंदराजवळ जसजसा पगार येऊं लागला तसतसें सुकातचें मन अधीर होऊं लागलें. बाळपणच्या साऱ्या ब्रह्मांडाचा चित्रपट त्याच्या अंतःचक्षूंसमोर हालू लागला तो स्वतःशींच गुणगुणत राहिलाः—

निघालों कोंकण—घरट्याकडे!
लांब लांबच्या क्षितिजावरुनी, भुर्कन जातो पंख हलवुनी
विसरुन जग रोकडें!
निघालों कोंकण—घरट्याकडे—!

अवंतीनें मुचकुंददरींत पाय ठेवल्यापासून "बॉब" संबधीं तिला आतां भयंकर धास्ती वाटूं लागली! तरी तिनें डोक्यावरून पदर घेतला होता! पाउलवाटेनें येणारीं माणसें त्यांना "सांद सबद" घालीत, मात्र अवंतीकडे चमत्कारिक चेहरा करून पहात! जसजशी ती घराजवळ येऊं लागली तों तों तिच्या मनाला काकाबद्दलची हुरहूर अधीक जाचूं लागली

"मला पाहून काका काय रे म्हणतील?"

सुकातनें उत्तर दिलें नाहीं.

अवंतीलाहि आतां फार वाईट वाटलें.

"मीं तुझेंच ऐकायला पाहिजे होतें!" तिनें कबुली जबाब दिला.

"पण आतां काय त्याचें! एवढें कर मात्र अवंती! तुला हात जोडून विनवतों! इथें आल्यापासून मुंबईला जाईपर्यंत आपल्या गाढ प्रेमाचें नाटक सर्वांना पटवून द्यायला मला शक्य ती मदत कर. आपला बेबनाव जर काकांना समजला तर त्यांचें आयुष्य—!

"बरोबर समजतय् मला तू काय म्हणणार ते, त्याला विनति कशाला? मी तेंच ठरवलय्!"

"That will do"

घराच्या पायणीवर दोघें येताच मावशींनीं त्याच्यावरून तादूळ ओंवाळून टाकले.

"काका, आलीं हीं मुलें" म्हणून मास्तर ओरडले

दोघेंहि तडक काकाच्या माच्याशेजारीं गेलीं

सुकातने त्याच्या पायाला हात लावून नमस्कार केला.

अथरुणावरून काका उठले. "या बाळानों" म्हणून त्यानीं दोघानाहि कवटाळलें.

मात्र डोळयातला अश्रुप्रवाह जोरानें सुरू झाला काकाच्या!

"काका, आता तुम्ही चागले बरे व्हाल! आम्ही आलों ना?"

"होय होय!"

अवती मात्र माच्यावरून दूर झाली.

"बर जा आता! आ आ आघोळी करा." ते परत आडवे झाले.

रावजीकाका आजारी असल्यामुळें ही मडळी मुचकुददरींत गेल्याचें उद्धवाला समजल्यापासून त्याला चैन पडेनासे झालें.

"रावजीकाका फार आजारी—!"

"सुकात–अवतीचें लग्न ताबडतोब होण्याचा ते आग्रह धरणार!–आणि तें पार पडलें तर—!"

"आपण जन्मभर कर्जात डुबणार—अवती हातची—हातीं राहिली तरी कर्जाची पैहि सुटणार नाहीं—सुकात मुचकुददरीचा मालक होणार–आणि आपण—?"

सर्वांगाला कुयले लागल्याप्रमाणें उद्धवाच्या मनाचा दाह होऊ लागला.

"एक क्षण या वेळीं फुकट दवडता नये."

"जाताना केन्या गोठलालाहि न्यावें–त्याचा वाटेल तसा उपयोग करून घेतां येईल!"

अवतीच्या बोलपटातील कामामुळें प्रत्येक वर्तमानपत्रानें तिची प्रशंसा

केल्याचे उद्धवानें वाचलें होतें. ते ते सारे अंक जमा करून उद्धव केन्या-सह मुचकुदद्रीकडे निघाला आठ दिवशीं.

सुकात आपल्या घरट्यात आला होता

त्या घरट्याचा विध्वस करायला उद्धव येत होता.

मुचकुददरींतील खोत–कुळाचा सलोखा! खाडक्यानीं त्याला दोन वर्षा-पूर्वी सुरूग लावण्याचें काम सुरू केले. प्रत्यक्ष बत्ती लावण्याकरता तेहि मुचकुददरींत यायला निघाले होते!

अवंतीची मनस्थिती—!

तार करून बोलावण्याइतकी काकांची अवस्था नव्हती असें तिच्या मनानें घेतलें.

"आपण एकदोन दिवसात मुंबईला जायचे—काय हरकत—सुकात येवो अगर न येवो—इथें कसा वेळ जायचा—या गावात जीवनाचा कोंड-मारा करून राहण्यापेक्षा—" आणि खरोखरच तिला या घरट्याबद्दल यत्किंचितहि प्रेम नव्हते.

"काका, तुम्ही आतां बरे अहा ना? मी उद्यां मुंबईस जाणार."

"जाणार?"

"हो."

"छेः छे: मीं आहें तो हहह तुमचें लग्न होऊन जाऊ दे. अगदीं दोन-चार दिवसातला मुहुर्त काढव म्हणून मी हहह सुकातला सागितलें मघाशीं."

"कशाला पण घाई?"

"का? तुझी हहह हरकत आहे का?" काकांचा चेहरा प्रेतवत् झाला होता.

"अ अ अ हो—नई."

"खर काय?"

"हरकत आहे."

काकाच्या डाव्या छातींत जोराची कळ आली म्हणून ते डाव्या कुशी-वर वळले.

अवती वाकून पाहूं लागली.

तोंच डॉक्टर आले व इन्जेक्शनूस सुरू झालीं. नंतर जातां जातां—

"भिण्यासारखें आता काहीं नाहीं बरें! या इंजेक्शननें बरें वाटेल!" आपली सिरिंज परत उकळत्या पाण्यात टाकीत डॉक्टर म्हणाले

"पण हहह नाव तरी काय दुखण्याचें?" काकानीं पृच्छा केली.

"हार्ट डिसीज! जपायला पाहिजे. मला दर आठ दिवशीं बोलवा. आता मी जातों. औषधें देवून ठेवलीं आहेत, शिवाय हे अर्धे डॉक्टर आहेतच तुमच्याजवळ!" डॉक्टर सुकातकडे पाहून म्हणाले.

"काळजी नको ना?" अवतीनें हळूच विचारलें

"हवी नी नको!" डॉक्टर बोलून गेले मोठ्यानें.

तिथे ओटीवर भिंतीला टेंकून मावशी उभ्या होत्या. जवळच घाबरलेले मास्तर होते. त्यानीं एकमेकाकडे पाहिलें.

खालीं पडवींत, मुचकुददरींतील पाचपन्नास कुळवाडी काकाच्या समाचाराकरिता आलेले बसून होते

सर्वांनींच हा डॉक्टर मूर्ख आहे असें ठरवलें. सुकातचीहि तशीच समजूत झाली.

"हहह डॉक्टर! कारण नसताना हहह का घाबरवता हहह या सर्वांना? या औषधाबरोबर थोडें व्यवहारज्ञानाचें हह चूर्ण जवळ बाळगीत चला याच्यापुढें." रानजीकाका म्हणाले.

"तरी माजा काका." रामाण्या आता उभा राहिला. "अव् मास्तर! म्हनताव काय? हा खोत रडया नाय! तुमाला हत काय घाबरवाया बलावला काय? घाबरवाया आमी मोपजना हाव! धीर द्याया तुमी होवेत!! ता सोडून नाय ताच काय्? ब्यस, पर आता या म्होर असा करूं नुगा."

डॉक्टराच्या हातीं मास्तरनीं दोन नोटा दिल्या व ते त्याना पोंचवायला निघाले.

काकानींहि सर्व कुळवाड्याना सागितलें कीं पोरें आल्यापासून आपणाला फार बरेपणा वाटतोय् म्हणून.

कुळें निघून गेलीं

अवतीहि मावशीबरोबर घरांत जाऊं लागली.

"अवू, बस. दोघें बसा समोर."

"हें पहा, मी फार दिवस वाचेनसें नाहीं हहह मला वाटत. माझ्या डोळ्यादेखत तुमचें हह लग्न हह झालें म्हणजे मग मी हह मरायला मोकळा. लग्नाआधीं जर–मी–मी–हहह मेलों–तर, स्पष्टच सांगतों, मला नाहीं वाटत हहह तुमचें मग लग्न होईलसें! अवू तर हहह भलतीकडेच चाललेली दिसत्यय." —

या वाक्याबरोबर अवतीनें आपला डोकीवरला पदर उजू केला.

"हहह म्हणजे या बॉबमुळें नाहीं हहह मी म्हणत! तुम्हाला एकमेकाना आवडल्यावर माझें हह काय म्हणणें असणार? शिवाय मी म्हणतों आतां तुम्ही मुळींच मुबईकडे जायचें नाहीं. आता—निदान् हहह मी पूर्ण बरा होईपर्यंत तर नाहींच नाहीं"

सुकात व अवती काकाकडेच पहात होतीं. सतापलेल्या माजरीप्रमाणें अवतीचा चेहरा 'हुप्प' झाला होता.

"नइ मी जायचा." सुकात म्हणाला.

"बर मृत्युपत्र पाहिलेंस वाचून?"

"पाहिल.!"

"मग?"

"काका, काका, आपण मला मुलापेक्षाहि अधिक वात्सल्यानें वागवलें आहे त्या लेखात! काका, आपण तें बदलून आपली सर्वच्या सर्व मिळकत अवतीला द्या."

"आणि अवतीनें तुझ्याजवळ हहह लग्न केलें नाहीं तर?"

"तर काय? मी उपाशी थोडाच रहाणार आहें? माझ्या मनगटाच्या जोरावर मी कुठेंहि सुखात ससार करीन"

"गप्प रहा सुकात. काका, (अवती आता स्फुदू लागली) तुमची सर्वच्या सर्व इस्टेट कातूच्या नावानें करून ठेवा माझा स्वभाव अगदीं वइट्ट आहे. एवढ्या मोठ्या इस्टेटीची मी धनीण झाल्यावर माझ्या हातून सुकातचा, मावशींचा, सर्वांचा अपमान होत राहील!"

अचूक सत्य तें अवती बोलल्याचे पाहून सुकात स्तिमितच झाला क्षणभर.

इतक्यात उद्धव तेथें येऊन पोंचला. प्राथमिक स्वरूपाची विचारपूस करून तो तिथेंच थबकला.

"उद्धव, वडलाना साग कीं आमचे हहह दहा हजार रुपये दोन दिव सात हहह तयार करा म्हणजे वरचें हहह व्याज मी सोडून देईन! हहह तू पहातोसच आहेस कीं मी हहह मरायला टेकलोंयू! ही रक्कम हहह सुकातची आहे. त्यालाच मिळाली पाहिजे."

"सुकातची रक्कम?" उद्धवानें विचारलें

"हो हो मीं ती त्याला दिली."

"असें का? बरें आम्ही तजविजींत आहोंच. पण काका, आम्हाला जर तूर्त परत करता नाहींच आली रक्कम तर तर पुढे अवूताईना देत जाऊ. ही वसुली त्याच्याकडे सोंपवाना?" उद्धवानें छान डाव टाकला.

"अवतीकडे का नि सुकांतकडे कां नको?"

"सुकातचें न माझें बरें नाहीं."

"कारे बुवा?" सुकातनें ताठ उभें राहून विचारलें.

"कारणें आत्ताच नकोत." उद्धव.

"बोल काय तें. एकदा तोंड विचकलेंस ना? आतां पुरती हहह घाण दिसू दे." काका अर्धवट बसत तक्क्याला टेंकत म्हणाले.

"या गावात त्यानें फार भानगडी केल्या आहेत. ती चिमा का कोणशीशी! अवूताईनाच विचारा ना?" उद्धवानें पुरता स्फोट केला आपल्या दृष्टीनें.

काका अवूकडे पाहू लागले.

"काहींतरी असावें खरें." अवंती बोलली.

डोक्यावर कुणीतरी आइस्क्रीमची प्लेट उपडी केल्याप्रमाणें सुकांत थंड पडला काहीं काळ.

"तुम्ही हवें तें भका, हहह माझा मुळींच विश्वास बसणार नाहीं. ही संशयी कार्टी—अवे, मिळेल त्या पहिल्या मुहूर्तावर तूं सुकांतशीं लग्न केलें पाहिजे. नाहीं होय काहीं एक चालायचें नाहीं. तूं नाहीं म्हणालीस तर हा माझ्या आयुष्यातला शेवटचाच क्षण असें समज. तुझ्याशिवाय मला—

इह--दुसरें पोर--इह--औरस पोर नाहीं. आणि सुकांतशिवाय मला दुसरा जावई पण करून घ्यायचा इहइ नाहीं. तेव्हा बोल? उद्धव! तू घरीं जा व पैशाच्या तयारीला लाग जा"

काकानीं त्याला घालवूनच दिला म्हणाना!

गुह्यात् गुह्य अशा खासगी गोष्टी चालू असता तिथेंच रेंगाळत रहायचा आचरटपणा कित्येक अन्यथा समजस समजले जाणारे लोक करीत असतात. अशा वेळीं 'हड्ड्' करण्यावाचून गत्यंतर नसतें.

"अवंती!" यावेळीं काकाच्या डोळयातून अश्रू वहात होते.

"ओ!"

"तयार आहेस ना लग्नाला?"

"आहे." अवतीचें तारतम्य तीक्ष्ण झालें होतें यावेळीं.

काकांनीं झटकन् तिला जवळ ओढले. अगदीं आपल्या छातीवर तिचें डोकें घेतलें. तीहि स्फुदू लागली. यावेळीं काकाचें अवघें चैतन्य एकवटलें होतें.

"पोरी, पोरी, इहइ तुझ्या त्या दोन अक्षरानीं माझा सारा हृद्रोग पार पळाला. उरातली कळ थाबली. इहइ थज्ये वारे बद होऊन इहइ दमदार ऊन पडलें आहे माझ्या जिवात! जीवन म्हणजे इहइ इच्छित हेतूंचें जाळें पूर्णत्वास नेणें नव्हे का? माझ्या इहइ साऱ्या जगण्याचा सकल्प माझ्या या दोन सशाचें कल्याण झालेलें पाहणें हाच आहे. तो सकल्प आता इहइ जाणार सिद्धीस. आता मी आठ दिवसात इहइ ठणठणीत बरा होतों बघ!"

अवेळीं पडणाऱ्या पावसानें रस्त्यालगतच्या जुनाट वृक्षभारावरला धुरळा पार धुवून जाऊन टकटवित झालेला झुबला सूर्यप्रकाशात तळपूं लागला, त्याप्रमाणेंच काकांचा चेहरा अत्यंत प्रफुल्लित झालेला सुकातला दिसूं लागावा. पण एका जीव कीं प्राण असलेल्या वृद्धाच्या समाधानाकरतां—पांचदहा वर्षांच्या आयुष्य वाढीकरिता-तरुणानीं एवढा त्याग करावा का? आपण करावा का? अवतीनेंहि करावा का?

अवंतीचा त्याग तिच्या स्पष्ट शब्दांतून व्यक्त झाला होता. पण आपला स्वतःचा!

पण स्वतःवर सत्ता—मालकीची सत्ता गाजवणारी अवती, पत्नी म्हणून करून घेण्यांत—

क्षणभर सुकातचें अग शहारलें

पण आता काय? जोखडाखालीं मान घातल्याशिवाय——

वडीलधाऱ्याकरता केला जाणारा त्याग हा एका सस्कृतीचा श्रेष्ठ असा भाग असतोच——

आणि त्याकरताच केवळ सुकातनें मनातल्या मनात लग्नाला कबुली देवून टाकली.

सुकात आपल्या घरट्यात आला होता खरा पण त्या घरट्याला आतून आग लागली होती व तें विझविण्याचें सामर्थ्यहि त्या बेफाम नसणाऱ्या जीवाना नव्हतें.

× × ×

इच्छित हेतु पूर्ण झाल्याचा ताळा रावजींच्या हृदयाला सहन होण्यासारखा नव्हता. हासत हांसत त्यांनीं प्राण सोडला क्षणाभऱ्यात.

कोंकण घरटें विस्कळून त्याची काडी काडी झाली!

आदर्श वाङ्मय प्रकाशन : पुष्प १२ वें

# मार्ग कुठें आहे?

लेखक : विठ्ठल वामन हडप

सध्या हिंदुस्थानात हिंदु-मुसलमानातील जातीय तेढ उभयतामधील जातिनिष्ठ संस्थामुळे व चळवळीमुळे वाढत आहे. व त्यामुळे हिंदु-मुसल्मानातील मध्यमवर्गीय तरुण वर्ग फसून भलत्या मार्गाला जात आहे तो मार्ग चुकीचा कसा आहे, व देशाच्या आणि आपल्या कल्याणाचा खरा मार्ग कुठे आहे, या महान् तत्त्वावर ह्या हृदयस्पर्शी शोकमय कथानकाची उभारणी करण्यात आली आहे

मूस्लिम लीग, हिंदु महासभा, रा स्व संघ, खाकसार वगैरे चळवळीच्या अंतरंगावर विदारक प्रकाश पाडलेला ह्या हृदयस्पर्शी कादंबरीत आढळेल

**सचित्र वेष्टण : पृष्ठें २०५ : उत्तम छपाई**
**किंमत रु. १८८**

# महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४